# भूमिका

## भूमिका

**यशवंतराव चव्हाण**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
जन. जगन्नाथ भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१.

अध्यक्ष
शरद पवार

उपाध्यक्ष
हुसेन दलवाई

कार्याध्यक्ष
अरुण गुजराथी

सरचिटणीस
श.गं. काळे

खजिनदार
डॉ. रविंद्र बापट

विश्वस्त
मोहन धारिया
शिवाजीराव पाटील निलंगेकर
डॉ. निळकंठराव कल्याणी
प्रि.पी.बी.पाटील
राम प्रधान
गुलाम गौस
लक्ष्मण माने

वसंतराव कार्लेकर
ज्ञानेश्वर खैरे
सौ. सुप्रिया सुळे
शासन प्रतिनिधी
शासन प्रतिनिधी

## भूमिका

लेखक
**यशवंतराव चव्हाण**

प्रकाशक / सर्वाधिकार
© **यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई**
जन. जगन्नाथ भोसले मार्ग,
मुंबई - ४०० ०२१

ई बुक प्रथमावृत्ती
२००६

ई बुक निर्मिती
संगणक प्रकाशन,मुंबई
५/६, शांती निवास , संत रामदास रोड,
मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१

विशेष आभार :
**सौ.वेणूताई चव्हाण प्रतिष्ठान, कराड**

## भूंमिका

यशवंतराव चव्हाण

माझे बंधू

**कै. गणपतराव**

यास

तुम्हांला जाऊन तीन वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला;

परंतु तुमची स्मृती

अजून तशीच ताजी टवटवीत आहे.

**अनुक्रम**


१. संसदीय लोकशाही आणि प्रत्यक्ष आंदोलन ११

२. भारताच्या उज्ज्वल भवितव्यासाठी १७

३. भारतीय नागरिकत्वाची आठवण २९

४. राष्ट्राचे सामर्थ्य ३२

५. एकोणिसशे सदुसष्टच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर ३९

६. गृहमंत्रिपदाच्या कसोटीचे वर्ष ४३

७. केंद्र-राज्य संबंधांवर दृष्टिक्षेप ४८

८. भारताची सद्य:स्थिती : एक चिंतन ५३

९. बांधिलकीचे राजकारण ५९

१०. पुरोगामी आर्थिक धोरण ७३

११. भारतीय लोकशाही : एक भविष्यकथन ८५

१२. नवी दिशा ९८

१३. राजकीय समस्यांचा चक्रव्यूह : शोध, वेध आणि भेद १०८

१४. आमचा आर्थिक पवित्रा ११४

१५. नाणे-सुधारणा आणि विकसनशील देश १२२

१६. आजवरच्या वाटचालीमागील माझी भूमिका १२९

१७. अर्थमंत्रिपदाची चार वर्षे : एक ताळेबंद १३३
१८. समाजाभिमुख शिक्षण १४६
१९. राजकीय निर्णय आणि परिवर्तनाची प्रक्रिया १५४
२०. भविष्यकाळाचे अभूतपूर्व आव्हान १६५
२१. परराष्ट्रिय धोरणाची दिशा १७१
२२. परराष्ट्रिय धोरणाची मार्गदर्शक मूलतत्त्वे १७९
२३. अलिप्ततावाद आणि पाचवी कोलंबो शिखर परिषद १८५
२४. जागतिक शांततेचे एकसंध स्वरूप १९७
२५. लोकमताचा कौल आणि त्याचा अर्थ २०७
२६. पक्षावर अभंगनिष्ठा २१०
२७. वर्गसंघर्ष आणि जातिसंघर्ष २२५
२८. जनता सरकारचे परराष्ट्रिय धोरण २३०

**प्रास्ताविक**

'युगांतर' नंतर जवळजवळ दहा वर्षांनी हा माझा तिसरा भाषणसंग्रह प्रसिद्ध होत आहे. मुख्यत: १९६६ ते १९७९ या कालखंडातील काही निवडक भाषणे यात समाविष्ट आहेत. यामध्ये भाषणांबरोबर काही मुलाखतींवर आधारलेले आणि स्वतंत्र असे दुसरे लेखही आहेत. वेगवेगळ्या प्रसंगी विविध विषयांवर व्यक्त केलेले विचार कुठेतरी एकत्रित नोंद झालेले असावेत, हा या पुस्तकाच्या प्रसिद्धीकरणाच्या पाठीमागचा हेतू आहे.

वाचकांच्या सोयीसाठी ही भाषणे किंवा या मुलाखती जशाच्या तशा स्वरूपात शब्दश: न देता प्रकाशकांनी माझ्या संमतीने त्यांचे लेखस्वरूपात रूपांतर आणि संपादन केले आहे.

गेले अर्धशतक मी एका राजकीय पक्षाचा सभासद म्हणून सातत्याने काम करीत आलो आहे व बोलत आहे. या कालखंडातील माझी १९५६ नंतरची काही भाषणे व लेख 'युगांतर' व 'सह्याद्रीचे वारे' यांत प्रसिद्ध झालेली आहेत.

राजकारणाच्या दगदगीच्या आणि धावपळीच्या जीवनात कुठे तरी निवांत बसून आपले विचार कागदावर उतरवण्यास आवश्यक ती उसंत मिळत नाही. तेव्हा प्रसिद्ध झालेले भाषणांचे वृत्तांत, इतर टिपणं व सहजपणे उपलब्ध झालेली भाषणांची टेप-मुद्रितं यांच्या मदतीने हे लेखन तयार केले आहे.

यांतील एक भाषण १९६१ साली 'हेराल्ड लास्की इन्स्टिट्यूट ऑफ पोलिटिकल सायन्स' अहमदाबाद, येथे दिलेले आहे. ते प्रसिद्ध करण्याचे राहून गेले होते. ते मला महत्त्वाचे वाटले, म्हणून 'संसदीय लोकशाही आणि प्रत्यक्ष आंदोलन' या शीर्षकाखाली या पुस्तकात प्रसिद्ध होत आहे. अहमदाबादच्या लास्की इन्स्टिट्यूटने या भाषणाची पुस्तिका प्रसिद्ध केली होती. या पुस्तिकेच्या काही प्रती माझ्याकडे सापडल्या, हा लेख त्या पुस्तिकेचेच भाषांतर आहे.

याच्याशिवाय बहुतेक सर्व भाषणे १९६६ ते १९७९ या चौदा वर्षांच्या पल्लेदार कालखंडातील आहेत. या काळात माझ्या राजकीय जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. मी संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री आणि शेवटी विरोधी पक्षाचा नेता व पार्लमेंटचा सभासद या नात्याने केलेली ही भाषणे आहेत. स्थानांमध्ये आणि कालामध्ये विविधता असली, तरी माझ्या मते या भाषणांमध्ये वैचारिक दृष्टीने अभ्यासकाला एकसूत्रता आढळून येईल, अशी मला आशा आहे.

संरक्षणाचे प्रश्न, देशाच्या ऐक्याचे व स्थैर्याचे प्रश्न, भारताचे कठीण आर्थिक प्रश्न व त्यांची सामाजिक पार्श्वभूमी व त्यांसाठी मूलभूत पुनर्रचनेची आवश्यकता, आजचे राजकारण डोळसपणाने करीत असतानासुद्धा भविष्यकाळाकडे आशेने पाहण्याची सवय, त्यांमधील उद्याचा भारत कसा असावा, वगैरे विषयासंबंधीचे माझे चिंतन या लेखांमधून वाचकांस पाहावयास सापडेल.

१९६७ आणि १९७७ या दोन वेळा झालेल्या हिंदुस्थानच्या सार्वत्रिक निवडणुका ह्या देशाच्या राजकारणाला कलाटणी देणा-या निवडणुका ठरल्या. या दोन्ही निवडणुकांकडे दृष्टिक्षेप टाकून परिस्थितीचे माझे विश्लेषण मी यांत दिले आहे. दहा वर्षांच्या कालखंडानंतर केलेली ही दोन्ही भाषणं असली, तरी यात काही समान वैचारिक दृष्टिकोण नजरेस आल्याशिवाय राहणार नाही. माझा नम्र दावा असा आहे, की अनेक स्थित्यंतरे मी जरी पाहिली असली, तरी मी माझे राजकारण काही वैचारिक स्वरूपाचा दृष्टिकोण ठेवून केले आहे; आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी, की या तऱ्हेचे राजकारण काही मूलभूत विचारसूत्रांच्या आधारेच करण्याचा त्यात प्रयत्न केला आहे.

परिस्थिती व प्रसंग बदलले, तरी एक गोष्ट यातून दिसून येईल, की मी आतापर्यंत ज्या काँग्रेस पक्षात काम करीत आलो, त्या पक्षापासून कधी अलग झालो नाही. सत्तेची अनेक महत्त्वाची स्थाने मी मिळवीत गेलो. परंतु त्यासाठी पक्षनिष्ठेशी कधी खेळ केला नाही. माझ्या पक्षाच्या जीवनामध्ये कसोटीचे जे कठीण प्रसंग आले, त्यांचे राजकारणावर झालेले परिणाम वा प्रतिक्रिया या भाषणांत उमटलेल्या दिसतील. १९६९ साली काँग्रेसच्या जीवनात एक मोठे वादळ निर्माण झाले. या वादळात दोन प्रवृत्ती मुख्यत: दिसून येतात. काही वैचारिक दृष्टिकोणातून काँग्रेसची नवी दिशा घेण्याची ऊर्मी आणि अंतर्गत सत्तासंघर्ष या त्या दोन प्रवृत्ती होत्या.

'बांधिलकीचे राजकारण' हे अखिल भारतीय काँग्रेसच्या फरिदाबाद अधिवेशनातील भाषण व 'पुरोगामी आर्थिक धोरण' हे काँग्रेसच्या मुंबई अधिवेशनातील भाषण, ही दोन भाषणे त्या कालातील राजकारणाची व अर्थकारणाची दिशा दाखवणारी अशी भाषणे आहेत. परराष्ट्रनीती व आंतरराष्ट्रिय आर्थिक पुनर्रचना यांचा विचार करणारी भाषणेही या पुस्तकात आहेत. ज्या कालखंडात मी अर्थमंत्री व परराष्ट्रमंत्री होतो, त्या काळच्या समस्यांचे चित्रण या भाषणांतून सापडेल.

या पुस्तकाचे शीर्षक 'भूमिका' हे ठरविले आहे. याचे कारण ज्या अनेक विषयांवर, जी वैचारिक क्षेत्रे निर्देशित केली आहेत, त्यांविषयी माझी आणि माझ्या पक्षाची काही निश्चित भूमिका होती, त्यात सुसंगतता व एकसूत्रता आहे, असे मला वाटते. ही भूमिका काहीशी स्पष्ट व्हायला या भाषणांचा उपयोग होईल, असे मला वाटते. मराठी वाचकांच्या हाती 'भूमिका' हे पुस्तक देताना माझी एवढीच अपेक्षा आहे, की या सुसंगत भूमिकेची नोंद त्यांच्याजवळ राहील.

१९८० सालच्या निवडणुका ऐन तोंडावर आल्या आहेत. त्यापूर्वी हे पुस्तक तयार झाले, याचा मला आनंद आहे. बदलत्या राजकारणाचे चित्र काय असेल, याची स्पष्ट कल्पना आज कोणालाही देता येत नाही, इतके धूसर वातावरण आज देशात आहे. ह्या निवडणुकीपूर्वी पुस्तक हाती देण्याचा उद्देश असा आहे, की निवडणुकीनंतर होणा-या प्रतिक्रियांपासून ते मुक्त असावे. हे पुस्तक वाचकांच्या हाती देतांना मला अतिशय आनंद होत आहेत.

## १. संसदीय लोकशाही आणि प्रत्यक्ष आंदोलन

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना

'हेरॉल्ड लास्की इन्स्टिटयूट ऑफ पोलिटिकल सायन्स' अहमदाबाद,
या संस्थेत २७ जानेवारी १९६१ रोजी दिलेल्या ग. वा. मावळंकर स्मारक-
व्याख्यानाच्या आधारे.

मी स्वत:ला महात्मा गांधींचा एक नम्र अनुयायी मानतो. अर्थात महात्माजींचे सर्व विचार मी आत्मसात केलेले आहेत, असा दावा मी करू शकत नाही, याचीही मला जाणीव आहे. १९४२ मधील स्वातंत्र्य-आंदोलनाच्या काळात महात्माजींनी घातलेल्या अटींचा भंग ज्या व्यक्तींनी केला, त्यांपैकी मीही एक होतो. त्यावेळी पोलीस माझ्या शोधात होते. मी भूमिगत झालो होतो आणि मला पकडून देण्यासाठी इंग्रज सरकारने बक्षीस जाहीर केले होते.

अगदी अलीकडेच मला एका प्रख्यात पत्रकाराने विचारले,
'ज्या व्यक्तीने १९४२ च्या आंदोलनात भाग घेतला होता, त्याने आता गृहमंत्री झाल्यावर आंदोलनाचा मार्ग अमान्य का समजावा?
मी म्हटले,
'तुम्हांला अपेक्षित असलेला माणूस मीच आहे. मी माझ्या मतांशी प्रामाणिक आहे. आजही पुन्हा त्यावेळची परिस्थिती देशात उद्भवली, आणि कोणत्याही लोकशाही मार्गाने सरकार बदलता येणार नाही, अशी जर माझी खात्री झाली, तर मी १९४२ मध्ये जे काम केले, तसेच पुन्हाही करीन !'

त्यावेळी मी जे काही केले, त्याचा मला मुळीच पश्चात्ताप होत नाही. गांधीजी सांगत असलेल्या मार्गाने आपण जाऊ शकलो नाही, याची खंत मात्र जरूर आहे; पण हे दु:ख वेगळ्या प्रकारचे आहे. भारताच्या स्वातंत्र्यावर गदा आली, तर एक स्वाभिमानी भारतीय नागरिक म्हणून मी माझी जबाबदारी १९४२ मधल्या निर्धारापेक्षाही अधिक कसोशीने पार पाडायला मुळीच कचरणार नाही. परंतु आता आपण संसदीय लोकशाही स्वीकारलेली आहे, आणि म्हणून संसदीय लोकशाहीमधील प्रत्यक्ष आंदोलनाच्या मर्यादा आपण समजून घेतल्या पाहिजेत. कोणताही सिद्धांत

परिस्थितिनिरपेक्ष नसतो. कोणताही राजकीय किंवा आर्थिक सिद्धांत कोणत्या परिस्थितीत अनुसरला जात आहे, हे अत्यंत महत्त्वाचे असते. म्हणून भारतातील आजच्या परिस्थितीत कोणते तत्त्व वा सिद्धांत स्वीकारायचा, याचा विचार व्हायला हवा, असे मी मानतो.

संसदीय लोकशाहीची काही वैशिष्ट्ये आहेत. विशेषता ही, की संसदीय लोकशाहीत कायद्याचे राज्य असते. दुसरे असे, की या लोकशाहीत विशिष्ट कालावधीनंतर प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वावर निवडणुका होत असतात. आणखी महत्त्वाची विशेषता ही, की संसदीय लोकशाहीत जनतेला विचारस्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य असे काही मूलभूत अधिकार असतात. या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यासाठी स्वतंत्र न्यायसंस्था असते. संसदीय लोकशाहीमध्ये सरकार बदलता येते. एका निवडणुकीत बहुमत मिळविलेला पक्ष, पुढच्या निवडणुकीत पराभूत होऊ शकतो. विधिमंडळात वा संसदेत निवडून जायची कोणत्याही व्यक्तीला मुभा असते. ज्या व्यक्तीचे बहुमत होते, त्याचे सरकार अधिकारावर येते. सर्व प्रौढ नागरिक मतदान करू शकत असल्यामुळे त्यांना पाहिजे तसे सरकार अस्तित्वात येऊ शकते. मतदारावर कोणतेही दडपण येऊ नये, म्हणून मतदान गुप्त पद्धतीने होते. या सर्व गोष्टी ध्यानात घेतल्या, म्हणजे संसदीय लोकशाहीत मतपरिवर्तनाला भरपूर वाव असतो, हे स्पष्ट होते. ज्या प्रकारच्या संसदीय लोकशाहीचा भारतामध्ये प्रयोग होत आहे, तो सा-या जगाच्या इतिहासात अपूर्व आहे, असे मला वाटते आणि या गोष्टीचा मला अभिमान वाटतो.

मग प्रश्न असा निर्माण होतो, की अशा लोकशाहीमध्ये प्रत्यक्ष आंदोलनाला स्थान असावे, की नसावे? व्यक्तिगत आणि सामुदायिक गाऱ्हाणी दूर करण्यासाठी कोणी शांततामय आंदोलन केले, तर त्याला हरकत घेण्याचे कारण नाही. परंतु कायदेभंगाच्या हेतूने जी आंदोलने संघटित केली जातात, त्यांचा वेगळा विचार व्हायला हवा. संसदीय लोकशाहीमध्ये कायद्याचे राज्य असल्यामुळे, कायदा मोडण्याच्या उद्देशाने करण्यात येणा-या प्रत्यक्ष आंदोलनाला तेथे कोणतेही स्थान असता कामा नये. कारण त्यामुळे कायद्याचे राज्यच संपुष्टात येईल.

आपल्या देशात वारंवार आंदोलने होत असतात, त्यांचे मी चार वर्ग करू इच्छितो. नैतिक संतापातून जन्म पावणारी आंदोलने पहिल्या वर्गात येतात. अशा आंदोलनांत लोकांच्या संतापाला तसेच काही तरी कारण घडलेले असते. त्याचे एक उदाहरण सांगतो. कोणी एक फकीर मुलांना पळवून नेतो, अशी बातमी पसरताच लोकांनी त्याला शोधून काढले व रागाच्या भरात ठार मारले. अशा घटनांबाबतचा लोकांचा राग मी समजू शकतो. परंतु त्यांनी कायदा स्वत:च्या हातात घेता कामा नये. गुन्हेगाराला त्यांनी कायद्यापुढे खेचले पाहिजे. लोक स्वत:च एखाद्याला शिक्षा करू लागले, तर देशात कोणती परिस्थिती उद्भवेल, याची कल्पना करणे अवघड नाही. काही विशिष्ट धार्मिक, जातीय वा आर्थिक कारणांमुळे लोक संतप्त होतात आणि आंदोलने सुरू करतात. ही दुस-या वर्गातील आंदोलने होत.

तिसरा वर्ग सरकारच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी आयोजित केल्या जाणा-या आंदोलनांचा.

चौथा आणि शेवटचा वर्ग राजकीय वा सामाजिक आंदोलनांचा.

लोकांचे जीवनमान सुधारावे, यासाठी प्रचलित अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था बदलावी, ही मागणी न्याय्य आहे, याबद्दल वाद नाही. लोकांचे शोषण थांबले पाहिजे, उत्पन्नांतील तफावत कमी झाली पाहिजे, प्रत्येकाला आपला विकास करण्याची समान संधी लाभली पाहिजे, अशी मागणी करण्यात काहीही गैर नाही. वर्गविरहित आणि शोषणमुक्त समाज हा आपण आदर्श समाज मानतो. परंतु असा समाज अल्पावधीत निर्माण करण्याची काही लोकांना घाई झालेली असते. ते काहीही करायला मागेपुढे पाहात नाहीत. कायद्याने समाज-परिवर्तन होणार नाही, असे ते गृहीत धरूनच चाललेले असतात.

काही लोक असा प्रश्न करतील, की गांधीजींनी नव्हती का प्रत्यक्ष आंदोलनाची हाक

दिली? म्हणूनच गांधीजींची जनआंदोलनाची कल्पना आपण नीट समजावून घेतली पाहिजे. कारण भारतात प्रत्यक्ष आंदोलनाचे पहिले प्रवर्तक गांधीजीच होते. मी तर असे मानणारा आहे, की सत्याग्रहाची कल्पना गांधीजींची आधुनिक जगाला लाभलेली फार मोठी देणगी आहे. परंतु त्याचबरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे, की गांधीजी आपल्या आंदोलनाला सत्याग्रह म्हणत असत. गांधीवादी सत्याग्रह हे केवळ सामुदायिक आंदोलन नव्हते. गांधीजी साध्याइतकेच साधनालाही महत्त्व देत असत. दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्यापासून ते जीवनाच्या अखेरपर्यंत गांधीजींनी अनेक सत्याग्रह केले. त्यांचे बलिदान, हाही एक सत्याग्रहच होता, असे मी म्हणेन.

भारताच्या फाळणीनंतर देशात धार्मिक विद्वेष उफाळून आला होता. सा-या देशभर ते विष पसरले होते. गांधीजींच्या हौतात्म्यामुळे देश एका भयानक विनाशातून वाचला. त्यांच्या हत्येच्या भयानक संकटामुळे आपल्याला आपली चूक कळून आली. गांधीजींनी सत्याग्रहाला काही व्यावहारिक आणि काही तात्त्विक मर्यादाही घालून घेतल्या होत्या. १९२० मध्ये त्यांनी आपला सत्याग्रह एकदम मागे घेतला. असे धाडस दुस-या कोणत्याच नेत्याने दाखविलेले नाही. केवळ गांधीजींसारखा महात्माच असा निर्णय घेऊ शकतो. १९४२ मधील 'भारत  छोडो' आंदोलन सुरू करण्यापूर्वी गांधीजींनी एक नवे सत्याग्रही आंदोलन सुरू केले होते. जुलमी कायदा मोडणे हा लोकांचा मूलभूत अधिकार आहे, असे गांधीजी मानत असत; परंतु त्याचबरोबर ते आपल्या सत्याग्रहाची मर्यादाही आखून घेत असत. कायदा तोडायला निघालेल्या माणसाला कायद्यासंबंधी आदर वाटला पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. मिठावरील कराचा कायदा तोडायला निघालेल्या माणसाने दुस-या कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करता कामा नये, यावर त्यांचा कटाक्ष असे. ही अट प्रत्येक सत्याग्रहीला पाळावी लागे.

त्यांची वैयक्तिक सत्याग्रहाची कल्पनाही प्रतीकात्मक होती. अन्याय सहन करायचा नाही, ही त्यामागची भूमिका होती. म्हणून 'सरसकट सर्व कायदे मोडा', असे गांधीजींनी कधीही सांगितले नाही. कायद्याची प्रतिष्ठा हा सार्वजनिक जीवनाचा

आधारस्तंभ घटक आहे, असेच ते म्हणत असत. म्हणून ज्यांना प्रत्यक्ष आंदोलनाचा मार्ग स्वीकारावासा वाटतो, त्यांनी गांधीजींची कायद्याच्या राज्यावरील ही निष्ठा विचारात घेतली पाहिजे.

प्रत्यक्ष आंदोलन कधीच समर्थनीय ठरणार नाही किंवा जनआंदोलने ताबडतोब थांबविण्यात आली पाहिजेत, असे मला मुळीच म्हणायचे नाही. सरकारच्या धोरणाबाबत वा कार्यक्रमाबाबत आपले मत व्यक्त करण्याचा लोकांना जरूर हक्क आहे; परंतु तो हक्क बजावताना कायदा मोडायची भूमिका घेतली जाता कामा नये. हरताळ पुकारण्याचा तर कामगारांना कायद्यानेच अधिकार दिलेला आहे. लोकांची गाऱ्हाणी वा अडचणी मांडण्यासाठी काढण्यात येणा-या मोर्च्यांना मी कधी कमी लेखलेले नाही. अशा मोर्च्यांचे म्हणणे सत्ताधीशांनी ऐकून घेतलेच पाहिजे. नव्हे, ते त्यांचे कर्तव्यच आहे.

एखाद्या घरात कुटुंबप्रमुख आणि कुटुंबीय यांचे जे नाते असते, ते शासक आणि जनता यांच्या दरम्यान असावे, असे मी मानतो. आपण निवडून दिलेले सरकार कसे काम करीत आहे, यासंबंधीची बरीवाईट मते लोकांनी मांडलीच पाहिजेत. परंतु कुटुंबप्रमुखच मान्य नाही, अशी भूमिका घरात घेऊन चालणार नाही. त्याप्रमाणे आम्ही सरकार मानतच नाही, असे लोकांनी म्हणता कामा नये. कुटुंबप्रमुखाचा अधिकार सरकारपाशी असतो. कुटुंबप्रमुखाप्रमाणे सरकारही लोकांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून देऊ शकते. परंतु हे सारे काम एकमेकांच्या विश्वासाच्या भावनेने व्हायला हवे. सरकारपुढे आपण आपली अडचण मांडली, तर तिचा विचार केला जातो, ती दूर केली जाते, असा लोकांनाही सरकारबद्दल विश्वास वाटायला हवा. कायद्याचा भंग होणार नाही, एवढी दक्षता लोकांनी घेतली, की मग त्यांच्या आंदोलनाबाबत कोणताच आक्षेप उरत नाही. जनतेला इतर बरेच अधिकार असले, तरी कायदा स्वत:च्या हातात घेण्याचा वा कायद्यासंबंधी बेपर्वाई दाखविण्याचा अधिकार तिला नसतो.

संसदीय लोकशाहीत जनतेची जशी जिम्मेदारी आहे, तशीच सरकारचीही एक जिम्मेदारी आहे. एखादे सरकार कितीही लोकोपयोगी कार्य करीत असले, तरी त्याने विशिष्ट मुदतीनंतर नव्या सरकारसाठी जागा खाली करायला तयार असले पाहिजे. लोकशाहीत कोणताही प्रामाणिक पक्ष दुस-या प्रामाणिक पक्षाकडून पराभूत झाल्याबद्दल दु:ख करणार नाही, असे मी मानतो. येथे मी मुद्दामच 'प्रामाणिक पक्ष' असा शब्दप्रयोग केलेला आहे. संसदीय लोकशाहीवर ज्या पक्षाची खरोखरच श्रद्धा आहे, तोच पक्ष लोकशाहीत 'प्रामाणिक पक्ष' ठरतो. ज्या देशात साम्यवादी पक्षाची सरकारे आहेत, तेथे असे सत्तांतर घडून येत नाही. यावरून त्यांची लोकशाहीसंबंधीची निष्ठा कळून येते.

आमच्या पक्षाने केरळमधील साम्यवादी सरकारविरुद्ध प्रत्यक्ष आंदोलन संघटित केले होते. त्यामागचे कारण समजावून घेतले पाहिजे. एका अपवादात्मक परिस्थितीमध्ये संसदीय लोकशाहीतही प्रत्यक्ष आंदोलन समर्थनीय ठरते. लोकशाहीच्या मार्गाने सत्तेवर आलेले सरकार जर संसदीय संकेत गुंडाळून ठेवू लागले, तर अशा सरकारला सत्तेवरून दूर करण्यासाठी प्रत्यक्ष आंदोलन उभारण्याची गरज निर्माण होते. सरकारने संसदीय लोकशाहीचे संरक्षण केले पाहिजे, म्हणून जर एखादे सरकार सत्तेचा दुरुपयोग करून लोकशाहीची मूल्ये नष्ट करू पाहील, तर त्या सरकारविरुद्ध प्रत्यक्ष आंदोलनाशिवाय अन्य मार्गच उरत नाही.
आणखीही एका परिस्थितीत प्रत्यक्ष आंदोलनाला स्थान आहे. त्याचे एक उदाहरण देतो. ब्रिटिश सरकारच्या अण्वस्त्राबाबतच्या धोरणाला विरोध करण्यासाठी बर्ट्रांण्ड रसेल यांनी शंभर लोकांची समिती स्थापन केली अन् तिच्या मार्फत आंदोलन सुरू केले. अण्वस्त्राची निर्मिती मानवजातीवरील फार मोठे संकट ठरणार आहे, या भूमिकेतून ही समिती आणि तिचे आंदोलन जन्माला आले. या आंदोलनामागची भूमिका विशाल मानवतावादी होती. या समितीने जो मोर्चा काढला, तो शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध होता. या आंदोलनाचे प्रवर्तक बर्ट्रांण्ड रसेल आपले निवेदन सरकारी कचेरीवर लावण्यासाठी हातोडी आणि खिळे घेऊन गेले होते. परंतु निवेदन

ठोकण्याऐवजी चिकटवावे, असे काहीजणांनी सुचविताच, रसेलनी तसे केले. आपला हट्ट पुढे रेटला नाही. ही बाब लहान असली, तरी आंदोलन करणारे लोक कोणत्या प्रवृत्तीचे होते, हे यावरून फार चांगले समजून येते.

थोडक्यात सांगायचे, तर संसदीय लोकशाहीमध्ये प्रत्यक्ष आंदोलनांना म्हणजे कायदेभंगाच्या चळवळींना स्थान असता कामा नये, असे सर्वसाधारण म्हणता येईल. मात्र दोनच अपवादात्मक परिस्थितींत हा मार्ग समर्थनीय ठरतो. एक, जेव्हा सरकार स्वत:च संसदीय लोकशाही नष्ट करीत असेल, तेव्हा; आणि दुसरी परिस्थिती, संपूर्ण मानवजातीचे भवितव्य धोक्यात येईल, तेव्हा. प्रत्यक्ष आंदोलनाच्या कार्यक्रमाला लाभलेल्या तात्त्विक मर्यादांचा या दोन असाधारण परिस्थितींतच फेरविचार करणे अपरिहार्य ठरते.

## २६. पक्षावर अभंग निष्ठा

'केसरी' १२ नोव्हेंबर १९७७ मधील लेखाच्या आधारे.

हिंदुस्थानची सर्वांगीण बांधणी करण्यासाठी प्रतिज्ञाबद्ध असलेल्या काँग्रेस पक्षाचे सध्याचे स्वरूप हे निश्चित धोरण आणि निश्चित कार्यक्रम स्वीकारलेला, अखिल भारतीय स्वरूपाचा एकसंध पक्ष, असे आहे. संसदेत आणि संसदेबाहेर काँग्रेस पक्ष आज विरोधी पक्षाची भूमिका बजावीत आहे.

स्वातंत्र्यसंपादनानंतर पक्षाच्या धोरणाची आणि कार्यक्रमाची दिशा निश्चित करून काँग्रेसने गेली तीस वर्षे राज्यकारभार केला. स्वातंत्र्यपूर्व काळातील आणि स्वातंत्र्योत्तर काळातील प्रेरणा आणि अनुभव यांतून पक्षाची धोरणे आणि दिशा निश्चित झालेल्या आहेत. सर्वसामान्य जनतेच्या संसदेत हा पक्ष आज विरोधी पक्ष

म्हणून काम करीत असला, तरी धोरणे आणि कार्यक्रमाची दिशा यांपासून तो मुळीच विचलित झालेला नाही. होऊ शकणार नाही.

स्वातंत्र्यलढ्याच्या काळात काँग्रेस ही बहुसंख्य जनतेशी एकरूप झाली होती. समाजोपयोगी कार्यक्रमाच्या आधारे नंतरच्या काळातही बव्हंशी हीच भूमिका टिकून राहिली. कार्यक्रमावर आधारलेल्या कार्यामुळे गेली पन्नास-पाऊणशे वर्षे, 'एकजीव, प्रवाहित पक्ष', असे या पक्षाचे स्वरूप बनलेले आहे. या पक्षाच्या पिढ्यांमागून पिढ्यांचा जो इतिहास आहे, त्यामध्ये प्रत्येक पिढीनंतर नवा विचार उदयाला येत राहिलेला असून विचाराचा नवा धागा पकडून पक्षाने देशाला नवा कार्यक्रम व नवी दिशा दिली आहे. माणसांच्या मनात उत्साह निर्माण करून त्यांना उज्ज्वल भवितव्याकडे खेचण्याचे कार्यच या पक्षाने केले आणि त्याच्या जोडीला प्रागतिक धोरणांचा आणि कार्यक्रमाचा पक्का पाया तयार केला.

विरोधी पक्ष म्हणूनही काँग्रेसला जिद्दीने, आत्मविश्वासाने हेच ऐतिहासिक कार्य पुढे करावयाचे आहे. त्याच भूमिकेतून संसदेत हा पक्ष कार्य करीत आहे. माझी मूलभूत धारणा अशी आहे, की धोरणाच्या आणि कार्यक्रमाच्या निश्चित दिशा असलेल्या काँग्रेस पक्षाने संसदेत व बाहेरही विधायक 'पर्यायी पक्ष' म्हणून काम केले पाहिजे. जिद्दीने, आत्मविश्वासाने आणि लोकशाहीला शोभायमान ठरणा-या प्रतिष्ठेने हे काम करावयाचे आहे.

'पर्यायी पक्ष', म्हणून काँग्रेसची लोकमानसात प्रतिमा तयार व्हावयाची, तर पक्षाची एकजीव संघटना अधिक भक्कम करणे, लोकशाहीची प्रतिष्ठा व शक्ती वाढेल, अशा विचारानुरूप प्रत्यक्ष कार्य करणे आणि त्यासाठी येणा-या सर्व अडचणी ओलांडून डोळ्यासमोर फक्त सामान्य माणूस आणि त्याचे हित व राष्ट्राचे भवितव्य एवढीच उद्दिष्टे ठेवून प्राणपणाने कार्य करीत राहणे, हेच विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसचे कार्य राहील. देशहित साधणे, सामाजिक आणि आर्थिक विषमता दूर करणे, परराष्ट्रिय धोरणात अलिप्ततेचा अवलंब करणे आणि देशांतर्गत स्वयंपूर्णता प्रस्थापित करणे

अशा कोणत्याही कसोटीवर काँग्रेस पक्ष हा 'पर्यायी पक्ष' बनू शकतो, हे मान्य करावे लागेल. योग्य क्षण येताच स्वत: सरकार बनविणे आणि आपल्या धोरणांची मांडणी त्या पद्धतीने करणे हे काम विरोधी पक्षाला करावेच लागते. संसदीय प्रथांची प्रतिष्ठा ठेवून, पण काहीशा आक्रमक पद्धतीनेच हे काम काँग्रेस पक्षाला करावे लागणार आहे.

पर्यायी पक्षाची भूमिका यथायोग्य रीतीने पार पाडावयाची, तर त्यासाठी विरोधी पक्षाजवळ संसदीय कामकाज, राज्यकारभार, प्रशासन इत्यादि आवश्यक विषयांवर अभ्यासपूर्ण आणि नेमकेपणाने विचारांची मांडणी करू शकतील, असे विशेष प्रवक्ते असावे लागतात. ब्रिटनमध्ये असे विशेष प्रवक्ते नियुक्त करण्याची त्यांची नवी पण परिणामकारक प्रथा आहे. भारताचा विचार करताना अलिकडील काळात या देशातील प्रश्नांची गती आणि गुंतागुंत वाढली असल्याचे आढळते. यांतील काही प्रश्न स्वतंत्रपणे हाताळावे लागणार असल्यामुळे केवळ त्यासाठी अभ्यासू प्रवक्ते तयार करावे लागतील. पर्यायी पक्षाचे शॅडो कॅबिनेट तयार व्हावयाचे, तर अशा अभ्यासू प्रवक्त्यांमधूनच ते आकाराला येऊ शकते.

देशांतर्गत प्रश्न सोडविण्याची ताकद काँग्रेस पक्षामध्ये आजही शाबूत आहे. हे प्रश्न सुटण्यासाठी काँग्रेसने आजवर जी वाटचाल केली, तीतून ही ताकद पक्षाला मिळालेली आहे. या ताकदीचा वापर पुढच्या काळात करीत राहून लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे आणि त्यासाठी जनतेशी असलेला जागता व जिव्हाळ्याचा संपर्क कायम ठेवणे, वाढवीत राहणे, यालाच मी काँग्रेसचा कार्यक्रम म्हणेन. देशासमोर असलेले महत्त्वाचे व मूलभूत प्रश्न आर्थिक आणि सामाजिक स्वरूपाचे आहेत. वर्षानुवर्ष या प्रश्नांशी काँग्रेस झुंज घेत आहे आणि यापुढेही तिला ती घ्यावी लागणार आहे. देशाच्या आर्थिक-रचनेत बदल आणि उत्पादन-पद्धतीत क्षमता वाढवून बहुसंख्य लोकांना रोजगार मिळण्याची व त्यांच्या किमान गरजा भागविण्याची व्यवस्था करणे याला अग्रक्रम दिला आहे. आर्थिक क्षेत्र, तंत्रज्ञानाचे क्षेत्र, उद्योग, शेती, आधुनिक विज्ञान, शिक्षण अशी जी महत्त्वाची क्षेत्रे आहेत, त्यांमध्ये

कोणत्याही कारणासाठी परावलंबन राहणार नाही आणि त्याचबरोबर देशाच्या ज्या मूलभूत गरजा आहेत, त्या पूर्ण करून सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक असणारी शक्ती आपण निर्माण करू शकतो, याचे प्रत्यंतर काँग्रेस पक्षाच्या गेल्या तीस वर्षांतील धोरणात्मक निर्णयाने आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीने आणून दिले आहे. देशांतर्गत प्रश्न सोडविण्याची ताकद काँग्रेस पक्षात निश्चित आहे, अशी खात्री मी त्यामुळेच व्यक्त करू शकतो.
मूलभूत विचार असा आहे, की ज्या राष्ट्राजवळ आधुनिक तंत्रज्ञानाची भरभक्कम सामग्री असते, तेच राष्ट्र जगात श्रेष्ठ ठरते. बदलत्या गतिमान दुनियेत ज्या राष्ट्राने ही तंत्रज्ञानाची अमोघ शक्ती प्राप्त करून घेण्याचे, वाढविण्याचे सामर्थ्य संपादन केलेले असेल, ते राष्ट्र किंवा तो देश, संरक्षण दृष्ट्या व आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर राहू शकतो. आत्मनिर्भरता निर्माण होण्यासाठी सरकारला तसे धोरण ठरवावे लागते. कार्यक्रमाची दिशा निश्चित करावी लागते. जनता पक्षाच्या सरकारवरची टीका या संदर्भात ही आहे, की या सरकारला काही दिशाच नाही.

आर्थिक रचनेप्रमाणेच, सामाजिक रचनेचा प्रश्नही माझ्या दृष्टीने तितकाच किंबहुना अधिक महत्त्वाचा आहे. ऐतिहासिक कालापासूनचा मागोवा घेतला, तरी दिसते, ते असे, की सामाजिक विषमता ही भारताच्या रोमरंध्रांत भिनलेली आहे. या सामाजिक विषमतेचे खरे कारण आर्थिक विषमता हे आहे. या दोन्हींची सरमिसळ इतकी झाली आहे, की आर्थिक दृष्ट्या वरचढ असणारा वर्ग हा पुढे पुढे सामाजिक अर्थानेही वरचढ ठरत राहिला आहे. शतकानुशतके येथे हे असेच चालले आहे. हा उच्च, हा कनिष्ठ, हा पहाडात राहणारा, हा समुद्रकाठी राहणारा, हा म्हणे, मैदानात राहणारा, एक स्पृश्य, तर दुसरा अस्पृश्य असे फरक भारताच्या इतिहासाच्या सर्वच कालखंडांत पाहावयास मिळतात. कोण, कुठे, कसा राहतो, यावरूनच त्याची सामाजिक प्रतिष्ठा जोखावयाची, ही आपली परंपरागत पद्धती. सामाजिकदृष्ट्या समाज एकजिनसी व एकबद्ध असल्याचे चित्रच उपलब्ध नाही. सामाजिक समतेचे अपेक्षित चित्र त्यासाठी कायदे करून निर्माण करता येईल का? मला वाटते, कायदा यासाठी फार तर साहाय्यभूत ठरेल. सामाजिक एकजिनसीपणाचे चित्र ख-या अर्थाने

निर्माण करावयाचे, ते भारतीय माणसांनी आपल्या कृतीने व विचारानेच निर्माण केले पाहिजे. सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत सारख्याच निष्ठेने प्रतिज्ञापूर्वक प्रयत्न केले, तरच हे शक्य होणार आहे.

काँग्रेस कार्यकर्त्यांना आता हाच एक कार्यक्रम स्वीकारावा लागेल. हरिजनांना आता पुन्हा एकदा वेठबिगार म्हणून बांधले व राबवले जात आहे. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी भूमिहीन हरिजनांना जमिनीचे वाटप केले. परंतु जमिनी ताब्यात आल्यावर त्या जमिनीचे संरक्षण करणे यांना अशक्य होऊ लागले आहे. बेघराला घर दिले, भूमिहीनांना, दलितांना, हरिजनांना जमीन दिली, तरी घरांचे आणि जमिनीचे रक्षण करण्यासाठी त्यांना कसलेही साधन नाही, कुणाचे सहकार्य नाही, किंवा पाठबळ नाही. हरिजन व गरीब शेतकरी याला जीवन जगता येणार नाही, जिवंत राहता येणार नाही, असे वातावरण वरिष्ठ वर्ग म्हणविणारे तयार करीत आहेत. उत्तर प्रदेश, बिहारमध्ये तर या वरिष्ठ वर्गांच्या अत्याचाराने कळस गाठला आहे. अन्न, पाणी आणि हवा या माणसाच्या कमीत कमी गरजा. यांपैकी गरिबांना, हरिजनांना जमिनीवरून हुसकावून लावून त्यांना अन्नापासून वंचित केले जात आहे. पाणी हे तर निसर्गाने दिलेले साधन. परंतु माणसांत, जाती-जातींत, फरक करून हरिजनांना पिण्याच्या पाण्यापासून दूर हाकलले जात आहे. माणूस म्हणून जगण्याचे पाणी हे एक साधन. परंतु त्याचे वाटप करताना माणसा-माणसांत, जाती-जातींत फरक केला जात आहे. निसर्गाची कृपा, की त्याने हवा मोकळी ठेवली. हवेची सुद्धा मर्यादित पुरवठ्याची व्यवस्था माणसांच्या हातात राहती, तर हरिजनांना जगणेच कठीण होते !

लोक मला विचारतात, काँग्रेससाठी नवा कार्यक्रम काय? माझे त्याला उत्तर आहे, की गरिबांवर, मग तो शेतकरी असो वा शेतमजूर असो, हरिजन असो किंवा आदिवासी असो, यांपैकी कोणावरही अन्याय होऊ नये, यासाठी तरुणांनी, कार्यकर्त्यांनी कंबर बांधून उभे राहिले पाहिजे. गरिबांची संघटना उभी करून गरिबांचे, दलितांचे प्रश्न हाती घेऊन त्यांच्यावर होणा-या अन्यायाविरुद्ध उभा

राहणारा पक्ष म्हणजे काँग्रेस पक्ष, असे प्रत्यक्ष कृतीने सिद्ध केले पाहिजे. हे सिद्ध करावयाचे, तर गरिबांचे शोषण करणारे जे असतील, त्यांना जाब विचारणारे कोणी नाहीत, असे चित्र दिसून येता उपयोगी नाही. कार्यकर्त्यांनी याची जाण ठेवली पाहिजे, की शोषकांच्या मागे जातीची, पैशाची, परंपरेची शक्ती उभी असते. त्याच्या बळावरच तो श्रीमंत वा शोषक, जमीनदार गरिबाला, हरिजनाला जमिनीवरून दूर ढकलण्यास सिद्ध असतो. अशा वेळी कार्यकर्त्यांनी काँग्रेसची संघटनेची शक्ती गरिबांच्या, दलितांच्या पाठीशी उभी करावयास हवी.

गरिबांच्या पाठीशी शक्ती उभी करावयाची, ती त्यांचे शोषण होऊ नये, यासाठी तर खरेच, परंतु त्याचबरोबर आर्थिक विषमता हे या सर्व अन्यायाचे मूळ आहे, हे लक्षात घेऊन विषमतेचे ते मूळ छाटण्याचा प्रयत्न काँग्रेस कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. विषमतेचे मूळ छाटावयाचे, याचा अर्थ विकासाच्या नवनवीन कार्यक्रमांत गरिबांना, दलितांना सहभाग दिला जाईल, यासाठी धोरणात्मक जपणूक करावयास हवी. म्हणजे असे, की विकासाकरिता नवीन कार्यक्रम हाती घेतला जाईल, तेव्हा त्यासाठी नवीन संस्था निर्माण होतील, अशा वेळी गरीब व मागासलेल्या वर्गाच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे लागेल. सहकारी चळवळीवर तर याची विशेष जबाबदारी आहे. छोट्या जमातीच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन, विधायक दृष्टिकोणातून सहकारी चळवळीने त्यांचे प्रश्न हाताळले पाहिजेत. गावात नवी संस्था सुरू होत असली किंवा गावातील जुन्या संस्थेचे कार्यक्षेत्र वाढविण्याची संधी प्राप्त झालेली असेल, किंवा विकासाच्या प्रगतीतून रोजगाराची नवी संधी निर्माण होत असेल, तर अशा वेळी रोजगाराची संधी उपलब्ध करून देताना एक पथ्य जरूर पाळले गेले पाहिजे, की त्या गावातील ज्या घरात मिळवता कोणी नसेल, अशा घरातील तरुणाला अग्रक्रमाने ही संधी दिली जाईल. याकडे जागरूकपणे लक्ष ठेवले पाहिजे. अशी संधी देत असताना, जात-पोटजात, रक्ताचे नाते, असा विचारसुद्धा करता कामा नये. ग्रामीण भागात काय किंवा नागरी विभागात काय, गरिबी ही अमुकच एका जातीपुरती मर्यादित नाही. या देशातील साठ टक्के जनता दारिद्र्य-रेषेखाली आहे,

अशी आकडेवारी जेव्हा आपण उद्धृत करतो, त्याचा अर्थच हा, की गरिबीला जात-पोटजात-धर्म-पंथ असे काही नसते.

अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शिकवण लो. टिळक व म. गांधींनी काँग्रेसला आणि कार्यकर्त्यांना दिली, याचे कारण, अन्याय हा गरिबांविरुद्ध, मागासलेल्यांविरुद्धच होत असतो, हे त्यांनी देशात आणि परदेशातही पाहिले होते. अनुभवले होते. म्हणूनच लहानमोठ्या अन्यायांविरुद्ध ते सातत्याने उभे राहिले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी या शिकवणुकीचे कसोशीने पालन केले पाहिजे. समाजाला एकजिनसी बनवावयाचे, तर कार्यकर्त्यांनी व्रत म्हणून हे धोरण स्वीकारणे अत्यावश्यक आहे. आपल्या गावापासून काँग्रेस कार्यकर्त्यांनी याचा प्रारंभ करावा. गावातले कोणते घर, कोणते कुटुंब दारिद्र्याच्या पेचात सापडले आहे, कोणत्या घरातले हात मिळवते नाहीत, याची माहिती त्या गावातल्या कार्यकर्त्यांना असलीच पाहिजे. तरच गावात नव्याने उदयास येणा-या संस्थेत कोणाला अग्रक्रमाने सामावून घ्यावयाचे, याचा आग्रह ते धरू शकतात.

नव्याने उपलब्ध होणा-या सामाजिक व आर्थिक सुविधांचे रक्षण करणे, त्या वाढविणे, गरीब शेतकऱ्यांना, शेतमजुरांना, हरिजनांना रोजगार मिळवून देणे, जाती-पोटजातींची प्रतिबिंबे कामात पडू न देणे, 'एक गाव-एक पाणवठा' यासारखे प्रतीकात्मक कार्यक्रम राबविणे, गावागावांतून त्यांची कसोटी लागते, की नाही, हे पाहणे आणि जेणेकरून समाज एकजिनसी बनेल, आर्थिक विषमता दूर होईल, असाच प्रमुख कार्यक्रम भारतासमोर असायला पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर गेल्या तीस वर्षांत काँग्रेसने या कार्यक्रमाचा पाठपुरावा केला. देशात निर्माण झालेल्या नव्या राजकीय परिस्थितीत तर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हा एक नवा कार्यक्रम म्हणून जिद्दीने, आत्मविश्वासाने, कसोशीने त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. गावागावांत ज्यांच्या शब्दाला वजन आहे, प्रतिष्ठा आहे, असा कार्यक्रम राबविण्यासाठी ज्यांच्याजवळ साधनांची अनुकूलता आहे, किमानपक्षी हा कार्यक्रम राबविण्याची इच्छा आहे अशा कार्यकर्त्यांनी हे काम अग्रक्रमाने हाती घेणे

उचित ठरेल. काँग्रेससाठी कार्यक्रम काय, अशी विचारणा करणाऱ्यांना माझे हे आवाहन आहे.

देशांतर्गत नव्या परिस्थितीने उभे केलेले आणखी एक महत्त्वाचे कार्य काँग्रेससमोर आहे, ते म्हणजे विशिष्ट विचाराने बांधलेल्या ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांची फळी उभी करणे हे होय. एका दिलाने आणि विचाराने बांधलेले कार्यकर्ते असल्याशिवाय पक्ष कार्यक्षम बनत नाही, हे खरे; परंतु राजकीय पक्ष हा जेव्हा जन-आंदोलनाच्या स्वरूपाचा, लोकांचा पक्ष (मास-पार्टी) बनतो, त्यावेळी एकाच विचाराने बांधलेल्या कार्यकर्त्यांचा पक्ष म्हणून त्याचे स्वरूप मर्यादित करणे अवघड ठरते. तसे ते आवश्यकही नसते, कारण सर्वच कार्यकर्ते समान अनुभवाचे असतील, याची शाश्वती नसते.

लोकपक्ष किंवा 'मास-पार्टी' आंदोलनाच्या रूपाने कार्य करीत असते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून काँग्रेस पक्ष आंदोलनाच्या रूपाने कार्य करीत राहिला. सर्व समाजाचे प्रश्न हाती घेऊन या पक्षाला काम करावयाचे असल्याने काँग्रेस हा कधी बांधीव पक्ष बनू शकला नाही. पक्षाचे व्यापक स्वरूप हे त्याचे एक कारण आहे.
कम्युनिस्टांप्रमाणे किंवा रा. स्व. संघासारखी या पक्षाला आपली रेखीव बांधणी करणेही परवडले नाही. आवश्यकही वाटले नाही.

लोकशाही ख-या अर्थाने शक्तिशाली करावयाची, तर साचेबंद, लष्करबंद, झापडबंद कार्यकर्त्यांच्या टोळ्या बनवून चालणार नाही. 'केडर-पार्टी' ही नेहमीच झापडबंद होण्याची शक्यता असते. विचार करण्याचे यंत्र बंद करून, कान व हात मोकळे ठेवावयाचे, फक्त 'आज्ञा' ऐकायच्या आणि त्या अमलात आणीत राहावयाचे, एवढेच 'केडर पार्टी' करू शकते.

काँग्रेस पक्ष अशा स्वरूपाचा असावा काय? माझे उत्तर असे, की एका विचाराने बांधलेले कार्यकर्ते पक्षाच्या संग्रही असलेच पाहिजेत. परंतु एका विचाराने म्हणजे

काय? तो विचार कोणता? माझ्या मते तो विचार हाच असला पाहिजे, की सामाजिक, आर्थिक, नव्या राष्ट्रउभारणीचे काम करावयाचे आहे, हाच तो विचार. म्हणूनच सामाजिक, आर्थिक न्यायावर अव्याभिचारी निष्ठा आणि दारिद्र्याविरुद्ध, अन्यायाविरुद्ध, विषमतेविरुद्ध पोटतिडीक हे दोन महत्त्वाचे गुण ज्या कार्यकर्त्यांच्या ठिकाणी आहेत, तो पहिल्या प्रतीचा कार्यकर्ता होऊ शकेल. विचारांच्या या दोन बाजू पक्क्या व्हाव्यात, यासाठी जरूर 'केडर' निर्माण करावे. त्यासाठी कार्यकर्त्यांना आवश्यक ते शिक्षण द्यावे. स्वातंत्र्यपूर्व काळात असे विचाराने बांधलेले कार्यकर्ते तयार करण्याची, प्रशिक्षित कार्यकर्ते घडविण्याची प्रक्रिया अवलंबिली जात असे.

परंतु आजच्या भारतासमोरील प्रश्नांचे स्वरूप आता वेगाने बदलत आहे. १९६० मध्ये तयार झालेला कार्यकर्ता १९७० मध्ये किंवा १९७७ मध्ये निकामी ठरेल, की काय, अशी ही स्थिती बदलली आहे. सारेच झपाट्याने बदलत आहे. सार्वजनिक कामाची मी सुरुवात केली, ती त्या काळात कार्यकर्त्यांची बांधणी करण्याचा मला मनस्वी छंद होता, म्हणून मी ते काम केले. स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेच्या राजकारणात आल्यानंतर सत्तेच्या मदतीने कार्यकर्त्यांच्या फळ्या निर्माण केल्याचा आरोप माझ्याविरुद्ध करण्यासाठी जे सरसावत, त्यांना याची जाणीव नसावी, की काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणूनच मी सत्तेत वावरलो, वागलो आणि कार्यकर्त्यांची बांधणी करण्याचे प्रारंभापासून स्वीकारलेले कामच करीत राहिलो. महाराष्ट्रात अगदी प्रारंभी, मी स्वत: सत्तेवर नसताना आणि नंतर सत्तेवर असताना, कार्यकर्त्यांच्या बांधणीच्या कामाचा ध्यास मी नित्य ठेवला आहे.

महाराष्ट्रासंबंधी लोक मला विचारतात, त्यावेळी मी त्यांना हेच सांगत आलो आहे, की महाराष्ट्र काँग्रेसची शक्ती ही तेथील असंख्य कार्यकर्त्यांची शक्ती आहे. हे कार्यकर्ते चळवळीत वाढले आहेत. शेकडो गावांतून ते विखुरले आहेत. काँग्रेसबरोबर ते सातत्याने उभे राहिले आहेत. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाने सरकारमार्फत व पक्षातर्फे विविध क्षेत्रांत पुढाकार घेऊन नागरी व ग्रामीण जीवनात नवीन आशा व उत्साह निर्माण केला. समाजातल्या विविध वर्गाचे, जातीजमातींचे व धर्मांचे लोक

त्यात आहेत. शेतकरी आहेत; कामगार आहेत, मध्यमवर्गीय आहेत. खेड्यांतील आहेत आणि शहरांतलेही आहेत. सदासर्वकाळ जागरूक न राहिल्याने कामात काही त्रुटी किंवा अपुरेपणा निर्माण झाला असेलही, परंतु या सर्वांतून निर्माण झालेली शक्ती ही महाराष्ट्र काँग्रेसमध्ये संमीलित झाली आहे. ही शक्ती आणखी वाढवावी लागणार आहे. त्याची आज गरज आहे.

गरज अशासाठी आहे, की देशातील प्रमुख सत्तेचे, कारभाराचे तारू दिशाहीन असलेल्यांच्या हाती गेले आहे. लोकांची गाऱ्हाणी वाढत आहेत. गरीब, हरिजन, शेतकरी, कामगार, मजूर अस्वस्थ आहेत. या सर्वांना दिलासा देण्याचे आणि त्यांची गाऱ्हाणी ही आपली स्वत:ची गाऱ्हाणी समजून उभे राहण्याचे काम करावे लागणार आहे. लोकांच्या दैनंदिन गाऱ्हाण्यांनुसार कामगारांत, शेतकऱ्यांत, आदिवासी लोकांत प्रत्यक्ष जाऊन काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना काम करावे लागेल. त्यासाठी कामाची शिस्त सांभाळून कार्यक्रमाची मांडणी केली पाहिजे. अशिक्षितांच्या रोजगारीचा प्रश्न आहे, तसा सुशिक्षितांच्या रोजगारीचाही प्रश्न तितकाच तीव्र असल्याने त्यासाठी वेगवेगळे काम सातत्याने करावे लागेल. जसा काळ जाईल, तसे हे प्रश्न अधिक सूक्ष्म बनतील. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांनी आपल्या वागण्यात आणि बोलण्यात टोकदारपणा आणण्याची गरज आहे. विचाराचे वेगवेगळे संस्कार माणसावर सतत होत राहतात. परंतु कार्यकर्त्याने पक्षासाठी एकदा दिलेल्या निष्ठा या विचाराधिष्ठित असतील, तर विचलित होऊ द्यावयाच्या नसतात. बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे वैचारिक संघर्ष व वादळे अधूनमधून उठतात. त्यांपासून काही शिकावेही लागते. पण त्यांच्या दडपणाखाली मी स्वत: माझ्या पक्षावरील निष्ठांपासून कधी ढळलो नाही. मी काँग्रेस पक्षातच आहे आणि अखेरपर्यंत असेन. माझी ती उमेद आजही अभंग आहे. देशातील नव्या परिस्थितीच्या संदर्भात काँग्रेस कार्यकर्त्यांनी निश्चित कार्यक्रमाचे बोट धरून ठामपणे उभे राहावे, असे मी सुस्पष्टपणे सांगतो आणि त्याच वेळी त्याची कारणमीमांसा करताना आजच्या सत्ताधाऱ्यांच्या उणिवांचा परखडपणे समाचार घेतो, तेव्हा या आक्रमकतेचा, स्वत:ला विचारवंत मानणारेही चुकीचा अर्थ लावून लोकांची मने कलुषित बनविण्याच्या प्रयत्नात असतात, याची

मला जाणीव आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याखेरीज मी काय करणार? जनता पक्षासारख्या एका दिशाहीन असलेल्या पक्षाविरुद्ध जनतेला जागे करणे, या देशाचे तारू जनता पक्षाच्या हाती राहणे कसे धोक्याचे आहे, याची कारणमीमांसा मांडणे यात चूक काय? मी आक्रमक भूमिका स्वीकारतो, याचा अर्थ जनता पक्षाच्या उणिवा, स्पष्टपणे-कोणाचाही मुलाहिजा न ठेवता बोलून दाखवतो. परंतु माझ्या या कृतीचा राजकीय पातळीवरून प्रतिवाद करण्याचे टाळून, ज्याच्या मनात माझ्याविषयी पूर्वग्रह आहेत, लिहिण्या-बोलण्यात विकृतता आहे, त्यांनी माझ्या बोलण्याचा चुकीचा अर्थ लावला, तर त्यांची कीव न करावी, तर काय करावे?

या संदर्भात काँग्रेस पक्ष आणि जनता पक्ष यांचे स्वरूप पुन्हा एकदा तुलनात्मक दृष्ट्या समजावून घेण्याची गरज आहे, असे मला वाटते. काँग्रेस पक्षाचे स्वरूप हे राष्ट्रिय आंदोलन-काळातील चळवळीचे स्वरूप राहिलेले आहे. या राष्ट्रिय चळवळीत सर्वच समाज सामील झाला होता, हे त्याचे कारण आहे. या पक्षाचा जो कार्यक्रम आहे, संघटनेची आजची रचना व वस्तुस्थिती आहे, ती पाहिल्यावर काँग्रेस पक्षाला राष्ट्रिय पक्ष संबोधणेच सयुक्तिक ठरते. काँग्रेस पक्षाला कोणी बहुजन समाजाचा पक्ष म्हणूनही संबोधतात. 'बहुजन' हा शब्द मी 'मासेस्' या अर्थाने वापरतो. बहुजन समाज म्हणजे 'अमुक एका जातीचा समाज' असा त्याचा अर्थ नव्हे. परंतु महाराष्ट्र या सारख्या प्रांतात बहुजन समाज या शब्दाला एक विशिष्ट, मर्यादित अर्थ प्राप्त करून दिला गेला आहे, काही विचारवंतांना या शब्दातून तसा मर्यादित अर्थ काढण्याची खोड आहे, एवढेच फार तर या संदर्भात मी म्हणू शकेन. मी स्वत: तरी 'बहुजन' शब्दाचा अर्थ 'मासेस्' असाच केला आहे आणि आजही तोच अर्थ मला अभिप्रेत आहे.

एखाद्या पक्षाला बहुजन समाजाचा पक्ष म्हणून राहावयाचे असेल, तर त्या पक्षाला राष्ट्रिय आंदोलनाचे स्वरूप द्यावे लागेल. भारतात काँग्रेस पक्षाला राष्ट्रिय आंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले आहे, याचे कारण बहुसंख्य समाजाला लागू असलेले दारिद्र्याचे, सामाजिक, सांस्कृतिक उत्थापनाचे जे प्रश्न आहेत, ते आणि असे अन्य

प्रश्न काँग्रेस पक्ष स्वत:चे म्हणून आजवर हाताळीत राहिला आहे. दलित समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे कार्यक्रमच या पक्षाने आजवर स्वीकारले. बहुजन समाजाचा पक्ष म्हणून राहायचे असेल, तर हेच कार्यक्रम पक्षाच्या कार्यकर्त्यांना राबवावे लागतील, हे उघड आहे.

बहुजन समाजातील दारिद्र्याचा प्रश्न पाहा. हा प्रश्न ग्रामीण भागात आहे, तसा नागरी भागातही आहे. नागरी भागात तर श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी स्पष्टपणे जाणवत असल्यामुळे नागरी भागातील दारिद्र्याचा प्रश्न अधिक बोचक ठरतो. ग्रामीण भाग असो वा नागरी असो, तेथील बहुजन समाजाचे आरोग्य, शिक्षण, रोजगार, स्पृश्य-अस्पृश्य यांसारखे प्रश्न सोडवावयाचे असतील, तर ते एक राष्ट्रिय आंदोलन म्हणूनच पक्षाने त्याचा स्वीकार केला पाहिजे. काँग्रेस कार्यकर्त्यांचा आजही हा एक कार्यक्रम होऊ शकतो. समाज हा कोणत्याही जाती-जमातींचा असो, त्या ठिकाणी दारिद्र्य हे असतेच. महाराष्ट्रात तर सामाजिक दृष्ट्या स्वत:ला जे वरच्या थरांतील समजतात, त्यांच्यांतही दारिद्र्य आहे आणि इतर खालच्या समाजातही आहे. याचा अर्थ दारिद्र्याचा प्रश्न हा बहुसंख्य समाजाचा प्रश्न आहे. काँग्रेस पक्षाने दारिद्र्याच्या  या प्रश्नाशी मुकाबला करण्यासाठी स्वत:ला वाहून घेतले, त्यामुळेच तो बहुजन समाजाचा पक्ष बनला आहे.

जनता पक्षाचा विचार करताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते, ती ही, की मूलत: राजकीय शक्तीच्या हिशेबाने, हिंदी भाषिक प्रांतापुरत्या एका विभागीय पक्षासारखे त्याचे मर्यादित स्वरूप दिसते. ग्रामीण भागापर्यंत या पक्षाची मुळे खरी तर रुजलेली नाहीत. जनता पक्षाची कमजोरी ही त्यांचा हा पक्ष स्थापन होतानाच अभावात्मक कारणांनी तो बनवला गेल्यामुळे मुळातच तो कमजोर व कच्च्या आधारावर उभा आहे. काँग्रेस पक्षाला विरोध करण्यासाठी सात्त्विक रागाची जी मनोभूमिका तयार झाली, त्याचा आधार घेऊन ज्यांचा कार्यक्रम एक नाही, अशा विविध पक्षांनी एकत्र येऊन काही प्रांतांत निवडणूक जिंकली व मग सरकार बनविले. आज केंद्रात ते सत्तेवर असले, तरी हीच खरी जनता पक्षाची कमजोरी आहे.

निवडणूक जिंकण्यासाठी काँग्रेस-विरोध, सात्त्विक राग जनता पक्षाला उपयोगी पडला. सरकार चालवायचे, तर निश्चित धोरण हवे, त्याचप्रमाणे निश्चित कार्यक्रमाची दिशा हवी.

केंद्रीय शासनात या दृष्टीने अजून तरी 'ना सरकार, ना पक्ष' (Non Govt., Non Party) अशी स्थिती आहे. जनता सरकारचा काही ठोस कार्यक्रम आहे, अशी भावना व खात्री लोकांच्याही मनात नाही. त्यामुळेच सर्वत्र चलबिचल आहे. जनता पक्षाबद्दल एकूणच भ्रमनिरास व्हायला लागला आहे. जो दुर्बल समाज आहे, हरिजन समाज आहे, त्यांच्यांत हा भ्रमनिरासाचा वेग जबरदस्त आहे. ज्या वेगाने लोकांचा भ्रमनिरास होतो आहे, त्याची कल्पना खुद्द जनता नेत्यांना तरी आहे, की नाही, याची शंका वाटते.

कोणत्याही सरकारला जनमानसात आपली यशस्वी प्रतिमा उभी करावयाची, तर त्यासाठी निश्चित कार्यक्रमाची आणि विचारांची चौकट बनवावी लागते. आर्थिक उद्दिष्टांची अशी जाणीव आज जनता सरकारच्या बोलण्यात, वागण्यात आढळत नाही. जनता पक्षाला मी 'नॉन पार्टी' म्हणून संबोधतो, याचे कारण, या पक्षात निरनिराळे पक्ष सामील झाले आहेत; पण ते एकजीव झालेले नाहीत. प्रत्येक पक्ष स्वतंत्रपणे बोलतोय, वागतोय, हे पक्ष जनता पक्षातून फुटणार, असेही लोक बोलतात. परंतु वस्तुत: जनता पक्षातील विविध पक्ष फुटण्याचा प्रश्न आहेच कुठे? एकतर ते एकजीव झालेलेच नाहीत. मुळात ते फुटलेलेच होते. आजही ते तसेच विभक्त आहेत. यांवर काँग्रेस पक्षात दुफळी नाही काय, असा प्रश्न साहजिकच विचारला जातो. काँग्रेससारख्या जुन्या व मोठ्या पक्षाला दुफळीचा, मतभेदाचा प्रश्न नेहमीच भेडसावीत असतो. परंतु गेल्या नव्वद वर्षांच्या या पक्षाचा इतिहास पाहिला, तर अशा प्रसंगोपात्त निर्माण होऊ पाहणा-या दुफळ्या पचवून, कार्यक्रमाच्या बांधीवपणाने जनतेच्या पाठिंब्याने पक्षाचे सातत्य कायम राहिले आहे. हा इतिहास आहे.

असे असले, तरी या मतभेदाचा परिणाम या पक्षाने स्वीकारलेल्या कार्यक्रमावर होणार नाही, याची पक्षाच्या कार्यकर्त्यांना चिंता बाळगावी लागेल. आर्थिक विषमता दूर करण्याचा, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा किंवा राजकीय दृष्ट्या निवडणुकी लढवण्याचा कार्यक्रम असो; अंत:स्थ मतभेदाचा यत्किंचितही परिणाम या कोणत्याही गोष्टीवर होणार नाही, याची काळजी पक्ष-कार्यकर्त्यांनी घेतलीच पाहिजे. महाराष्ट्रातील काँग्रेस कार्यकर्त्यांना तर या बाबतीत अधिकच जागरूक राहावे लागेल. यावेळी तर सर्व कार्यकर्त्यांना अन्य कशाचाही विचार न करता एकजुटीने आपली सारी शक्ती काँग्रेसच्या पाठीशीच उभी केली पाहिजे.

कार्यकर्त्यांना मी जेव्हा असे आवाहन करतो आणि जनता पक्षाच्या उणिवा सांगतो त्यावेळी शहाणीसुरती, विचारवंत मंडळीही माझ्यावर जातीयवादाचा आरोप करण्यासाठी सरसावतात. जाणती माणसे असे काही विपर्यस्त बोलतात, तेव्हा मला खेद होतो. वाईट वाटते, मन कष्टी होते. राजकारणातल्या वादात विचारवंत टीका करण्याचे जमत नाही, म्हणून जातीयवादाची शिवी देण्याचा या मंडळींचा प्रयत्न असावा काय? मला तरी तसेच वाटते.

माझा नम्र दावा आहे, की महाराष्ट्रातील राजकारण हे जातीयवादापासून अलिप्त राहावे, यासाठी मी मनस्वी कष्ट घेतले आहेत. महाराष्ट्रात असताना तेथील माझ्या कर्तेपणाच्या दिवसांत आणि नंतरही मी त्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न केले. मनातून स्वत: मी कधी जातीयवादी भावनेला बळी पडलो नाही. उलट, समाजात एकजिनसीपणा आणण्याचेच ध्येय मी मनाशी निरंतर बाळगले.

महाराष्ट्रात कोणत्या पक्षाचे सरकार बनवायचे, हे अखेरीस जनतेच्या स्वाधीन आहे. काँग्रेसचे सरकार यावे, यासाठी अर्थातच मी शर्थीचे प्रयत्न करीन. परंतु याचा अर्थ महाराष्ट्राचा समाज दुभंगावा, फुटावा किंवा जातीयवादाने डोके वर काढावे, असा नव्हे. राजकारण करण्यासाठी म्हणून जातीयवाद राबवावा, या विचारापासून मी

नेहमीच अलिप्त राहिलो आहे. माझ्यावर जातीयवादाचा आरोप करणारांना मला असे विचारायचेय, की माझे कोणते विधान जातीयवादाला आवाहन आणि प्रोत्साहन देणारे आहे? जनता पक्षावर टीका करताना, जनसंघावर आणि रा. स्व. संघावर मी जरूर टीका करतो आणि यापुढेही करीन. परंतु मी ही टीका करतो, त्यावेळी माझ्यासमोर समाजातील एक विशिष्ट वर्ग असतो, अशी शहाण्यासुरत्या पुढाऱ्यांची टीका जेव्हा ऐकतो, तेव्हा खेद वाटतो. जनसंघावर आणि रा. स्व. संघावर टीका करणारा मी कोण एकटाच आहे? टीकाकारांना अभिप्रेत असणा-या वर्गात संघ-जनसंघाचे टीकाकार नाहीत, असे त्यांना म्हणावयाचे आहे काय?

जनसंघ, रा. स्व. संघावर मी टीका करताच श्री. एस्. एम्. जोशी यांच्यासारखे राजकारणी विचारवंत 'म्हणजे ब्राह्मण समाजावरच ना ही टीका?' असे स्वत:चे विधान त्याला जोडून पुढे सरसावतात, याला काय म्हणावे? श्री. एस्. एम्. जोशी यांच्याबद्दल मला नेहमीच आदर वाटत आला आहे. परंतु माझ्या भाषणावरचे असे हे विपरीत भाष्य जोशीबुवा व त्यांचे सहकारी करीत आहेत, ही आश्चर्याची गोष्ट आहे. यातल्या वैयक्तिक बदनामीची मला चिंता वाटत नाही. पण या मंडळींनाच महाराष्ट्रातील निवडणूक-प्रचाराला जातीय स्वरूप द्यावयाचे आहे, की काय, अशी चिंता मनात निर्माण होते आणि खेद वाटतो. वस्तुत: महाराष्ट्रातले सार्वजनिक जीवन गेल्या पाव शतकात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादापासून मुक्त झाले आहे. माझ्या थोर मित्रांना मी विनंती करेन, की मी जे उच्चारले नाही, माझ्या मनात जे नाही, त्याचा आरोप करून कृपया माझ्यावर अन्याय करू नका. माझी शक्ती कमी व्हावी, ही त्यांची इच्छा मी समजू शकतो. परंतु त्यासाठी याच मार्गाचा अवलंब कशाला? एका चांगल्या पद्धतीने सार्वजनिक जीवन पुढे जात असताना ते जीवन निवडणुकीच्या स्वार्थासाठी म्हणून मलिन करू नका, एवढेच मी म्हणेन.

जातीय विचार हा माझ्या जीवनात अशक्य आहे, हे काय या मंडळींना माहीत नाही? खरे म्हणजे माझ्या खासगी जीवनातल्या गोष्टींची मी सार्वजनिकरीत्या

वाच्यता करू नये. तसे काही सांगण्याची माझ्यावर कोणी वेळही आणू नये. परंतु अशा तऱ्हेचे आरोप केले जातात, तेव्हा खंत वाटते.

महाराष्ट्रातल्या जनतेला माहिती आहे, की मी अगदी गरीब स्थितीत असताना शिक्षण घेतले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी गाव सोडून बाहेर जावे लागले. परंतु जेथे गेलो, तेथे राहण्यासाठी वसतिगृह निश्चित करताना मी दहा वेळा विचार केला. परंतु जातीय नावावर चालणा-या वसतिगृहात शिक्षणासाठी राहायचे काय, असा सवाल माझ्यासमोर निर्माण झाला आणि अखेरीस अशा वसतिगृहात राहायचे माझ्या मनाने नाकारले. जिथे कुठे लहान खोली मिळाली, तिथे राहिलो आणि शिक्षण घेतले. योगायोग असा, की त्या लहान खोलीत मला जोडीदार मिळाला, तोही एक माझा ब्राह्मण मित्रच होता.

हा उल्लेख मी एवढ्यासाठी करीत आहे, की जातीयवादाचा विषारी विचार लहानपणापासूनच मला कधी शिवला नाही. माझा तर असा दावा आहे, की महाराष्ट्रात आणि अन्यत्रही समाजातील सर्व वर्गांतील लोकांशी माझे व्यक्तिशः जिव्हाळ्याचे आणि घरोब्याचे संबंध आहेत. गरीब घरांतल्या शेतकऱ्यांशी, हरिजन वर्गातल्या मंडळींशी जेवढे माझे जिव्हाळ्याचे संबंध आहेत, तेवढेच पुढारलेल्या ब्राह्मण वर्गातील लोकांशीही आहेत. जनसंघ आणि रा. स्व. संघ यांच्याशी राजकीय दृष्ट्या मतभेद असले, तरी त्यांच्यापैकी अनेकांशी व्यक्तिगत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. इतकेच कशाला, मनातले दु:ख कुणाला सांगायचे ठरवले, तर चारांतले तीन ब्राह्मण असतात. हरिजन, मुसलमान, लिंगायत, ब्राह्मण अशा साऱ्यांच जातीजमातींबद्दल माझ्या मनात काही जिव्हाळ्याच्या भावना आहेत. अशा स्थितीत महाराष्ट्रात कोणी जातीयवाद फैलावण्याचा प्रयत्न करणार असतील, तर जीव पणाला लावून महाराष्ट्रातील जातीयवादाविरुद्ध मी उभा राहीन, असा माझा निर्धार आहे.

थोडे मागे वळून पाहिले किंवा इतिहासाची पाने उलटली, तर रा. स्व. संघावर टीका

करणारे कोण आढळतात? रा. स्व. संघ ही ब्राह्मणांची संघटना आहे. ही टीका प्रथम राष्ट्रसेवा दलाच्या गोटातूनच केली गेलेली आहे. राष्ट्रसेवा दलाच्या मार्गदर्शकांना ही माहिती असावी. असलीच पाहिजे.

या उलट, रा. स्व. संघाचे महाराष्ट्रातले आणि बाहेरचेही स्वरूप मी पाहिले आहे. त्यामुळे या संघटनेत एकाच जातीचे लोक आहेत, असे मी म्हणू शकत नाही. जनसंघाचेही तेच आहे. समाजातले निरनिराळे वर्ग त्यात आहेत, याचीही मला माहिती आहे. व्यक्तिगत उल्लेख करायचा, तर पुण्यात, मी जेव्हा वकिलीचा अभ्यास करायला आलो, त्यावेळी लॉ कॉलेजसमोर, जिथे मी राहात असे, तेथे माझा 'रुम पार्टनर' हा रा. स्व. संघाचा एक सचोटीचा कार्यकर्ता होता. माझ्या मित्रमंडळींतही अशांचा भरणा होता. तेव्हा संघ-जनसंघावरील माझी टीका म्हणजे ब्राह्मण वर्गावर किंवा जातीवर टीका, असे भासविण्याचा प्रयत्न जेव्हा माझ्या बाबतीत होतो, तेव्हा त्याचे मला हसू येते.

कारण माझी टीका असते, ती विचारसरणीवर. सामाजिक-सांस्कृतिक अलिप्तपणाच्या त्यांच्या निष्ठांवर. परंतु याची जाणीव टीकाकार ठेवीत नाहीत, असे दिसते. तेही मी समजू शकतो. पण काँग्रेसमधून शिंगे मोडून जनता पक्षाच्या आश्रयाला कालपरवा गेलेलेही तशीच पोपटपंची करतात, हा सर्वांत मोठा विनोद आहे.

खरे तर, जनता पक्षातलेच प्रमुख कर्ते लोक संघ-जनसंघाबाबत टीकात्मक बोलत आहेत. महाराष्ट्रातल्या टीकाकार मंडळींनी, वस्तुत: या टीकेचा अंतर्मुख होऊन विचार करावा, हे बरे. शहाण्या-सुरत्यांनी अगोदर जनता पक्षातल्या टीकाकारांचे समाधान करावे आणि मगच शिल्लक उरल्यास टीकेचे हत्यार परजून माझ्या रोखाने धाव घ्यावी. संघ-जनसंघाला खडे बोल ऐकवणारा एक गट जनता पक्षांतर्गत आहेच ना ? माझ्यावर जातीयतेचा आरोप करणारांनी या गटावरील आरोपाचाही उच्चार एकदा केलेला बरा.

वैचारिक श्रद्धांतून काम करणारा मी माणूस. अनेकविध विचारांच्या मंडळींशी संबंध. विविध प्रकारच्या वाचनाची, व्यासंगांची सवय. असा मी, इच्छा झाली, तरी जातीयवादी बनणार कसा? सहज ओघात आले, म्हणून हा प्रपंच.

१९७८ चा प्रारंभ हा राजकीय इतिहास निर्माण करणारा महत्त्वाचा काळ आहे. चार-सहा राज्यांत निवडणुका होणार असून या निवडणुकांमध्ये जनता पक्षाच्या राज्यकारभाराच्या व धोरणांच्या अनुभवानंतर जनमताची कसोटी लागणार आहे. काँग्रेस पक्षाला आपल्या ध्येय-धोरणाचा, कार्यक्रमाचा पाठपुरावा करीत करीत गेल्या वर्षभरातल्या इतिहासाला कलाटणी द्यायची आहे. आपल्या मूळ प्रेरणा व काँग्रेसला इतिहासाने दिलेले काम व मनातली तीव्र जाणीव यांच्या आधारावर पक्षाने अधिकाधिक एकसंध बनून जनतेपर्यंत पाहोचावयाचे आहे आणि आव्हान पूर्ण करावयाचे आहे.

काँग्रेस पक्षावर, पक्षाच्या नेत्यांवर टीका या होत राहणारच. परंतु या टीकांचे परिमार्जन करण्यासाठी, लोकांना वस्तुस्थिती पटविण्यासाठी पाच-दहा माणसांच्या संख्येपासून हजारोंच्या संख्येपर्यंत कार्यकर्त्यांनी पोहोचून नवे युवामंडळ बनविण्याचे काम केले पाहिजे. खेड्यांपासून शहरांपर्यंत करावयाचे हे काम आहे. महाराष्ट्र म्हणजे काँग्रेस कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे, असे महात्मा गांधी म्हणत असत. म. गांधींनी महाराष्ट्राला जो काँग्रेसचा मंत्र दिला, त्याच्या परीक्षेची, कसोटीची ही वेळ आहे.

## २. भारताच्या उज्ज्वल भवितव्यासाठी

संरक्षणमंत्री असताना
२९ डिसेंबर ६५ रोजी
मद्रास येथे केलेल्या भाषणाचे रूपांतर.

भारताच्या महान लढ्यातील एका ऐतिहासिक घटनेशी 'आवडी' हा शब्द निगडित आहे. समाजवादी समाजरचना या महान संकल्पनेचा पहिला उच्चार आवडी येथेच झाला. या संकल्पनेत एक नवे स्वातंत्र्य अभिप्रेत आहे. याच आवडीने पुन्हा एकदा इतिहास घडविला आहे. स्वातंत्र्याच्या संरक्षणाशी या इतिहासाचा अनुबंध आहे. संरक्षण खात्याच्या आवडी येथील कारखान्यातून आज पहिला रणगाडा बाहेर पडत आहे. देशाची संरक्षणक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल टाकले जात आहे, ही केवळ माझ्याच दृष्टीने नव्हे, तर आपणां सर्वांच्या दृष्टीने अभिमानाची घटना आहे.

सध्या आपल्याला अनेक अवघड समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. यांतील एक समस्या देशाच्या संरक्षणाशी संबंधित आहे. संरक्षणाच्या समस्येस विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे; परंतु संरक्षणाचा एकाकी विचार करता येत नाही. देशाच्या राजकीय आणि आर्थिक परिस्थितीच्या संदर्भात संरक्षणाचे प्रश्न समजावून घ्यावे लागतात. तसेच देशाभोवती ज्या राजकीय शक्ती वावरत आहेत आणि संपूर्ण जगामध्ये जे शक्तिसंतुलन चालू आहे, त्याचाही विचार करावा लागतो.

१९६० पासूनचा कालखंड आपल्या देशाच्या दृष्टीने अत्यंत लक्षणीय कालखंड ठरलेला आहे. म्हणून या कालखंडातील संरक्षणविषयक प्रश्न जाणून घेण्यासाठी, आपल्या देशास स्वातंत्र्य मिळाल्यापासून येथे कोणत्या राजकीय शक्ती विकसित झाल्या, यांचा आढावा घेणे आवश्यक ठरते. कारण त्याशिवाय सध्याच्या प्रश्नांची ऐतिहासिक पार्श्वभूमी कळून येणार नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच आपल्या नेत्यांनी देशाच्या परराष्ट्रीय धोरणासंबंधी अत्यंत महत्त्वाचा मूलभूत निर्णय घ्यावा, हे क्रमप्राप्तच होते. जागतिक शांततेच्या मूलभूत संकल्पनेवर आपले परराष्ट्रीय

धोरण आधारलेले आहे, हे सर्वांनाच माहीत आहे. शेजारी देशांसह सर्व देशांबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे, हा त्या धोरणाचाच एक भाग होता - परंतु त्या काळातही पाकिस्तानने - जो एके काळी भारताचाच भाग होता - भारतासंबंधी मित्रत्वाची भूमिका घेतली नाही. आपण १९५० मधील परिस्थितीचा विचार केला, तर आपल्याला असे आढळून येईल, की भारताचे चीन आणि रशिया या अन्य दोन शेजारी राष्ट्रांबरोबरचे संबंध निश्चितच चांगले होते. हा एक त्रिकोणच होता. रशिया आणि चीन यांचे संबंध चांगले होते, चीन आणि भारत यांचे संबंध चांगले होते आणि भारत नि रशिया यांचे संबंध चांगले होते. पाकिस्तान मात्र त्यावेळी या त्रिकोणाबाहेर होता.

१९६० मध्ये ही परिस्थिती बदलली. रशिया आणि चीन यांचे संबंध पूर्वीसारखे राहिले नाहीत. भारत आणि चीन यांचे संबंध 'मैत्रीचे' होते. भारत आणि रशिया यांचे संबंध केवळ चांगले राहिले, असे नव्हे, तर ते बळकटही झाले.

या काळात पाकिस्तानने अत्यंत चतुराईने राजकीय डावपेचांची आखणी करून चीन आणि रशिया यांच्याबरोबरचे संबंध सुधारायला प्रारंभ केला. येथपासून शक्तिसमतोलात बदल होऊ लागला. म्हणून आपल्याला ही समग्र परिस्थिती ध्यानात घ्यावयास हवी. शक्तिसमतोलातील बदल कशामुळे घडून आला? हा समतोल आता कसा आकार घेत आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधायला हवीत.

१९६२ मध्ये जे घडले, त्याचे स्वतंत्र महत्त्व आहे, असे मी मानतो. कारण त्या घटनेने भारताच्या केवळ संरक्षणविषयक समस्येच्या दृष्टीनेच नव्हे, तर राजकीय दृष्ट्याही दीर्घकालीन परिणाम घडवून आणला. त्यावेळी चीनने सीमावाद उकरून काढून भारतावर आक्रमण केले. चिनी सैनिक नेफा-लडाखमध्ये घुसले आणि एके दिवशी सकाळी अचानक चीनने आपण माघार घेत असल्याचे जाहीर केले. त्याप्रमाणे त्याने आपले सैन्य मागे घेतलेही.

२० नोव्हेंबर १९६२ ची रात्र अजूनही आपल्याला आठवते. त्यावेळी चीनने एकतर्फी माघारीची घोषणा केली, त्याच दिवशी मी मुंबईहून संरक्षणपदाची वस्त्रे घेण्यासाठी दिल्लीस गेलो. चीनबरोबर लढण्यासाठी माझी संरक्षणमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. चीनबरोबरची लढाई आता उरलेलीच नाही, हे मला दुस-या दिवशी सकाळी समजले. मी दिल्लीस गेलो, म्हणून लढाई थांबली, असे मला म्हणायचे नाही; परंतु तसे घडले, हे मात्र खरे. महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की चीनने आक्रमण का केले आणि नंतर एकतर्फी माघार का घेतली? व्यापलेला सगळाच प्रदेश चीनने सोडलेला नाही. अजून लडाखचा काही भाग त्याच्याच ताब्यात आहे. यामागचे कारण समजावून घेतले पाहिजे. चीन काही गमतीकरिता आलेला नव्हता. किंवा हिमालयाची सहल करण्याकरिता त्याने आपल्या सैन्यास धाडले नव्हते. चिनी सैनिक शस्त्रास्त्रे घेऊन आलेले होते. त्यांच्यापाशी तोफखाना होता. ते आपल्या लोकांशी लढले. त्यांनी आपली शक्ती दाखविली. आपल्यापाशी सामर्थ्य आहे, हे त्यांना कळून आले; पण या आक्रमणामागचा उद्देश कोणता होता? ज्या देशाबरोबर आपल्याला युद्ध करावे लागते, त्याचा राजकीय उद्देश समजावून घेतल्याशिवाय आपल्याला लढता येत नाही. म्हणून चीनचा आक्रमणामागचा उद्देश समजावून घेतला पाहिजे. मला असे वाटते, की या आक्रमणामागे चीनचे दोन-तीन हेतू असावेत. ज्या जगात आपण राहतो, त्या जगात राजकीय दृष्ट्या चीन महत्त्वाचा आहे, भारत नव्हे, हे आफ्रिकी-आशियाई इ. देशांना कळावे, हा चीनचा एक हेतू असावा. लष्करीदृष्ट्या चीन बलवान आहे, भारत नव्हे, हे जगाला दाखवून द्यायचे असावे आणि आपले आर्थिक विचार, आर्थिक सिद्धता आणि आर्थिक साधनसंपत्ती यांच्यावर एक प्रकारचा ताण पडावा, हा त्याचा दुसरा हेतू असावा. कारण तोपर्यंत आपण आपल्या आर्थिक विकासावर विशेष भर देत होतो. आपण आपली आर्थिक साधनसामग्री वाढविली, आर्थिक बाबतीत देश स्वयंपूर्ण केला, तर आपली संरक्षणक्षमता वाढवू शकू, असे आपण मानत होतो.

आक्रमण करून भारताची आर्थिक ताकद खच्ची करावी, असे चीनला वाटत असले

पाहिजे. भारताला अलिप्ततावाद सोडायला भाग पाडावे, हा त्याचा तिसरा हेतू असावा, असेही मला वाटते. अमेरिका आणि रशिया यांच्या दरम्यान सुरू असलेल्या शीतयुद्धापासून आपण अलिप्त राहावे आणि या दोन्ही गटांतील राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध ठेवावेत, ही भारताची भूमिका चीनला रुचण्यासारखी नव्हती.

चीनच्या १९६२ मधील आक्रमणाने अनेक राजकीय प्रश्न स्पष्ट केले आहेत. शीत युद्ध हे दोन लष्करांतील युद्ध नसते. जागतिक वर्चस्वासाठी धडपडणा-या भिन्न विचारसरणींमधील ते युद्ध असते. अशा युद्धाचे नेतृत्व आपल्याकडे यावे, अशी चीनची आकांक्षा आहे. या आकांक्षेबरोबरच त्याला आणखी एका महत्त्वाकांक्षेने ग्रासलेले आहे. सा-या जगाचे नाही, तरी निदान आशियाई-आफ्रिकी देशांचे राजकीय नेतृत्व आपल्याकडे यावे, असे चीनला वाटते.

पाकिस्तानने भारताबाबत सतत शत्रुत्वाचीच भूमिका घेतलेली आहे. पाकिस्तानच्या दृष्टीने काश्मीर हा भारत आणि पाकिस्तान यांच्यांतील एक विवाद्य प्रश्न आहे. काश्मीरचा भूभाग हा आमच्या दृष्टीने निश्चितच जसा महत्त्वाचा आहे, तसाच तो आमचा आहे. आमच्या भूमीचा इंच अन् इंच भाग आम्हांला प्रिय वाटतो; परंतु भारत-पाकिस्तान वाद केवळ काश्मीरपुरताच मर्यादित नाही. भूभागापेक्षाही अधिक महत्त्वाच्या गोष्टी त्यात अंतर्भूत आहेत. आपल्या लोकशाहीवादी राष्ट्रीय जीवनाशी तो प्रश्न निगडित आहे. खरे आव्हान तेच आहे.

आजचा भारत कसा आहे? भारत जर लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष राहणार नसेल, तर त्याला काहीच अर्थ उरणार नाही, ही गोष्ट आपण नीट समजावून घेतली पाहिजे. आपल्या संरक्षणाच्या दृष्टीने ती महत्त्वाची आहे. त्यासाठी आपल्याला भारताच्या गेल्या एक हजार वर्षांच्या इतिहासावर नजर टाकली पाहिजे. गेल्या हजार वर्षांचा भारताचा इतिहास हा भारतावर झालेल्या आक्रमणांचा इतिहास आहे. पूर्वीच्या काळी वायव्येकडून ही आक्रमणे झाली. टोळ्यांमागून टोळ्या, सैन्यांमागून सैन्ये येत होती आणि भारत पादाक्रांत करू पाहात होती. नंतर

पश्चिमेकडून सागरी मार्गाने आक्रमणे झाली. या प्रत्येक आक्रमणाच्या वेळी भारत पराभूत झाला, ही वस्तुस्थिती मान्य केलीच पाहिजे.

आपण का पराभूत झालो? आपल्या देशात प्रतिकाराची परंपराच नव्हती का? आपल्या देशात रणधुरंधर नव्हते का? तसे मुळीच नव्हते. उलट, या भूमीने अनेक पराक्रमी वीर आणि शूर योद्धे यांना जन्म दिलेला आहे. अशीच इतिहासाची साक्ष आहे. हा देश त्यागामध्ये कधीही उणा पडलेला नाही. तशी बुद्धिवंतांचीही कधी वाण नव्हती. तरीही आपण पराभूत झालो, ही वस्तुस्थिती शिल्लक उरतेच. मग असे का झाले? आपण चंद्रगुप्त, अशोक, चाणक्य आणि विजयनगर यांच्या परंपरा सांगतो. त्या परंपरा असूनही आक्रमकांसमोर आपल्याला नमते घ्यावे लागले. आपल्यापाशी शूर सैनिक होते, मोठे सैन्य होते, पराक्रमाचा वारसा होता आणि तरीही आपण आक्रमकांपुढे नमलो, याचे कारण आपण एक राष्ट्र नव्हतो. १९६२ मध्ये नेफा विभागात आक्रमकाला यशस्वी रीतीने रोखले, हा गेल्या हजार वर्षांच्या इतिहासातील पहिला प्रसंग आहे. १९६५ मध्ये पाकिस्तानच्या सुसज्ज लष्कराने आपल्यावर चाल केली, सुरुवातीला त्याला थोडेसे यशही मिळाले. परंतु नंतर आपण आक्रमकांना रोखले आणि त्यांचा पराभवही केला. याचे कारण आजचा भारत हा खरा भारत आहे. आजचा भारत हा लोकशाहीवादी देश आहे. सर्व प्रांतांतील सर्व धर्मांचे, सर्व भाषिक गटांतील भारतीय एक होऊन आक्रमकांविरुद्ध उभे ठाकले.

हा नवा भारत काही विशिष्ट मूल्यांवर उभा आहे. ही कोणती मूल्ये आहेत? लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता ही ती मूल्ये आहेत. पंजाब, काश्मीर, राजस्थान आणि सिंध येथे कोण लढले? ते केवळ सिंधी किंवा पंजाबी किंवा काश्मिरी नव्हते. पंजाब, काश्मीर, राजस्थान येथल्या भूमीवर केवळ पंजाबी, काश्मिरी आणि राजस्थानी लोकांचे रक्त सांडलेले नाही. तामीळ लोकांचे रक्त तेथे सांडले, केरळीयांचे सांडले, कर्नाटकीयांचे सांडले, गुजरात्यांचे सांडले. म्हणून मी म्हणतो, की भारताचा नवा इतिहास लिहिला जात आहे, तो केवळ शाईने आणि लेखणीने लिहिला जात नाही. तलवार आणि रक्त यांनी तो लिहिला जात आहे. तलवार

आणि रक्त यांनी लिहिला जात असलेला इतिहास हा खराखुरा आधुनिक इतिहास आहे. आपल्याला असा इतिहास घडविणारा भारत हवा आहे.
पाकिस्तानचे आक्रमण हे केवळ भारताच्या विशिष्ट भूभागावरचे आक्रमण नव्हते. लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता या भारताच्या राष्ट्रीय जीवनाच्या मूलभूत मूल्यांवरच हे आक्रमण करण्यात आले होते, म्हणून आपण कशासाठी लढत आहोत, हे नीट समजावून घेतले पाहिजे. आपण कोणाविरुद्ध लढत आहोत, याचाही बोध व्हावयास हवा.

एक हजार वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या एका चिनी युद्धवेत्त्याने - चीनमध्ये असे अनेक युद्धवेत्ते होऊन गेले - अत्यंत मार्मिकपणे असे म्हटले आहे, की 'तुम्हांला शत्रूचा पराभव करावयाचा असेल, तर प्रथम शत्रू समजावून घ्या.' म्हणून आपणही आपला शत्रू कशासाठी आपले शत्रुत्व करीत आहे, हे जाणून घेतले पाहिजे.

चीनला केवळ दक्षिण आणि आग्नेय आशियामध्येच नव्हे, तर संपूर्ण आशियाई-आफ्रिका देशांमध्ये राजकीय वर्चस्व प्रस्थापित करावयाचे आहे. त्या दृष्टीने भारत हा आपल्या मार्गातील मुख्य अडसर आहे, असे त्याला वाटते. कारण चीनच्या विचारसरणीपेक्षा भिन्न विचारसरणी भारताने अंगिकारली आहे. चीनच्या विचारसरणीला आपण खराखुरा पर्याय शोधून काढला आहे.

आज आपल्याला ज्या दोन देशांशी मुकाबला करावा लागत आहे, त्या दोन्ही देशांत हुकूमशाही आहे. पाकिस्तानात धर्माधिष्ठित हुकूमशाही आहे, तर चीनची साम्यवादी हुकूमशाही आहे. या दोन्ही हुकूमशाही राजवटींना भारताचे खरे सामर्थ्य कळूच शकत नाही. भारत हा एक दुर्बल देश आहे, असेच ते मानतात. लोकशाहीचे सामर्थ्य काय असते, हे त्यांना उमगून येत नाही. त्यात त्यांचाही काही दोष नाही. गेल्या जुलै-ऑगस्टमधील परिस्थिती ध्यानात घ्या. त्यावेळी भारतापुढे अनेक अडचणी होत्या. अन्नधान्यांची टंचाई होती. ठिकठिकाणी निदर्शने होत होती. पंजाबमध्ये संत फत्तेसिंगांनी आमरण उपोषणाची धमकी दिली होती. मुंबईत हरताळ आणि संप

घडून येत होते. दिल्लीत संसदेवर मोठा मोर्चा आयोजित करण्यात आला होता. भारताचे विघटन होते, की काय, अशी भीती वाटावी, अशी त्या वेळची परिस्थिती होती. आपल्याला लोकशाही पचली आहे किंवा नाही, अशी शंका व्यक्त केली जात होती. काय होणार आहे, हे कोणीच सांगू शकत नव्हते. ६ सप्टेंबरला भारतीय सैन्याने लाहोरची दिशा धरली आणि परिस्थिती एकदम बदलली. निदर्शने आणि हरताळ यांची भाषा ऐकू येईनाशी झाली. निदर्शनाची आणि उपोषणाची भाषा बंद पडली. हा खरा लोकशाहीचा अर्थ आहे, म्हणून आपण देशाची बांधणी करताना आपल्याला प्रिय असलेल्या मूल्यांचेही जतन करीत आहोत. भारताचे हे खरे चित्र आपण नेहमीच आपल्या डोळ्यांसमोर ठेवले पाहिजे. दुर्दैवाने पाकिस्तानला या चित्राचा अर्थ कळूच शकला नाही.

आपण चीनकडून एक धडा शिकलो, तो पाकिस्ताननेही ध्यानात घेतला पाहिजे. चीन आणि भारत मित्रभावाने नांदतील, असे आपण १९६२ पर्यंत गृहीत धरून चाललो होतो. १९५८-५९ मध्ये चौ एन-लाय मुंबईला आले होते, त्यावेळी मी द्वैभाषिक मुंबई राज्याचा मुख्यमंत्री होतो. मी त्यांच्या स्वागताला गेलो, तेव्हा मी त्यांच्यावर प्रेमपूर्ण पुष्पहारांचा वर्षाव केला. त्यांनी आपला हात उंचावून म्हटले, 'हिंदी चिनी भाई भाई !' मीही तसेच म्हटले. त्यांची ती घोषणा खरी आहे, अशीच आपली कल्पना झाली. तसे होणे स्वाभाविकही होते. कारण हातात पुष्पगुच्छ आणि अंत:करणात मैत्री ठेवून आपण मित्रांचे स्वागत करीत असतो. परंतु नंतर आपल्याला कळून आले, 'भाई भाई' म्हणविणा-या या लोकांच्या हातांत तलवारी आहेत आणि हृदयात विष आहे.

आपण चीनपासून हा धडा शिकलो. आपल्याला तो काल शिकायला मिळाला. आज इंडोनेशियाला तोच धडा शिकावा लागत आहे. हाच धडा कदाचित पाकिस्तानलाही उद्या शिकावा लागेल. त्या धड्यापासून शिकायचे किंवा नाही, हे पाकिस्तानने ठरवायचे आहे. आपण त्याचा विचार करण्याचे कारण नाही; परंतु भारतातील त्यावेळची परिस्थिती पाहून, पाकिस्तानने त्या परिस्थितीचा फायदा उठविण्याचा डाव रचला. आपला चांगुलपणा हा पाकिस्तानला आपल्या दौर्बल्याचा निदर्शक

वाटला. पाकिस्तानी लष्कराशी लढतानाही, आपल्या मनामध्ये पाकिस्तानी जनतेबाबत वैरभाव नव्हता. भारतीय व पाकिस्तानी जनतेच्या मैत्रीसंबंधात पाकिस्तानी सरकार व्यत्यय आणत आहे. भारताला पाकिस्तानबरोबर शांतता आणि मैत्री हवी आहे. मात्र त्यासाठी भारत आपल्या राष्ट्रीय प्रतिष्ठेशी कधीही तडजोड करणार नाही.

भारताची ही भूमिका पाकिस्तान जाणून घेऊ इच्छीत नाही. जे लष्करी आक्रमण करून साध्य झाले नाही, ते रशियाकडून भारतावर दबाव आणून साध्य करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न चालू आहे. रशियाचे दडपण पुरेसे पडले नाही, तर पाकिस्तान चीनचाही दडपण म्हणून वापर करील. म्हणूनच चीन अधूनमधून नेफा, लडाख आणि सिक्कीम भागांत अतिक्रमणे करीत आहे. रशियाच्या मध्यस्थीला यश येऊ नये, अशीच या अतिक्रमणांमागील चीनची इच्छा आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यांत मैत्री होऊ नये, असा चीनचा प्रयत्न आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यांतील भांडण कायम राहिले, तर त्याचा आपल्याला फायदा घेता येईल, असा चीनचा मनसुबा आहे. चीनचा हा कावा पाकिस्तान ध्यानात घेऊ इच्छीत नाही.

ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊनच आपल्याला राजकीय, लष्करी अशा सर्व गोष्टींचा विचार केला पाहिजे. आपली मूलभूत भूमिका स्पष्ट आहे. आम्हांला केवळ शेजारी देशांशीच नव्हे, तर जगातील प्रत्येक देशाशी मैत्रीचे संबंध निर्माण करण्याची इच्छा आहे. परंतु एखादा देश जर मैत्रीची बोलणी चालू असतानाच, लष्कराचे भय दाखवून आम्हांला धमकवण्याचा प्रयत्न करीत असेल, तर आम्ही कोणापुढेही नमते न घेता आक्रमणाचा खंबीरपणे मुकाबला करू.

१९६५ च्या सप्टेंबरमधील घटनांनंतर देशात एक नवे चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. स्वातंत्र्यलढा जोरात चालू असताना देशात जे वातावरण आढळत होते, तशाच प्रकारचे हे वातावरण आहे. देशाच्या कोणत्याही भागात जा, लोकांत आपल्याला भरपूर उत्साह आढळेल. प्रत्येक प्रदेशाची भाषा वेगळी आहे, जीवनपद्धती

वेगळी आहे, भौगोलिक रचना भिन्न आहे. परंतु त्या विविधतेतही एकात्मतेची मूलभूत जाणीव कायम आहे. अलिकडच्या घटनांमुळे या एकात्मतेला जी चालना मिळालेली आहे, ती आपण टिकवली पाहिजे. या एकात्मतेमुळेच शत्रूला पुन्हा आक्रमण करण्याची हिंमत होणार नाही.

पाकिस्तान व चीन यांच्या मनात काय आहे, असा काहीजण मला प्रश्न विचारतात. उद्या काय घडेल, हे कोणालाच सांगता येणार नाही. परंतु माझ्यापुरते बोलायचे, तर पाकिस्तानच्या मनात पुन्हा एकदा आक्रमण करायचा विचार असावा, असे मला वाटते. परंतु पाकिस्तानपाशी तेवढी ताकद आहे का, यासंबंधी मी साशंक आहे. सध्याच्या युद्धबंदीचा फायदा घेऊन पाकिस्तान आपले लष्करी बळ वाढविण्याचा प्रयत्न करील. वाटाघाटींनी काही साधेल काय, याचाही तो अंदाज घेईल. वाटाघाटी फिसकटल्या, तर कदाचित तो पुन्हा आक्रमक पवित्रा घेण्याचा संभव आहे. मात्र त्याबाबतीत तो पुढाकार घेण्याची शक्यता कमी आहे.

पाकिस्तानला भारताच्या तयारीचाही विचार करावा लागेल. १९६२ मध्ये चीनने आपल्यावर आक्रमण केले. १९६५ मध्ये पाकिस्तानी आक्रमणाचा अनुभव घ्यावा लागला. १९६६-६७ मध्ये हे दोन्ही देश पुन्हा आक्रमण करतील काय, हे सांगणे कठीण आहे. अर्थात हे सांगून मला युद्धानुकूल वातावरण निर्माण करायचे नाही, हे सांगितलेच पाहिजे. भारताने नेहमीच शांततेचा पुरस्कार केलेला आहे. मी फक्त, शक्यता काय आहे, याचे विवेचन केले. युद्ध होणार आहे किंवा युद्ध झालेच पाहिजे, असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. युद्धे कधीच घडता कामा नयेत, अशीच आपली भूमिका आहे. परंतु केवळ आपण तशी इच्छा करून काहीच साध्य होणार नाही. इतर देशांचीही तशीच इच्छा असेल, तरच ही अपेक्षा फलद्रूप होऊ शकेल. आपल्याला मैत्री आणि शांतता हवी आहे, अशी प्रतिपक्षाकडून ग्वाही मिळायला हवी. तशी ग्वाही जोपर्यंत मिळत नाही, तोपर्यंत आपल्याला कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्याइतकी सिद्धता केलीच पाहिजे.

संरक्षणक्षम व्हायचे, याचा अर्थ अंगावर गणवेश चढवून आघाडीवर जायचे, असा करून चालणार नाही. काही थोडे लोकच पायदलात किंवा नौदलात किंवा हवाईदलात जाऊ शकतात. सारा देश आपल्या पाठीशी उभा आहे, याची त्या लोकांना खात्री झाली, तरच ते चांगल्या तऱ्हेने लढू शकतात. पाकिस्तानबरोबरच्या युद्धात आपल्या जवानांनी आणि अधिकाऱ्यांनी मर्दुमकीचे चांगले दर्शन घडविले. ते एवढ्या शर्थीने का लढले? आपण जर जिद्दीने लढलो नाही, तर आपल्या देशाची अप्रतिष्ठा होईल, आपल्या लष्कराचे नाव खराब होईल, आपल्या देशाच्या सन्मानाला बट्टा लागेल आणि एका स्वतंत्र देशाचे आपण नागरिक आहोत, असे आपल्याला अभिमानाने म्हणता येणार नाही, याची त्यांना जाणीव होती. स्वातंत्र्यापूर्वी लष्कर आणि जनता यांच्यांत अद्वैत नव्हते. लष्कर वेगळे आणि लोक वेगळे अशी परिस्थिती होती. आज ती अवस्था राहिलेली नाही. लष्कर हा जनतेचाच एक भाग झालेला आहे. पायदलात किंवा नौदलात किंवा हवाईदलात काम करणा-या प्रत्येकाला हे माहिती आहे, की आपला दुसरा भाऊ कारखान्यात किंवा शेतात, शहरात किंवा खेड्यात देशासाठीच काम करीत असून त्याच्यात आणि आपल्यात अभिन्न नाते आहे. आजचा सैनिक स्वत:साठी लढत नाही. तो देशासाठी लढत असतो. जीवनाला कंटाळला, म्हणून तो आघाडीवर मरायला तयार झालेला नाही. ती सर्व मुले तरुण होती, बुद्धिमान होती. त्यांची प्रकृती चांगली होती. त्यांच्यापुढे उज्ज्वल भवितव्य उभे होते. आणि तरीही त्यांची आत्मबलिदानाला सिद्धता होती. मरणाचा विचार त्यांच्या मनाला स्पर्शूच शकला नाही. देश जिवंत राहावा, म्हणून हे तरुण सैनिक मृत्यूला सामोरे गेले.

देशाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी प्रत्येकाने आघाडीवर जायची जरूर नाही. लष्कराला शस्त्रास्त्रे लागतात, आणखीही ब-याच गोष्टींची जरूरी भासते. देशाला ती साधने पुरविता यावीत, अशी परिस्थिती निर्माण करणे, हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपण उत्पादन-क्षेत्रात काय करतो, आर्थिक प्रगती किती घडवून आणतो, याचा यासाठी विचार करायला हवा. कारण तीच गोष्ट महत्त्वाची आहे. आपली आर्थिक

प्रगती होऊ नये, तिच्यात अडथळा यावा, हाच नेमका चीनच्या आक्रमणाचा हेतू होता.

भारतात भाषेवरून, प्रदेशावरून, धर्मावरून भांडणे आहेत. त्यामुळे अशा या फुटीर देशाला आपण एक धक्का दिला, की तो जगाच्या नकाशावरून उडून जाईल, असे चीनला वाटत होते. भारतासंबंधीचे हे विश्लेषण चुकीचे आहे, हे आपण दाखवून दिले पाहिजे. दोनदा आपण तसे करून दाखविले आहे. तसा प्रसंग पुन्हा आला, तर जुना फुटीर भारत आता राहिलेला नाही, आता भारतीय जनता एकदिलाने उभी आहे, हे आपण दाखवून देऊ, यासंबंधी मला शंका नाही. नवभारत लोकशाहीवादी आहे, धर्मनिरपेक्ष आहे आणि या मूल्यांसाठी तो लढायला कधीही मागेपुढे पाहणार नाही. सध्या आपली आर्थिक परिस्थिती चांगली नाही, असे जेव्हा मी म्हणतो, तेव्हा माझ्या डोळ्यांपुढे पुढच्या दहा वर्षांचा कालखंड आहे. हा काळ आपल्याला खडतर जाणार आहे. कारण आपल्याला अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागणार आहे. या आव्हानांचा आपण जिद्दीने स्वीकार करणार नसलो, तर राष्ट्र म्हणून राहण्याचा आपल्याला अधिकार नाही, असे मी मानतो. कारण आव्हाने नेहमीच असतात. अडचणी आणि आव्हाने नसतील, तर वैयक्तिक जीवनदेखील बेचव होऊन जाते. आव्हानांना घाबरलो, की सारे काही गमावून बसतो. पण जर का त्यांना धैर्याने तोंड दिले, तर आपण यशस्वी होऊ शकतो. जे वैयक्तिक जीवनाबाबत खरे आहे, तेच राष्ट्राच्या जीवनाबाबतही सत्य आहे.

आपण इंग्लंडचे उदाहरण घेऊ या. १९४० साली इंग्लंडची परिस्थिती काय होती? जर्मनीने फ्रान्स जिंकून घेतल्यावर इंग्लंडला फ्रान्समधून आपले लष्कर काढून घ्यावे लागले. भारतातील आपण लोक त्यावेळी इंग्लंडला हसत होतो; पण इंग्रज लोकांचा निर्धार ओसरला नाही. इंग्लंडला त्यावेळी कोणीही मित्र उरलेला नव्हता. शत्रू पुढेपुढे येत होता. इंग्लंड एकाकी पडले होते. पण त्याची हिंमत शाबूत होती. चर्चिलच्या नेतृत्वाखाली इंग्लंडने लढा दिला आणि शेवटी दुसरे महायुद्ध त्याने जिंकले.

आपला भविष्यकाळ खडतर असला, तरी आपण गांगरून न जाता, काय केले पाहिजे, याचा शांतपणे विचार केला पाहिजे. आपली एकी अभेद्य राहिली पाहिजे. आर्थिक समस्यांवर मात करावयास हवी. आपण जर हे करून दाखविले व भारत अडचणीतही निर्धारी आणि एकात्म राहतो, हे आपल्या शत्रूला दिसून आले, तर त्यालाही भारतावर आक्रमण करण्याची हिंमत होणार नाही. परिस्थिती कितीही बिकट झाली, तरी आपण लढण्याची ईर्ष्या गमावता कामा नये. हीच माझी भारताच्या संरक्षणाची खरी कल्पना आहे.

चीनजवळ अणुबाँब आहेत, पाकिस्तानने अत्याधुनिक शस्त्रास्त्रे पैदा केली आहेत. युद्धामध्ये या शस्त्रास्त्रांना महत्त्व असते, हे तर खरेच, पण आणखी एक हत्यार अधिक महत्त्वाचे असते. ते म्हणजे लढणा-या माणसाची इच्छाशक्ती. पाकिस्तानबरोबरच्या अलिकडच्या युद्धात आपल्याला हा अनुभव आलेलाच आहे.

पाकिस्तानची विमाने आपल्यापेक्षा चांगली होती, त्याचे रणगाडे, तोफखाना-सगळेच काही श्रेष्ठ प्रतीचे होते. कारण त्याने ते पाश्चात्त्य राष्ट्रांकडून मिळविले होते. याउलट, आपल्यापाशी जुन्या बनावटीचे रणगाडे होते. आपली विमानेही लहान होती. तरीही आपण पाकिस्तानी लष्कराचा आणि हवाईदलाचा पराभव केला, याचे कारण काय? आपल्यापाशी सर्वांत महत्त्वाचे असे एक शस्त्र होते. शास्त्रज्ञांनी आणि संशोधकांनी गेल्या काही वर्षांमध्ये किती तरी आधुनिक शस्त्रास्त्रे शोधून काढली आहेत. परंतु सर्वांत प्रभावी शस्त्र परमेश्वराने निर्माण केले आहे, आणि ते म्हणजे माणूस ! माणसापेक्षा श्रेष्ठ असे जगात कोणतेही शस्त्र नाही. भारत आणि पाकिस्तान यांच्यांतील युद्ध हे रणगाडे आणि विमाने यांच्यातील युद्ध नव्हते. प्रशिक्षित भारतीय सैनिक आणि शस्त्रविद्येत निपुण नसलेले पाकिस्तानी सैनिक यांच्यांतील तो संघर्ष होता. म्हणून माणूस महत्त्वाचा आहे. 'मी देशाचा आहे आणि देश माझा आहे', ही भावना जर आपण प्रत्येक नागरिकात जागृत करू शकलो; आणि कोणतीही किंमत द्यावी लागली तरी ती देऊन स्वातंत्र्य जतन केलेच पाहिजे,

असे त्याला वाटायला लागले, तर भारतावर आक्रमण करण्यापूर्वी शत्रूला शंभर वेळा विचार करावा लागेल. हे सामर्थ्य, हा विश्वास, ही जाणीव हेच देशाच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचे मूलभूत शस्त्र होय. देशनिष्ठेइतका स्वातंत्र्यरक्षणाचा दुसरा प्रभावी उपाय नाही.

संरक्षणाचा विचार करताना शेतीचा प्रश्नही विचारात घेतला पाहिजे. आपण जर अन्नधान्यासाठी इतर देशांकडे याचना करू लागलो, तर त्यांची आपल्यासंबंधी काय कल्पना होईल? ते म्हणतील, 'तुम्हांला जर पुरेसे धान्य पिकवता येत नसेल, तर जागतिक शांतता, स्वातंत्र्यरक्षण इत्यादी बडे शब्द उच्चारण्याचा तुम्हांला अधिकार पोहोचत नाही.' अमेरिकेसारख्या मित्रदेशाने आपल्याला अन्नधान्याची मदत केली, याबद्दल आपण त्याचे आभार मानू; पण तेवढ्यावर थांबून चालणार नाही. आपल्याला अन्नधान्याची आयात करावी लागणार नाही, इतके शेती-उत्पादन वाढविले पाहिजे.

संरक्षणमंत्री म्हणून मी १९६४ मध्ये याचनायात्रेवर गेलो होतो. मी अमेरिकेला गेलो, इंग्लंडला गेलो, रशियाला गेलो. या देशांनी आपल्याला काही ना काही मदत देण्याचे आश्वासन दिले. हे सगळे देश आपल्याशी चांगले वागले. आपल्याला मदत करण्याची त्यांची इच्छा होती. हे सगळे ठीक होते. तरीही एक गोष्ट मला जाणवली. भारताला काय द्यायचे नाही, हे त्यांनी अगोदरच ठरविले होते. त्या गोष्टी सोडूनच त्यांनी आपल्याला मदत केली. कारण कोणताही देश आपल्याजवळची सर्वांत चांगली आणि प्रभावी शस्त्रास्त्रे दुस-याला देत नसतो. म्हणून आपल्याला जर स्वातंत्र्य टिकवायचे असेल, तर आपण स्वयंपूर्ण झालो पाहिजे. स्वयंपूर्णतेतूनच देश समर्थ होऊ शकतो.

स्वयंपूर्ण होणे अवघड आहे, याची मला जाणीव आहे. केवळ स्वयंपूर्णतेचा गजर करून ती साध्य होणार नाही. स्वयंपूर्णतेसाठी नियोजन हवे असते. आपली तांत्रिक क्षमता विकसित करायला हवी. कोणते कार्यक्रम आधी घ्यावयाचे, कोणते नंतर

घ्यावयाचे, हे सारे ठरवायला हवे. स्वयंपूर्णतेचा प्रवास लांब पल्ल्याचा आहे. तरीही त्याला प्रारंभ हा केलाच पाहिजे.

भावी काळ आपली कसोटी पाहणारा ठरणार आहे. परंतु त्याचबरोबर संकटांना आणि अडचणींना तोंड देण्याचा निर्धार आपल्या हृदयात जागा झालेला आहे. या निर्धारावरच आपली प्रगती आणि शांतता निर्भर राहणार आहे. कारण शांततेसाठीही सामर्थ्य हवे असते. मी रशियाला गेलो असताना, बोलण्याच्या ओघात ख्रूश्चोव्ह म्हणाले, 'तुम्ही आमच्याकडे ब-याच गोष्टी मागत आहात, आम्ही त्या देऊही. पण एक गोष्ट लक्षात ठेवा. तुमचा देश शांतताप्रेमी आणि अलिप्ततावादी आहे. तुम्हांला शांतताप्रेमी आणि अलिप्ततावादी राहायचे आहे; पण हे शांतताप्रेम आणि अलिप्तता टिकविण्यासाठीही तुम्हांला बलिष्ठ व्हायलाच हवे.' त्यांचा हा उपदेश मला फार महत्त्वाचा वाटला. आता आपण तो अमलात आणीत आहोत. ही गोष्ट आपल्याला माहीत नव्हती, असे नाही; परंतु अनुभवाने पुन्हा आपल्याला तिचे महत्त्व जाणवले आहे.

आपण दोन गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. मैत्री आणि जागतिक शांतता यांच्यावरील आपली श्रद्धा कधीही कमी होता कामा नये. आपल्याला कोणत्याही देशाचा द्वेष करावयाचा नाही, इतर देशांच्या मैत्रीचा आदर करून जागतिक शांतता बळकट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचबरोबर आपण आपला देश आर्थिक आणि लष्करी दृष्टीने बलिष्ठ करावयास हवा. देशभक्तीची जाणीव सतत प्रज्वलित ठेवायला हवी. आपण या दोन्ही गोष्टी ध्यानात ठेवल्या, तर जगातील कोणतीही शक्ती भारताची प्रगती रोखू शकणार नाही.

भारताने लोकशाहीचा स्वीकार केलेला आहे. तो निरंतर लोकशाहीवादीच राहील, अशी माझी श्रद्धा आहे. लोकशाहीमध्ये अंतिम सत्ता लोकांच्याच हातांत असते. लोकांची ही सार्वभौमता अखंडित राहिली पाहिजे, असे मी मानतो. निर्धार, विश्वास आणि

देशनिष्ठा यांच्या आधारांवर आपल्याला आपल्या या महान देशाचे उज्ज्वल भवितव्य घडवायचे आहे.

## ३. भारतीय नागरिकत्वाची आठवण

१९६६ साली संरक्षणमंत्री असताना
स्वातंत्र्यदिनानिमित्ताने सैनिकांना व जनतेला
उद्देशून केलेले संदेशवजा भाषण.

भारतीय प्रजासत्ताकाची स्थापना झाली, तो दिवस या देशाच्या इतिहासातील नव्या लोकशाही युगाचा पहिला दिवस म्हणून आपण सर्वजण साजरा करतो. पण हा जसा लोकशाहीचा उत्सव आहे, लोकांच्या विजयाचा उत्सव आहे, तसाच आपण ज्या नव्या बंधनाने सर्वजण इतिहासात प्रथमच बांधलो गेलो, त्या समान भारतीय नागरिकत्वाचाही तो जन्मदिन आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. आपल्या राज्यघटनेने हे नवे नाते निर्माण केले. या नात्याने प्रचंड प्रजासत्ताक राज्याचा नागरिक म्हणून आपल्याला अधिकार मिळाले. कोणत्याही धर्माचा नागरिक या देशात सारख्याच दर्ज्याने वागविला जाईल. स्त्री आणि पुरुष असा भेद दाखविला जाणार नाही. कोणत्याही जातीचा, कोणत्याही वर्गाचा नागरिक असला, तरी राज्यसंस्था त्याला नि:पक्षपातीपणे वागवील. अशी ही राज्यघटनेची देणगी आपणांला या दिवशी मिळाली. प्रजासत्ताक राज्याचा उत्सव साजरा करताना हे ऋण आठवले पाहिजे. आपली नागरिक या नात्याने काय जबाबदारी आहे, हे ओळखले पाहिजे. हा एक लोकशाही नागरिकत्वाचे संस्कार करणारा उत्सव आहे. आपण भाऊबीजेच्या दिवशी बहिणीवरचे आपले प्रेम व्यक्त करतो. त्या नात्याची आठवण आपणांला येते. नात्याची आठवण देणारा तो एक संस्कार आहे. प्रजासत्ताक राज्याचा उत्सव हाही असाच एक राष्ट्रीय संस्काराचा प्रयत्न आहे. पण

संस्काराचा उपयोग आपल्या वागणुकीसाठी झाला पाहिजे. संस्कार व्हावयाचे असतील, तर मन उघडे ठेवले पाहिजे. प्रजासत्ताक राज्याचा नागरिक म्हणून आपले वर्तन योग्य रीतीने व्हावे, असे वाटत असेल, तर आपल्याला आपल्या मनाचीही त्यादृष्टीने जोपासना करावी लागेल.

भारतीय प्रजासत्ताकाचा नागरिकधर्म यशस्वी व्हावयाचा असेल, तर आपले मन भारतीय राहिले पाहिजे. गेल्या दीडशे वर्षांत हे भारतीय मन घडविण्याचे प्रयत्न महर्षी दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, रवींद्रनाथ टागोर, महात्मा गांधी आदी राष्ट्रीय नेत्यांनी केले आहेत. स्वातंत्र्यासाठी लढत असताना ही जी भारतीयतेची घडण झाली, तिचाच भावनोत्कट उद्गार म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोसांनी दिलेली 'जय हिंद' ही घोषणा होय. इतिहासातील योगायोग असा, की ही घोषणा सैनिकांना दिली गेली, ती आराकानच्या, इंफाळच्या आणि सिंगापूर-मलायाच्या जंगलात घुमली आणि तिचे पडसाद भारतात उमटले. भारतातही ती स्वीकारली गेली. पण हा ऐतिहासिक योगायोग असला, तरी त्यात फार मोठे सत्य आहे. ते सत्य म्हणजे भारतीय सैन्य हे भारताच्या राष्ट्रीय ऐक्याचे प्रत्यक्ष दिसणारे रूप आहे. रणांगणावर लढताना, संकटाच्या छायेखाली वावरताना, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी नागरिकांच्या मदतीसाठी धावून जाताना भारतीय सैन्याच्या या आदर्श राष्ट्रीय ऐक्याचा अनुभव गेल्या वीस वर्षांत भारताने घेतला आहे. त्या पराक्रमाचा, सेवाबुद्धीचा भारतीय नागरिकाला अभिमान वाटतो, हेही १९६५ साली भारतीय जनतेने जे सैनिकांचे कौतुक केले, त्यावरून दिसले. भारतीय सैन्याची ही कामगिरी जितकी महत्त्वाची, तितकीच त्यात जोपासली जाणारी राष्ट्रीय प्रवृत्तीही महत्त्वाची आहे.

आधुनिक शस्त्रास्त्रे, किंवा रणनीती ही देशाचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक आहेत. पण मजबूत, विशाल भारतीय मन हीही भारतीय सैन्याची अभेद्य अशी शक्ती आहे, हेही लक्षात ठेवले पाहिजे. ते मन अभंग असल्यामुळेच जगातील कोणतीही दुष्ट शक्ती आपल्याला पराभूत करू शकणार नाही.

भारतीय सैनिकांनी या देशातील नागरिकांविषयी जशी राष्ट्रीय भावनेने आस्था बाळगली पाहिजे, तसेच नागरिकांनीही सैन्याकडे कौटुंबिक भावनेने पाहिले पाहिजे. रक्त गोठविणा-या हिमालयाच्या थंडीत, उष्णतेने भाजून काढणा-या राजस्थानच्या सीमेवर किंवा आसामच्या किर्र झाडीत आपल्या सीमेचे रक्षण करीत उभा असलेला भारतीय सैनिक आपल्या विशाल कुटुंबाचा घटक आहे, या भावनेने आपण वागले पाहिजे. त्याच्याशी आपले नाते कृत्रिम नाही, कौटुंबिक जिव्हाळ्याचे आहे, असे मानले, तर भारतीय सैनिकाच्या खडतर जीवनात त्याला मोठा आधार वाटेल.

प्रजासत्ताक दिनाच्या उत्सवात सैन्याचे संचलन पाहताना ही भावना उचंबळून आली, तर त्याचे सार्थक होईल. त्यात कृतज्ञतेची भावना असली पाहिजे. कारण आपण शांतपणे झोपावे, म्हणून तो जागत असतो. आपण सुरक्षित असावे, म्हणून तो धोक्याचे जीवन पत्करीत असतो. भारतीय नागरिक आणि भारतीय सैन्य यांच्यांतील हे जिव्हाळ्याचे संबंध हीसुद्धा भारतीय प्रजासत्ताकाची मोठी शक्ती ठरेल. भारतीय प्रजासत्ताक राज्याचा उत्सव करताना या सर्व विचारांची आठवण ठेवली पाहिजे. हा केवळ रोशनाईचा उत्सव नव्हे. आपल्या देशाची जबाबदारी आपल्यावर आहे. ती कोणती आहे, हे समजावून घेण्याचा प्रयत्न करून त्याप्रमाणे आपण वागले पाहिजे. कारण प्रत्येक नागरिकाचे वर्तन कसे आहे, यावरच आपल्या राष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे.

## ४. राष्ट्राचे सामर्थ्य

कऱ्हाड येथे ८ एप्रिल १९६६ रोजी झालेल्या भाषणाच्या आधारे.

स्वराज्य मिळाले, त्याला आता १८ वर्षे झाली. त्यांतला १५-१६ वर्षांचा काळ हा जणू काही मधुचंद्रासारखा गेला. एक बलाढ्य भूभाग असलेला देश स्वतंत्र झाला, याबद्दल सर्वत्र वाहवा सुरू झाली होती. दुसरे महायुद्ध संपले होते आणि जगाला शांततेची आवश्यकता वाटू लागली होती. सर्वत्र शांततेची हवा होती. आम्हीही जागतिक शांततेचाच पुकारा सुरू ठेवला होता. आम्ही जगाला शांतीचे संदेश देत होतो. ते ऐकले जात आहेत, असे वाटत होते. मोठी प्रगती झाली, असे आम्हांला वाटत होते; पण ते खरे नव्हते. शांततेचा अर्थ आम्हांला कळलाच नव्हता, कारण खरी लढाई आम्ही पाहिली नव्हती.

आजच्या दुनियेत दोन प्रकारच्या प्रवृत्ती आढळतात. जगात शांतता प्रस्थापित केली पाहिजे, असे आज बडी बडी राष्ट्रे म्हणत आहेत. संहार करण्याचे सामर्थ्य ज्यांच्याजवळ आहे, त्यांनाच शांततेची गरज अधिक भासत आहे, असे दिसते. रशिया, अमेरिका यांसारखी बलाढ्य राष्ट्रे आधुनिक संहारक शस्त्रास्त्रांनी परिपूर्ण आहेत; परंतु शत्रूचा नाश करावयास जाणारी शस्त्रे व अस्त्रे आपला स्वत:चाच नाश करतील, असे त्यांना वाटते. त्या दृष्टीने या दोन्ही राष्ट्रांचे शांततेच्या संदर्भात हितसंबंध एकच आहेत, असे दिसते.

१९६२ साली चीनचा भारतावर हल्ला झाला, त्यावेळी व नंतरही जागतिक शांततेला धोका निर्माण झाला होता. भारताप्रमाणेच क्यूबामधील परिस्थितीने सा-या जगाचे लक्ष त्यावेळी वेधून घेतले होते. 'वॉटरशेड ऑफ हिस्ट्री' ज्याला म्हणता येईल, अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली होती. म्हणजे शिखरावरून कोसळणारे पाणी, आता या बाजूला जाते, की त्या बाजूला जाते, अशी ती परिस्थिती होती. महाबळेश्वरला, आर्थर पॉइंटजवळ पाच नद्या एकत्र येतात. कृष्णा, कोयना, वेण्णा, सावित्री व गायत्री या पाच नद्या त्या डोंगराच्या टोकावरून एकत्र आल्याने तेथे 'वॉटरशेड' अवस्था तयार झाली आहे. तशीच काहीशी ही अवस्था होती.

युद्ध, की शांतता, असा त्यावेळचा निर्वाणीचा सवाल होता. चीन हे त्यावेळी युद्धखोर

राष्ट्र होते आणि आजही आहेच. युद्ध नको, अशी भूमिका चीनने स्वीकारली, तर त्याला आपली महत्त्वाकांक्षा पुरी करता येणार नाही.

२० नोव्हेंबर १९६२ रोजी मी दिल्लीला गेलो, त्यावेळी मोठे भयानक चित्र निर्माण झाले होते. तेथे जाऊन काय करणार, असे मला वाटत होते. महाराष्ट्राचा मुख्यमंत्रीही नाही आणि संरक्षण-मंत्रिपदही अधिकृतपणे स्वीकारले नाही, असा एक दिवस मुंबईत होतो. काही परिचित मित्र मला त्या दिवशी भेटले. दिल्लीस जाऊन या परिस्थितीत काय करणार, असे सचिंत होऊन गंभीर होऊन त्यांनी विचारले. मी दिल्लीला पोहोचलो, त्यादिवशीही परिस्थिती अधिक गंभीर बनली होती.

'येथे या परिस्थितीत कशाला आलात', असे मला दिल्लीतल्याही माझ्या काही मित्रांनी विचारले. पण योग असा, की मी दिल्लीत आलो, त्याच्या दुस-या दिवशीच चीनने आपले सैन्य मागे घेतले व लढाई थांबली.

चीन सैन्य घेऊन भारतावर चाल करून आला आणि आपण होऊनच परत गेला ही घटना नीटपणे समजावून घेतली पाहिजे. तो काय हौस म्हणून भारतावर चालून आला होता? पण तो परत गेल्यामुळे लढायचे कोणाशी, असा प्रश्न माझ्यापुढे पडला. मी नंतर असे पाहिले, की लढाई संपलेली नाही. हिमालयात सुरू झालेली लढाई थांबली होती; पण संपलेली नव्हती. आजच्या लढायांमागे केवळ सैनिकी लढाई एवढाच हेतू नसतो. या लढायांमागे राजकीय हेतू असतात. ज्यांचा परिणाम जागतिक स्वरूपात होईल, अशा काही गोष्टी त्यात दडलेल्या असतात. लढायचे असेल, तर लढणारा कशासाठी लढणार आहे, याचा आढावा घ्यावा लागतो. तसा तो घेतल्याशिवाय आजकाल लढता येत नाही.

चीनचा लढाईमागचा हेतू स्पष्ट होता. आशिया व आफ्रिका खंडांतील देशांसमोर त्याला एक सामर्थ्यवान देश म्हणून जावयाचे होते. आग्नेय आशिया खंडात त्याला

नेतृत्व करावयाचे होते. ते करण्यासाठी, भारताशी धक्काबुक्की करून, भारत हा दुबळा देश आहे, असे जगाला दाखवून द्यावयाचे होते.

दुस-या महायुद्धानंतर दोन महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. जनसंघटनेतून व जनसंघर्षातून स्वातंत्र्याची क्रांती जन्माला आली होती व या क्रांतीद्वारे राष्ट्रे स्वतंत्र होऊ लागली होती. लोकशाही मार्गाने राष्ट्रे स्वतंत्र होण्याचा हा मार्ग चीनला अर्थातच रुचणारा नव्हता, म्हणून लोकशाही मार्गाने क्रांती यशस्वी होऊ शकत नाही, असेही त्याला सिद्ध करावयाचे होते.

स्वातंत्र्यानंतर आम्ही आमची सर्व शक्ती विकासाच्या कामासाठी लावली. आम्हांला कोणी शत्रू असण्याचे कारण नाही, याही समजुतीत आम्ही होतो. पंडित नेहरूंसारखे पुरोगामी नेतृत्व या देशाला लाभलेले असल्याने सर्वांगीण विकासाचे धोरण नजरेसमोर ठेवून आम्ही पुढे चाललो होतो. मधुचंद्राच्या अवस्थेचा काळ मी म्हणतो, तो हाच. परंतु त्याच वेळी चीन दुसरा विचार करीत होता. भारतापुढे युद्धसमान किंवा लष्करी संकटांसारखे प्रश्न उभे केले, तर भारतात अंतर्गत आर्थिक प्रश्नांचा ताण वाढत राहील, विकास योजना कोसळतील व आर्थिकदृष्ट्या ताणला गेलेला देश तुटून फुटून पडेल, असे वाटत होते. भारत हा एक दुर्बल देश आहे, असे काही देशांना वाटते. याच समजुतीवर त्यांची लष्करी तयारी चाललेली असते. याच वृत्तीतून ते भारतामधील लष्करी संकटे वाढवण्याचाही प्रयत्न करतात. भारताने तटस्थ नीतीचा अवलंब केलेला असल्याने या तटस्थतेच्या व्रतापासून त्याला बाजूला करावयाचे, हाही चीनचा एक हेतू होता.

भारताने कोणत्याही लष्करी गटापासून अलिप्तच असले पाहिजे, याबद्दल नेहरूंचे धोरण आणि मन खंबीर होते. मित्र राष्ट्रांच्या युद्धखोर नीतीविषयी त्यांच्या मनाला खंत वाटत होती. परंतु लष्करी करारात सामील न होण्याच्या धोरणापासून ते कधीच विचलित झाले नाहीत.

मला आठवते, मी दिल्लीत गेलो, त्या दिवशी रात्री पंडितजींना दिल्लीत पोहोचल्याचे मी कळविले. रात्री भेटावयाला या, असे त्यांनी सांगितले. रात्री उशिरापर्यंत ते कचेरीत काम करीत बसलेले असत. मी त्यांच्याकडे गेलो, त्यावेळी ते असेच काम करीत होते. लढाईचा जोर वाढलेला होता. एकापाठोपाठ एक युद्धवार्ता येत होत्या. कोणत्या परिस्थितीत आपणांला काम करावयाचे आहे, हे पंडितजी मला समजावून देत होते. तटस्थतेच्या धोरणाबद्दलही त्यांनी सांगितले, राष्ट्रावर भयानक संकट कोसळले असतानाही ते आपल्या तटस्थपणापासून यत्किंचितही ढळले नव्हते. त्यावेळी त्यांच्याच एका वचनाची मला आठवण झाली. 'मला राग लवकर येतो; पण धैर्य नाही खचत', असे ते म्हणाले होते. पंडितजींचे तटस्थतेचे धोरण योग्य होते, हे आम्हांस आज पटते.

चीनचे त्या लष्करी आक्रमणामागचे हेतू काही अंशी खरे ठरले. लढाईनंतर अंतर्गत परिस्थिती बदलली, देशात महागाई वाढली. बाहेर देशांची आर्थिक मदत कमी झाली, हे खरे; परंतु त्यातून राष्ट्रीय एकात्मतेची आमची भावनाही दृढ झाली, हे विसरून चालणार नाही.

आमचा दुसरा शेजारी पाकिस्तान. इतर मुस्लिम राष्ट्रांशी पाकिस्तानची दोस्ती जमली, तर समजू शकते. पण चीनशी मैत्री कशासाठी, हे समजत नाही. पाकिस्तान हे धर्माधिष्ठित राष्ट्र. कम्युनिझम हे काही त्याचे ध्येय नव्हे. चीनशी त्याचा धर्माचा किंवा कम्युनिझमचा कसलाच दुवा नाही. तरीही ते एकत्र येतात. याचा अर्थच हा, की भारताबद्दलची विरोधी भावना हा त्या दोघांना जोडणारा समान दुवा आहे. राष्ट्रांशी मैत्री मूलभूत तत्त्वावर किंवा सिद्धांतावर जडलेली असेल अथवा आधारलेली असेल, तरच ती टिकू शकते. निव्वळ द्वेषावर आधारलेली मैत्री दीर्घकाल टिकणे अशक्य आहे.

या दोन्ही राष्ट्रांना भारत हे एक मोडू शकणारे दुर्बल राष्ट्र आहे, असेच वाटते. त्यांचे हे म्हणणे खरे आहे काय, हेही आपण तपासून पाहिले पाहिजे.

गेल्या सप्टेंबरमध्ये भारत-पाक युद्धाचे वेळी देशातील परिस्थिती तशी चिंताजनक वाटत होती. बंगाल बंद, केरळ बंद, मुंबई बंद, अशी वावटळ सुरू झाली होती. पंजाबी सुभ्यासाठी संत फत्तेसिंग यांनी आमरण उपोषणाचा पवित्रा घेतला होता. काही शहरांतून जातीय दंगलींनी उचल खाल्ली होती. पुण्यात त्यावेळी अशी एक दंगल उडाली. देशात एक प्रकारची अंतर्गत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. पण पाकिस्तानचे आक्रमण झाले आणि सबंध ५० कोटींचा देश एकसंध उभा राहिला. नाग फणा काढून उभा राहावा, असे दृश्य त्यावेळी दिसले. जातिभेद, पंथभेद, राजकीय मतभेद, महागाई, आर्थिक ओढाताण असे सर्व मतभेद आणि वाद बाजूला पडले व देशाचे संरक्षण व तेही एकवटून करणे, एवढेच एक ध्येय उरले.

पण त्यानंतर लढाई थांबवली, ताश्कंद करार झाला आणि पुन्हा 'ये, रे,माझ्या मागल्या' सुरू झाले आहे. 'बंद' भाषा पुन्हा सुरू झाली आहे. नशीब बंद होण्याची वेळ आली, तरी ही बंद भाषा चालूच आहे. लोकशाही राष्ट्रात अंतर्गत भांडणे असतात, हे मान्य, पण त्या भांडणांचे स्वरूप देशाची शक्ती वाढविण्यासाठी असते. त्यांतून भावात्मक शक्ती पाहिजे तशी वाढवता येते.

आमच्या देशावर चीनने आणि पाकिस्तानने हल्ला केला, तर तुम्ही काय करणार, असे कोणी मला विचारतात. काय सांगणार मी त्यांना? या दोघांबरोबर लढूच लढू. पण त्याबरोबर देशातील एकात्मता कशी वाढेल आणि टिकेल, हेही पाहिले पाहिजे. देश समर्थ बनविणे, हे लढण्याअगोदरचे महत्त्वाचे कार्य आहे. आम्ही लढण्यासाठी आम्हांला कोणी मदत करील, म्हणून स्वस्थ राहून चालणार नाही.

संरक्षण-साहाय्य मिळविण्यासाठी मी अमेरिका, इंग्लंड व रशिया या तीन देशांचा

दौरा केला. संरक्षण-मदतीबद्दल मी तेथे चर्चा केली. त्या देशांनी थोडीफार मदत दिलीही. पण ही चर्चा करीत असताना, भारताला काय द्यावयाचे नाही, याचा निर्णय त्यांनी अगोदर केलेला होता, हे माझ्या लक्षात आले. तेव्हा ख-या अर्थाने संरक्षणाची तयारी आपली आपणच केली पाहिजे, असा आपला निर्धार हवा. चीन हा सबंध भारत जिंकण्यासाठी मोठी झेप घेईल, असे नव्हे. तो त्रास देईल. सीमेवर कटकटी निर्माण करील, पाकिस्तानशी संधान बांधून काही कुरापत काढेलही, पण सहजासहजी आता भारताशी धक्काबुक्की त्याला करता येईल, अशी परिस्थिती राहिलेली नाही. आपले सैन्य चांगले पराक्रमी आहे. कोणी हल्ला केल्यास त्यापासून देशाचे संरक्षण करण्याची त्याची मोठी हिंमत आहे. पण या सैन्याच्या सामर्थ्याबरोबरच देशातील जनमनाचे सामर्थ्य कसे पक्के करता येईल, हे पाहिले पाहिजे.

देशात किंवा देशाच्या संदर्भात घडणा-या घटनांचे अर्थ आपण नीट समजावून घेण्याची आवश्यकता आहे. आजकाल ताश्कंद कराराविषयी किंवा शास्त्रीजींच्या निधनाविषयी बोलताना काही राजकीय पक्ष 'ध' चा 'मा' करून बोलताना आढळतात. ताश्कंदचा करार झाला, त्यामध्ये रशियाच्या सामर्थ्याची प्रचीती आली. कम्युनिस्ट राष्ट्राने दोन बिगरकम्युनिस्ट राष्ट्रांमध्ये समझोता घडवून आणला. त्यांच्या डोक्यात वाईट गोष्टी येण्याचे कारण काय? पण या करारासंबंधी बोलताना मनात शंका बाळगून काहीजण बोलतात. ताश्कंद करार काही कोणी कोणाच्या दडपणाने स्वीकारलेला नाही. त्यात उलट-सुलट प्रदीर्घ चर्चा झाल्या. डावपेचाच्या गोष्टी झाल्या. ताश्कंदचा करार स्वीकारला, याचा अर्थ पाकिस्तानचा हृदयपालट झाला, असे आम्ही कधीच मानले नाही. काश्मीर प्रश्नाबद्दल या दोन्ही राष्ट्रांत पूर्व पश्चिमेइतकी विरोधी मते आहेत, असे ध्यानात घेऊनच करारावर सह्या झाल्या. करार न स्वीकारणे हे हिंदुस्थानला शोभले नसते. ते हिताचेही नव्हते. आजही ताश्कंद करार मोडण्यात आमचा फायदा नाही. पाकलाही हा करार मोडावयाचा झाला, तर पुन्हा आक्रमणच करावे लागेल. भाषणबाजी फार तर करीत असतील; पण त्यामुळे करार मोडला गेला, असे नव्हे. याबाबतची आमची भूमिका स्पष्ट आहे.

पाकशी मैत्री ठेवण्याची आमची इच्छा आहे; पण त्यासाठी काश्मीरचा सौदा झाला पाहिजे, असे कोणी म्हणेल, तर त्याला आमचा साफ नकार आहे.

पंतप्रधान इंदिरा गांधी नुकत्याच अमेरिकेत जाऊन आल्या. त्यांनी ही भूमिका स्पष्ट केली आहे. आता पुन्हा फाळणी नाही, अशी आमची ठाम भूमिका आहे. धर्मातीत लोकशाहीच्या कल्पनेचा भारतासारख्या मोठ्या देशात पराभव झाला, तर जगातील लोकशाहीच नष्ट होईल, असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे.

पाकिस्तानने पुन्हा भारताच्या भूमीत घूसखोर पाठविले आणि कटकटी निर्माण केल्या, तर काय करणार, असा प्रश्न विचारला जातो. पण ताश्कंद करार या संकटाला तोंड देण्याच्या आड येण्याचे कारण नाही. असे घूसखोर पुन्हा आले, तर भारत समर्थपणाने हत्यार चालवील. राष्ट्र म्हणून जगताना सामर्थ्य हे टिकविले गेलेच पाहिजे अशी, आमची भूमिका आहे. आम्ही युद्धखोर नाही. पण आमची त्याचबरोबर संरक्षण-भूमिकाही स्पष्ट असली पाहिजे.

अंतर्गत शक्तिसामर्थ्य हा आज देशापुढील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. नागा, मिझो यांसारख्यांचे बंड झाले, तर बाहेरची मदत मागता येणार नाही. यासंबंधी बाहेर बोलताना मान खाली घालावी लागते. देशातील मधुचंद्राचा काळ संपला आहे. विवाहानंतर मधुचंद्राचे काही दिवस गेल्यावर मीठ-मिरचीचा विचार जसा करावा लागतो आणि दैनंदिन कौटुंबिक जीवन सुरू करावे लागते, त्याचप्रमाणे आता देश आणि देशासमोरचे प्रश्न आम्ही वास्तवतेने समजावून घेऊ लागलो आहोत. त्या दृष्टीने हा एक कठीण काळ आहे. राजकीय नेत्यांनी गंभीरपणाने बोलण्याचा आणि वागण्याचा हा काळ आहे.

देश म्हणून भारताचा विचार हा आज प्रामुख्याने आपणांसमोर आहे. स्वातंत्र्य प्राप्त होऊन १८ वर्षे झाली. या संदर्भात, आम्ही काय केले, काय प्रगती केली, असे प्रश्न विचारले जातात. पण देश म्हणून भारताचा विचार केला, तर निदान गेल्या हजार,

दीड हजार वर्षांत या देशाची काही प्रगती झाली नाही, असे विद्वान इतिहासकार म्हणतात. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजीमहाराजांकडून किंवा अन्य प्रांतातून इतर काही प्रगतीचे स्वतंत्र प्रयत्न झाले असतील, परंतु एक देश म्हणून या देशाची प्रगती गेली दीडहजार वर्षे खुंटलेलीच आहे. याच संदर्भात स्वातंत्र्यानंतरच्या १० वर्षांचा विचार केला पाहिजे. शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रांत आम्ही प्रगती करीत आहोत. पण त्याचबरोबर या प्रगतीला मागे खेचण्याचेही कार्य सुरू आहे. कोल्हापुरातील रंकाळा तलावाच्या काठी एक नंदी आहे. त्याची एक कथा काहीजण सांगतात, की हा नंदी म्हणे वर्षभरात केसभर पुढे आणि गहूभर मागे सरकतो. हा नंदी जेव्हा रंकाळ्यात उडी घेईल, त्यावेळी जलप्रलय होईल, असे सांगितले जाते. आमच्या प्रगतीचेही असेच काहीसे चालू आहे.

देशापुढे महत्त्वाचे आर्थिक प्रश्न आहेत. टीका करून आर्थिक प्रश्न मिटत नाहीत किंवा मिटवता येत नाहीत. व्यक्ती काही प्रयत्नांनी लौकर श्रीमंत होऊ शकते, पण समाज तसा होऊ शकत नाही. ५० कोटींचा देश बदलावयाचा आहे. योजनापूर्वक काही गोष्टी केल्या व समाजाचे नियोजन केले, तर थोड्या काळात क्रांतिकारक बदल घडू शकतो, असा अनुभव इतर देशांतून आलेला आहे. समाजच्या समाज श्रीमंत, सुखी होऊ शकतो, हा आमच्या काळातील क्रांतिकारक विचार आहे. नवनव्या शोधांनी समाजातील गरिबी व दारिद्र्य हटविता येते, असे अनुभवाने सिद्ध झालेले आहे. आपल्या देशात या कामाला प्रयत्नपूर्वक लागण्याची आवश्यकता आहे. रशियासारखे देशही विधायक वृत्तीने शेती, शिक्षण यांसारख्या प्रश्नांच्या प्रगतीचा विचार करतात. केवळ राजकीय विचारानेच हे केले जाते किंवा करावे लागते, असे नाही.

वैज्ञानिक दृष्टिकोणातून ही प्रगती साध्य करता येते. आम्ही आमच्या देशातील राजांची राज्ये लोकराज्यात विलीन करण्याची क्रांती केली. इतर देशांतही राजांची राज्ये नष्ट करणा-या क्रांत्या झाल्या. पण मानवी जीवन बदलण्याची क्रांती यापुढे करावयाची आहे. हिंदुस्थानातील आर्थिक व सामाजिक गरिबी नाहीशी झाल्याशिवाय

या देशातील लोकशाहीला अर्थ राहणार नाही. आज महागाई आहे, गरिबी आहे, इतरही अनेक प्रश्न आहेत. परंतु त्याचबरोबर देशाचाही प्रश्न आहे आणि या प्रश्नाच्या संदर्भातच इतर प्रश्न सोडवावयाचे आहेत.

स्वातंत्र्य मिळून २८ वर्षे झाली, याचा अर्थ आपण आता सज्ञान झालो आहोत. सज्ञानाप्रमाणेच आपण यापुढे वागले पाहिजे. सज्ञानाप्रमाणेच राजकारण केले पाहिजे. राष्ट्र वाढते आहे. त्याच्या गरजाही वाढल्या आहेत. संकटाचा काळ समोर दिसतो आहे. म्हणून नेत्यांचीही गरज आहे. पराक्रमाला जागा आहे, असा हा काळ. यावेळी राष्ट्राला बळकट करण्याचे कामच तुम्ही-आम्ही करावयाचे आहे.

## ५. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर

१९६७ मधील एका मुलाखतीच्या आधारे

सार्वत्रिक निवडणुकीतील निकालांचा अन्वयार्थ सांगताना कोणताही एक निश्चित निष्कर्ष काढणे केवळ अशक्य आहे. जनतेला विनाविलंब परिवर्तन हवे आहे, हेच जनतेने मतपेटीच्या द्वारा सर्व पक्षांना दाखवून दिले आहे. जनतेचा कल डावीकडे आहे, की उजवीकडे, याबाबतीतही खात्री देता येणार नाही. या निवडणुकीत काँग्रेसला राज्यविधानसभांमध्ये मोठ्या प्रमाणावर पराभव पत्करावा लागला आहे, हे अगदी खरे. परंतु याचा अर्थ जनतेचा नियोजनाला, निधर्मी राष्ट्राच्या कल्पनेला वा आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील गतमान तटस्थतेच्या धोरणाला विरोध आहे, असे मात्र म्हणता येणार नाही.

मग काँग्रेस पक्षाचा हा पराजय कसा व का झाला? स्थानिक लोकभावना, निर्णयांच्या अंमलबजावणीची अक्षम्य दिरंगाई आणि काही राज्यांत काँग्रेसच्या

स्थानिक नेतृत्वाविरुद्धचा राग यांमुळे जनतेने मिळालेल्या संधीचा लाभ घेतला आणि काँग्रेसविरुद्धचा राग प्रकट केला.

या निवडणुकीपासून भारतात राजकीय 'पोलरायझेशन'ला प्रारंभ झाला आहे, असे मात्र मला वाटत नाही. तशी भावना निर्माण झाली आहे, एवढेच. परंतु अशा प्रकारच्या 'पोलरायझेशन'ला मी मात्र याक्षणी तरी फारसा उत्सुक नाही. तत्त्वत: नव्हे; व्यावहारिक दृष्ट्या. कारण 'पोलरायझेशन'ची प्रक्रिया याक्षणी सुरू होणे राष्ट्रहिताला बाधक ठरणार आहे, असे मला वाटते. आज आपण राष्ट्रीय विकासाच्या ज्या स्तरावर उभे आहोत, त्याकडे दृष्टीक्षेप टाकता माझे म्हणणे कुणालाही पटावे. कारण अशा प्रक्रियेतून देशात यादवी युद्ध पेटेल, अशी मला भीती वाटते.

याचा अर्थ विविध राजकीय पक्षांनी वेळोवेळी उद्भवणा-या प्रश्नांवर आपापली धोरणे स्पष्टपणे मांडू नयेत, असे नाही. त्याप्रमाणे शांततापूर्ण व घटनेच्या चौकटीत राहून जन-आंदोलने उभारण्यासही माझा विरोध नाही. पण राजकारणात 'पोलरायझेशन' हा शब्दप्रयोग ज्या अर्थाने वापरला जातो, तो अर्थ मला याक्षणी अमान्य आहे. जनतेची डाव्या व उजव्या गटांत विभागणी करणे देशाला परवडणारे नाही.

काँग्रेसचा पराभव मोठ्या प्रमाणावर झाला असला, तरी देशातील जनता निश्चितपणे कोणत्या तत्त्वज्ञानाच्या पाठीशी उभी आहे, हे चित्र अद्यापि स्पष्ट झालेले नाही. मद्रास राज्यात द्रविड मुन्नेत्रा, केरळ राज्यात कम्युनिस्ट नियंत्रित संयुक्त आघाडी आणि उत्तर प्रदेश, बंगाल, बिहारात जनसंघ-कम्युनिस्टांसह बंडखोर काँग्रेसजनांच्या नेतृत्वाखाली संयुक्त दले सत्तेवर आली आहेत.

अशा या वैचारिक गोंधळातून मार्ग काढण्यासाठी काँग्रेसचे पुन:संघटन होणे आवश्यक आहे. निवडणूक निकाल लक्षात घेता काँग्रेसला आत्मटीका जरूर केली पाहिजे, अंगभूत दोष दूर केले पाहिजेत आणि जनतेच्या भावनांचे व आकांक्षांचे प्रतिबिंब काँग्रेस संघटनेत अधिक उमटले पाहिजे, यात मुळीच शंका नाही.

काँग्रेसच्या मूलभूत धोरणाशी तडजोड सुचविणारी कोणतीही योजना मला मान्य नाही. गेल्या ८०/९० वर्षांच्या काळात काँग्रेसने राजकीय, सामाजिक व आर्थिक विचारांची एक निश्चित दिशा निर्माण केली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात नवनिर्माणाच्या अनेक योजना आखल्या आहेत आणि एका विशिष्ट दिशेने पुरोगामी वाटचालही सुरू केली आहे.

या पार्श्वभूमीवर, निवडणुकीत काही प्रमाणात पराभव पत्करावा लागला, या एकमेव कारणासाठी जनसंघ वा स्वतंत्र पक्षाशी पक्ष या नात्याने सहकार्य करणे सुसंगत ठरणार नाही. या दोनही पक्षांच्या प्रमुख नेत्यांबाबत माझ्या मनात अतीव आदर आहे. परंतु व्यक्तिगत लोभ वा आदरभावनेचा उपसर्ग पक्षाच्या तत्त्वज्ञानाला पोहोचू नये, या मताचा मी आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने पाहता हे दोनही पक्ष 'जैसे थे' (Status Quo) वादी आहेत. खास करून आर्थिक पुनर्रचनेच्या बाबतीत स्वतंत्र पक्ष राजकीय दृष्ट्या समाजातील उच्च व वरच्या थरातील समाजाचे प्रतिनिधित्व करीत आहे आणि म्हणूनच प्रतिगामी आहे. सांस्कृतिक क्षेत्रातील स्वतंत्र पक्षाची विचारसरणी पाश्चिमात्यांकडे झुकलेली आहे, तर जनसंघाचे स्फूर्तिस्थान पुराणमतवादी विचारसरणीत आहे. अशा पक्षांशी काँग्रेससारखा गतिमान व पुरोगामी पक्ष सहकार्य करू शकेल काय? याचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल. इतिहासाकडे पाठ फिरवून आत्मघाताला सिद्ध होण्याचाच तो एक प्रकार ठरेल.

प्रजासमाजवादी पक्षाशी सहकार्य करण्याची कल्पना मात्र निश्चितपणे विचार करण्याजोगी आहे. अर्थात दोन्ही बाजूकडील प्रमुखांत वैचारिक देवाणघेवाण कितपत होते व दोन्ही पक्ष एकमेकांशी सहकार्य करण्यास कितपत उत्सुक आहेत, यांवरच सारे अवलंबून आहे. व्यावहारिक अडचणी बाजूला सारता आल्यास, तत्त्वत: या दोन पक्षांत वैचारिक मतैक्य असल्याचेच दिसून येईल.

भारतीय राज्यघटनेने राज्यांना दिलेली स्वायत्तता देशातील फुटीर प्रवृत्ती वाढीला लावील, असे मला वाटत नाही. सध्याची स्वायत्तता राज्यांना व केंद्रांना सारख्याच

प्रमाणात परस्परपूरक ठरणारी आहे. केंद्राला दुर्बल करणे एवढाच जर काही हितसंबंधियांना अभिप्रेत असलेला स्वायत्ततेचा अर्थ असेल, तर तो अनर्थकारी आहे, असेच मानावे लागेल; पण भारताच्या घटनाकारांनी या सर्व बाबींचा विस्ताराने व खोलवर विचार करूनच स्वायत्ततेच्या कक्षा निश्चित केल्या आहेत. अर्थात या कक्षांमागील भावना समजावून घेतली पाहिजे. एवढे पथ्य पाळल्यास केंद्रात वा राज्यांत कोणत्याही प्रकारची सरकारे स्थापन झाली, तरी जगन्नाथाचा हा रथ योग्य मार्गानेच मार्गक्रमण करील.

चारित्र्यहननाची कल्पना केवळ लोकशाहीशीच विसंगत आहे, असे नसून, व्यक्तिगत जीवनात पाळावयाच्या शिष्टसंमत संकेताशीही ती विसंगत आहे. आणि म्हणूनच हा मार्ग केव्हाही त्याज्य व निषेधार्हच आहे. सभ्यतेच्या मर्यादा ओलांडणारा हा प्रकार हिडीस व ओंगळवाणा आहे. असे प्रकार थांबलेच पाहिजेत.

सुरक्षा दलाची ट्रेड युनियन (संघटना) असा प्रकार जगाच्या पाठीवर कुठेही असत नाही. या प्रश्नावर तडजोड नाही. कारण अशा प्रकारची ट्रेड युनियन (संघटना) देशहिताशी विसंगत आणि अराजकाला निमंत्रण देणारी ठरेल. देशात हळूहळू लोकशाही स्थिर होत असताना पोलिसांचा संप व्हावा, ही घटना खेदजनक आहे. अनुशासनावर आधारलेल्या पोलीस संघटनेला संपाचे तत्त्व मान्य असलेली ट्रेड युनियन (संघटना) स्थापन करण्यास अनुमती दिल्यास लोकशाही संकटात येईल.

अर्थात पोलिसांची गाऱ्हाणी मांडण्यासाठी मर्यादित अधिकारांचीही संघटना असू नये, असे मात्र कुणीही म्हणणार नाही. दिल्लीतलेच उदाहरण घ्यावयाचे झाल्यास, दिल्ली पोलिसांच्या अशा प्रकारच्या संघटनेला मान्यता देण्यात आली होती. परंतु दुर्दैवाने या संघटनेच्या नेत्यांनी ती संघटना ट्रेड युनियन तत्त्वावर चालविण्याचा प्रयत्न केला व या प्रयत्नांतूनच संपाचे अरिष्ट ओढवले. अर्थात लोकशाहीला धोका निर्माण करणारे कोणतेही कृत्य सहन केले जाणार नाही, असा सरकारचा पक्का निर्णय असल्यानेच परिस्थिती आटोक्यात आली.

अराजकवादी अपप्रवृत्तींविरुद्ध लोकमत संघटित करण्याची जबाबदारी बव्हंशी वृत्तपत्रांची असून, ही जबाबदारी पत्रकारांनी पार पाडली आहे, असे मला वाटते. पोलिसांच्या संपाच्या संदर्भांत मी हे विधान करीत आहे. लोकमताचा पाठिंबा असेल, तर अशा अप-प्रवृत्तींवर मात करणे मुळीच अशक्य नाही, असे मला वाटते. लोकशाहीत 'बंद' वा 'घेराओ'ना मुळीच स्थान असू नये, असे माझे स्पष्ट मत आहे. कारण हे दोन्ही प्रकार लोकशाहीशी संपूर्णत: विसंगत आहेत.

केवळ निवडणुकीच्या निमित्ताने रिपब्लिकन पक्ष आपल्या पक्षाशी युती करतो, म्हणून तक्रार करण्याचे वा नाराज होण्याचे काही कारण नाही. कारण लोकशाहीत सत्तेच्या गाभा-यात शिरण्याचे निवडणूक हे प्रभावी अस्त्र आहे. आणि याची जाणीव असणे, यात गैर काहीच नाही. अर्थात याचे श्रेय बुद्धवासी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आहे. त्यांनी आपल्या समाजात प्रचंड जागृती केली. त्या जागृतीचाच परिपाक म्हणून रिपब्लिकन अनुयायी निवडणूक-क्षेत्रात जाणीवपूर्व आघाडीवर असतात. केवळ निवडणुकीच्या निमित्ताने इतरेजनांशी सहकार्य करण्याची सुरू झालेली ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. काँग्रेसमध्ये संघटित झालेल्या समाजाचे व आपले हितसंबंध एकच आहेत, ही भावना लोकांत निर्माण करण्याचे काम काँग्रेसला जिल्हा परिषद निवडणुकीच्या निमित्ताने करावयाचे आहे. तसे घडल्यास, हा समाज सहकारी व इतर चळवळींत जाणीवपूर्ण भाग घेईल आणि हीच लोकशाही-संवर्धनाची नांदी ठरेल, असे मला वाटते.

## ६. गृहमंत्रिपदाच्या कसोटीचे वर्ष

'लोकसत्ता' (१९६७) दिवाळी अंकातील मुलाखतीच्या आधारे.

गेल्या निवडणुकीनंतर भारताचे अंतरंग ढवळून निघाले आहे. भारताच्या विविध

प्रश्नांविषयीची सामान्य माणसाची जिज्ञासा वाढली आहे. प्रश्न तर रोज नवे निर्माण होत आहेत. दुष्काळाच्या, अन्नटंचाईच्या आपत्तींतून बाहेर पडायच्या आतच अनेक दुष्प्रवृत्ती पुन्हा एकदा उफाळून आल्यासारख्या दिसत आहेत. भाषिक तंटे, प्रादेशिक तक्रारी व जातीय पूर्वग्रह ही आपल्या दुष्प्रवृत्तींची वारुळे आहेत. त्यांचा उद्रेक असा आलटून पालटून का होतो, याचा विचार व्हावयास हवा.

या प्रश्नांच्या शास्त्रीय चर्चेबरोबरही भारताला राष्ट्र म्हणून जगावयाचे असेल, आपला उत्कर्ष साधावयाचा असेल, तर त्याला स्वत:च्या आचारांचे नियमन करायला लागेल. परचक्र आले, की आपली राष्ट्रिय भावना अभिमान वाटावा, इतक्या चांगल्या रीतीने दिसते; आणि ते संकट गेले, की पुन्हा गाडे मूळ पदावर येते. असे का होत आहे? आपल्या राष्ट्रियतेचा रंग कच्चा आहे का? राष्ट्रिय भावनेचे धागे दुबळे आहेत का? राष्ट्रिय नागरिकता आपणांला पेलत नाही का?

या सर्व राष्ट्रिय प्रश्नांकडे गृहमंत्री होण्यापूर्वी मी काहीसा तटस्थपणाने पाहात असे. राजकीय दृष्टीने त्यांचा विचार करीत असे. पण गृहमंत्रिपद ही फार मोठी जबाबदारी आहे. ती लोकांच्या जीवनाशी, त्यांच्या सुरक्षिततेशी निगडित झालेली आहे. त्या भूमिकेवरून जेव्हा मी या प्रश्नांकडे पाहतो, तेव्हा मला एक वेगळा अनुभव येतो. केवळ कायदा व सुव्यवस्था यांपुरती माझी जबाबदारी मर्यादित राहात नाही. राष्ट्रात शांतता, सौहार्द, ऐक्य कसे नांदेल, याची चिंता मला करावी लागते. प्रादेशिकता किंवा भाषिकता, धर्म किंवा जाती यांच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची दृष्टी येते. भारतीयत्वाची खरी प्रचीती येते. भेदांतही अभेद पाहावा लागतो.

माझा अनुभव सांगतो. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो, तेव्हा मी अनेकदा दिल्लीत येत असे. महाराष्ट्राचे प्रश्न मांडण्यासाठी यावे लागे. त्या वेळेस इतर राज्यांचेही मुख्यमंत्री येत. आमच्या राज्याला पुरेसा पैसा नाही, न्याय मिळत नाही, असे सर्वजण सांगत. पण आता गृहमंत्री म्हणून जेव्हा मी सर्व राज्यांत जातो, तेव्हा तिथे असे दिसते, की केंद्र सरकार आपल्याकडे दुर्लक्ष करीत आहे, असे सर्वांनाच

वाटते. मग प्रश्न पडतो, की दिल्ली जर कोणालाच न्याय देत नसेल किंवा पुरेसा पैसा देत नसेल, तर दिल्लीचा पैसा जातो कुठे? इतकेच नव्हे, दिल्लीतल्या लोकांनाही असे वाटते, की केंद्र सरकार आपल्याकडे पुरेसे लक्ष देत नाही.

पण ही समजूत चुकीची आहे, हे इथे आल्यावर पटते. खरे म्हणजे, ही वाढत्या भुकेची लक्षणे आहेत आणि त्यामुळेच ही समजूत निर्माण होते. मूलत: प्रश्न आर्थिक आहे. त्याचा उद्रेक भाषा किंवा प्रदेश यांच्या आधाराने होतो. त्यामुळे राष्ट्राचे ऐक्यच धोक्यात येत आहे.

मी गृहमंत्री झालो, तेव्हा देशाचा 'मूड' अशा प्रकारचा होता. त्यावेळची देशाची मन:स्थिती थोडीशी उदास होती. दुष्काळ, अन्नटंचाई यांमुळे अर्थव्यवस्था विकल झाली होती. स्वातंत्र्यकालीन नेतृत्वाचा शेवटचा दुवा निखळून पडल्यावर होणारी पहिली निवडणूक जवळ आली होती. लोक अधीर झाले होते. सरकारात बदल करण्याचे आपले सामर्थ्य वापरावयाची लोकांची इच्छा दिसत होती. लोकशाहीच्या कसोटीचा तो काळ होता. 'बंद'च्या चळवळी चालू होत्या. विद्यार्थ्यांच्या असंतोषाचे स्फोट ठिकठिकाणी होत होते. गोवधबंदीचा प्रश्न धसास लावण्याचे प्रयत्न सुरू होते. हिंदीचा प्रश्न होताच. राजकारणही अस्थिर होते. निवडणुकीपूर्वीची ही सारी अस्थिरता होती. त्यामुळे निवडणुकी तरी सुरळीत पार पडतील, की नाही, या चिंतेत मी होतो.

पण आहे या परिस्थितीला सामोरे जायलाच हवे होते. लोकशाही हे अग्निदिव्य आहे. निवडणुकाही त्याचाच एक भाग. राज्यकर्त्यांसकट सर्वांनी जनतेपुढे जायला हवे, ते टाळता येणार नाही. म्हणून मला त्यावेळी वाटले आणि आजही वाटते, की निवडणूक ही समाज ढवळून काढणारी प्रक्रिया आहे. त्यासाठी राजकर्त्यांनी सदैव तयार असलेच पाहिजे. गृहमंत्री म्हणून मी कोणते धोरण स्वीकारतो आणि अमलात आणतो, याविषयी त्यावेळी चर्चा चालू होती.

माझ्यापुढे येणारे प्रश्न हाताळण्याचा माझा स्वत:चा असा एक दृष्टिकोण आहे. मी राज्यकर्ता म्हणून तो स्वीकारला आहे. क्रियाशून्य चर्चा करणारा पंडित होऊन मला माझी राज्यकर्त्याची भूमिका करता येईल, असे वाटत नाही. राज्य करणारा पुढारी हा समाजाच्या विविध प्रश्नांची उकल, जसे ते प्रश्न पुढे येतील, तशी करीत जातो. त्याची स्वत:ची पोथीनिष्ठ किंवा सैद्धांतिक विचारसरणी पुढे ठेवून किंवा त्याच्या चौकटीत राहून त्याला समाजाचे प्रश्न सोडविता येणार नाहीत.

गृहमंत्री म्हणून धोरण ठरविताना मी दोन सूत्रे ठरवली होती. मला वाटे, की गृहमंत्री म्हणून कणखरपणा दाखविला पाहिजे; पण तो दाखवायचा असेल, तर प्रश्नांची योग्य रीतीने उकल करून घेण्यासाठी लागणारा समजूतदारपणाही दाखविला पाहिजे. कणखरपणा म्हणजे हेकटपणा नव्हे. तसेच तार्किक विचारप्रदर्शन केवळ तत्त्वचर्चेला ठीक दिसते; पण व्यवहाराची कसोटी लागली, की त्यातल्या अडचणी दिसायला लागतात. लोकशाहीत तर हा व्यवहार असंख्य लोकांना बरोबर घेऊन करावयाचा असतो.

मी फक्त दोन प्रश्नांचा उल्लेख करतो. मी गृहमंत्री झालो, तेव्हा गोवधबंदीची चळवळ सुरू झाली होती. ती करणा-या लोकांना वाटत होते, की राज्यघटनेत तिची तरतूद आहे व ती अमलात आली पाहिजे. म्हणून सरकारवर दडपण आणण्यासाठी चळवळ आवश्यक आहे. काही लोक गोवधबंदीचे विरोधक होते. सरकारला दोन्ही दृष्टिकोणांचा विचार करावयाचा होता. पण चळवळ चालू होती. पुरीच्या श्रीशंकराचार्यांच्या उपोषणाने वातावरण तंग झाले होते. तेव्हा त्याचा प्रतिकूल परिणाम राजधानीवर होऊ नये, याची काळजी घेणे गृहमंत्री या नात्याने माझे कर्तव्य होते, म्हणून मी मनाशी कठोर निर्णय घेतला. तो म्हणजे श्रीशंकराचार्यांना अटक करण्याचा. अनेक दृष्टींनी त्याचे परिणाम होणार आहेत, हे माझ्या मनात मी जाणले होते. तरी शांततेच्या दृष्टीने आवश्यक असा तो निर्णय मी घेतला आणि पुरी येथे त्यांची पाठवणी केली. पण गोवधबंदीच्या पुरस्कर्त्यांशी मी पूर्वग्रह ठेवून

वागलो नाही. पूर्वनिश्चित मते मनात बाळगून प्रश्न सुटणार नाहीत, असे मला वाटते. राज्यकर्त्या पक्षाकडूनही काही चुका झाल्या असल्यास तो प्रतिष्ठेचा प्रश्न न करता जनतेच्या इच्छेनुसार नव्या दृष्टीने त्या प्रश्नांची फेरतपासणी करणे ख-या राज्यकर्त्यांचे धोरण असले पाहिजे. म्हणूनच मी गोवधबंदीच्या प्रश्नाची फेरतपासणी करण्यास तयार झालो. त्यासाठी समितीची स्थापना केली. सरकारने नेमलेली ही समिती सर्व दृष्टींनी निश्चित विचार करील.

दुसरा प्रश्न नक्षलबारीचा. तो हाताळण्यासाठी कणखरपणा, समजूतदारपणा दाखवायला हवा होता. नक्षलबारी हे असंतोषाचे प्रतीक होऊ पाहात आहे, संबंधितांनी नमुन्यासाठी सुरू केलेला तो एक राजकीय प्रयोग होता. जिथे काँग्रेस पक्षाचे सरकार नाही, अशा राज्यात तो घडत असल्याने त्याच्याशी संबंध येणे ही एक नाजूक बाब होती. लोकांना वाटत होते, की काँग्रेसेतर सरकारशी आमचे वर्तन पक्षपाती असेल. पण मला पक्षापेक्षा देश मोठा वाटतो. त्या देशातल्या लोकांची इच्छा ही सार्वभौम आहे, हे एकदा मान्य केल्यानंतर त्यांच्या निर्णयाचा स्वीकार केला पाहिजे. म्हणून नक्षलबारीच्या प्रश्नाकडे मी संकुचित पक्षीय दृष्टीने पाहात नव्हतो. कायदा व सुव्यवस्था यांचे रक्षण करण्यापुरता माझा संबंध होता. नक्षलबारीत त्यालाच धोका आहे, हे जेव्हा दिसून आले, तेव्हा कार्यवाही करणे जरुरीचे होते. काँग्रेसपक्षीय या नात्याने सामाजिक न्याय व समता या तत्त्वांवर समाजाचे स्थित्यंतर घटनात्मक मार्गाने केले पाहिजे, यावर माझी श्रद्धा आहे. कदाचित घटनात्मकतेचे हे बंधन पडल्यामुळेच गेल्या वीस वर्षांत अशा स्थित्यंतराच्या दिशेने भारतात पुरेशी प्रगती झाली नसेल. पण शोषक वर्गाचे हितसंरक्षण आम्हांला करावयाचे नव्हते. नक्षलबारीतही आम्हांला विशिष्ट वर्गाचे रक्षण करायचे नव्हते. आम्हांला रक्षण करायचे होते, शांततेचे. बंगाल सरकारला मी सवाल केला, तो हाच, की सामाजिक स्थित्यंतरासाठी जे तुमचे कार्यक्रम ठरले असतील, ते आता घटनात्मकरीत्या अमलात आणण्याची संधी आली आहे. तिचा फायदा तुम्ही घेतला पाहिजे. पण बंगाल सरकारमध्ये सहभागी झालेल्या पक्षांनी त्या सरकारवर अशा तऱ्हेचे दडपण आणले नाही. संसदीय मार्गांनी जमिनींचा प्रश्न न सोडविता तो दहशतीने

सोडविण्यास एका पक्षाने प्रोत्साहन दिले. नक्षलबारीत हिंसात्मक सामुदायिक आंदोलन करण्याचे प्रयत्न झाले. जेथे सरकारच तुमच्या हाती आहे आणि जनतेला स्थित्यंतर हवे आहे, तेथे हिंसा कशाला, अशी माझी भूमिका होती. माझ्या मते नक्षलबारीच्याद्वारे 'माओवाद' या देशात आणण्याचा प्रयत्न झाला. सरकारच अशा प्रयत्नात सहभागी झाले, तर देशहिताच्या दृष्टीने आम्ही स्वस्थ बसून चालेल काय, हा आमच्यापुढे खरा प्रश्न होता. देशाच्या सीमेवर माओवादाचा नंगानाच आणि देशात त्याचे अनुकरण ही व्यूहरचना कोणत्याही परिस्थितीत फोडली पाहिजे. ती देशहिताच्या दृष्टिने घातक आहे. मला वाटते, लोकमत माझ्या बाजूने आहे.

मला वाटते, की भारतीय समाजाची मानसिक घडणच अशी आहे, की त्याला कोणताही बदल उत्कटतेने हवा आहे, असे वाटत असले आणि त्यासाठी तात्कालिक उद्रेक जरी निर्माण झाले, तरी त्याला हा बदल शांततेने व्हावासा वाटत असतो. १९६७ च्या निवडणुकीचे निकाल हे भारतीय समाजाच्या मानसिक घडणीचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

मला त्यावेळची माझी मन:स्थिती आठवते. गृहमंत्री या नात्याने त्या निवडणुका शांततेने व्हाव्यात, याची काळजी मला घ्यावयाची होती. या निवडणुकी शेवटच्याच ठरतील, अशी अभद्र भाकिते वर्तविली जात होती. पण जे घडले आहे, ते सर्व जगाने पाहिले आहे. राजकीय समज किंवा योग्य तो निर्णय घेण्याची क्षमता ही काही साक्षरतेवर अवलंबून नसते. मला वाटते, शिक्षणानेही एक प्रकारचा मनोगंड येतो, न्यूनगंड येतो. आपले समाजाच्या अंतर्मनाशी असलेले संबंध सुटतात. बावळ्या वेशातील फाटकी वस्त्रे घातलेली, दीन दिसणारी माणसेही प्रचंड धक्का देऊ शकतात, राजवटी कोलमडवू शकतात, राज्यकर्त्यांना व राजकीय पक्षांना धडा शिकवितात, हे लोकशाहीचे सामर्थ्य आहे. भारतीय जनतेने ते सिद्ध केले आहे. आणि हे सारे शांततेने घडवून आणले, याचा मला अभिमान वाटतो. म्हणूनच माझा जनतेवरील व लोकशाहीवरील विश्वास दुणावला आहे.

आपल्या देशाला त्याच्या विशालतेचा विसर पडेल, विशाल स्वप्ने जाऊन तिथे संकुचित भावना रुजतील, की काय, याच गोष्टींची मला काळजी वाटते. भारत हा प्रचंडकाय देश आहे. तेच त्याचे फार मोठे सामर्थ्य आहे. जागतिक राजकारणात आपल्याला त्यामुळेच प्रतिष्ठा लाभलेली आहे, हे आपण विसरलो, तर हा देश निष्प्रभ होईल. हिमालयाची उत्तुंगता, सागराची खोली व विशालता, भारताच्या नद्यांतून अखंड वाहात असलेली एकच उदात्त उदारतेची परंपरा, मंदिरांत तेवणारे नंदादीप व मशिदीमशिदींतून भल्या पहाटे ऐकू येणारी बांग हे भारताचे व्यक्तिमत्त्व आहे. मला वाटते, त्याचा विसर या देशाला पडू नये. तो विसर पडला नाही, तर हा देश खरोखरच महान होईल, हा माझा विश्वास आहे.

## ७. केंद्र-राज्य संबंधांवर दृष्टिक्षेप

'माणूस' (१९६८) दिवाळी अंकातील मुलाखतीच्या आधारे.

लोकशाहीत निवडणूक ही एक सामाजिक प्रक्रिया असते. राजकीय पक्ष मतदारांकडे त्यावेळी नुसती मते मागत नाहीत, तर आपल्या विचारसरणीचीही छाप त्यांच्यावर पाडण्याचा प्रयत्न करतात. विविध हितसंबंधाचे प्रतिनिधी, आपण राजकीय प्रतिस्पर्धी म्हणून, एकमेकांना आव्हाने देतात. या दृष्टीने काँग्रेसखेरीज कम्युनिस्ट आणि जनसंघ हे दोनच महत्त्वाचे अखिल भारतीय पक्ष आहेत. दोन्ही समाजवादी पक्ष, हे प्रॉटेस्टंट काँग्रेसवादी आहेत, असे माझे मत आहे. प्रादेशिक पक्षांत डी. एम्. के. हाच एक पक्ष पुढे आला आहे.

१९६७ च्या निवडणुकीत लोकांचा 'मूड' लोकशाहीने त्यांना दिलेला मताधिकार वापरून एक नवाच प्रयोग करून पाहण्याचा होता. संयुक्त आघाड्यांचे राजकारणी

तंत्र कसे जमते, हे विरोधी पक्षांना एकदा अजमावून पाहावयाचे होते. त्याप्रमाणे काँग्रेसेतर आघाड्यांना संधी मिळाली व सात राज्यांत काँग्रेसेतर पक्षांची सरकारे स्थापन करण्यात आली.

लोकांचा उत्साह वाढता होता. काँग्रेसेतर पक्षांनाही ही सुवर्णसंधी प्राप्त झाली होती. पण गेल्या वर्षातील या सरकारांचा अनुभव लक्षात घेता वाटते, की काँग्रेसेतर पक्षांनी ही सुवर्णसंधी वाया घालविली आहे. सत्ता जिंकण्याचे व राबविण्याचे एक तंत्र म्हणून संयुक्त आघाड्यांचे राजकारण फसले आहे, असेच म्हणावे लागते. त्यामुळे नजीकच्या काळात नवीन राजकीय सोयरिकी होतील, असे दिसते. संयुक्त आघाडी ही एक लोकशाही सत्तास्पर्धेतील डावपेचाची अवस्था (Tactical Phase) आहे. परंतु ही अवस्था आता तूर्त तरी संपुष्टात आली आहे. तरी सुद्धा त्यात दिसलेली लोकांची प्रयोगशीलता वाखाणण्याजोगी आहे. पण ही प्रयोगबुद्धी यापुढे आता अधिक वास्तववादी होईल, असे मला वाटते. कारण मतदार मत देतो, ते देशात स्थिर सरकार निर्माण व्हावे, म्हणून. देशात राजकीय अस्थैर्य असेल, तर अनेक महत्त्वाच्या सुधारणांची गती कुंठित होते. त्यामुळे लोक आता काँग्रेसकडे पुन्हा वळतील; असे मला वाटते. काँग्रेसच्या भवितव्याशीच या देशाचे भवितव्य निगडित होणार, असेही दिसते. याचा अर्थ आगामी मुदतपूर्व निवडणुकीत काँग्रेसला विनासायास विजय मिळेल, असा करता येणार नाही. या लोकविलक्षण कालखंडात घडलेल्या अनेक घटनांतून काँग्रेसलाही बोध घ्यावा लागणार आहे.

आपल्या राज्यघटनेच्या प्रयोगाचा विचार करता हा कालखंड अतिशय मोलाचे अनुभव देऊन गेला. सभापतीचे अधिकार, विधिमंडळाचा दर्जा, मुख्यमंत्र्यांचे व राज्यपालांचे संबंध, राज्यपालाची भूमिका हे जसे घटनात्मक प्रश्न उद्भवले, तसेच पक्षांतराचा राजकीय प्रश्नही मोठ्या प्रमाणात पुढे आला. प्रादेशिक पक्षांची सरकारे आणि राष्ट्रिय प्रश्नांविषयीचे त्यांचे धोरणात्मक मतभेद असेही प्रश्न निर्माण झाले. उदाहरणार्थ, हिंदीचा प्रश्न. राष्ट्रिय प्रश्नांच्याबाबत काँग्रेसेतर पक्षांत परस्परविरोधी मते असल्यामुळे त्यांची इच्छा असूनही काँग्रेसविरोधी आघाडी ते उभारू शकत

नाहीत, हेही त्याच वेळी सिद्ध झाले. थोडक्यात, लोकशाही राज्यपद्धतीच्या विविध व्यवहारांची एक प्रकारे परीक्षाच पाहिली गेली.

राज्यसरकारांचा केंद्राशी असलेला संबंध या वर्षातील घटनांमुळे अधिक निकटचा व वास्तववादी होईल, अशी आशा वाटते. शेवटी राजकारण किंवा राज्यशासन हा एक व्यवहार आहे. तेथे यशस्वी व्हावयाचे असेल, तर काल्पनिक भीती किंवा फोल स्वप्नरंजन या दोन्हींचाही त्याग करावा लागेल. राष्ट्रिय राजकारण हे अधांतरी राहू शकत नाही. ते जमिनीवरून चालावयाचे असेल, किंवा जनताभिमुख करावयाचे असेल, तर संघराज्य ही अटळ राज्यव्यवस्था आहे. राष्ट्रिय राजकारण हे एका अर्थाने प्रादेशिक किंवा स्थानिक राजकारणच असते. अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी उभे असलेले उमेदवार निक्सन यांनी नुकतेच म्हटल्याप्रमाणे प्रत्येक मतदार मत देताना आपल्या प्रदेशाचा फायदा कोणाला मत दिल्याने अधिक होईल, याचाच विचार प्रथम करीत असतो. याच अर्थाने स्थानिक राजकारणाचा राष्ट्रिय राजकारणाशी अभेद्य संबंध आहे.

याच प्रकारच्या जाणिवेतून केंद्र सरकारही सामर्थ्यशाली होण्यास मदत मिळते. केंद्र सरकारची संमती, सहानुभूती, सहकार्य व साहाय्य असल्याखेरीज आपल्या प्रदेशाचा विकास होणार नाही, हे राज्यसरकारांना कळून चुकले आहे. इतकेच नव्हे, तर इतर घटक राज्यांचीही सहानुभूती आपल्याला मिळविली पाहिजे, हे प्रादेशिक सरकारांच्या आता निश्चितपणे ध्यानी आले आहे. अशा प्रकारचे केंद्रावलंबन हेच केंद्र सरकारचे खरे सामर्थ्य आहे. त्यामुळेच हा देश दुभंगला जाणार नाही, असे मला वाटते. मधून मधून परस्परांत काही तणाव किंवा तंग परिस्थिती निर्माण होणारच. पण एक गोष्ट ठामपणे म्हणता येईल, की आता अलग होण्याच्या प्रवृत्ती दुबळ्या झाल्या आहेत. द्र. मु. क. सारखा पक्षही भारतापासून अलग होण्याची भाषा आता काढीत नाही. उत्तरपूर्व भारतामध्ये मात्र असा आवाज अजून ऐकू येतो; त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

दुसरा निष्कर्ष असा, की राज्यसरकारचे अधिकार राज्यहित साधण्यासाठी अपुरे आहेत, ही जाणीव आता राज्यांना झाली आहे. अनुभवातून मिळणारे हे एक शिक्षण आणि शहाणपण असते आणि ते आता राज्यांनी घेतले आहे. त्यामुळे केन्द्रीय सत्ता मजबूत हवी आणि त्यात राज्यसरकारांना प्रभावी व परिणामकारक वाटा आणि सहभाग हवा, ही गोष्ट सर्वांना पटू लागली आहे. ही राज्यघटनेची नव्हे, तर लोकहिताच्या राजकारणाची (Welfare Politics) सक्ती आहे, असेच मला वाटते. लोकशाही जर आपल्या नागरिकांना विकासाची संधी देत नसेल, तर ती टिकणार नाही. म्हणून राज्यांच्या विकासाचा विचार करताना राष्ट्रहिताची चौकट जशी महत्त्वाची, तसेच त्या प्रदेशातील लोकांचे हितही महत्त्वाचे आहे. म्हणून राष्ट्राचे आर्थिक धोरण किंवा त्याच्या विकासाचा वेग यावर देशातील लोककल्याण अवलंबून आहे. लोककल्याणाच्या योजनांवर राष्ट्राचे राजकीय स्थैर्य अवलंबून आहे. म्हणून आर्थिक विकासाची सामान्य नागरिकाला मिळणारी संधी आणि त्याच्या भवितव्याबद्दलचे आश्वासन या दोन निकषांवर कोणतीही राष्ट्रिय अर्थव्यवस्था तपासली पाहिजे. तोच आपल्या राजकारणाचा पाया असला पाहिजे. जी अर्थव्यवस्था हे नाकारील, तेथे राजकीय विभाजन होईल किंवा प्रसंगी लोकशाहीही धोक्यात येईल.

आज तरी दिसते, ते असे, की मद्रास व पंजाबखेरीज अन्यत्र प्रादेशिक पक्ष फारसे प्रबळ नाहीत. प्रादेशिक पक्षांचा धोका त्यामुळे फारसा राहिलेला नाही. प्रादेशिक पक्षही स्वत:च्या विकासासाठी केन्द्रावर अवलंबून असल्यामुळे आणि राष्ट्राच्या संपत्तीची निर्मिती व वाटणी राष्ट्रिय पातळीवरच ठरत असल्यामुळे प्रादेशिक पक्ष जनकल्याणाच्या सर्वच योजना स्वत:च्या हिमतीवर पार पाडू शकणार नाहीत. म्हणून प्रादेशिक पक्ष हा राजकीय जीवनाचा नवा घाट (पॅटर्न) होईल, असे मला तरी वाटत नाही. भारतीय संघराज्यात राहण्यानेच आपला सर्वांगीण आर्थिक विकास साधेल, हे स्वानुभवाने लोकांना पटले, तर प्रादेशिक पक्ष फार काळ टिकणार नाहीत.

राष्ट्रिय पक्षांनी आपली राष्ट्रिय धोरणे आखावीत आणि ती जनतेसमोर सतत

विचारार्थ मांडीत राहावे, असे मला सुचवावेसे वाटते. जनतेचा त्याबाबत कौल मिळविण्यासाठी निवडणुका लढवाव्यात. म्हणून  माझे व्यक्तिगत मत असे आहे, की राज्यांच्या विधिमंडळाच्या निवडणुका आणि संसदीय निवडणुका वेगवेगळ्या वेळी व्हाव्यात, म्हणजे मतदारांना प्रादेशिक हितासाठी वेगळा विचार करावा लागेल आणि संसदीय निवडणुका राष्ट्रिय उद्दिष्टांच्या आधारे लढविल्या जातील. राष्ट्रिय धोरणावर आपला प्रभाव पाडण्यासाठी किंवा सत्तेचा प्रादेशिक वाटा मिळविण्यासाठी प्रादेशिक पक्षांना राष्ट्रिय पक्षांशी निवडणूक-करार करावे लागतील. पण ही अवस्थाही फार काळ टिकणार नाही. कारण, भारतीय अर्थव्यवस्थेची गती या सर्वांना एकत्र खेचीत राहील.

भारताच्या राजकीय एकतेचा विचार करताना, ब्रिटिश राजवटीत येथे असलेल्या केन्द्रीय सत्तेचा तुलनात्मक विचार आपल्या मनात प्रामुख्याने असतो. ब्रिटिश सत्ता ही लोकशाही तत्त्वावर आधारलेली नसल्याने त्यावेळी असलेले सरकार लोकशाही स्वरूपाचे नव्हते. त्याचे सामर्थ्य नोकरशाहीच्या पोलादी चौकटीचे होते. तेव्हा त्या काळच्या केंद्रीय ब्रिटिश सरकारची नि आपल्या राज्यघटनेने निर्माण केलेल्या प्रजासत्ताक केंद्र सरकारची तुलना करणे चुकीचे आहे.

लोकशाहीत निर्माण झालेले सरकार हे लोकमतावर चालणार असल्याने ते एका अर्थाने अशाश्वतच असते. ही अशाश्वतता किंवा अनिश्चितता यांचा धाक हीच राज्यकर्त्या पक्षाला लोकाभिमुख ठेवणारी शक्ती असते.

दुसरा मुद्दा असा, की भारताची राज्यघटना ही संघराज्याचीही (फेडरल) नाही आणि एककेंद्री (युनिटरी) राज्याचीही नाही. दोहोंतील चांगल्या कल्पना एकत्रित करून निर्माण केलेली व आपल्या देशस्थितीला अनुरूप अशी राज्यघटना आहे. घटनेच्या निर्मात्यांनी भारताला दिलेली सर्वांत मोठी देणगी म्हणजे त्यात अनुस्यूत असलेले समर्थ केंद्र सरकार. आणि हे मूलभूत तत्त्व ध्यानी ठेवून अत्यंत सुसंगत व स्पष्ट रीतीने घटनेत तशा तरतुदी केलेल्या आहेत.

कारभार सुधारणा समितीच्या सेटलवाड उपसमितीने केंद्र-राज्य संबंधांचा तपशिलवार विचार करणारा एक अहवाल नुकताच सादर केला आहे. त्यातील विविध सूचनांचा सरकार अवश्य विचार करील, पण एक गोष्ट ठाम आणि स्पष्ट आहे, की केंद्र व राज्य सरकारे यांच्यांतील राजकीय संबंधांत कोणताही मूलगामी बदल करणे धोक्याचे आहे. कारण भारत हे विविध उपराष्ट्रांचे संयुक्त राज्य आहे, ही कम्युनिस्टांची विचारप्रणाली एका बाजूला; आणि राज्यांना आहेत त्यांपेक्षा जास्त अधिकार देण्याचा आग्रह धरणारी अतिउदार विचारप्रणाली दुस-या बाजूला, असे परस्परविरोधी विचारप्रवाह देशात प्रचलित आहेत. या दोन्ही प्रवाहांपैकी कशाचाही स्वीकार केला आणि केंद्र-राज्यसंबंधांत मूलगामी बदल केले, तर या देशाच्या विभक्तीकरणास सुरुवात होईल. काश्मीर किंवा आसाम यांचे गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्यासाठी अशा एखाद्या विचारसरणीचा आपण स्वीकार केला, तर ती घातक तडजोड ठरेल. म्हणून राज्यघटनेत नमूद केलेल्या सरकारच्या मूलभूत अधिकारांबाबत कोणतीही तडजोड होता कामा नये, असे माझे मत आहे.

भारतातील एकता ही सांस्कृतिक साधर्म्यावर आधारलेली होती. तिला केंद्रीय राजकीय सत्तेचा आधार नव्हता. एक राष्ट्र, एक राज्य ही कल्पनाही अस्तित्वात नव्हती. म्हणूनच आता या सांस्कृतिक एकतेवर राजकीय प्रक्रिया करून आधुनिक कल्पनेप्रमाणे भारत एकसंध राष्ट्र बनविणे हे आपले कर्तव्य आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे लोकशाहीवादी राष्ट्रिय मन तयार झाले आहे. राष्ट्रियत्व ही एक मानसिक अवस्था (State of mind) आहे, हे खरे आहे, पण ही एकता स्वप्नरंजक ध्येयवादावर न आधारता राजकीय वास्तवतेवर आधारली पाहिजे. या दृष्टीने संघराज्याच्या कल्पनेचा मनोमन स्वीकार करून, आपल्या राज्यघटनेने दिलेले समान नागरिकत्व व त्यातील मार्गदर्शक तत्त्वे यांच्या चौकटीत केंद्र सरकार व राज्ये यांचे परस्परसंबंध पक्के केले पाहिजेत. गेली काही वर्षे ही प्रक्रिया सुरू आहे.

आणि मला वाटते, की तपशिलात काही किरकोळ बदल करावा लागला, तरी घटनेच्या निर्मात्यांनी तयार केलेली परस्परसंबंधाची ही चौकट भक्कम केंद्र सरकार निर्माण करील.

## ८. भारताची सद्यःस्थिती - एक चिंतन

‘केसरी’ (१९६८) दिवाळी अंकातील लेख

भारताची राजकीय सद्य:स्थिती अनेकांना अस्वस्थ करते. तशीच ती मलाही चिंताग्रस्त करते. विशेषत: स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेले किंवा त्या उत्तेजक, स्वप्नरंजक वातावरणात वाढलेले नेते अस्वस्थ होतात. कारण एका भव्य स्वप्नाच्या पूर्तीसाठी झगडत असताना दिसलेली बेहोशी आता कुठे दिसत नाही. उलट अधिकारांची वा हक्कांची चर्चा सर्वत्र होते. विमानातून जाताना दिसणारे नद्या-पर्वतांचे रूप मोहक असते, पण प्रत्यक्ष त्या नद्या-पर्वतांसमोर आपण उभे राहतो, तेव्हा ते दुर्लंघ्य वाटू लागतात. वाटते, की ती मोहकता हा एक भास होता. आपले तसेच झाले आहे. १९४२ साली भारतीय क्रांतीसाठी लढत असताना काही स्वप्ने तरळत होती आणि अगदी अचानकपणे १९४७ साली आपल्याला या देशाचे राज्य करण्याची सुवर्णसंधी मिळाली. त्यावेळी स्वातंत्र्याची पहाट फुटताना नेहरू म्हणाले होते, की भारत आता नियतीची भेट घेण्यासाठी (tryst with destiny) मुक्त झाला आहे. एक स्वप्न साकार झाले होते. दुसरे स्वप्न देशाला देण्याची गरज होती. नेहरूंनी ते दिले. ते स्वप्न आपल्या नियोजनात दिसले. ज्या क्रांतीचा उद्घोष आपण करीत होतो, तिच्यातील प्राणतत्त्वे, तिच्यातील स्फुरणे आपल्या राज्यघटनेत समाविष्ट झाली. आंतरराष्ट्रिय जगात भारत आपल्या शांतिप्रेमावर आधारलेली तत्त्वनिष्ठ भूमिका घेऊन उभा राहिला. मला वाटते, अव्यक्त भारतीय क्रांतीची ही व्यक्त रूपे होती.

ही क्रांती शांतपणे घडत होती. त्यामुळे तिच्याकडे लोकांचे पुरेसे लक्षच गेले नाही. रक्तरंजित आर्थिक क्रांतीत दिले जाणारे मानवी प्राणांचे मूल्य आपण दिले नाही. त्यामुळे आपल्याला वाटते आहे, की या देशात क्रांतीच सुरू झालेली नाही.

ज्या दिवशी आपण अस्पृश्यतेला घटनेत मूठमाती दिली, स्त्रियांना मताधिकार दिला, अल्पसंख्याकांना नागरिकत्वाचे सर्व अधिकार दिले, त्या दिवशी सामाजिक क्रांतीचे नवे पर्व सुरू झाले. आपण कामगारांना न्याय देणारे अनेक कायदे केले, त्या दिवशी आपल्या आर्थिक न्याय देणा-या उद्दिष्टांची पूर्ती करण्यास आपण प्रारंभ केला. जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, सामूहिक विकास केन्द्र यांच्याद्वारे ग्रामीण क्रांतीची पायभरणी केली. विज्ञानाचा अभ्यास करणा-या प्रयोगशाळा काढल्या, नवे, अवजड उद्योगाचे कारखाने निघाले. देश संरक्षणक्षम करण्यासाठी संरक्षक साधनांचे कारखाने सुरू केले, ही सगळी भारतातील नव्या वैज्ञानिक युगाची नांदी होती, पण दुर्दैव असे आहे, की परदेशात घडलेल्या क्रांतीच्या उदाहरणांनी आम्ही इतके भारावून गेलो होतो, की आम्ही आमच्या देशात सुरू केलेली क्रांती यशस्वी होण्यासाठी, ती राबविण्यासाठी पुरेसा उत्साह दाखविला नाही. याचा अर्थ गेल्या २० वर्षांत घडले, ते सारे बरोबर होते, चुकाच झालेल्या नाहीत, असे मुळीच नाही. पण आज दिसणारे वैफल्य हे केवळ आपल्या अपेक्षाभंगातून निर्माण झालेले नसून जे सभोवताली घडते आहे, ते आपण नीट समजावून न घेतल्यामुळे आले आहे. त्यामुळे परिस्थिती अगदी निराशाजनक वाटते आणि समाजात दोषदर्शी प्रवृत्तीच वाढत जातात. एखादी योजना आपण आखतो, ती पार पाडू लागतो, त्यावेळी तिच्या सामाजिक, आर्थिक परिणामांची समग्र जाणीव अनेकदा आपल्यास होत नाही. जसजसे आपण त्या मार्गाने पुढे जातो, तसतसे आपणांस नवे प्रश्न दिसू लागतात. उदाहरणच द्यावयाचे झाले, तर शिक्षणाचे देता येईल. शिक्षणाचा अनिर्बंध प्रसार व्हावा, अशा मताचा मी होतो, आणि आजही आहे. शेकडो वर्षे निरक्षरतेच्या, अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणा-या भारताला विज्ञानाचा प्रकाश लवकर दिसावा, ही त्यामागची तळमळ होती. पण ही विज्ञानाची कवाडे उघडली, प्रकाश आला आणि त्यामुळे नवा,

तंत्रज्ञांचा वर्ग निर्माण झाला. पण त्यातूनच बेकार तंत्रज्ञांची व शिक्षितांची समस्या आज आपल्यापुढे उभी आहे. एखाद्या वर्गाला पुढचे भवितव्य स्पष्ट दिसले नाही, की तो अस्वस्थ होतो. काही तरी नवा मार्ग शोधतो. शासन अशा वर्गाबाबत थंड व उदासीन राहिले, तर त्या वर्गाच्या असंतोषाला राजकीय स्वरूप येते. हा राजकीय असंतोष एका शैक्षणिक धोरणातून निर्माण झालेला आहे, असे लक्षात येते. समाजातील तंग परिस्थिती अशा अनेक कारणांमुळे निर्माण होते. मी फक्त एकच उदाहरण दिले. दुस-या दृष्टीने पाहिले, तर ही प्रगती नाही का? तंत्रज्ञांची टंचाई असलेल्या या देशात त्यांची संख्या वाढावी, हे सुचिन्ह नाही का?

दुसरे उदाहरण लोकशाहीतील राजकीय क्रांतीचे घेता येईल. आपण प्रौढ मतदानाचा अधिकार दिला. हा अधिकार देऊ नये, असे काही घटनापंडितांचे मत होते. यामुळे लोकशाही ही झुंडशाही होईल, असे भय त्यांना वाटत होते. तरीही गांधीजींनी प्रौढ मताधिकाराचा आग्रह धरला. कारण, आता जर हा अधिकार दिला नाही, तर तो गरिबांना मिळावयास अनेक वर्षे झगडा करावा लागेल, असे त्यांचे मत होते. ज्या वर्गाच्या हातात मर्यादित मतदानाने सत्ता जाईल, तो वर्ग ती सत्ता दलितांच्या हाती जाऊ देणार नाही. त्यासाठी डावपेचाचे राजकारण करीत राहील. या प्रौढमतदानाने आजचे भारतीय लोकशाहीचे प्रचंड स्वरूप आपण पाहात आहोत. त्यामुळे काही समस्या निर्माण झाल्या आहेत, हे खरे. ही एक फार मोठी राजकीय क्रांती आपण केली आहे, असे आपण का मानीत नाही?

मला वाटते, भारतातील क्रांतीमुळे निर्माण झालेल्या नव्या शक्तीचा आपण पुरेसा अभ्यासच केलेला नाही. त्याबाबत आपण उदासीन राहिलो आहोत. आपल्या देशात सत्तांतर शांततापूर्ण झाले. ही एक अभूतपूर्व घटना होती. तसेच ही क्रांतीही अपूर्व आहे, असे आपण मानले नाही. क्रांती आता सुव्यवस्थित फलदायी करावयाची, असे आपल्याला वाटतच नाही. क्रांतीच्या स्वप्नरंजक तत्त्वज्ञानात वावरणाऱ्यांना या क्रांतीचे महत्त्वच पटले नाही. झालेली क्रांती पूर्ण आहे, असे कोणीच मानत नाही. पण ती विधायक दृष्टीने राबवून शेवटच्या थरापर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न अपुरे

पडले. मला वाटते, आता हे औदासीन्य टाकून दिले पाहिजे. क्रांती पुरी करण्यासाठी पुरोगामी शक्तींनी काही नवे आग्रह धरले पाहिजेत. रुसून किंवा चिडून हे घडणार नाही. आजचे सारे वैफल्य या आपल्या उदासीनतेतून आले आहे. आजचे राजकारण समाजापासून दूर जात आहे. याचे कारणही हेच आहे. दिल्लीत मला दिसते, ते असे, की कोणताही पक्ष हे लोककारण करीत नाही. त्यांच्या राजकीय चळवळी डावपेचाच्या स्वरूपाच्या झाल्या आहेत. त्यामुळे त्यांत सातत्य नाही. नव्या शक्ती उदयास येत नाहीत. नवे नेतृत्व दिसत नाही. या देशाचे राजकारण अद्याप जुन्या घोषणांवर, जुन्या पूर्वग्रहांवर आधारलेले आहे. गेल्या वीस वर्षांत काय घडले आहे, याचा ताळेबंद तयार न करता, नेमके आजचे लोकांचे प्रश्न काय आहेत, त्यांचा लोकांत जाऊन अभ्यास न करता, काँग्रेसच्या नेतृत्वाविषयी जुने आकस विविध पक्षांच्या धोरणावर प्रभाव पाडीत आहेत. असे नकारात्मक राजकारण फार काळ चालू राहिले, तर नवी पिढी आणि जुने नेते यांच्यांतील अंतर झपाट्याने वाढेल. नवी पिढी दिशाहीन होईल आणि त्यातून नवा राजकीय पेचप्रसंग उद्भवेल.

दुसरी एक समस्या गेली काही वर्षे लोकांना अस्वस्थ करीत आहे. ती म्हणजे प्रादेशिक राजकारणाची. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात दिसलेली एकात्मता एका समान शत्रूविरुद्ध केलेल्या युद्धातून निर्माण झालेली होती. बाहेरच्या शत्रूविरुद्ध युद्ध करताना एकत्रित होणे कठीण नसते. स्वातंत्र्यकाळातही १९६२ नि १९६५ साली या एकतेचा अनुभव आपण घेतला. स्वातंत्र्याची पहिली १७ वर्षे नेहरूंचे नेतृत्व होते. त्यामुळे आपल्या प्रादेशिक, भाषिक वा जातीय तंट्यातून मार्ग काढण्यासाठी त्यांचा उपयोग होई. शिवाय एकपक्षीय सरकारे सर्वत्र होती. त्यामुळे आपल्यांतील मतभेद मिटविण्याचे संसदीय किंवा घटनात्मक मार्ग फारसे अवलंबावे लागले नाहीत.

पंडितजी गेल्यावर आणि १९६७ च्या निवडणुकी पार पडल्यावर जे राजकीय चित्र दिसले, ते अगदी वेगळे होते. म्हणजे आपल्या परिचयाचे नव्हते. एक प्रकारे राजकीय व सामाजिक स्फोटांचा (Social explosion) हा काळ आहे. आपल्यांतील मतभेद वर आलेले आणि पूर्वीचे भारतीय नेतृत्व गेलेले, अशा या काळात वावरताना

स्वाभाविकच बावरल्यासारखे होते. आपल्या मनात विभूतिमत्त्वाची, पुरुषावताराची कल्पना कोठे तरी घर करून बसली आहे. त्यामुळे राजकीय नेतृत्वाकडे या दृष्टीने आपण पाहतो, ते साफ चूक आहे.

मला वाटते, की राजकारण आणि राजकीय नेतृत्व लोकव्यवहार आहे. त्यात सत्ता मिळविण्यासाठी स्पर्धा ही चालणार आहे. प्रभावी पुढारी आपल्या विचारसरणीचे, आपल्या कार्यक्रमाचा आग्रह धरणारे गट करणार, हेही आता उघड आहे. सत्ता मिळविणे किंवा तिची अभिलाषा धरणे, म्हणजे काही तरी पाप आहे, असे मानणारे लोक राजकारण करू शकणार नाहीत. कोणता तरी गट अडचणीत सापडला, की दुसरा गट पुढे येणार. सत्तासंक्रमण हे आता असेच होत राहणार. म्हणून गटबाजीचे राजकारण इत्यादी शब्द छद्मी अर्थाने आपण वापरतो, ते आता सोडून द्यावे लागेल. जगात सर्वत्र असेच चालले आहे. भारतातही त्याला अपवाद आढळणार नाही. अर्थात वैयक्तिक हेव्यादाव्यांसाठी उभारलेले गट हे केव्हाही निंद्य व त्याज्य समजावे लागतील.

दुसरा मुद्दा प्रादेशिक नेतृत्व आणि राष्ट्रिय नेतृत्व यांच्या निर्मितीचा आहे. राजकारणाचा पहिला संबंध एवढ्या प्रचंड देशात एकदम अखिल भारतीय पातळीवर येणे कठीण असते. म्हणून गाव, तालुका, जिल्हा, राज्य या ठिकाणी माणसे राजकारणात भाग घेऊ लागतील आणि तेथूनच ती वर जातील. मी स्वत: राजकारणात पडलो, तो स्थानिक पातळीवरच. कल्पनाही नसताना मला राष्ट्रिय पातळीवर यावे लागले. तसेच आता होत राहील.

राष्ट्रिय नेतृत्व आता प्रदेशातून चांगली माणसे आणून रुजवावे लागेल. विद्यमान कर्तृत्ववान नेत्यांपैकीच कोणाला तरी पुढे करून हे भारतीय सामूहिक नेतृत्व निर्माण केले जाईल. म्हणून गांधी-नेहरूंच्या काळातील राष्ट्रिय नेतृत्वाच्या कल्पना आता आपल्याला बदलाव्या लागतील.

प्रादेशिक राजकारणाचेही तसेच आहे. प्रादेशिक राजकारण अधिक लोकाभिमुखकरावे लागेल. तेथे तपशिलाच्या अनेक प्रश्नांवर लोकमत प्रभावी करून सामाजिक, आर्थिक प्रश्न राज्य पातळीवर सोडवावे लागतील. राष्ट्रिय उद्दिष्टांची समानता मान्य करूनही शेवटी सत्तेचा पाया हा प्रादेशिक राजकारणात राहणार, हे उघड आहे. म्हणून तेथे पुरोगामी शक्ती व नेतृत्व संघटित केली पाहिजेत. राष्ट्रिय उद्दिष्टांवर एकमत असणारे राजकीय नेतृत्व (Politics of consensus) प्रादेशिक पातळीवर यशस्वी होईलच, असे नाही.

आपले राज्य हे ख-या अर्थाने संघराज्य होणार, हे स्पष्ट आहे. तसे होत गेले, तर आर्थिक, सामाजिक परिवर्तनाची क्रियात्मक पातळी (Operative level) ही राज्यातच राहील. अर्थात फुटीर प्रवृत्ती माजू नयेत, म्हणून काही संहिता ठरवावी लागेल. पण तसे घडणे कठीण नाही. अगदी अलिकडची दोन उदाहरणे घेऊ. राष्ट्रिय एकात्मता परिषदेत जेव्हा राष्ट्रिय प्रश्नांची चर्चा झाली, तेव्हा अनेक प्रश्नांवर विविध पक्षांचे एकमत झाले. दुसरे उदाहरण राष्ट्रिय विकास मंडळाच्या सभासदांत नियोजनातील विकास खर्चावर झालेल्या चर्चेचे देता येईल. प्रत्येक प्रदेशालाच अधिक पैसा हवा आहे. प्रत्येकाला विकासाची ओढ आहे. पण राष्ट्रिय संकल्प आणि राष्ट्रिय तत्त्वे ही विचारात घेतली पाहिजेत, त्यासाठी काही तत्त्वसूची तयार केली पाहिजे, हेही सर्व राज्यांना-काँग्रेसेतर सरकारांनाही पटले आहे. त्याचाच प्रत्यय राष्ट्रिय विकास मंडळात आला.

सारांश, अविवेकी, आत्मकेंद्रित प्रदेशनिष्ठा कोणत्याही प्रदेशाने जोपासली, तर तो प्रदेश एकाकी पडेल, हे आता अगदी उग्र प्रादेशिक निष्ठा असणाऱ्यांनाही कळून चुकले आहे. प्रादेशिकता व एकराष्ट्रियत्व यांच्यांतील तोल सांभाळणे हीच व्यवहार्य राष्ट्रियता आहे.

ही सगळी परिस्थिती समजावून घेऊन आपली धोरणे आखली पाहिजेत. त्यासाठी

आपली विचारांची जुनी पठडी बदलली पाहिजे. विविध प्रश्नांतून उत्पन्न होणा-या परिस्थितीला आत्मविश्वासाने सामोरे गेले पाहिजे.

मला वाटते, आपण समस्यांनी उत्तेजित (Excite) वा उद्‌विग्न होतो. पण मनुष्य जोपर्यंत सुधारणेसाठी झगडतो आहे, तोपर्यंत प्रश्न हे राहणारच. ते सोडविण्यासाठी प्रयत्न करणे हे राज्यकर्त्यांचे काम आहे. जगातील कोणत्याही प्रगत वा अप्रगत देशापुढे आज समस्या नाहीत, असे झालेले नाही. भारत तर एका अभूतपूर्व प्रयोगात गुंतला आहे. अनेक संकटे कोसळत आहेत. नवीन समस्या पुढे येत आहेत. पण त्या वांछित नियतीसाठी झुंज देण्यातच खरा पुरुषार्थ आहे.

## ९. बांधिलकीचे राजकारण

अखिल भारतीय काँग्रेसच्या फरिदाबाद
अधिवेशनातील भाषणाच्या आधारे (२७-४-६९)

गेल्या दोन वर्षांतील राजकीय घडामोडींचे विहंगमावलोकन केल्यास आपल्याला काही अत्यंत विलक्षण गोष्टी दिसून येतात, काही अतिशय अर्थपूर्ण राजकीय घटना आढळतात. (मी केवळ या अहवालाची पार्श्वभूमी सांगत आहे. या समितीने देशातील राजकीय परिस्थितीवर चर्चा केली, तेव्हा तिने गेल्या दोन वर्षांत घडलेल्या विशेष महत्त्वाच्या व अर्थपूर्ण राजकीय घटनांचा विचार केला. आणि या घटनांच्या व गेल्या दोन वर्षांत आम्हांला आलेल्या अनुभवांच्या आधारेच आम्ही प्रस्तुत निवेदन केलेले असून त्यात काँग्रेसची वरील घटनांविषयीची भूमिका स्पष्ट करून, भावी काळातील धोरणाची रूपरेषा दिली आहे.)

१९६७ मधील निवडणुकीनंतरची सर्वांत महत्त्वाची राजकीय घटना म्हणजे १९६९ मधील मुदतपूर्व निवडणूक ही होय. या निवडणुकीविषयी व्यासपीठावरून व नियतकालिकांतून इतकी मल्लिनाथी झालेली आहे, की १९६९ मध्ये काय घडले व

राजकीय दृष्ट्या त्याचा अन्वयार्थ काय, याचा आपण स्वत: आढावा घेणे आवश्यक होऊन बसले आहे.

पाच निवडणुकांपैकी बंगाल व पंजाबमध्ये आपण हरलो, हे खरे. हरियाणात आपण निर्विवाद जय मिळविला. उत्तर प्रदेशात आणि बिहारमध्ये आपण काही नव्या महत्त्वाच्या जागा जिंकल्या. आता आपण तेथे मंत्रिमंडळ बनवू शकलो नाही, हे खरे. परंतु ६७-६९ च्या निवडणुकांत काँग्रेसने सपशेल आपटी खाल्ली, असे मानण्याची प्रवृत्ती दिसून येते. काँग्रेसने प्रगतीच केली, असे आकडेवारी देऊन सिद्ध करायची माझी इच्छा नाही, पण तरीही ६९ साली जे घडले, त्याचा समतोल दृष्टीने विचार करणे अगत्याचे आहे. ६९ च्या निवडणुकींचा अर्थ लावताना भविष्यात अधिकच पराजय होण्याची शक्यता व्यक्त केली जाताना दिसत आहे. आणि या प्रवृत्तीपायी काँग्रेसच्या लहानमोठ्या कार्यकर्त्यांच्या मनातील आत्मविश्वास ढासळू पाहत आहे. या प्रतिक्रियेची अंतिम परिणती सर्वसाधारण जनतेच्याच मनात आत्मविश्वासाचा अभाव निर्माण करण्यात होणार आहे. त्यामुळेच उत्तर प्रदेश व हरियाणा या प्रांतात काँग्रेसने प्रगती साधली असल्याचे (प्रस्तुत निवेदनाने) दाखवून देण्यात आले आहे. इतरही कित्येक प्रांतांत काँग्रेसचे बळ चवथ्या सर्वसाधारण निवडणुकीतल्याहून वाढलेलेच आहे.

या निवडणुकांचा आपण तपशिलवार विचार करू या. आपण बंगालमध्ये हरलो, हे मी सांगितलेच. तो पराजय आपल्याला मान्य करायलाच हवा. पण त्याबरोबरच बंगाल्यात जे घडले, त्याचा राजकीय अन्वयार्थ शोधायचाही प्रयत्न आपण करायलाच हवा. बंगालमधील ५० लाखांहून अधिक मतदारांनी आपल्याला मते दिली, हे आपण जाणतो. जागांच्या दृष्टीने आपण हरलो असू, पण अडचणीच्या काळातही ५५ लाख लोक काँग्रेसच्या बाजूने उभे राहिलेले होतेच. त्यांना वा-यावर सोडून आपण असे म्हणणार का, की 'आम्ही हरलो, तर आता आम्ही अज्ञातवासात राहू !' या लक्षावधी लोकांच्या पाठीशी राहून आगामी काळात मार्गदर्शन करणे, हे आपले

कर्तव्य ठरते. ते आपले राजकीय दायित्व आहे. काही अंशी उत्तर प्रदेशात आपली स्थिती सुधारली आहे, हेही आपल्याला विसरता येत नाही.

हरियाणात कित्येकांनी पक्षांतर केले असूनही आपण जिंकलोच. पराजयाला विजयाचे स्वरूप द्यायचा माझा अट्टाहास नाही. परंतु आपण सर्वच गमावले असून आता वाचवण्याजोगे काही उरलेलेच नाही, अशीही भावना मला निर्माण करावयाची नाही. माझ्या मते ती एक प्रकारची आत्महत्याच ठरते. ज्याच्या पाठीशी महान इतिहास आहे, आणि माझी खात्री आहे, की त्याच्यापुढे महान भविष्यही आहे, अशा या राजकीय पक्षाने परिस्थितीचा समतोल दृष्टीने विचार करून, वस्तुस्थिती नीट ध्यानात घेऊनच पुढे पाऊल टाकण्याचा प्रयत्न करायला हवा. काही माणसे, किंबहुना काही नेतेही जनतेने झिडकारले, असे आपण म्हणू. परंतु निवडणुकींच्या निकालाचा असा अर्थ खासच नाही, की आपल्या पक्षाचे धोरण व कार्यक्रम जनतेने अमान्य केले. मुदतपूर्व निवडणुकांचा अर्थ अशा पद्धतीने लावणे म्हणजे काँग्रेसचे अस्तित्व संपूर्णतया नाकारणे होय.

मुदतपूर्व निवडणुकांच्या या पृथक्करणाच्या अनुषंगाने राष्ट्राच्या राजकीय विचारसरणीत वाहू लागलेल्या नव्या प्रवाहांचाही विचार करायला हवा.

आज ध्रुवीकरणाची भाषा बोलली जात आहे. ध्रुवीकरण म्हणजेच फुटाफुटीच्या अनुरोधाने स्वतंत्र मतप्रणाली धारण करणारे दोन पृथक् गट सिद्ध करण्याची प्रवृत्ती. देशात सुरू असलेले एक प्रकारचे ध्रुवीकरण वा विचारपद्धती मी समजू शकतो. पण आपण काँग्रेसच्या ध्रुवीकरणाचा विचार करू लागतो, तेव्हा काँग्रेसमध्येच अति उजवे व अतीव डावे अशी मतभेदजन्य फूट पाडावी, अशी अपेक्षा दिसते. असे करणे बरोबर ठरते का? (महाशय, या समितीचे असे ठाम मत बनले आहे, की) परिस्थितीचे हे मूल्यमापन सर्वस्वी चुकीचे असून तिच्यावर उपचार करण्याचा हा मार्ग संपूर्णतया चूक आहे. ऐतिहासिक दृष्ट्या लोकशाही समाजवादाचा पाठपुरावा काँग्रेसने केलेला आहे. तिचे स्वत:चे निश्चित कार्यक्रम असून तिने

जनतेच्या हृदयात मानाचे स्थान मिळविलेले आहे. काँग्रेसच्या धोरणाने आपल्याला दगा दिल्याचे कोणीही सिद्ध केलेले नाही. आपण स्वत:च स्वत:ला दगा दिला असण्याचीही शक्यता आहे. पण काँग्रेसची धोरणेच अपेशी ठरली, असे आपण म्हणू शकत नाही. पण चालू काळात मात्र निरनिराळे लोक पुढे सरसावून 'आपण उजवा गट बनवण्याचा प्रयत्न करू या', अशी सूचना करताना दिसत आहेत. स्वतंत्र पक्ष व आपण यांत फारसा भेद नाहीच, असे सिद्ध करण्याचा कोणी प्रयत्न करीत आहेत. कोणी म्हणतात, 'आपण तर जनसंघालाच अधिक जवळचे आहोत'. उलट पक्षी, 'आपण पुढे सरून डाव्या पक्षांशी सख्य साधण्याचा प्रयत्न करू या', असा आग्रह करणारेही दुसरे काही आहेतच. हे 'डावे' म्हणजे काय, ते मला खरोखरीच समजत नाही. विध्वंसाची भाकिते करणारे काही भविष्यवादी तर, '७२ सालच्या निवडणुकीत काँग्रेस केंद्रातही मताधिक्य गमावणार आहे आणि म्हणून आपण आतापासूनच संयुक्त सरकारांचा विचार करायला प्रारंभ करायला हवा', असाही प्रचार करीत आहेत. संयुक्त सरकार कोणाच्या सहकार्याने आणि कोणत्या उद्दिष्टांसाठी?

देशातील राजकीय आराखड्याचा वा दृश्यांचा वस्तुनिष्ठ दृष्टीने विचार करावयाचा प्रयत्न आपण करू या.

आपण कोणाशी गट्टी करू पाहतो, आणि कशासाठी? मला आजचे राजकीय दृश्य दिसत आहे, ते असे: डाव्या बाजूला दोन, किंवा कदाचित दोहोंहून अधिक पक्ष असून ते स्वत:ला कम्युनिस्ट पक्ष व लोकशाही समाजवादी पक्ष म्हणवतात. उजवीकडे जनसंघ व स्वतंत्र हे पक्ष आहेत. त्यांतल्या कोणाशी तुम्ही संगनमत करू इच्छिता? जनसंघाशी आपले थोडे तरी मतैक्य आहे का? एक पक्ष धर्मनिरपेक्षता मानीत नाही, तर दुसरा जैसे थे परिस्थिती टिकवू पाहतो.

दुस-या बाजूला आहेत उजवे कम्युनिस्ट व मार्क्सवादी. भारतातले कम्युनिस्ट व त्यांचे पक्ष आपल्या स्वत:च्याच विसंगतीला बळी पडत असल्याचे मला आढळून आले. उजवा कम्युनिस्ट पक्ष आपण चांगला ओळखतो. मला तशी कोणत्याही

राजकीय पक्षावर टीका करायची नाही. पण आपल्यातल्या प्रत्येकाने राजकीय वातावरणाचे पृथक्करण करून त्यांच्या-आपल्यांत काही तरी समान गोष्टी आहेत का, हे पाहावे, हे फार बरे. वीस वर्षे काम केल्यानंतर उजव्या कम्युनिस्ट पक्षात फूट पडली. आणि तेही नेतृवर्ग देशाबाहेरून कुठून तरी - मॉस्कोकडून - मार्गदर्शन स्वीकारू लागला, म्हणून ! त्यांतल्या काहींना तर मॉस्कोच्या आज्ञा पाळणेही पुरेसे वाटेना ! त्यांना बहुधा त्यात पेकिंगच्याही आज्ञांची भर पडायला हवी होती ! यामुळेच त्यांच्यांत फूट पडली. मार्क्सवादी उजव्या कम्युनिस्टांची पाठ धरतात, तर त्यांच्या शेपटाला धरून आता तिसराच एक गट डोके वर काढू लागला आहे - नक्षलबारी लांडग्यांचा. ते स्वत:च स्वत:मधील विसंगतीला बळी पडत आहेत. तुम्ही त्यांच्याशी सहकार्य करायला जाऊ पाहता का? खरे सांगायचे, तर उजव्या कम्युनिस्ट पक्षाची सारी लोकप्रियता नष्ट झाली आहे. गेल्या दोन निवडणुकांतील सर्वसाधारण प्रवृत्ती पाहाल, तर हे पूर्णपणे स्पष्ट दिसून येईल. काँग्रेसमधील फूट आणि सोव्हिएट रशियाच्या नेतृत्वाखाली चालणा-या राजनैतिक घडामोडी यांवरच ते अधिक अवलंबून आहेत, हेच त्यांचे राजकारण !

मार्क्सवादी कम्युनिस्ट सशस्त्र क्रांतीची भाषा बोलत असले, तरी तिची कास धरण्याचा काळ हा नव्हे, अशी त्यांची भावना आहे. म्हणून वर्तमान परिस्थिती वर्गीय संघर्षासाठी मुत्सद्देगिरीने राबवण्याचा आणि तीतूनच भावी काळात सशस्त्र संघर्ष निर्माण व्हावा, या दृष्टीने प्रयत्न करण्याचा त्यांचा खटाटोप असतो. सशस्त्र क्रांतीला वर्तमानकाळ अनुरूप आहे, असे स्पष्ट सांगण्याइतका प्रामाणिकपणा नक्षलबाऱ्यांजवळ असून ते साहसवादाचीच भाषा बोलत असतात. आता हे झाले डावीकडचे चित्र.

उजवीकडच्या दृश्याचा निर्देश मी मागे केलाच आहे. वाद घालणारे - त्यांचा प्रामाणिकपणा मला मान्य आहे - म्हणतात, 'आपण सर्वसाधारण व मुदतपूर्व निवडणुका हरलो, याचे एकटे एक कारण म्हणजे विरोधी पक्षांनी अवलंबलेले आघाड्यांचे नवे मुत्सद्दी धोरण.' ही मुत्सद्देगिरी हळूहळू काँग्रेसला सर्व पक्षांनी घातलेल्या एक प्रकारच्या घेरावात परिणत होत आहे. हा एक राजकीय घेराव आहे

खराच. भारतातील लोकशाही समाजवाद सुरक्षित राहायला हवा असेल, तर दृढनिश्चय, योजनाबद्ध कार्यक्रम आणि आत्मविश्वास यांच्या बळावर हा घेराव मोडून काढणे हे आपले कर्तव्य होय, असे मला वाटते. पण हा राजकीय गराडा मोडायचा कसा? कोणी म्हणतात 'ही फळी फोडायची असेल, तर स्वत:च जाऊन तिच्यात सामील होणे, हा उत्तम मार्ग.' मोठा अपूर्व तर्कवाद आहे हा ! आणखीही दोन पक्ष आहेत. ते म्हणतात, 'डाव्यांनाही मिळू नका आणि उजव्यांनाही मिळू नका. पण आपले दोन समाजवादी पक्ष आहेतच. एक प्र. सो. प. आणि दुसरा सं. सो. प.'. या दोन पक्षांना काँग्रेसशी कसलाच संपर्क नको आहे, हे मी जाणून आहे. मग त्यांच्याशी संपर्क साधायला हवा, अशी भाषा आम्ही का बोलावी, तेच मला कळत नाही. प्र. सो. प. काय आहे आणि सं. सो. प. काय आहे, ते आपण ओळखून आहोत. वस्तुत: ते दोषैकदृष्टी आहेत. काँग्रेसचे दोष हुडकीत राहून ती चुकली, असे सिद्ध करणे, हेच त्यांचे एकमेव तत्त्वज्ञान. हा एक प्रकारचा अकरणात्मक काँग्रेसवाद, हेच त्यांचे एकमेव तत्त्वज्ञान होय. अशा लोकांचे आपण करणार काय? हे दोन पक्ष देखील आपापल्या क्षेत्रात आपल्याच काँग्रेसविरोधी मतप्रणालीखाली पिचत चालले आहेत. त्यांची संगत धरून आपण स्वत: सामर्थ्यवान बनू शकू व जनतेला आणि देशातील राजनैतिक जीवनाला वा लोकशाहीला सामर्थ्याचे लेणे चढवू शकू, असे का (तुम्हांला) सुचवायचे आहे? याहून अधिक करुणार्ह आत्मवंचना मी दुसरीकडे कुठेच, कधीच पाहिलेली नाही.

अर्थ असा, की ध्रुवीकरणाची, संयुक्त आघाडीची ही बडबड अगदीच अवास्तव आहे. व्यक्तिश: मला ती फारच असमंजसपणाची वाटते. आता आपणच सहभागी होऊ शकत नाही, उजव्या, डाव्या व इतर वर्गांत विभागल्या गेलेल्या या राष्ट्रिय पक्षांशी आपण कसलेच नाते जोडू शकत नाही.

मग आपण करायचे काय?

मला वाटते, आपण एकच करू शकतो. व्यक्तींवर नव्हे, तर काँग्रेसची तत्त्वप्रणाली, कार्यक्रम आणि धोरण यांवरच मदार ठेवून सारा मार्ग एकाकीपणे कापण्याचा

निश्चय करणे. काँग्रेसला वाचवण्याचा आणि देशालाही वाचवण्याचा हाच एकमेव मार्ग आहे.

आपण करतो आहोत, त्याचा उदो उदो करण्याचा माझा खटाटोप आहे, असे मात्र कृपा करून समजू नका. आपण आत्मसंतुष्ट बनत आहोत, असे मानू नका. ज्याच्या अंगी आत्मपरीक्षणाची अपरिहार्य, आवश्यक अशी क्षमता नाही, त्याला फारसे उज्ज्वल भविष्यही नाही. पण आत्मपरीक्षणाचीही दृष्टी समतोलच ठेवायला हवी. आत्मपरीक्षण परीक्षणच ठरायला हवे असेल, तर ते विधायकच असायला हवे. ते वस्तुनिष्ठ असले पाहिजे.

पण आज आपल्याला काय आढळते आहे? आत्मपरीक्षणाची अधोगती आत्मनिंदेत, आत्मधिक्कारातच होत आहे. स्वत:वर टीका करतानाही आपण वस्तुनिष्ठ राहायला हवे. आपण धोरणांची चर्चा करू शकतो, धोरणांचे पृथक्करण करून सत्यान्वेषण साधू शकतो, ते अमलात आणण्यातील चुका काढून त्या दूर करू शकतो. पण या घडीला मात्र काँग्रेसचे सगळे चुकले आहे - काँग्रेसचा कार्यक्रम चूक आहे, तिचे नेतृत्व चुकीचे आहे, तिची संघटना चूक आहे, इत्यादी टीका करणे हेच शिष्टमान्य होऊन बसल्याचे माझ्या निदर्शनास येत आहे.

काही तरी चुकते आहे, हे मीही मान्य करतो. पण सारेच काही चुकले आहे, असे म्हणता येईल का आपल्याला? अजूनही काँग्रेसला पाठिंबा देणारे कोट्यवधी लोक आहेतच. ते मूर्ख आहेत, म्हणून का ते काँग्रेसला पाठिंबा देत आहेत? का ते आंधळे आहेत? आजही काँग्रेस संघटनेत व तिच्या कार्यक्रमात काही तरी अत्यंत गतिमान असे आकर्षण आहे. स्वत:चे दोष जाणून घेण्यासाठी, आत्मपरीक्षण करण्यासाठी स्वत:चीच निंदा करण्याची मुळीच गरज नाही. कधी कधी तर आत्मनिंदेची, आत्मधिक्काराची ही वृत्ती इतकी पराकाष्ठेला जाते, की तिला विदूषकी रंग चढतात. मला कोणाही एका व्यक्तीची निंदा करायची नाही. प्रत्येकाची स्वत:ची मते प्रामाणिकच असतात, अशीच माझी श्रद्धा आहे. (पण काल एका व्यक्तीने दोन ठराव

मांडलेले आढळले. एक काँग्रेसचे विसर्जन करण्याचा, तर दुसरा काँग्रेस मध्येच उच्चनीच श्रेणी निर्माण करण्याचा. काँग्रेसचे विसर्जन करायलाच का त्यांना काँग्रेसमध्येच अशी श्रेणी हवी आहे?) आजकाल अवलंबिला जातो, त्या विदूषकी थाटाचाही निर्देश मी केलाच आहे. (काँग्रेसचे विसर्जन न केल्याचा धिक्कार, म्हणून एका सद्गृहस्थाने मुंडणच करायचे ठरवले.) या देशात मूलभूत हक्क आहेत, हे मी जाणतो. व्याख्याने देण्याचे, संघटना करण्याचे व इतरही वैयक्तिक स्वातंत्र्याचे अधिकार आहेत. आपले डोके तासायचा मूलभूत हक्क त्याला निश्चितच आहे. अर्थात खरे सांगायचे, तर आत्मपरीक्षण करायची वेळ आता निश्चितच आलेली आहे. पण ती वस्तुनिष्ठ व विधायक आत्मपरीक्षणाची. पण हा तर आत्महत्येचा घातक न्यूनगंड आहे. मी तरी त्याला आत्महत्येची वृत्तीच म्हणतो. आपल्याला आपला देश व पक्ष या आत्मघातकी वृत्तीपासून वाचवावाच लागणार आहे. या पक्षात काही तरी गतिमान, काही तरी ऐतिहासिक महत्त्वाचे आहे, हे आपण ध्यानात घ्यायला हवे. आज आपण अडखळत असूही. पण हे अडखळणे कसे सावरायचे, याचा मार्ग आपणच शोधून काढू या आणि भावी कार्यक्रमाची अंमलबजावणी आत्मविश्वास व भवितव्यावरील श्रद्धा यांची कास धरून करण्याचा प्रयत्न करू या.

उपर्युक्त समितीने केंद्र-राज्य संबंधांचाही प्रश्न विचारात घेतला. भारतात या प्रश्नाला एक वेगळा इतिहास आहे. केंद्र-राज्य संबंध हा प्रश्न स्वातंत्र्योत्तरच नव्हे, तर स्वातंत्र्यपूर्व काळातही अस्तित्वात होताच. खंडप्राय आकारमानाच्या देशात, विशेषत:, आपल्या देशासाठी घटनेनुसार आपण संघीय राज्ययंत्रणा स्वीकारलेली असल्याकारणाने केंद्र व राज्ये यांच्या परस्परसंबंधांची समस्या निर्माण होणे अटळच आहे.

केंद्र व राज्य यांच्यांतील चर्चा व सुसंवाद अपरिहार्य आहेत, हे कोणीच अमान्य करू इच्छीत नाही. काही राज्ये रूढ परिभाषेनुसार 'काँग्रेसेतर' बनल्यावर या चर्चेला निराळेच स्वरूप आलेले आहे. एक राजकीय समस्या म्हणून ती पुढे ढकलली जाते. या समस्येचे आकलन तिच्या यथातथ्य पार्श्वभूमीसकट संपूर्णतया होण्याच्या दृष्टीने

तिची अतिसूक्ष्म छाननी करायला हवी आहे, असे मला वाटते. केंद्र व राज्ये यांच्या परस्परसंबंधांकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोण आहेत : एक हा, की प्रत्येक राज्य व त्याची प्रजा यांना प्रगती साधण्याचे समग्र अधिकार असून त्या ध्येयाच्या पूर्तीसाठी साधनसामग्री व साहाय्य यांतील स्वत:चा वाजवी वाटा केंद्राकडे मागण्याचा त्यांना हक्क आहे. त्यात काहीही चूक नाही. केंद्र बलाढ्य व्हायला हवे असेल, तर घटनेची बंधने सांभाळून घटक राज्येही प्रबळ करणे आवश्यक आहे. ही वस्तुस्थिती नाकारण्यासारखी नाहीच.

पण अडचणीची बाब ही नव्हेच. दुरापास्त अडचण आहे, ती दुस-या दृष्टिकोणाची. मधूनमधून निराळीच भाषा बोलणा-या कम्युनिस्ट सरकारांविषयी मी काहीच म्हणत नाही, पण कम्युनिस्ट पक्ष मात्र केंद्र व राज्ये यांचे परस्परसंबंध हाही एक प्रकारचा वर्गीय संघर्षच असल्याचे जोरजोराने प्रतिपादन करीत आहेत. केंद्र एका वर्गाचे प्रतिनिधित्व करते, तर ही नवी राज्ये दुस-या वर्गाचे, असे त्यांना वाटत आहे. म्हणूनच ते असा दावा करतात, की राज्य सरकारांचे अधिकारही लढ्यातील शस्त्र म्हणूनच राबवले गेले पाहिजेत. प्रत्येक राज्य हे स्वत:पुरते एक स्वतंत्र राष्ट्रच आहे, असा त्यांचा अंतिम सिद्धांत आहे.

त्यांच्या मते संरक्षण, दळणवळण व परराष्ट्रसंबंध एवढीच खाती केंद्राच्या अधिकारात असावी. म्हणजेच संरक्षण, दळणवळण व परराष्ट्र खाते एवढ्यांचेच केवळ दायित्व केंद्राकडे ठेवून उरलेल्या सर्व बाबी राज्यांकडे सोपवाव्या. केंद्र दुर्बळ करून टाकणे एवढेच फलित यातून निष्पन्न होणार आहे.

कम्युनिस्टांनी प्रतिपादलेल्या या सिद्धांताचे कधी कधी मला आश्चर्यच वाटते, कारण सर्वसाधारणपणे कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीची लोकशाही केंद्रवादावर निष्ठा आहे. त्यांचे स्वत:चे राज्य झाले, की ते केंद्रवाद स्वीकारू इच्छितात, पण केंद्रसत्ता त्यांच्या हाती नसेल, तेव्हा मात्र त्यांना केंद्रवाद अनिष्ट वाटतो. मग त्यांना राज्येच अधिक प्रबळ व्हायला हवी असतात.

म्हणूनच केंद्र-राज्यसंबंधविषयक समस्यांचा विचार आपण समतोल दृष्टीने करायला हवा आहे. राज्याराज्यांतील विषमता दूर करण्यासाठी केंद्र व राज्ये यांचे प्रतिनिधी मिळून चर्चा घडवून आणणे आवश्यक आहे, हे आपण जाणतोच. तेलंगण व पूर्व उत्तर प्रदेश यांच्या समस्या आहेतच. उत्तर बंगाल, मध्य प्रदेशाचा काही भाग, किंवा झारखंड, इ. इतरही अनेक राज्यांचे प्रश्न असू शकतात. पण या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने राज्य सरकारांनीच बव्हंशी परस्पर विचारविनिमय करायला हवा. कदाचित त्यांना केंद्र सरकारशीही चर्चा करण्याची गरज भासू शकेल. अशा चर्चा सुलभतेने घडवून आणण्याच्या दृष्टीने नियोजनमंडळ, राष्ट्रिय विकासमंडळ, अर्थमहामंडळ, इत्यादी अनौपचारिक संस्थांच्या यंत्रणा आपण निश्चितच राबवू शकतो. त्या आपली गरज पुरी करू शकणार नसतील, तर दुस-याही एखाद्या व्यासपीठाचा विचार आपण करू शकतो. त्या ठिकाणी एकत्र जमून व चर्चा करून आपल्या समस्यांचा उलगडा करून घेण्याची प्रक्रिया आपल्याला निरंतर चालू ठेवता येईल.

समस्यांच्या सोडवणुकीची चर्चा करायला कोणाचाच नकार नाही. पण घटनेने वाटून दिलेले अधिकार व कार्य-विधिविषयक व शासकीय, दोन्ही क्षेत्रांतील - यांची फेरवाटणी करण्याची खरोखर गरज आहे का? त्यांची संपूर्णतया वा मूलत: फेरवाटणी करणे आवश्यक आहे का? (प्रस्तुत समितीने असा सुनिश्चित निर्णय दिला आहे, की) केंद्र व राज्ये यांत विधायक चर्चा घडवून आणण्याची व्यवस्था करायलाच हवी, परंतु घटनेने ठरवून दिलेल्या विधिविषयक व शासकीय कार्याच्या मूलभूत वाटणीचा फेरविचार करण्याचे मात्र मुळीच कारण नाही. कारण केंद्र प्रबळच असायला हवे, अशी आमची श्रद्धा आहे. (आणि त्यासाठी आपला पाठिंबा आम्हांला हवा आहे.) फेरफार करण्याच्या खटाटोपात आपण केंद्राचे सामर्थ्य खच्ची केले, तर केवळ केंद्रसत्ता दुर्बळ होण्यावरच भागणार नसून देशाच्या एकात्मतेलाच बाधा येणार आहे आणि राष्ट्रातील लोकशाहीलाही हादरा बसणार आहे. केंद्र व राज्यांच्या परस्परसंबंधांविषयी आमचे म्हणणे हे असे आहे.

आजच्या क्षणी काही लोकांना हीच काळजी लागून राहिली आहे, की देशाच्या विभिन्न विभागांत नक्षलबारी कार्य करण्याचा संभव आहे. पण आपण केवळ कम्युनिस्टांवर टीका करावी आणि नक्षलबाऱ्यांपासून धोका आहे, असे तुणतुणे वाजवीत राहावे, एवढ्याचीच गरज आज आहे, असे नाही. कारण असल्या तत्त्वप्रणाली अन्यायाच्या सुपीक क्षेत्रातच फोफावतात.

त्यांना शेतकऱ्यांची - छोट्या शेतकऱ्यांची एकजूट घडवून आणायची आहे. कुळे व मालक यांच्या परस्परसंबंधांत विद्यमान असलेल्या विषमतेमधून उद्भवणा-या कुळांच्या अडचणी राबवून घेण्याचा त्यांचा डाव आहे. बंगाल, बिहार, आंध्र व इतरही राज्ये या ठिकाणी लढे पेटवून देण्याचा त्यांचा खटाटोप आहे. यावर उपाय काय? दडपशाही हा खासच नव्हे. आपणच अशा कुळांना भेटावे, त्यांची संघटना करावी व विषमता दूर करून त्यांच्या अडचणींचे निवारण करावे, यातच तो उपाय सामावलेला आहे. असल्या समस्यांचे हेच एकमेव उत्तर होय. संघर्ष घडवून आणणे, हे ते स्वत:चे कर्तव्य मानतात. पण आपण मात्र संघर्षाचे मूळच उखडून टाकणे, हेच आपले कर्तव्य ठरवायला हवे. आपण असा मार्ग स्वीकारल्यावाचून प्रस्तुत समस्येवर शाश्वत उपाय सापडण्याचा सुतराम् संभव नाही.

या समस्येकडे केवळ कायदे जारी करण्याची व शिस्त कायम राखण्याची समस्या म्हणून पाहता येणार नाही. कायदा व सुव्यवस्था यांचे दायित्व मी जाणून आहे. (ते पार पाडण्यात काही चुका झाल्या, तर त्या पदरात घेण्यासही मी तत्पर राहीन.) पण कायदा व सुव्यवस्था यांच्या समस्या हाताळताना आपल्याला त्या समस्यांच्या मूळ कारणांनाच हात घालायला हवा आहे. त्यांवरच उपाय हुडकून काढायला हवे आहेत. आवश्यक तर संरक्षक-दलाचा उपयोग करावाच लागेल. बळाचाही उपयोग अवश्य तिथे करायला हवाच. पण केवळ संरक्षक दलाच्या बळाचा वापर करून काही आपल्याला सर्व उत्तरे, सर्व उपाय सापडू शकणार नाहीत.

(इतर महान समस्यांचाही निर्देश आम्ही केलेला आहे : उदा.,) जातीयतावाद, प्रादेशिकतावाद, विभक्ततावाद (Divisiveness) या समस्या आ वासून खड्या आहेतच. गेल्या दोन वर्षांत आपल्या देशात सर्वांत भीषण जातीय दंगे उसळलेले आपण पाहिले आहेत. महात्मा गांधी व जवाहरलाल नेहरू यांच्या नावाचा वारसा सांगणा-या पक्षाला हे दंगे कायमचे थांबवण्यात यश येऊ नये, ही लज्जास्पद घटना होय. गृहमंत्री या नात्याने या अपेशाच्या दोषाचा माझा वाटा मलाही आपल्या पदरात घ्यायला हवाच. पण एकेकट्या मंत्र्याला वा शासनाला ही समस्या सोडवणे मात्र शक्य होणार नाही. देशात अवश्य ते वातावरण निर्माण करण्यात, जनतेच्या मनात यथायोग्य मूल्यांना स्थान प्राप्त करून देण्यात आपण अपेशी ठरणार असलो, तर आशेला मुळीच वाव नाही. या समस्यांवर सोपे व सुलभ आणि झटपट उपाय सापडण्याची थोडी देखील शक्यता नाही. म्हणूनच काही समस्यांची दखल घेणे अगत्याचे होऊन बसले आहे.

जातिवादाच्या समस्येचा विचार करतानाच अल्पसंख्याकांच्याही समस्येचा उल्लेख करणे मला इष्ट वाटते. मुसलमान, ख्रिस्ती व इतर अल्पसंख्य लोकांच्या मनात तक्रारीची, उपेक्षितत्वाची भावना निश्चितच आहे. (याचा निर्देश आम्ही केलेला आहे.) तिचे अस्तित्व नाकारण्यात काहीच अर्थ नाही. आणि या अल्पसंख्याकांशी सामुदायिक संपर्क साधण्याचा व त्यांच्या मनात विश्वासाची भावना निर्माण करण्याचा जुना कार्यक्रम आपण नव्याने हाती घ्यायलाच हवा. आपण स्वीकारलेल्या सामाजिक व राजकीय राष्ट्रविकासाच्या कार्यात त्यांनाही समान पातळीवरील सहकाऱ्यांच्या नात्याने सामील होता येईल, असा विश्वास त्यांच्या मनात निर्माण व्हायला हवा.

अस्पृश्यतावाद या देशात फिरून डोके वर करू पाहात असल्याची चिन्हे दुर्दैवाने दृश्यमान होऊ लागली आहेत. अस्पृश्यता ही पवित्र, धार्मिक बाब असल्याचा दावा सांगायला एखादा मनुष्य, स्वातंत्र्य मिळून वीस वर्षे लोटल्यावरही, पुढे सरसावेल, असे आम्हांला कधीच वाटले नव्हते. निदान मला तरी असे साहस कोणी करू

शकेल, असे स्वप्नातदेखील वाटले नव्हते. कोणाही व्यक्तीचा उल्लेख करून तिला नसते महत्त्व द्यायची माझी इच्छा नाही, कारण अशा बाबतीत काही गोष्टी न्यायप्रविष्ट केल्या जाण्याचाही संभव असतो. पण दुर्दैवाने काही व्यक्ती तसा दावा करायला पुढे सरसावल्याचे आपण प्रत्यक्षच पाहिले आहे. आजच्यासारख्या काळातदेखील अस्पृश्यतेला पाठिंबा लाभावा आणि चातुरवर्ण्याचे समर्थन करायला एखाद्याने पुढे सरसावावे, याचा मला अचंबा वाटतो.

येथे मी एक मुद्दा मांडू इच्छितो. केवळ आर्थिक विकास, समाजवादी अर्थव्यवस्था एवढाच या देशापुढचा प्रश्न नाही. या उदंड विभक्ततावादी प्रवृत्तींनाही आपल्याला तोंड द्यायचे आहे. भाषिक व प्रादेशिक हेव्यादाव्यांवर आधारलेल्या फुटीर प्रवृत्तींशी आपल्याला अजून सामना द्यायचा आहे. हा सामना द्यायला काँग्रेस बद्धपरिकर झालेली आहे. वस्तुत:, तीच तिची ऐतिहासिक भूमिका आहे. किंबहुना हा एकच सामना नव्हेच. तसेच त्यात एकच आघाडी लढवायची नसून, भारताला शंभर आघाड्यांवर लढा द्यायचा आहे. या रोगांचा प्रतिकार आपण करायला हवा असून, तीही धैर्याने व आत्मविश्वासानेच, समतोल मनानेच करायला हवा आहे.

या खोड्यातून यशस्वीपणे बाहेर पडण्याच्या दृष्टीने हेच गुण उपकारक ठरणार आहेत. वस्तुत: काँग्रेस ही जनतेच्या केवळ राजकीय महत्त्वाकांक्षांचेच प्रतिनिधित्व करीत नाही. आजच नव्हे, तर गेल्या ८०-१०० वर्षांत ती आपल्या नवयुगाकडील वाटचालीच्या पोटतिडकीचे, आधुनिक जगाचे, अद्ययावत झालेल्या नवसमाजाच्या निर्मितीच्या आपल्या स्वप्नाचे प्रतिनिधित्व करीत आलेली आहे. आपली ध्येये हीच आहेत. पण केवळ घोषणा देत राहिल्याने काही ही ध्येये प्रत्यक्षात उतरवता येणार नाहीत. मी स्वत:च ही घोषणा करीत असतानाच मला याची पूर्ण जाणीव आहे. ध्येयाचा हा ध्रुवतारा गाठण्यासाठी आपल्याला बांधिलकीच्या राजकारणाच्या भूमिकेवरून विचार करावा लागणार आहे. मौलिक व पायाभूत गोष्टींचा मागोवा घेतल्यानेच हे साधता येईल. एका तत्त्वावर मी सदैव श्रद्धा ठेवत आलो आहे. आजच्या क्षणी निष्ठेविषयीच आणीबाणी निर्माण झाली आहे, असे लोक बोलतात.

काही लोक 'आपण नाना मार्ग फुटलेल्या चौकात संभ्रमित अवस्थेत उभे आहो', असे या परिस्थितीचे वर्णन करतात. सध्या आपल्याला राजकीय दृष्ट्या कठीण काळातून मार्गक्रमण करावे लागत आहे, हे खास. आणि म्हणूनच या देशाच्या भवितव्यतेच्या दृष्टीनेच काँग्रेसने विचार करायला हवा आहे. मग आम्ही करावे काय?

ब्रिजच्या खेळातल्या एका अत्यंत वेधक नियमाचा मी निरंतर मागोवा घेत आलेलो आहे. त्या खेळात असा नियम आहे, की जेव्हा तुम्ही संशयग्रस्त व्हाल, तेव्हा हुकूम खेळावा. मला वाटते, हाच नियम राजकारणाच्याही डावाला उत्तम प्रकारे लागू पडतो. कारण हाही डाव मूलभूत राजनीतीचाच आहे. संकटग्रस्त परिस्थितीत अडकल्यासारखे वाटेल, तेव्हा पायाभूत तत्त्वांचाच विचार करा. आणि काँग्रेसच्या दृष्टीने पायाभूत गोष्ट कोणती? तिच्या सदस्यांच्या दृष्टीने सर्वसाधारण जनतेपर्यंत पोहोचून तिच्याशी तादात्म्य साधणे, हीच मूलभूत गोष्ट होय. तत्त्वप्रणाली बाजूला ठेवून लोकांच्याच भूमिकेवर आरूढ होणे, त्यांच्याशी तदाकार होणे, हाच महत्त्वाचा निकष होय.

निर्धन बहुजनसमाज, लहान लहान कुळे, औद्योगिक कामगारवर्ग तसेच या देशातील तरुण यांच्या प्रेरणा व महत्त्वाकांक्षा यांच्याशी तादात्म्य साधता येईल, अशाच कार्यक्रमाच्या दृष्टीने आपल्याला विचार करायला हवा, (असे आम्ही इतिवृत्तात म्हटले आहे.) दुस-या, तिस-या व चवथ्या दशकांत आपण जे काही केले, तेच आपण करीत राहिलो, जनतेशी तादात्म्य साधण्याच्या मूलभूत नियमांचा मागोवा घेऊन व पक्षाला असलेला बहुजनसमाजाचा आधार पुनरुज्जीवित करून, तो आपण सुदृढ केला, तर काँग्रेसला भवितव्यतेविषयी कसल्याही प्रकारची भीती वाटण्याचे कारण पडेल, असे मला वाटत नाही.

दुस-याही एका क्षेत्राकडे आपण खास लक्ष पुरवणे इष्ट ठरेल. तरुण मनाला प्रेरणा देऊन व आकर्षित करून स्वत:च्या ध्येयपूर्तीसाठी त्यांचा उपयोग करून घेण्याचे जे सामर्थ्य काँग्रेसमध्ये आहे, तेही आपण लक्षात घ्यायला हवे. पक्षाच्या उच्चनीच

सर्वच थरांकडे तरुणांचा पुनरुज्जीवन देऊ शकणारा ओघ अव्याहत चालू नसेल, तर कोणत्याही राजकीय पक्षाला उज्ज्वल भविष्याची आशा बाळगायला नको, हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाही. देशाचे भवितव्य घडविण्याच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावू इच्छिणा-या काँग्रेसने वरील कार्यक्षेत्राकडे दुर्लक्ष करून भागण्यासारखे नाही. म्हणूनच काँग्रेस संघटनेने तरुणांसमोर विधायक कार्यक्रम ठेवण्याच्या आवश्यकतेवर आणि आपल्याबरोबर देशाच्या पुनर्रचनेच्या कार्यात सहभागी होण्याची ओढ त्यांना लागावी, म्हणून स्फूर्तिदायक पण प्रत्यक्ष लाभदायी अशी उद्दिष्टे त्यांच्यापुढे ठेवण्याच्या  आवश्यकतेवर भर दिला पाहिजे.

विद्यार्थिवर्गाचा उल्लेख मात्र आम्ही मुद्दामच टाळला आहे. कारण पक्षीय राजकारणाच्या आखाड्यात विद्यार्थिवर्गाला ओढू नये, असेच काँग्रेसने अव्याहत मानलेले आहे. मूलभूत राजकारण, सामाजिक व आर्थिक विचारसरणींतील मौलिक आशय यांपासून मात्र त्यांना वंचित करता येत नाही. भावी काळात आपल्यावर अटळपणाने पडणा-या दायित्वाची धुरा योग्य वेळी सांभाळता यावी, या दृष्टीने विद्यार्थ्यांनी चालू काळातील सामाजिक व आर्थिक विचारप्रवाहांचा अद्ययावत मागोवा घेत राहावे, हे स्वाभाविकच आहे. पण त्यांनी एखाद्या राजकीय पक्षाशी नाते जोडण्याच्या मुद्द्यावर मात्र आम्हांला असेच वाटते, की समग्र विद्यार्थिवर्गाने अशा प्रकारच्या पक्षीय राजकारणाच्या जाळ्यात न गुरफटणेच अधिक इष्ट. आम्ही विद्यार्थ्यांचा निर्देश केला नाही, तो याच कारणामुळे. तरुणांचा उल्लेख आम्ही खासच केला आहे. देश वा पक्ष, तरुणांना नाही, तर दुस-या कोणाला आवाहन करू शकेल? तरुणांविना देशालाही उज्ज्वल भवितव्य नाही व पक्षालाही नाही. नव्या रक्ताची भरती अखंडित होत राहिली पाहिजे, एका पिढीमागून दुस-या पिढीचा पाठिंबा अव्याहत लाभला पाहिजे, हा मूलभूत धडा भूतकाळातील अनुभवांतून आपण घ्यायलाच हवा.

दुस-या, तिस-या व चवथ्या दशकांत चळवळींची व लढ्यांची परंपरा अव्याहतपणे सुरू होती. स्वाभाविकच काँग्रेसच्या उच्चनीच थरांत तरुणांचा अव्याहत प्रवाह मिसळत राहिला. पण चवथ्या व पाचव्या दशकांपासून मात्र देशभक्तीच्या भावनेने

उत्स्फूर्त झालेल्या चळवळी वा लढे झालेच नाहीत. आता चळवळी होतात, त्या जातिनिष्ठ हेव्यादाव्यांमुळे, भाषिक स्वार्थपरतेपायी वा प्रादेशिक उद्दिष्टांसाठी. असल्या चळवळींतील व्यक्तींची भरती आपल्याला करता येत नाही. परंतु काँग्रेसच्या उच्चनीच थरांत भरती करता येईल, अशा थोड्या इतर प्रकारच्याही युवकांच्या चळवळी निश्चितच आहेत. तरुण पिढीला तुम्ही योग्य प्रकारे आवाहन कराल आणि, त्यांची गरज इतरांना आहे, अशी भावना त्यांच्या मनात जागृत कराल; देशाच्या पुनर्रचनेसाठी आपण जे जे काही करीत आहोत, त्यात भाग घेण्याची संधी त्यांना मिळू शकेल, अशी त्यांची खात्री पटवाल; तर काँग्रेसला आपल्या भवितव्यतेविषयी काहीच काळजी उरणार नाही.

स्वातंत्र्योत्तर काळातील नवी पिढी आता ऐन उमेदीत आहे. आपल्या देशात एक नवी प्रौढ पिढी उदयाला आलेली असून तिला वीस वर्षांपूर्वी आपण काय केले, याची यथातथ्य माहिती मुळीच नाही. आणि आमचा लढा अशा स्वरूपाचा होता आणि आम्ही इतका इतका त्याग केला, असे त्यांना सांगितले, तरी त्याची मुळीच छाप त्यांच्यावर पडण्यासारखी नाही. कारण आपण लावलेला हातभार ते गृहीतच धरून चालतात आणि ते स्वाभाविकच आहे. प्रत्येक नवी पिढी पूर्वीच्या पिढीच्याच खांद्यावर आरुढ होत असते. आपण त्यांच्यासाठी इतके इतके केले, एवढेच नव्हे, तर भावी काळात आपण त्यांच्यासाठी काय काय करणार आहोत, हेही त्यांना सांगावे लागेल. जेव्हा जेव्हा माझी तरुण पिढीशी गाठ पडते, तेव्हा मी त्यांना सांगत असतो: 'स्वातंत्र्यसंग्रामात लढलेल्या स्वाभिमानी पिढीचे आम्ही घटक आहोत. आमचा वाटा आम्ही उचललेला आहे. आम्ही स्वातंत्र्यसंग्रामातले सैनिक आहोत, याचा आम्हाला आनंद वाटतो. आता पुढे सरसावून परिस्थितीचे आव्हान स्वीकारणे, स्वातंत्र्य दृढमूल करणे आणि हा लढा अधिकाधिक पुढे चालू ठेवणे, हे तुमचे कर्तव्य आहे.' तुम्ही त्यांना योग्य प्रकारे आवाहन कराल, तर तरुण पिढी तुमच्याकडे वळेल, याविषयी मला मुळीच संशय नाही. आपल्या युवकांच्या संदर्भात आपण ही भूमिका स्वीकारू, तर काँग्रेसचा धिक्कार होण्याचे काहीच भय नाही. आणि यासाठीच आम्ही तरुणांचा खास उल्लेख केलेला आहे.

(म्हणूनच वरील विवेचनाच्या आधारे हा ठराव पुढील अंतिम आवाहन करीत आहे.) आपण फुटीरपणाच्या राजकारणाच्या दृष्टीने विचार करता कामा नये, निंदेच्या दृष्टीनेही राजकारणाचा विचार करू नये. वैयक्तिक टीका करून शीलावर शिंतोडे उडवण्याचेही धोरण ठेवू नये. सुनिश्चित अभिवचने देऊन त्यांसाठी बांधिलकीच्या राजकारणाच्याच दृष्टीने विचार करण्याचा प्रयत्न आपण करू या. आपण हे करू, तर आपला देश व लोकशाही समाजवाद स्वत:चे संरक्षण स्वत:च करू शकतील, याविषयी मला मुळीच शंका नाही.

## १०. पुरोगामी आर्थिक धोरण

अखिल भारतीय काँग्रेसच्या मुंबई येथे भरलेल्या ७३ व्या
अधिवेशनात आर्थिक ठराव मांडताना २८ डिसेंबर १९६९
रोजी केलेल्या भाषणाच्या आधारे.

देशातील सध्याच्या राजकीय पेचप्रसंगाच्या काळात, आपण जे आर्थिक धोरण स्वीकारू, त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. या धोरणावर आपली केवळ आर्थिकच नव्हे, तर राजकीय प्रगतीही अवलंबून राहणार आहे. म्हणून या धोरणास जसे आर्थिक महत्त्व आहे, तसाच राजकीय संदर्भही आहे. सध्या आपल्यापुढे जो प्रस्ताव आहे, त्यात गेल्या बावीस वर्षांमध्ये आपल्या देशाने काय काय साध्य केले, हे नमूद करण्यात आलेले आहे. येथे हे लक्षात ठेवायला हवे, की आर्थिक धोरणाची जशी काही तात्कालिक उद्दिष्टे असतात, तशीच दीर्घकालीन ध्येयेही असतात. या दीर्घकालीन ध्येयांनुसार देशाच्या आर्थिक धोरणास विशिष्ट दिशा लाभत असते. ही ध्येये गाठण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम

स्वीकारण्याची गरज भासते. त्या दृष्टीने काँग्रेसने १९६७ मध्ये दहा कलमी कार्यक्रम मंजूर केला. त्यानंतर काय घडले, हे सर्वांनाच माहीत आहे. खरे म्हणजे हा कार्यक्रम अमलात आणण्यावर भर दिला गेला नाही, म्हणूनच पक्षामध्ये धोरणविषयक पेचप्रसंग उद्भवला. आपल्याला कोणती दिशा धरायची आहे, हे दहा कलमी कार्यक्रमाद्वारे आपण निश्चित ठरवले होते. पण आता परिस्थिती अशी आहे, की केवळ या कार्यक्रमाकरता थांबून चालणार नाही. आपल्याला दहा कलमी कार्यक्रमाच्याही पुढे गेले पाहिजे. आर्थिक कार्यक्रमाची आणि धोरणांची आणखी काही क्षेत्रे निश्चित करायला हवीत. कारण गेल्या बावीस वर्षांमध्ये आपण विशिष्ट आर्थिक धोरण स्वीकारून त्या अनुरोधाने पावले टाकली असली, तरी देशाच्या आर्थिक परिस्थितीत अद्यापही काही विसंगती आढळून येऊ लागल्या आहेत, हे नाकारून चालणार नाही. किंबहुना आर्थिक धोरणासंबंधीचा हा प्रस्ताव तयार करण्यामागचा मूलभूत विचार तोच आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या गेल्या बावीस वर्षांमध्ये आपल्या देशाने काहीच प्रगती केली नाही, असे म्हणणे निखालस चूक ठरेल. या काळामध्ये आर्थिक क्षेत्रात अशा अनेक चांगल्या गोष्टी करण्यात आलेल्या आहेत, की त्यांचा देशाला, काँग्रेसला आणि सरकारला जरूर अभिमान वाटतो. आपण जेव्हा आत्मपरीक्षण करायला बसतो, तेव्हा या चांगल्या गोष्टींचे आपल्याला विस्मरण होते. असे होणे चांगले नाही. आपली आणखी प्रगती व्हावी, यासाठी आपण आत्मपरीक्षण केले पाहिजे, हे मलाही मान्य आहे. परंतु आत्मपरीक्षण करताना आपण केलेले उल्लेखनीय कार्य विचारात घेतले नाही, तर आपण आपला आत्मविश्वास आणि विकासाची दिशा हरवून बसण्याचा धोका आहे.

गेल्या बावीस वर्षांमध्ये आपल्या देशाने निश्चितच भरीव आर्थिक प्रगती केली आहे, याबद्दल माझ्या मनात तरी संदेह नाही. शेतीचा विचार केला, तरी असे दिसेल, की आपण पाटबंधारे आणि विद्युतीकरण यांचा अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेऊन हरित-क्रांती घडवून आणली आहे. उद्योगधंद्यांबाबतही हेच म्हणावे लागते.

गेल्या काही वर्षांमध्ये आपल्या देशात इतके आधुनिक आणि विविध प्रकारचे कारखाने स्थापन झाले आहेत, की केवळ आशियातीलच नव्हे, तर सा-या जगातील एक औद्योगिक दृष्ट्या प्रगत देश म्हणून भारत ओळखला जात आहे. ही प्रगती कमी लेखून कसे चालेल? परंतु त्याचबरोबर हेही मान्य केले पाहिजे, की प्रगतीबरोबरच देशात काही प्रश्न नव्याने निर्माण झाले आहेत.

आपण मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली आहे. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्राला सुस्थिर पाया लाभत असतानाच खाजगी क्षेत्रही प्रगतिपथावर आहे. खाजगी क्षेत्राच्या प्रगतीबरोबर अर्थव्यवस्थेमध्ये एक अपप्रवृत्ती शिरू पाहात आहे. या प्रगतीबरोबर आर्थिक मक्तेदारीचीही वाढ होत असून ही आर्थिक मक्तेदारी राजकीय क्षेत्रावर आपले वर्चस्व गाजवू पाहात आहे. आणि हाच खरा धोका आहे. ज्यांच्या हातांत आर्थिक सत्ता असते, त्यांचे या सत्तेवर समाधान होत नाही. ते आपल्या आर्थिक सामर्थ्याच्या बळावर राजकीय सत्ताही हस्तगत करू पाहतात. आपण इतर देशांचा इतिहास पाहिला, तर तेथे हेच घडल्याचे आढळून येते आणि आज भारतातही हेच घडत आहे. आपल्या देशाच्या प्रत्येक आर्थिक क्षेत्रामध्ये - मग ते शेतीचे असो, उद्योगधंद्याचे असो वा व्यापारविषयक असो-मक्तेदारीने पाय रोवले असून आता ही मक्तेदारी राजकारणातही प्रवेश करू पाहात आहे. म्हणून आपण आपले आर्थिक प्रश्न सोडवत असताना मक्तेदारीच्या धोक्याची उपेक्षा करून चालणार नाही. मी असे मानतो, की आमच्या देशात संमिश्र अर्थव्यवस्था राहील. पण त्याचबरोबर आम्ही मक्तेदारी चालू देणार नाही. आपल्या देशाचे औद्योगिक धोरण कसे राहील, यासंबंधी आपण एक धोरणविषयक प्रस्ताव केला असून त्यामध्ये खाजगी क्षेत्राकडे कोणते उद्योग राहतील, याचा निर्देश करण्यात आलेला आहे. ते उद्योग खाजगी क्षेत्राकडेच राहतील. त्यायोगे खाजगी क्षेत्र देशाच्या आर्थिक विकासातील आपली भूमिका योग्य तऱ्हेने पार पाडू शकेल; परंतु आम्ही खाजगी क्षेत्राचा वरचश्मा सहन करणार नाही. मूलभूत उद्योगधंद्यांच्या बाबतीत सार्वजनिक क्षेत्रांचा पूरक विभाग म्हणूनच खाजगी क्षेत्रास काम करावे लागेल. लघुउद्योगाचे क्षेत्र मुख्यत: खाजगी क्षेत्राकडेच राहील. ज्यांनी तांत्रिक शिक्षण घेतलेले आहे, त्यांना आपले स्वत:चे

लघुउद्योग सुरू करता येतील. या लोकांना कर्ज कसे उपलब्ध करून देता येईल, हा या संदर्भातील एक प्रश्न आहे. परंतु आपण जेव्हा खाजगी क्षेत्रासंबंधी बोलतो, तेव्हा आपल्या डोळ्यांपुढे मुख्यत: काही मूठभर घराण्यांनी आपल्या नियंत्रणाखाली उभारलेले औद्योगिक साम्राज्य येते. अशा खाजगी क्षेत्राची ही मक्तेदारी चिंताजनक बाब होण्याइतकी वाढलेली आहे. आम्ही जेव्हा संमिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करतो, तेव्हा अशा मक्तेदारांना कसेही वागायची मुभा आम्ही देऊ, असा याचा अर्थ होत नाही. खाजगी क्षेत्राने सार्वजनिक क्षेत्राबाबत स्पर्धकाची भूमिका घेताच कामा नये. शिवाय राजकीय सत्तेवर नियंत्रण मिळविण्याच्या खटाटोपातही पडू नये. कारण अशी मक्तेदारी राजकीय आणि आर्थिक लोकशाहीची मारेकरी ठरू शकते.

नियोजनबद्ध अर्थव्यवस्था स्वीकारण्यामागे आपली हीच दृष्टी होती. देशाच्या आर्थिक विकासास हातभार लावण्यात खाजगी क्षेत्रासही स्थान लाभले पाहिजे आणि म्हणून खाजगी कारखान्यांच्या वाढीला प्रोत्साहन दिले पाहिजे, असे आपले नियोजनकार प्रथमपासून म्हणत आलेले आहेत. मात्र कोणत्याही विकसनशील देशामध्ये सार्वजनिक क्षेत्रालाच निर्णायक महत्त्व असले पाहिजे, याबाबत नियोजनकारांमध्ये दुमत नव्हते. परंतु काही मक्तेदार घराण्यांनी अर्थव्यवस्थेवरील आपली पकड वाढवून सार्वजनिक क्षेत्रावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न चालविला आहे. मक्तेदारांचे हे आव्हान आपल्याला स्वीकारले पाहिजे.

हे आव्हान स्वीकारण्यासाठी आपण आपल्या समाजवादी उद्दिष्टांचा आणि धोरणांचा पुनरुच्चार केला पाहिजे. कारण काँग्रेसची प्रारंभापासून समाजवादाशी बांधिलकी आहे. गरिबी आणि बेकारी हे आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला भेडसावणारे दोन मूलभूत प्रश्न असून ते सोडविण्यासाठी समाजवादाशिवाय पर्यायच नाही. त्यासाठीच काँग्रेसने दहा कलमी कार्यक्रम तयार केला. परंतु हा कार्यक्रम नीटपणे अमलात न आणल्यामुळे मक्तेदारीचा प्रश्न आणखी बिकट झाला आहे. म्हणूनच या दहा कमली कार्यक्रमाबाबत आपण कोणती भूमिका स्वीकारतो, यावर आपल्या वाटचालीची दिशा ठरणार आहे. फरिदाबाद येथल्या अधिवेशनात हा दहा कलमी

कार्यक्रम मांडण्यात आला, तेव्हा आपल्या काही पुढाऱ्यांनाच तो मनापासून मान्य नव्हता, असे आपल्याला आढळून आले. त्यातूनच पेचप्रसंग निर्माण झाला.

बँकांवर सामाजिक नियंत्रण असावे, असे सुचविण्यात आले, तेव्हा सामाजिक नियंत्रण म्हणजे काय, यासंबधीच वाद झाला. सामाजिक नियंत्रण ही राष्ट्रियीकरणापेक्षा किती तरी व्यापक आणि सर्वंकष कल्पना आहे, असे मी मानतो. १९६७ मधील काँग्रेसच्या निवडणूक जाहिरनाम्यात सामाजिक नियंत्रणाचा आवर्जून उल्लेख करण्यात आला होता. परंतु नंतर सामाजिक नियंत्रण म्हणजे काय, यासंबंधी वेगवेगळी मते मांडण्यात येऊ लागली. सामाजिक नियंत्रण म्हणजे राष्ट्रियीकरण नव्हे, असे अट्टाहासाने सांगितले जाऊ लागले. अर्थात या वादंगाला आता केवळ तांत्रिक महत्त्व तेवढे उरले आहे, कारण राष्ट्रियीकरण का सामाजिक नियंत्रण, हा प्रश्न आता शिल्लक राहिलेला नाही. कारण आपण केवळ राष्ट्रियीकरणाचे तत्त्व स्वीकारूनच थांबलो नाही, तर देशातील चौदा प्रमुख बँकाही सरकारने आपल्या ताब्यात घेतल्या आहेत.

मक्तेदारीविरुद्धचा आपला लढाही त्याचबरोबर चालूच आहे. मक्तेदारीवर नियंत्रण घालणारे विधेयक आपण मंजूर केले आहे. आयात व्यापाराबाबतही आपण हे धोरण अनुसरले आहे.

अनेक वस्तूंचा आयात-व्यापार यापुढे केवळ सरकारी यंत्रणेमार्फतच केला जाईल. बँकांचे राष्ट्रियीकरण करून आणि मक्तेदारी व्यापारावर निर्बंध लादून आपण जो समाजवादी मार्ग अनुसरायला प्रारंभ केला आहे, त्या मार्गावरील पुढील वाटचाल करण्याच्या दृष्टीने आपण आणखी काही पावले टाकायला हवीत.

सर्वसाधारण विमा व्यवसायाचे (General Insurance) राष्ट्रियीकरण हे त्यापैकी एक पाऊल होय. कारण केवळ बँका ताब्यात घेऊन भागणार नाही. त्याबरोबर सर्वसाधारण विमा-व्यवसायही सरकारी नियंत्रणाखाली आला पाहिजे.

भूतपूर्व संस्थानिकांचे तनखे आणि खास अधिकार हेही काढून घ्यायला हवेत. कारण हे संस्थानिक जुन्या सरंजामशाहीचे अवशेष असून अशा कालबाह्य अवशेषांना समाजवादी अर्थव्यवस्थेमध्ये स्थान राहूच शकत नाही. संस्थानिकांचे तनखे आणि खास हक्क काढून घेण्याबाबत आतापर्यंत भरपूर चर्चा झालेली आहे. याबाबत माझी भूमिका अशी आहे, की आपण हा प्रश्न शक्य तर वाटाघाटी करून सोडवावा. कारण त्यामुळे कटुता निर्माण होणार नाही. मात्र येथे एक गोष्ट केली पाहिजे. संस्थानिकांचे तनखे आणि हक्क नाहीसे करण्याच्या निर्णयाबाबत तडजोड होऊ शकणार नाही. आमचा पक्ष त्याबाबतीत खंबीर भूमिके वर उभा आहे. म्हणून लवकरच आम्ही संसदेपुढे तसे विधेयक सादर करणार आहोत. संस्थानिक अजूनही खळखळ करीत आहेत. काही घटनात्मक तरतुदींची सबब पुढे करून स्वत:चा बचाव करू पाहत आहेत. मला त्यांची अडचण समजू शकते. परंतु काळ बदलला आहे, इतिहासाचा संदर्भ बदलला आहे, इतिहासाची अपेक्षा बदलली आहे, ही वस्तुस्थिती भूतपूर्व संस्थानिकांनी समजावून घेतली, तर राष्ट्रिय जीवनप्रवाहामध्ये सहभागी होण्याची ही संधी ते दवडणार नाहीत, अशी मला आशा आहे.

शहरी भागातील मालमत्तेच्या धारणेवर कमाल मर्यादा घातली पाहिजे, हा विचार आपण १९६२ पासून बोलून दाखवीत आहोत. त्यावेळी निवडणूक जाहिरनामा तयार करीत असताना, केवळ शेतजमिनीच्या धारणेवर मर्यादा घालून चालणार नाही, शहरातील मालमत्तेच्या धारणेबाबतही कमाल मर्यादा ठरविली पाहिजे, असे तेव्हा सुचविण्यात आले. शहरांमधील रहिवाशांना किती अडचणी सहन कराव्या लागत आहेत, याची आपल्याला कल्पना आहे. तेथील जमिनींच्या किमती भरमसाट वाढत चालल्या असून त्यायोगे राहण्याच्या जागेचा प्रश्न बिकट झालेला आहे.

म्हणून शहरभागातील जमिनींच्या धारणेबाबत निश्चित धोरण ठरवून त्याची क्रमश: अंमलबजावणी करण्याची वेळ आता आलेली आहे. शहरी मालमत्तेवर नियंत्रण घालण्याचा प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा असल्यामुळे तो एकदम सोडविता येणार

नाही. त्यासाठी भिन्नभिन्न पातळयांवर निर्णय घ्यावे लागतील. म्हणून प्रथम स्थूल निर्णय घेणे इष्ट ठरेल.

शेतक-याला त्याच्या शेतमालाबद्दल किमान वाजवी भाव मिळालेच पाहिजेत, हे आपल्या आर्थिक धोरणाचे एक प्रमुख सूत्र आहे. शेतमालाचे उत्पादन वाढावे आणि उत्पादक व ग्राहक यांचे शोषण थांबावे, यांसाठी काही नवी पावले उचलावी लागतील. त्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्रात प्रमुख अन्नधान्याची घाऊक खरेदी करणे इष्ट ठरेल. अशी एकाधिकार खरेदी सुरू झाली, तरच शेतकऱ्यांची पिळवणूक थांबू शकेल. काही राज्य सरकारांनी या दृष्टीने पावले टाकली आहेत, हे मला माहीत आहे. काही राज्यांमधील शिलकी अन्नधान्य खरेदी करण्याबाबत अन्नधान्य महामंडळ पुढाकार घेत असते. परंतु एकेका वस्तूचा व्यापार सार्वजनिक क्षेत्रात घेऊन हा व्यापक प्रश्न सुटणार नाही. ग्रामीण भागातील उत्पादकांची परिस्थिती सुधारण्यासाठी गहू, तांदूळ, ज्वारी आणि इतर नगदी पिके यांची खरेदी सार्वजनिक शासन यंत्रणेमार्फतच झाली पाहिजे, हा आमच्या नव्या पुरोगामी आर्थिक धोरणातील आग्रहाचा भाग आहे. तेलबियांसारख्या इतर शेतमालाच्या व्यापारात श्रीमंत ठेकेदार अशा रीतीने भाव बांधून घेतात, की त्यामुळे शेतकरी आणि ग्राहक या दोघांनाही नुकसान सोसावे लागते. म्हणून शेतमालाच्या व्यापारातील मध्यस्थाला आणि त्याच्या नफेबाजीला मुळीच वाव राहणार नाही, अशा रीतीने शेतमालाची खरेदी सुरू व्हावयास हवी.

शेतकऱ्यांनी अपार कष्ट करून नगदी पिकांचे उत्पादन वाढविले, तर त्याचा परिणाम काय होतो? एकदम वस्तूंचे बाजारभाव खाली येतात आणि परिणामी शेतक-याला नुकसान सहन करावे लागते. परंतु हाच शेतमाल कच्चा माल म्हणून कारखान्यात गेला, की त्याची किंमत एकदम चढू लागते. उत्पादक आणि ग्राहक यांची पिळवणूक करण्याची घाऊक बाजारातील ही नेहमीचीच रीत झालेली आहे. उत्पादकांनी राबायचे आणि त्यांच्या कष्टाचा फायदा पैसेवाल्या दलालांनी घ्यायचा, ही अनिष्ट पद्धत यापुढे बंद झाली पाहिजे. सरकारनेच सर्व अन्नधान्य व्यापार

आपल्या हातात घेतला, की शेतक-यालाही योग्य भाव मिळेल आणि ग्राहकांचीही लुबाडणूक होणार नाही. ग्रामीण भागातील अर्थकारणाचा विचार करताना शेतकरी उपाशी राहणार नाही, ही पहिली खबरदारी घेतली पाहिजे. त्याप्रमाणे साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याची व लोकांकडून भरमसाट भाव वसूल करण्याचा कटही उधळून लावायला हवा.

स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपण जागोजागी धरणे बांधण्याचे कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्यामुळे शेतीला पाणी आणि वीज मिळू लागली. गेल्या वीस-बावीस वर्षांमध्ये आपण या बाबतीत खरोखरच आश्चर्यकारक प्रगती केलेली आहे. आपल्या देशाला मोठ्या जलवाहिनींचे वरदान मिळालेले आहे. गंगा, ब्रह्मपुत्रा, कृष्णा, गोदावरी अशा किती तरी लोकमाता या भूमीमध्ये नांदत आहेत. परंतु त्यांच्यावर धरणे बांधावीत आणि अडवलेले पाणी शेतीसाठी वापरावे, हा विचार पूर्वीच्या काळी आपल्याला सुचला नव्हता. त्यामुळे एकीकडे नद्यांतील पाणी वाहून जाई, तर दुसरीकडे पाण्याअभावी शेते वाळून जात. पं. जवाहरलाल नेहरूंचे या देशावर फार मोठे ऋण आहे. कारण त्यांनीच प्रथम आपल्या सर्व नियोजनांमध्ये अवाढव्य धरणांना आणि प्रचंड वीजनिर्मिति-केंद्रांना अग्रक्रम दिला. त्यामुळेच भारतीय शेतीचा चेहरामोहरा एकदम बदलून गेला.

शेतीमध्ये अलीकडे नवे तंत्रविज्ञानही अनुसरण्यात येऊ लागले. त्यामुळे आपल्याला ग्रामीण भागात काही सुधारणा दिसून येत आहे. वीस वर्षांपूर्वीचे भारतीय खेडे आणि आजचे खेडे यांत बराच फरक आहे. त्यावेळी खेडेगाव उदास अन् उजाड दिसायचे. आता तेथे प्रगतीची चक्रे फिरत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे साहजिकच मनाला बरे वाटते. पण एवढ्यावरच समाधान मानून चालणार नाही. श्रीमंत शेतक-याचा एक नवा वर्ग निर्माण झाला आहे, हे खरे आहे. परंतु अजूनही बहुसंख्य शेतकरी गरीबच राहिले आहेत. पडीक जमिनीचे पट्टेच्या पट्टे अनेक ठिकाणी पाहायला मिळतात. भूमिहीन शेतमजूर आणि छोटे शेतकरी यांचे भीषण दारिद्र्य अंत:करण पिळवटून टाकणारे आहे. शेतीचा क्रमश: विकास होऊनही

बहुसंख्य ग्रामीण जनता गरीबच राहावी, हे आपल्या राष्ट्रिय अर्थव्यवस्थेपुढील सर्वांत मोठे आणि महत्त्वाचे आव्हान आहे.

धरणे बांधण्याचे कार्यक्रम आपण यापुढे सोडून द्यावेत, असे मला मुळीच म्हणायचे नाही. तो कार्यक्रम चालू ठेवलाच पाहिजे. परंतु मला हे सांगायचे आहे, की आपण देशातील सारी जलसंपत्ती उपयोगात आणली, तरीदेखील बराच मोठा भूभाग पाण्यापासून वंचितच राहणार आहे. आपण त्या कोरडवाहू जमिनीचे काय करणार आहोत, हा खरा प्रश्न आहे. तो सोडविला नाही, तर देशातील गरिबीचे आपण निर्मूलन करू शकणार नाही. छोट्या शेतकऱ्यांच्या जमिनीला पाणी मिळूनही त्यांचा प्रश्न सुटलेला नाही, हे आपण पाहातच आहोत. म्हणून यापुढे आपल्या ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांमध्ये बहुसंख्य उपेक्षित शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यावर विशेष भर दिला गेला पाहिजे. त्या दृष्टीनेच कोरडवाहू शेतीचा प्रश्न हाताळला पाहिजे. कोरडवाहू शेतीच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी खास कार्यक्रम संघटित केले पाहिजेत. तसेच अशा शेतांमध्ये कोणती पिके घेता येतील, याचाही विचार व्हायला हवा. त्यासाठी आपल्याला कोरडवाहू शेतीचे नवे तंत्र विकसित करावे लागेल. ही शेती करणाऱ्यांना बी-बियाणे आणि खते यांचा पुरवठा करण्याची आणि त्यांच्या मालाला सहकारी बाजारपेठ मिळवून देण्याची व्यवस्था करण्यासाठी वेगळा निधी उभारावा लागेल.

आपण लहान माणसांना कर्ज कसे उपलब्ध करून देणार आहोत, हाही पुरोगामी आर्थिक धोरणाच्या संदर्भात महत्त्वाचा प्रश्न ठरतो. ज्याच्याकडे संपत्ती आहे, मालमत्ता आहे, त्यालाच कर्ज द्यायचे, अशी आपल्याकडील बँकांची सर्वसाधारण प्रवृत्ती आहे. लहान माणासाने नव्या योजना अंगीकारिल्या पाहिजेत व त्याने उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये भाग घेतला पाहिजे, अशी जर आपली अपेक्षा असेल, तर त्याला स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आपण भांडवल कोठून देणार आहोत, याचा विचार व्हावयास हवा. विशेषतः, जो नवीन तंत्र आत्मसात करू इच्छितो, त्याला तर अधिकच भांडवल लागते. ते त्याला कोण देणार? तो जर एखाद्या अर्थ

महामंडळाकडे गेला, तर तेथील अधिकारी विचारणार, 'तुझ्यापाशी तारण ठेवायला काय आहे?' त्या बिचा-यापाशी मुळीच मालमत्ता नसते. मग तो तारण काय ठेवणार? त्यामुळे कर्ज देण्याबाबतचे पारंपरिक धोरण यापुढेही चालू राहिले, तर ज्याच्यापाशी मालमत्ता आहे, त्यांनाच यापुढेही कर्ज मिळत राहील. या पद्धतीमुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होतात आणि गरीब अधिक गरीब होऊ लागतात. म्हणून मालमत्ता आणि भांडवल-पुरवठा या दुष्टचक्राचा भेद केलाच पाहिजे. त्यासाठी मालमत्ता पाहून कर्ज देण्याची प्रथा थांबविली पाहिजे. एखादी व्यक्ती जो उद्योग-व्यवसाय सुरू करू इच्छीत आहे, त्या व्यवसायाची संभाव्य क्षमता ध्यानात घेऊनच कर्ज देण्यात आले, तर भांडवलाअभावी अडून पडलेले अनेक प्रकल्प मार्गस्थ होतील. नवा कारखाना वा नवा उद्योग सुरू करायची तरुण उद्योजकाला हिंमत होईल, अशा रीतीने कर्जवाटपाची कार्यपद्धती ठरविली पाहिजे. या कार्यपद्धतीमुळे देशात स्वयंरोजगारांना खूप चालना मिळू शकेल-मग तो उद्योग छोट्या शेतक-याने सुरू केलेला असो वा एखाद्या शेतमजुराने.

शेतीचा विचार करीत असताना जमीनधारणेचा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. या बाबतीत गेल्या वीस वर्षांमध्ये आपण फारसे काही साध्य करू शकलो नाही, हे कटु सत्य मान्य केलेच पाहिजे. तसे पाहिले, तर या प्रश्नाचा विचार आपण अलीकडेच करू लागलेलो आहोत, असे मुळीच नाही. देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीही काँग्रेस पक्षाने जमीनदारी-निर्मूलनाचा कार्यक्रम पुरस्कारिला होता. त्या काळातही काही राज्य सरकारांनी जमीनधारणेसंबंधी कायदे केले होते. १९३७ मध्ये तेव्हाच्या मुंबई सरकारने कुळांच्या हक्कांचे संरक्षण करणारे विधेयक मांडले होते. नंतर इतर अनेक राज्यांनीही तशा प्रकारचे कायदे केले. परंतु या कायद्यांच्या अंमलबजावणीचे गेल्या वीस वर्षांतील चित्र काय दिसते? शेतजमीन कसणा-याच्या मालकीची झाली पाहिजे, हे तत्त्व मान्य झाले आहे. तसे कायदेही करण्यात आलेले आहेत आणि तरीही छोटा शेतकरी आणि शेतमजूर आहे तेथेच आहे. असे का? कारण कायदे कागदावरच राहिले. त्यांची अंमलबजावणी झालीच नाही. म्हणून यापुढे एक-दोन वर्षांच्या आत या सर्व कायद्यांची व्यवस्थित अंमलबजावणी करण्याचा निर्धार

आपण केला पाहिजे. आपण तसे काही करू शकलो, तरच लोकांचा आपल्यावर विश्वास बसेल. नाही तर ते वैफल्याने ग्रासले जातील.

मोठे जमीनदार आणि शेतकरी यांच्यात असंतोष धुमसत आहे. तो वेळीच नाहीसा केला नाही, तर ग्रामीण भागात हिंसाचाराचे थैमान निर्माण होईल आणि हरितक्रांतीचे सारे फायदे नाहीसे होऊन जायला वेळ लागणार नाही. म्हणून जमीनवाटपाच्या प्रश्नाची ताबडतोब दखल घेतलीच पाहिजे. याबाबतीत दिरंगाई वा चालढकल चालणार नाही.

शेतीनंतर आर्थिक धोरणामध्ये विचार होतो, तो उद्योगधंद्यांचा. वीस वर्षांपूर्वी आपण जे औद्योगिक धोरण निश्चित केले, त्यांत मूलत: काहीच चूक नाही. परंतु हे धोरण अमलात आणताना काही गफलती घडल्या, हे मान्य केलेच पाहिजे. कारखानदारीमध्ये मक्तेदारी अशीच वाढत गेली, तर लवकरच धोकादायक परिस्थिती निर्माण होईल. म्हणून काही मूठभर घराण्यांच्या हातांत औद्योगिक सामर्थ्य केंद्रित होण्याची सध्याची प्रक्रिया थांबविली पाहिजे. त्यासाठी औद्योगिक चौकटीत काही बदल वा काही फरक करायला हवेत.

कर चुकविणे आणि काळा पैसा साठविणे, हा आपल्या अर्थव्यवस्थेला लागलेला एक मोठाच शाप आहे. काळा पैसा बाहेर काढण्यासाठी आणि त्याचा प्रसार थांबविण्यासाठी कोणते उपाय योजिले पाहिजेत, याचा विचार करण्यासाठी केंद्र सरकारने तज्ज्ञांची समिती नेमावी, असे मी म्हणेन. तसेच कोणालाही कर चुकविता येऊ नयेत, अशा रीतीने करपद्धतीची आखणी करायला हवी. करपद्धती सोपी आणि सुटसुटीत केली, तर कर चुकविण्याची प्रवृत्ती कमी होऊ शकेल. म्हणून करपद्धतीची पुनर्घटना करण्यासाठीही तज्ज्ञांची समिती नेमणे आवश्यक ठरते.

प्रत्येक माणसाच्या पाच मूलभूत गरजा असतात. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या त्या गरजा होत. सध्या आपण आरोग्यसेवांच्या विस्तारावर बराच

पैसा खर्च करीत असतो. परंतु सर्वसामान्य माणूस अजूनही प्राथमिक आरोग्यसेवेपासून दूरच राहिलेला आहे. म्हणूनच मला असे वाटते, की ताप, खोकला, पडसे यांसारख्या वारंवार उद्भवणा-या आजारांवरील औषधे तरी लोकांना स्वस्त किंमतीत मिळायला हवीत. सर्वसामान्य नागरिकांना हे आजार नेहमी होत असतात. त्यामुळे या आजारांवरील औषधे जरी लोकांना स्वस्त किंमतीत मिळाली, तरी आपण या बाबतीत बरेच काही साध्य केले, असे म्हणता येईल. म्हणून औषध-निर्मितीकडे केवळ व्यवसाय म्हणून न पाहता त्यातील सामाजिक आशय ध्यानात घेतला पाहिजे.

तसेच बालसंगोपनाचा प्रश्नही दुर्लक्षित राहता कामा नये. मुले राष्ट्राची भावी नागरिक आहेत. आणि म्हणून त्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य द्यायला हवे, असे आपण म्हणत असतो. पण प्रत्यक्षात काहीच घडत नाही. म्हणून बालसंगोपनासाठी वेगळा राष्ट्रिय निधी उभारून तो केवळ लहान मुलांच्या कल्याणासाठी वापरला जाईल, असा प्रयत्न व्हावयास हवा.

आरोग्याप्रमाणे घरांचा प्रश्नही बिकट झालेला आहे. शहरांमध्ये झोपडपट्ट्या वाढत आहेत तर खेडेगावांमधील छोटे शेतकरी आणि शेतमजूर असुरक्षित जीवन जगत आहेत. जमिनीचा मालक केव्हा येईल आणि आपल्याला घर सोडून जायला सांगेल, याची त्यांना सारखी भीती वाटत असते. हे शेतमजूर अत्यंत छोट्या खोपट्यांमध्ये राहतात. पण त्याही, त्या आपल्या आहेत व आपल्याला येथून कोणीही हुसकावून लावणार नाही, याची शाश्वती त्यांना वाटत नाही, हे अगदी खरे आहे. म्हणून शेतमजुरांना राहत्या घरांसाठी त्यांच्या मालकीची जमीन उपलब्ध करून दिली पाहिजे.

आजही आपल्या देशात अशी अनेक खेडेगावे आहेत, की जिथे आपण पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करू शकलेलो नाही. हा प्रश्न जितका व्यापक आहे, तितकाच अवघडही आहे. परंतु म्हणून तो टाळून चालणार नाही. केव्हा तरी प्रारंभ करायलाच

हवा. म्हणून येत्या पाच वर्षांमध्ये आपण सर्व खेडेगावांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करू शकू, असा कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला पाहिजे.

बेकारीचा प्रश्नही अतिशय तातडीचा झालेला आहे. खरे तर गरिबी आणि बेकारी हे आपल्या अर्थव्यवस्थेतील अत्यंत मूलभूत प्रश्न आहेत. म्हणून त्यांचा एकत्रित विचार करायला हवा. बेकारी नाहीशी झाल्याशिवाय गरिबी दूर होणार नाही आणि गरिबीची समस्या सोडविल्याशिवाय बेकारांना रोजगार देता येणार नाही. दरवर्षी शाळा-महाविद्यालयांमधून हजारो विद्यार्थी बाहेर पडत आहेत. त्यांना रोजगार कोण देणार? या सुशिक्षित तरुणांच्या उदरनिर्वाहाची सोय करणे जमले नाही, तर ही युवाशक्ती प्रक्षुब्ध होऊन देशाच्या स्थैर्याला आणि प्रगतीलाच आव्हान देईल. म्हणून बेकारीची समस्या सोडविण्यावाचून आपल्याला पर्यायच उरत नाही. उपाशी पोट आणि निष्क्रिय हात यांतून निर्माण होणारा असंतोष भयावह ठरतो. बेकारी आणि गरिबी यांच्या निर्मूलनाला आर्थिक धोरणात अग्रक्रम द्यायलाच हवा.

या संदर्भामध्ये आणखी एक प्रश्नाचा विचार होणेही आवश्यक आहे. देशातील कोट्यवधी लोक उपासमारीच्या छायेत निरंतर वावरत असताना काही थोड्या लोकांनी विलासी जीवन उपभोगत राहावे, ही खरोखर संतापजनक बाब आहे. एका बाजूस आपण माजी संस्थानिकांचे तनखे काढून घेत असताना हा नव-श्रीमंतांचा वर्ग उदयाला यावा, याला काय अर्थ आहे? श्रीमंत शेतकरी, कारखानदार अन् व्यापारी यांची राहणी जुन्या संस्थानिकांनाही मागे टाकेल, इतकी ऐशारामाची झालेली आहे. हे नवे राजेरजवाडे कसे निर्माण झाले? करपद्धतीमधील उणिवांचा गैरफायदा घेऊन त्यांनी आपले वैभव वाढविले. आपण सर्वसामान्य जनतेचे सेवक आहोत आणि या जनतेसारखेच आपलेही जीवनमान असले पाहिजे, याची या नव-श्रीमंतांना जाणीव करून देण्यासाठी आपण करविषयक आणि अन्य कायद्यांत दुरुस्ती केली पाहिजे. आपण आपल्या आर्थिक जीवनामधील ही बेसुमार विषमता जोपर्यंत नाहीशी करीत नाही, तोपर्यंत आपला समाजवादाचा जयघोष निरर्थक आहे.

समाजवादाचे तीन विशेष निकष असतात. पहिला हा, की सर्वांना विकासाची समान संधी मिळाली पाहिजे. सगळेजण कायद्यासमोर समान आहेत, एवढे म्हणून भागत नाही. देशाच्या आर्थिक समृद्धीमध्ये हातभार लावण्याची आणि या समृद्धीचा उपभोग घेण्याची प्रत्येकाला ख-या अर्थाने समान संधी उपलब्ध झाली पाहिजे.
जीवनमानांतील विषमता नाहीशी करणे हा समाजवादाचा दुसरा निकष आहे.
जीवनमान म्हणजे केवळ आर्थिक जीवन नव्हे, सामाजिक जीवनही त्यात अंतर्भूत असते. उत्पादनाच्या प्रक्रियेतील शोषण थांबविणे, ही समाजवादाची तिसरी अट आहे. हे तिन्ही निकष आपापल्या परीने महत्त्वाचे असले, तरी आर्थिक आणि सामाजिक विषमता नष्ट करणे, हा समाजवादाचा गाभा म्हटला पाहिजे. म्हणून आपण येत्या पाच-दहा वर्षांमध्ये ही विषमता निपटून काढली पाहिजे. तरच आपली समाजवादाच्या दिशेने खरीखुरी वाटचाल चालू झालेली आहे असे म्हणता येईल.

मला येथे आणखी एक इशारा द्यावासा वाटतो. केवळ घोषणा करून समाजवाद अवतरत नसतो. तसे मानणे म्हणजे आत्मवंचना करण्यासारखे होईल.
समाजवादाच्या मार्गावरील प्रवास प्रदीर्घ, कठीण आणि कष्टप्रद असतो. मात्र हा प्रवास आपल्याला केलाच पाहिजे. कारण तशी आपली प्रतिज्ञाच आहे. म्हणून केवळ आर्थिक प्रश्नांचा तात्त्विक विचार करून चालत नाही. तो विचार विशिष्ट कालावधीमध्ये प्रत्यक्षात उतरायला हवा. आज काय करायचे, उद्या काय करायचे, या वर्षातील उद्दिष्ट कोणते, पुढल्या वर्षी किती पल्ला गाठायचा, हे सगळे ठरले पाहिजे, आणि त्याप्रमाणे घडले पाहिजे. समाजवाद पुस्तकातून अवतरत नाही. कृती-कार्यक्रमातून त्याचा प्रत्यय येत असतो.

आपल्या घोषणा जेव्हा कृतीत येतील, तेव्हाच आपण आपल्या कर्तव्याला जागलो, असे होईल. आपला उच्चार आणि आचार यांत तफावत पडली, म्हणूनच कॉंग्रेसला १९६७ मध्ये अनेक राज्यांत पराभव पत्करावा लागला. कारण लोक म्हणतात, 'तुम्ही

बोलता खूप, पण करता मात्र थोडे !' म्हणून यापुढे ही चूक घडता कामा नये, येत्या चार-पाच वर्षांत निश्चित काय करू शकू, याचे आपल्या मनाशी मोजमाप करूनच आपण लोकांना आश्वासन दिले पाहिजे. नाही तर लोकांची फसगत केल्याच्या पापाचे धनी आपण होऊ. म्हणूनच यापुढे आपला सारा भर वचनपूर्तीवर असला पाहिजे.

## ११. भारतीय लोकशाही : एक भविष्यकथन

'किर्लोस्कर' जानेवारी १९७०.

आपण आता १९७० पासून सुरू होणा-या नव्या दशकात प्रवेश करीत आहोत. अशा वेळी स्वाभाविकच देशाचा विचार करणाऱ्यांच्या मनात या दहा वर्षांत आपल्या देशात काय काय घडेल, यासंबंधी विचार येतात. विशेषत:, लोकशाहीमध्ये राजकारणी विचारवंताला अशा प्रश्नांचा विचार केवळ खाजगी रीतीने किंवा गुप्तपणे करता येत नाही.

कारण आजच्या राजकारणातील प्रश्न हे सर्व जनतेशी निगडित असतात. म्हणून राजकारणी माणसाला लोकशाहीमध्ये अशा सार्वजनिक विषयांवर आपले विचार लोकांसमोर मांडून लोकांना विश्वासात घ्यावे लागते. त्यातून विचारप्रवर्तन सुरू होते. त्यामुळे सामान्य नागरिक स्वत:च्या प्रतिक्रिया देऊ लागतो. अशा मतप्रदर्शनातून शेवटी लोकमत तयार होते आणि त्यातून लोकशाहीतील अंतिम निर्णय घेतले जातात.

येत्या दशकात आपण आपले धोरण कसे आखावे, असा प्रश्न उभा करताच इतर अनेक उपप्रश्न उभे राहतात. हे ध्येयधोरण कशासंबंधी व कोणासाठी आखावयाचे,

हा यांच्यांतील केन्द्र-प्रश्न होय. या धोरणाची वैशिष्ट्ये कोणती राहतील; हे त्यावरून ठरते. कोणत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीमध्ये आपल्याला नवे धोरण आखावे लागेल, हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आखलेल्या ध्येय-धोरणाशी संभाव्य संघर्ष कोणते होतील आणि ते टाळण्याचा किंवा त्यांच्याशी सामना देण्याचा कोणता मार्ग पत्करावा लागेल, याचाही विचार करावा लागतो. आगामी दशकाचे ध्येयधोरण आखताना स्वाभाविकच गेल्या दशकात काय घडले, याचीही नीट पाहणी केली पाहिजे. कारण एखाद्या दशकातील घटनांची जंत्री, म्हणजे काही त्या दशकातील घटनांचा शास्त्रोक्त विचार नव्हे. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये राष्ट्राच्या पुनर्रचनेसाठी काही मूलभूत तत्त्वे व ध्येये यांचा पुरस्कार आपण केला. त्यानुसार राजकीय व आर्थिक व्यवहार झाले, या प्रवासातील काही अडचणीही आपल्या नजरेस आल्या. तेव्हा गेल्या दशकाचा विचार करताना आपल्या घटनेतील जी सामाजिक उद्दिष्टे आपण डोळ्यांसमोर ठेवली, ती आपण कितपत साध्य केली आणि ती झाली नसल्यास येत्या दशकामध्ये ती कशी साध्य करता येतील, याचा विचार प्रामुख्याने करावयाचा आहे.

आपली राज्यघटना हा भारताच्या इतिहासातील एक क्रांतिकारक संकल्प आहे. सार्वदेशीय लोकसत्ता व समान नागरिकत्व ही तिच्यातील क्रांतिकारक तत्त्वे आहेत. भारतासारख्या सामाजिक व आर्थिक विषमतेने हजारो वर्षे जखडलेल्या समाजात धर्मातीत व जातिभेदातीत नागरिकत्वाचा पुरस्कार करणे व त्यामागे शासनशक्ती उभी करणे, ही एक मूलभूत राजकीय क्रांती आहे.

मला वाटते, की या ध्येयाचे क्रांतिकारक महत्त्व आपण विसरलो आहोत. किंबहुना ते आपल्याला उमगलेच नाही. हीच क्रांती हिंसात्मक झाली असती, तर कदाचित तिची नाट्यमयता व तिच्यातील भावनोत्कटता आपल्याला अधिक तीव्र भासली असती. पण शांततेने सत्तान्तर झाल्यामुळे या क्रांतीला नाट्यमय पार्श्वभूमी लाभली नाही. हे खरे असले, तरी शासनाने एकदा आर्थिक व सामाजिक न्यायाचे तत्त्व स्वीकारल्यानंतर व शासनाचे स्वरूप लोकसत्ताक राहील, हे ठरल्यानंतर प्रत्येक

नागरिकाचे हक्क, त्याच्या गरजा, त्याचे सुख हीच त्या शासनाची सामाजिक उद्दिष्टे ठरतात आणि ती साध्य करण्यासाठी ध्येय, धोरण व कार्यक्रम शासनाला ठरवावा लागतो.

गेल्या दशकातील आपल्या राजकीय अनुभवावरूनच भारताची ह्यापुढील राजकीय ध्येये कोणती असावीत, याचा विचार करता येईल. मला स्वत:ला तीन दृष्टींनी भारताचे राजकीय ध्येयधोरण ठरले पाहिजे, असे वाटते. पहिले ध्येय भारताचे प्रादेशिक व राजकीय ऐक्य अभंग ठेवणे, हे राहील; दुसरे ध्येय लोकशाहीप्रधान व स्वतंत्र समाजाची निर्मिती व त्यासाठी लागणा-या राजकीय संस्थाचे संवर्धन व या समाजाला न्यायाचे अधिष्ठान देण्यासाठी त्याच्यातील आर्थिक व सामाजिक संबंध यांत आवश्यक ते मौलिक परिवर्तन घडविणे, हे राहील. तिसरे ध्येय म्हणजे राष्ट्रसंरक्षणाची अद्ययावत तयारी, हे असेल.

या तिन्ही आघाड्यांवर आपण गेल्या वीस वर्षांत काय केले, याचाही थोडक्यात विचार करू. पहिल्या ध्येयाच्या बाबतीत संस्थानांचे विलीनीकरण, प्रांतांची पुनर्रचना या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. या वीस वर्षांत केंद्र व राज्य यांचे संबंध चांगले राहिले, आणि त्यामुळे भारताच्या राजकीय क्षेत्रात फारसे संघर्ष निर्माण झाले नाहीत. तसेच भारताने अनेक राज्यांमध्ये लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रयोग याच २० वर्षांत सुरू केला आणि जनतेचे राज्य खेड्यापर्यंत पोचावे व राजकीय शासनामध्ये तिला सहभागी होता यावे, म्हणून जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती आदी नव्या संस्था निर्माण केल्या. या राजकीय पार्श्वभूमीवरच भारताने आपल्या आर्थिक पुनर्रचनेचे संकल्प व नियोजन, तीन पंचवार्षिक योजनांच्याद्वारे केले. याच काळात आपल्या दोन शेजाऱ्यांनी भारतावर आक्रमणे केली, पण त्यामुळे निर्माण झालेला आर्थिक ताणही मोठ्या हिमतीने आपण पेलला आणि भारताच्या अर्थकारणाचे आधुनिकीकरण वेगाने चालू ठेवले. या आधुनिकीकरणाचा पाया प्रत्येक आर्थिक क्षेत्रात घातला गेला. मागासलेल्या व कोरडवाहू शेतीला धरणांचे पाणी मिळायला

लागले. नांगराच्या बरोबरच आधुनिक अवजारे दिसू लागली. पिकांच्या पद्धतीही बदलल्या आणि अन्नस्वावलंबनाचा पाया घातला गेला.

औद्योगिक क्षेत्रातही असेच परिवर्तन घडले. अनेक क्षेत्रांमध्ये परदेशातून माल आयात होत असे. ती आयात फार कमी अथवा बंद झाली आणि उत्तम, दर्जेदार माल बाजारातून दिसू लागला. बाहेरच्या बाजारपेठेतही भारतीय माल जाऊ लागला. अवजड उद्योगधंदे व यंत्रोत्पादन यांमुळे नवे यंत्रयुग सुरू झाले. या अनुषंगाने शिक्षणक्षेत्रातही बदल झाले. नव्या औद्योगिक प्रकल्पांना तंत्रज्ञांचा पुरवठा करणारी अनेक विद्यापीठे व शिक्षणसंस्था निर्माण झाल्या.

या नव्या औद्योगिक आणि शेतकी प्रगतीबरोबरच शेतकऱ्यांचे जमिनीवरचे हक्क प्रस्थापित झाले. कामगारांसाठी नवे कायदे झाले. मागासलेल्या जातींना आणि हरिजन-गिरिजनांना आर्थिक आणि सामाजिक साहाय्य देण्यासाठी अनेक संस्था निर्माण झाल्या.

या सर्व प्रयत्नांमुळे शेतकरी व कामगार आता भारतीय समाजाचा क्रियाशील, जागरूक व शक्तिमान घटक झाला आहे. स्वत:च्या शक्तीची प्रचीती आली, की समाजामध्ये एक नवीन शक्तिशाली प्रवाह सुरू होतो. हा शक्तिशाली प्रवाह लोकशाहीमध्ये अत्यंत परिणामकारक असतो. कारण, अशा प्रवाहामुळेच राजकीय स्थित्यंतरे घडत असतात. त्यांचे प्रत्यंतर भारतामध्ये गेल्या वीस वर्षांमध्ये ज्या चार सार्वत्रिक निवडणुका झाल्या, त्यांच्यांत दिसून आले. या निवडणुकांमध्ये भारतातील नव्या शक्तीचे दर्शन घडले. अर्थात अद्याप आपली पक्षपद्धती जितकी तत्त्वप्रधान व सुसंघटित असावयास हवी, तितकी नाही. परंतु अनेक पर्यायी पक्ष लोकांपुढे जाऊन त्यांना राजकीय दृष्ट्या आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करतात, हा एक असामान्य राजकीय अनुभव व प्रयोग आहे. हा मतप्रचार किंवा मतप्रसार शांततेने होतो व लोक आपले प्रतिनिधी शांततेने व विचारपूर्वक निवडतात, हे गेल्या निवडणुकांत दिसून आले आहे. तेव्हा पक्षपद्धतीत किंवा पक्षांच्या संघटनेत संघर्ष

असले, तरी भारतीय मतदाराची राजकीय विवेकशक्ती शाबूत आहे, हे नि:संशय. माझ्या दृष्टीने आजच्या अंधारलेल्या वातावरणातही गेल्या वीस वर्षांत आपण मिळविलेला हा राजकीय अनुभव व यशस्वी केलेला लोकशाही निवडणुकीचा प्रयोग अधिक मोलाचा व आश्वासक वाटतो. यावरून हे सिद्ध होते, की राजकीय, आर्थिक व सामाजिक स्थित्यंतर हे आपण लोकशाही मार्गानेच घडवून आणवू शकू. नवजात भारतीय लोकशाहीची प्रकृती निकोप आहे, हे सिद्ध झाले आहे. ती निकोप प्रकृती निश्चितच आपल्याला राजकीय दृष्ट्या अत्यंत सावध व जागरूक ठेवील.

भारताचे ऐक्य, त्यातील लोकशाहीचे संरक्षण व संवर्धन व भारताचे राष्ट्रिय संरक्षण या तीन प्रश्नांचा विचार आपल्याला अलगअलगपणे करून चालणार नाही. कारण हे तिन्ही प्रश्न परस्परांशी निगडित आहेत. अनेकदा या महत्त्वाच्या मुद्याकडे दुर्लक्ष होते. भारताचे संरक्षण हा यांपैकी अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. त्याचा आपण विचार करू.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच शेजारच्या राष्ट्रांशी आपला संघर्ष सुरू होईल, याची आपल्याला मुळीच कल्पना नव्हती. कुरबुरी होत्या, पाकिस्तानबरोबरीचे संबंध तणाव निर्माण करणारे होते. पण पाकिस्तानने काश्मीरवर केलेल्या हल्ल्यामुळे युद्धाला तोंड फुटले. पण याही बाबतीत आपल्या आंतरराष्ट्रिय धोरणानुसार आपण हा प्रश्न समझोत्याने सोडविण्याचा प्रयत्न केला.

चीनबरोबरही संबंध ठेवताना आपली हीच दृष्टी होती. पण १९५० नंतर चीनने आपण आशियातील सर्वशक्तिमान राष्ट्र आहोत, या भावनेने आपले परराष्ट्रिय धोरण आखण्यास सुरुवात केली आणि त्यासाठी युद्धाची तयारी चालू ठेवली. भारतात निर्माण झालेल्या लोकशाही राजवटीमुळे चीनच्या राजकीय, आर्थिक रचनेला व त्याच्या तत्त्वप्रणालीला जणू आव्हानच देण्यात आले, असे चीनला वाटू लागले. भारत जर यशस्वी झाला, तर आपण जे राजकीय व आर्थिक धोरण पत्करले आहे, त्याचा पराभव होईल, असे चीनला वाटत होते. म्हणून चीनने,

भारताला राजकीय व आर्थिक दृष्ट्या दुबळे करण्यासाठी, १९६२ साली काय घडविले, यासंबंधी मी येथे अधिक काही सांगत नाही. पण एवढेच सांगतो, की त्यानंतर आम्ही चीन आव्हानाचे स्वरूप नीट समजावून घेऊन त्याप्रमाणे धोरण आखू लागलो. त्यानंतर चीनने पाकिस्तानबरोबर मैत्री केली. या आणि तदनंतरच्या चीनच्या सर्व नीतीचे मुख्य ध्येय भारताचे आर्थिक सामर्थ्य खच्ची करणे हेच होते.

सुदैवाने भारताने प्रारंभापासूनच स्वावलंबी अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून आपले आर्थिक नियोजन केले. तरीही १९६२ नंतर अनपेक्षितपणे आपल्याला आपल्या संरक्षणखर्चात वाढ करावी लागली आणि ती करून आम्ही संरक्षणक्षमता वाढविली. ते करताना विकासयोजनांवरील खर्च स्वाभाविकपणेच कमी झाला. पण जनतेने केलेला हा त्याग कारणी लागला, हे १९६५ सालच्या संघर्षात सिद्ध झाले.

येत्या दशकात संरक्षणविषयक धोरण कसे आखावे, याचा विचार करताना आपल्याला अर्थातच आपल्या शस्त्रसामर्थ्याच्या वाढीबरोबरच, जगाच्या राजकारणात ज्या घडामोडी घडत आहेत, त्यांच्यावरही नजर ठेवली पाहिजे. कारण देशाचे संरक्षण व जागतिक राजकारण यांचा निकट संबंध असतो. या दृष्टीने पाहता असे दिसते, की अनेक कारणांमुळे जगातील दोन्हीही सत्तागटांना पश्चिम आशिया व आग्नेय आशिया यांत शांतता अन् सुरक्षितता हवी आहे. अर्थात चीनच्या प्रादेशिक विस्ताराच्या आकांक्षेमुळे आग्नेय आशियातील चीनचा धोका कायम आहे, याची जाणीवही या दोन्ही प्रबल राष्ट्रांत आहे. दोन्ही राष्ट्रांनी आशियाच्या संरक्षणासाठी आशियाई संरक्षण योजना यासारख्या काही योजनांचा प्रचार चालू केला आहे. अर्थात आतापर्यंत लष्करी करारावर विश्वास ठेवणा-या या दोन्ही सत्तागटांना त्या कराराचे वैयर्थ्य व निष्फळता, फार उशिरा का होईना, पण कळून आली आहे. १९५० नंतर नेहरूंनी अशा लष्करी कराराविरुद्ध विचार मांडले, तेव्हा त्यांना कम्युनिस्ट म्हणून हिणविण्यात आले. सारांश, आता लष्करी संरक्षणाच्या कराराचा अंत झाला आहे आणि सीटो वा सेंटो यांसारखे करार हे दप्तरी केवळ नाममात्र राहिले आहेत. पण

आता या करारांऐवजी कोणती संरक्षण योजना आखली जाईल, याकडेच जगातील सर्व राजकीय व सैनिकी निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

चीनमध्ये अंतर्गत बदल घडत आहेत, त्यांमुळे परिस्थिती गुंतागुंतीची झाली आहे. चिनी नेत्यांचे धोरण अधिकाधिक हट्टी होत आहे. त्यामुळे चीन हे येत्या दशकातही मोठे प्रश्नचिन्ह राहणार आहे. कदाचित मोठ्या राष्ट्रावर चीन हल्ला करणार नाही, पण त्यांच्याविरुद्ध आक्रोश मात्र सतत करीत राहील. पण चीनचे भारताविषयी धोरण काय राहील, याबद्दल कोणताच खात्रीपूर्वक अंदाज देता येणार नाही. जोपर्यंत चीनला स्वत:च्या आर्थिक व सामाजिक रचनेबद्दलच आत्मविश्वास निर्माण होत नाही, तोपर्यंत भारताकडे चिनी नेते संशयाने व शत्रुभावनेनेच पाहतील आणि पाकिस्तानलाही भारताविरुद्ध सदैव चिथवीत राहतील, हे नि:संशय. चीनचे रशियाशी जे भांडण चालू आहे, ते मिटले, तरीही चीनच्या धोरणात बदल होईल किंवा नाही, हे सांगणे कठीण आहे.

प. आशिया व आग्नेय आशिया यासंबंधी बड्या राष्ट्रांचे जे धोरण आहे, त्यावरून या भागात फक्त अणुयुद्ध होणार नाही, एवढेच फार तर म्हणता येईल. परंतु या भागातील विविध राष्ट्रांमध्ये छोटे-छोटे संघर्ष टाळणे शक्य होईल, असे वाटत नाही. याचे कारण अगदी साधे आहे. काही राष्ट्रांना जैसे-थे प्रवृत्ती मानवतच नाही किंवा स्वस्थ बसवत नाही. मग त्याची कारणे कोणतीही असोत. म्हणूनच भारताला आपले सैनिकी सामर्थ्य सतत वाढवत राहिले पाहिजे. कोणत्याही आंतरराष्ट्रिय स्वरूपाच्या संरक्षण-योजनेमुळे पाकिस्तान आपले काश्मीरविषयीचे आक्रमक मनसुबे टाकून देईल, असे वाटण्यास मला काही जागा दिसत नाही.

आपल्या संरक्षणक्षमतेत तांत्रिक दृष्ट्याही सुधारणा व्हावयास हवी. त्या दृष्टीने जगामध्ये जी नवीन शस्त्रास्त्रे निर्माण होत आहेत, त्यांचीही दखल व माहिती आपल्याला घ्यावयास हवी. आपल्या सैन्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी ब-याचशा योजना आखण्यात आल्या आहेत. पण तरीही अजून बरेचसे व्हावयाचे आहे.

मुख्यत: आपल्याला संरक्षणक्षमतेत भारतीय शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ यांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन सैन्याचे आधुनिकीकरण करावे लागणार आहे. आधुनिक संरक्षणव्यवस्थेतही पायदळाचे महत्त्व कमी झालेले नाही. आणि येत्या काही वर्षांत जुनी युद्धतंत्रे सर्वस्वी बदलतील किंवा त्यांत काही गुणात्मक बदल होईलच, असे नाही. यामुळेच केवळ तांत्रिक आधुनिकीकरण हे अपुरे ठरेल. सैन्याची संख्या व नैतिक बळ हेही संरक्षणक्षमतेचे महत्त्वाचे अंग आहे.

संरक्षण-क्षमता वाढविण्यासाठी केवळ आधुनिक शस्त्रास्त्रे पुरी आहेत काय? की आपणही अण्वस्त्रे निर्माण केली पाहिजेत, हा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. मला असे वाटते, की अण्वस्त्रे असलेली सुसज्ज सेना निर्माण करण्याची मागणी ही असमंजस आहे. त्याचे एक कारण असे, की भारताला आक्रमक आकांक्षा नाहीत. भारताचे प्रादेशिक संरक्षण, एवढेच आपल्या सैन्याचे मर्यादित ध्येय आहे. संरक्षण-क्षेत्रात आपले मुख्य धोरण येत्या दशकात शस्त्र-स्वावलंबनाचे असले पाहिजे. तसेच आशियातील बदलती परिस्थिती लक्षात घेऊन, आपल्या स्वाभिमानास व राष्ट्रहितास पोषकरीत्या जर चीनशी आपले संबंध सुधारता आले, तर तोही प्रयत्न करून पाहण्यासारखा आहे. असा एखादा तडजोडीचा मार्ग निघाला, तर दोन्हीही देशांतील जनतेचे आर्थिक राहणीमान सुधारण्याच्या दृष्टीने ते उपकारक ठरेल.

संरक्षण-व्यवस्थेनंतर येत्या दशकात आपले आर्थिक धोरण काय राहील, याचा विचार महत्त्वाचा आहे. आपल्या घटनेतील सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याची उद्दिष्टे यादृष्टीने आपण कितपत साधली व ती अधिक जलदरीत्या साधण्यासाठी आपल्याला काय करावे लागेल, याचा निर्णय आपल्याला घ्यावयाचा आहे. गेल्या २० वर्षांत जे विविध आर्थिक व सामाजिक संकल्प व कायदे आपण केले, त्यांतून आपण मूठभर लोकांच्या हातांत आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होण्याचा धोका अंशत: टाळला असला किंवा समाजातील आर्थिक दृष्ट्या पंगु असणा-या लोकांना संरक्षण देण्यात अंशत: यशस्वी झालो असलो, तरीही हे कायदे व आपल्या विकास-योजना यामुळे सामाजिक न्याय व आर्थिक समता आपण प्रस्थापित करू

शकलो नाही, ही वस्तुस्थिती आहे. राष्ट्राच्या विकासासाठी लागणारी अर्थसाधने समाजाच्या सर्व घटकांनी निर्माण केली पाहिजेत, हे खरे असले, तरी आर्थिक विकासाच्या या कालखंडात सोसावे लागणारे हाल व कष्ट हे समाजातील सर्व गटांना सारखेच सोसावे लागावे, याची काळजी घेणे अत्यंत निकडीचे आहे. आपले आर्थिक धोरण आखताना शिक्षण, आरोग्य, वाहतूक, सांस्कृतिक संवर्धन यांसारख्या सार्वजनिक हिताच्या अनेक योजनांवर जास्त पैसा खर्च करून हजारो वर्षे उपेक्षित असलेल्या भारतीयांना आपण आर्थिक दृष्ट्या सुखी करू शकलो पाहिजे. यासाठी लागणारा पैसा सरकारला मिळावा, म्हणून जे सुखवस्तू वर्ग आहेत, त्यांना थोडीशी जास्त तोशीस पडली, तरी तीही समर्थनीय मानली जावी.

या दृष्टीने बँकांचे राष्ट्रियीकरण करून असे साहसी पाऊल भारत सरकारने टाकले आहे. अर्थात ज्या वेगाने व ज्या दिशेने आपल्याला जावयाचे आहे, त्याची ही केवळ सुरुवात आहे. यानंतरच औद्योगिक दृष्ट्या अविकसित प्रदेशांकडे लक्ष द्यावे लागेल. भूमिहीन शेतमजुरांनाही संरक्षण कसे देता येईल, याचा विचार तातडीने करावा लागेल. आधुनिक तंत्रविज्ञानाचा वापर करून देशात सर्वत्र छोटे उद्योग-धंदे वाढविले पाहिजेत. सहकारी क्षेत्रात ते अधिक प्रमाणात सुरू केले पाहिजेत. यामुळे दृश्य व अदृश्य बेकारी कमी करण्यास मोठी मदत होईल. शेतीमध्ये तांत्रिक क्रांती करून, छोट्या व मध्यम शेतकऱ्यांना शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी योजना आखाव्या लागतील. ही सर्व कामे करावयाची असतील, तर आतापर्यंत कधीही केले नाही, एवढे प्रचंड अर्थसंचयाचे व भांडवल-निर्मितीचे कार्य आपल्याला करावे लागेल. एतद्देशीय अर्थसाधने निर्माण झाली, तरच परदेशातून आर्थिक मदत घेण्याची आपली प्रवृत्ती कमी होईल. यासाठी आपल्या वैयक्तिक जीवनातील चैनबाजी व उपभोग्य वस्तूंचा वापर कमी करावा लागेल. अपुरी बचत, कमी उत्पादनक्षमता व कमी उत्पन्न यांच्या दुष्ट चक्रात आपला देश सापडला आहे. त्यातून त्याला बाहेर काढण्यासाठी आपल्याला समाजवादी पुनर्रचनेची साहसी उपाय-योजना तातडीने करावी लागेल.

बँकांच्या राष्ट्रियीकरणामुळे जलद आर्थिक प्रगतीच्या दिशेने आपण एक क्रांतिकारक

पाऊल टाकले आहे, असा लोकांचा समज झाला आहे. पण बँकांच्या राष्ट्रियीकरणातून आपल्या अर्थसाधनांचा सर्वंकष विकास करण्यामागे आपण लगेच लागले पाहिजे. तसे झाले नाही, तर बँकांच्या राष्ट्रियीकरणामुळे निर्माण झालेला उत्साह विरून जाईल. तो उत्साह कायम ठेवावयाचा असेल व लोकांच्या अपेक्षा पूर्ण करावयाच्या असतील, तर अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण यांसाठी प्रत्येक माणसाला काही तरी किमान दर्जा आपण प्राप्त करून दिला पाहिजे. त्याशिवाय देशात विकासाचा हुरूप निर्माण होणार नाही. म्हणून जे काही करावयाचे आहे, ते आपल्याला अत्यंत तातडीने केले पाहिजे. नाही तर वैफल्याची व लोकक्षोभाची अशी प्रचंड लाट अंगावर येईल, की आपण अगतिकच होऊन जाऊ.

आता राजकीय क्षेत्रात काय घडेल, याचा थोडासा अंदाज घेतला पाहिजे. राजकीय क्षेत्रातही संरक्षण-योजनांचा संबंध येतोच. संरक्षणक्षमता वाढविण्यासाठी जी योजना आखावयाची, तिच्यामागे राष्ट्रिय मानस हवे. तरच तिच्यासाठी लागणारा आवश्यक खर्च आपण निर्वेधपणे करू शकतो. आणखी दोन बाबतींत जास्तींत जास्त मतैक्य साधणे जरूर आहे, असे मला वाटते. पहिली बाब अशी, की आपले राजकीय ऐक्य अभंग ठेवण्यासाठी आपल्याला काही राजकीय व शासकीय धोरणे आखावी लागतील. आपल्या राष्ट्ररचनेच्या कामात अनेक अडचणी आहेत. अर्थात त्या पुष्कळशा आपल्या इतिहासातून निर्माण झालेल्या आहेत. त्यांपैकी जातीयवाद ही आपल्यापुढची अत्यंत गहन समस्या आहे. आपल्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमुळेही काही सामाजिक तणाव निर्माण झाले आहेत. हजारो निरपराध जीवांची हत्या व मालमत्तेची नासधूस करणारे जातीय दंगे या समस्येची दु:खद आठवण आपल्याला नेहमी करून देतात. धर्मातीत तत्त्वावर आपण या राष्ट्राची पुनर्रचना आद्यापि करू शकलो नाही, याचे स्मरण त्यामुळे सतत होते. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे, की भारतीय राष्ट्रवादाचा आधार कोणताही विशिष्ट धर्म हा नसून समान नागरिकत्व, समान अधिकार व समान कर्तव्ये हा आहे. या देशात विशेष अधिकार असलेले कोणतेही नागरिक नाहीत. भारतीय प्रजासत्ताकाचे समान नागरिकत्व हेच राष्ट्राच्या विविधतेचे प्रतीक आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यात व

त्यानंतर आपण राष्ट्रवादाच्या आधुनिक काळात हेच निधर्मी तत्त्व अंगीकारले. हे एका विशिष्ट धर्माचे वा संस्कृतीचे प्रभुत्व मानणा-या राष्ट्रवादाशी पूर्णपणे विसंगत आहे. परंतु दुर्दैवाने आपल्यांतील काही लोकांना हे पटत नाही. धर्म व राष्ट्र हे एकच आहे, असे ते मानतात. धर्मनिष्ठ राष्ट्रवाद व धर्मातीत राष्ट्रवाद यांच्या संघर्षातून काय घडेल, ते आपल्याला माहिती आहेच. पण फाळणीनंतरही भारत हे बहुधर्मी, परंतु धर्मातीत राष्ट्र म्हणून आपण मानले आहे. ती आमची अढळ निष्ठा आहे. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये धर्मातीत राष्ट्रवादावरील आपल्या श्रद्धेची परीक्षा अनेकदा घेतली गेली आहे. ती श्रद्धा डिवचण्याचा पाकिस्तानने सतत प्रयत्न चालविला आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी, की अन्य धर्मीयांशी संघर्ष निर्माण करून, धर्मातीत राष्ट्रवादावरील आपली अश्रद्धा काही लोकांनी वारंवार सिद्ध केली आहे.

धर्मातीत राष्ट्रवादाची निष्ठा वाढीला लावल्याखेरीज आणि जातीयवादाचे विष नाहीसे केल्याखेरीज भारत हा राष्ट्र म्हणून तगू शकणार नाही, याबद्दल माझी खात्री आहे. स्वातंत्र्य-लढ्यात या धर्मातीत राज्यकल्पनेसाठी त्या काळच्या नेत्यांनी आपले पुरेसे बौद्धिक परिवर्तन जरी घडवून आणले होते, तरीही काही जुन्या प्रवृत्ती व मूल्ये अद्यापि समाजाच्या काही घटकांमध्ये मूळ धरून आहेत, असे दिसते. त्यामुळे समाज व सरकार यांच्या प्रश्नाकडे धर्मातीत दृष्टीतून पाहण्याची प्रवृत्ती आपण समाजात सर्वथैव निर्माण करू शकलो नाही, ही वस्तुस्थिती आहे.

मला वाटते, की येणा-या दशकात या दृष्टीने दोन दिशांनी दृढतापूर्वक प्रयत्न करावे लागतील. पहिली गोष्ट अशी, की सर्व राजकीय पक्षांना जातीय दंगे टाळण्यासाठी शासनाशी सहकार्य करावे लागेल. त्यासाठी जातीय भावना व द्वेष वाढवीत राहून लोकांना हिंसाचारास प्रवृत्त करणा-या शक्तींशी सामना देण्यासाठी सरकारशी सहकार्य करावे लागेल. पण याहीपेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट, म्हणजे आपल्याला ध्येयवादाच्या संघर्षात समान आघाडी उभारावी लागेल. धर्मातीत राष्ट्रवादाचे तत्त्व समाजामध्ये प्रसृत करण्यासाठी संयुक्त प्रयत्न करावे लागतील. साहित्य, चित्रपट, नाट्य, शाळा व विद्यापीठे या माध्यमांतून हा प्रसार आपल्याला करता येईल.

लोकांना पटवावे लागेल, की मिथ्या राष्ट्रवादाचे दिवस आता संपले आहेत. हिंदुराष्ट्र किंवा हुकमत-ए-इलाही या दोन्ही कल्पनांशी बौद्धिक पातळीवर आपल्याला लढावे लागेल व लोकांना धर्मातीत राज्यसंस्थेच्या कल्पनेकडे वळवावे लागेल. मला वाटते, की या गोष्टीकडे जितके लक्ष द्यावे, तितके देण्यात आलेले नाही. भूतकाळातच ज्यांचे विचार सर्वथा रमलेले आहेत, त्यांच्याशी बौद्धिक सामना दिल्याखेरीज धर्माच्या नावावर केला जाणारा विफल संघर्ष भविष्यकाळात आपण टाळू शकणार नाही. येत्या दशकात या आव्हानाला आपल्याला उत्तर द्यावयाचे आहे.

जास्तींत जास्त मतैक्य ज्यात साधू शकेल, अशी दुसरी बाब म्हणजे स्वतंत्र लोकशाही समाजाच्या निर्मितीचे आपले स्वप्न. यातही दोन धोके आहेत. एक धोका आपली गाऱ्हाणी सोडविण्यासाठी हिंसाचार करण्याची आपल्यांतील वाढती प्रवृत्ती. दुसरा धोका लोकशाही व संसदीय विरोधी असणा-या तत्त्वप्रणाली व चळवळी यांचा आहे. या दोन्ही प्रश्नांचा आगामी दशकाच्या दृष्टीने अत्यंत गंभीरपणे विचार केला पाहिजे.

मी वर सांगितल्याप्रमाणे आपली आर्थिक व सामाजिक पुनर्रचना क्रांतिकारक कार्यक्रम करण्याचे नेटाचे प्रयत्न आपण केले, तर त्यासाठी लोकांना शिस्तबद्ध रीतीने व सामूहिकरीत्या कष्ट करावे लागतील, हे उघड आहे. धैर्य व भविष्यकाळाबद्दलची आशा यांच्या बळावर हे कष्ट लोक सोसतील, तर विकासाचा वेग वाढू शकेल. कष्ट व हाल सोसल्याविना आपला औद्योगिक व शेतकी विकास वेगाने होईल, अशा भ्रमात आपण राहून चालणार नाही. लोकशाही रचनेत राजकीय पक्षांनी व किसान कामगार संघटनांनी अशा प्रकारची श्रम करण्याची प्रवृत्ती व जिद्द लोकांत निर्माण केली पाहिजे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासंबंधीच्या कल्पना व वर्गहित यांचा संघर्ष झाला, तर त्यात काहीही वावगे नाही; पण तो संघर्ष विधिमंडळात किंवा सभागृहात झाला पाहिजे. वृत्तपत्रांत त्याचे पडसाद उमटले पाहिजेत. पण असे द्वंद्व जर हिंसाचाराने रस्त्यात व्यक्त होऊ लागले, तर या देशातील स्वतंत्र समाजाच्या कल्पनेवर निर्माण झालेल्या राजकीय संस्था धोक्यात येतील. स्वत:च्या

कल्पनांची बळजबरी व त्यातून येणारा हिंसाचार यांतून राजकीय दहशतवाद निर्माण होतो. जगाच्या इतिहासात सर्वकाळी व वारंवार हे घडले आहे. वाढत्या हिंसाचाराच्या थैमानातही भारतातील लोकशाही टिकून राहील, असे दैवी वरदान या देशाला मिळाले आहे, असे नाही. ह्या वाढत्या हिंसक प्रवृत्तीपासून लोकशाहीचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सर्व विचारवंतांना कटिबद्ध होऊन निष्ठेने प्रयत्न करावे लागणार आहेत.

अनेकांना असे वाटते, की सरकारने कठोर उपाययोजना करून हिंसाचाराला आळा घालावा. तसे करणेही शक्य आहे. पण हा केवळ कायद्याची अंमलबजावणी करण्याचा प्रश्न नाही, तर आपल्या राजकीय श्रद्धांचा हा प्रश्न आहे. आपल्याला जर येत्या दशकात आर्थिक विकासाचा वेग वाढवावयाचा असेल, तर हे दशक शांततेचे गेले पाहिजे. ही शांतता प्रस्थापित करण्यासाठी सरकारलाही आपल्या शासनयंत्रणेला लोकाभिमुख करावे लागेल. आपल्या समाजात विविध व गुंतागुंतीचे जे बदल घडवावयाचे आहेत, त्यांसाठी आवश्यक असे शासकीय बदल करावे लागतील. नव्या तंत्रांचा वापर करावा लागेल. ह्याबरोबरच विरोध व मतभेद हे व्यक्त करण्याचे शांततेचे मार्ग आपण अवलंबिले पाहिजेत. यासंबंधी राष्ट्रिय जागृती व मतैक्य आपण घडविले पाहिजे. अर्थात या कामी येणा-या अनेकविध अडचणींची जाणीव मला आहे. कोणत्याही स्वतंत्र समाजामध्ये मतभिन्नता (Dissent) हेही महत्वाचे तत्त्व आहे, हे मी मानतो. पण शांतता हीही तितकीच महत्त्वाची आहे. कारण त्याविना या देशातील कोट्यवधी लोकांना हवे असलेले सुखद जीवन आपण देऊ शकणार नाही.

दुसरा धोका आहे, तो 'सामाजिक व राजकीय बदल हे हिंसेशिवाय घडणार नाही,' अशी दृढ श्रद्धा असणा-या लोकांचे प्रमाण कमी आहे व ते असंघटित आहेत. परंतु या प्रश्नाचा गंभीरपणे व साकल्याने विचार न झाल्यास सार्वत्रिक हिंसाचार करण्याइतके त्यांचे सामर्थ्य वाढू शकेल, हे आपण विसरून चालणार नाही. या संदर्भात लोकशाहीच्या मार्गाने समाजवादी रचनेची शपथ घेतलेल्या राजकीय पक्षांवर

जास्त जबाबदारी आहे. असे जातीय दंगे केवळ सरकारी सामर्थ्याने नाहीसे होणार नाहीत; तर त्यासाठी लोकांचे मनपरिवर्तन केले पाहिजे. तसेच हिंसाचारावर विश्वास ठेवणा-या ध्येयप्रणालीपासून लोकांना परावृत्त करावयाचे असेल, तर ज्या लोकमानसात अशा हिंसात्मक ध्येयवादाचा प्रभाव पडतो, त्याच्यावर लोकशाहीचे परिणामकारक संस्कार करीत राहिले पाहिजे. लोकशाही पद्धतीची श्रेष्ठता लोकांना पटवून दिली पाहिजे. सामाजिक न्याय व समता यांचे आश्वासन देणा-या समाजवादी शक्तीवर दृढ श्रद्धा असलेली लोकशाहीच अशा हिंसाचारी ध्येयप्रणालीशी मुकाबला करू शकेल.

येत्या दहा वर्षांत राजकीय पक्षामध्ये कोणत्या प्रकारचे बदल घडतील, यासंबंधी मी हेतुत:च काही सांगितले नाही. कारण, आपल्या पक्षाखेरीज इतर पक्षांत काय घडेल, हे सांगणे कठीण असते. तथापि, राजकीय पक्षांच्या कार्यपद्धतीत कोणता बदल होणे आवश्यक आहे, हे स्थूलमानाने सांगू इच्छितो. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर भारतीय राजकारणावरील एकपक्षीय प्रभुत्व कमी झाले. किंबहुना नाहीसे झाले, असे सांगण्यात येते. अर्थात १९६७च्या निवडणुकीनंतर भारतीय राजकारणात गुणवत्तेच्या दृष्टीनेही काही बदल झाले, हे नि:संशय आहे. येत्या दशकात जी उद्दिष्टे राजकीय पक्षांना साधावयाची आहेत, त्यांच्या मनाने बहुपक्षीय सरकारे किंवा संमिश्र सरकारे यांचा प्रश्न गौण समजला पाहिजे.

गेल्या दोन दशकांमध्ये ज्या नव्या सामाजिक व आर्थिक शक्ती निर्माण झाल्या, त्यांना सामावून घेण्यासाठी भारतातील राजकीय पक्षांना आता ध्येयप्रणालीची स्पष्टता व त्यांच्याशी सुसंवाद अशा कार्यक्रमावर भर द्यावा लागणार आहे. १९६७ नंतर घडलेल्या स्थित्यंतराचे हे मर्म आहे. या प्रक्रियेमुळेच काही पक्षांत अंतर्गत स्थित्यंतरे वेगाने घडत आहेत व काहीमध्ये अद्यापि तेवढा वेग आलेला नाही, हे आपण पाहतो आहोत. त्यामुळेच पक्षांतर्गत शिस्तीत थोडासा ढिलेपणा आला आहे. हा ढिलेपणा शिस्त असावी, की नसावी, या मतभेदातूनच निर्माण झाला आहे, असे मानणे चुकीचे ठरेल. मूलभूत व तातडीचे प्रश्न सोडविण्यासाठी नवे मार्ग शोधले पाहिजेत, असे सांगणा-या मतप्रवाहांचे दडपण पक्ष-संघटनेवर येते, हे पक्षबंधनाच्या

लवचीकपणामुळे शक्य होत आहे. याच प्रक्रियेतून गेल्या काही वर्षांत पक्षांतर सुरू झाले आहे. येत्या दशकात सर्व राजकीय पक्षांना आपली दिशाहीनता टाकून देऊन सामाजिक व आर्थिक उद्दिष्टांची निश्चिती व अंमलबजावणीचा सुस्पष्ट आणि अनुक्रमबद्ध कार्यक्रम यांच्याकडे आपला मोहरा वळवावा लागेल. विविध राजकीय पक्षांतील हे परिवर्तन कदाचित योजनापूर्वक घडेल किंवा काही प्रमाणात पक्षाबाहेरील किंवा अंतर्गत शक्तीच्या दडपणामुळे घडेल. परंतु एक निष्कर्ष निश्चित काढण्यासारखा आहे, तो असा, की सुस्पष्ट ध्येयवाद व निश्चित कार्यक्रम हा जनतेसमोर ठेवला नाही, तर राजकीय पक्षपद्धतीलाच धोका पोचण्याचा संभव आहे.

आज जो सर्वत्र गोंधळ दिसत आहे, त्यातूनही एक आशादायक प्रवाह मला दिसतो. तो म्हणजे सर्व राजकीय पक्षांत बदलत्या परिस्थितीचे समीक्षण, पृथक्करण व आत्मचिंतन करण्याची प्रवृत्ती प्रबळ झाली आहे. या सर्वांचा परिणाम होऊन येत्या दहा वर्षातील राजकारण हे जनतेच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नावर आपले लक्ष केंद्रीभूत करील, असे  मला वाटते. त्यामुळे पक्षापक्षांच्या केवळ विचारांतच नव्हे, तर आचारांतही परिवर्तन घडेल, असा माझा विश्वास आहे.

अनेक लोकांना सध्याच्या बदलत्या व आव्हानात्मक परिस्थितीपुढे भारतातील लोकशाही तग धरू शकेल, की नाही, याबद्दल प्रामाणिक शंका वाटते. देशातील हिंसाचार व संसदीय लोकशाहीचा उघडउघड धिक्कार करणा-या मतप्रणालीचा जो प्रभाव आज पडत आहे, त्यामुळे अनेक लोक शंकाकुल झाले आहेत. विशेषत:, गेल्या दोन अडीच वर्षांतील घटना, विधिमंडळातील पक्षांतरे व बेशिस्त वर्तणूक यांमुळे राजकीय निराशावाद निर्माण होत आहे. आपल्या देशातील नव्या लोकशाहीच्या अस्तित्वास या सर्व गोष्टी घातक ठरतील, हे मी नाकारत नाही. परंतु दोन दुष्काळानंतर निर्माण झालेल्या आर्थिक व सामाजिक तंग परिस्थितीतही १९६७ साली सार्वत्रिक निवडणुका शांतपणे पार पडल्या आणि मोठ्या प्रमाणात मतदान झाले, ही घटना माझ्या दृष्टीने अधिक बोलकी आहे. तसेच १९६९ मधल्या चार राज्यांतील मध्यावधी निवडणुका शांत रीतीने पार पडल्या, हेही विसरून चालणार

नाही. लोकशाही शासनाच्या लोक-व्यवहारात सार्वत्रिक निवडणुकांना जे सामाजिक स्थान आहे, ते लक्षात घेता, भारतीय लोकांची निवडणुकीतील शांततामय वागणूक त्यांच्या लोकशाहीवरील दृढमूल श्रद्धेची द्योतक मानली पाहिजे. १९६७ मध्ये राजकीय पक्षांत काही घटनाविषयक निर्णयामुळे तीव्र मतभेद झाले होते. केंद्र-राज्य संबंधांवर किंवा राज्यपालांच्या अधिकारांसंबंधी राजकीय वादळेही निर्माण झाली होती. तरीही सामान्यत: देशात सर्वत्र शांतताच नांदली.

मला वाटते, की अशा संकलित व दूरदर्शी दृष्टिकोणातून सद्य:स्थितीचे आपण मूल्यमापन केले, तर फारसे निराश होण्याचे कारण नाही. किंबहुना, मला तर असे दिसते, की ज्या राजकीय पक्षांनी घटनात्मक राजकारणाला प्रखर विरोध केला, ते आता हळूहळू संसदीय शासनपद्धतीच्या शिस्तीशी स्वत:च्या राजकीय वर्तनाचा मेळ घालू लागलेले आहेत. अर्थात अशा पक्षांना त्यांच्या पूर्वनियोजित राजकीय सिद्धांतामुळे संसदीय शासनपद्धतीचा उघड अंगीकार करणे सोपे ठरणार नाही; पण त्यांचा प्रयत्न चालू आहे, हे मात्र नि:संशय. म्हणूनच भारतीय लोकशाहीची मृत्युघंटा वाजते आहे, अशासारख्या भावनाप्रधान घोषणांनी मी सचिंत होत नाही. मला स्वत:ला भारतीय लोकशाहीचे रोपटे लहान, पण रसरसलेले आहे, असे वाटते व लहानशा वादळाने ते पडेल, अशी भीती मला तरी वाटत नाही.

## १२. नवी दिशा

३ ऑक्टोबर १९७० रोजी मद्रास, येथे भरलेल्या
'काँग्रेस फोरम फॉर सोशलिस्ट ऍक्शनच्या'
अखिल भारतीय मेळाव्यापुढील भाषणाच्या आधारे.

काँग्रेस पक्ष केवळ राजकीय स्वातंत्र्याच्या संग्रामामध्ये नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास किंवा उपेक्षित अवस्थेत राहणा-या जनतेच्या मुक्ततेसाठी असलेल्या संघर्षातही सतत आघाडीवर राहिला आहे. आपल्याला कोणता नवभारत निर्माण करावयाचा आहे, याचे स्वप्न, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण जी राज्यघटना तयार केली, तिच्या पूर्वनिवेदनामध्ये रेखाटण्यात आले आहे. सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय लाभेल; विचार, उच्चार, श्रद्धा आणि पूजा यांबाबतीत स्वातंत्र्य राहील आणि दर्जा नि संधी यांबाबतीत समानता राखली जाईल, असे राज्यघटनेने सर्व नागरिकांना वचन दिलेले आहे. राष्ट्रिय जीवनाच्या सर्व यंत्रणांमध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळेल, अशी समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार करण्यात आलेला आहे. सर्वसामान्य माणसाच्या हिताची जपणूक व्हावी, म्हणून आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होणार नाही, अशी अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे आश्वासन देण्यात आलेले आहे, ही सर्व अभिवचने प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने क्रमशः कोणते कार्य अंगीकारण्यात येईल, याची सूचना काँग्रेस पक्षाने वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या निवडणूक जाहिरनाम्यांमध्ये पाहायला मिळते. त्या दिशेने आतापर्यंत आपण किती वाटचाल केली आहे आणि कितपत उद्दिष्टे साध्य केलेली आहेत, याचा आढावा घेणे सयुक्तिक ठरेल.

आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्यासाठी नियोजन आवश्यक आहे, हा विचार स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच स्वीकारण्यात आला. पंचवार्षिक योजना आखताना आणि त्यांतील अग्रक्रम ठरविताना वर निर्देशित केलेली राष्ट्रिय उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवण्यात आली होती. प्रत्येक योजना-काळाच्या अखेरीपर्यंत, राष्ट्रिय कार्याच्या सर्व स्तरांपर्यंत सामाजिक न्यायाचे प्रमाण वाढते राहील, यासाठी काही खबरदारीही घेण्यात येत होती. आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊ नये, तिला जनतेचे शोषण करता येऊ नये व प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे जतन झाले पाहिजे, या दृष्टीने पूरक आर्थिक-सामाजिक कायदेही करण्यात आले.

हे सारे उपाय योजण्यात आलेले असतानाही, नियोजनाच्या पहिल्या वीस वर्षांमध्ये सामाजिक न्यायाची कदर न करताच आर्थिक विकास होत राहिला, हे मान्य केलेच पाहिजे. दोन दशकांच्या विकास-प्रयत्नांनंतरही आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण वाढलेले आहे. काही थोड्या लोकांची चैनीची राहणी व वारेमाप खर्च चालूच आहे आणि मागास नि पिढ्यान् पिढ्या गरीब असलेल्या लोकांच्या आणि विशेषत: अनुसूचित जाती-जमातींच्या जीवनात पंचवार्षिक योजनांनी फारसा बदल घडवून आणलेला नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. या काळामध्ये देशाची जी भरभराट झाली, तिचा लाभ प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचू शकलेला नाही.

याबाबतीत हरित-क्रांतीचे उदाहरणही घेता येण्यासारखे आहे. सध्या हरित-क्रांतीसंबंधी बरेच बोलले जात आहे. परंतु या क्रांतीमुळे ग्रामीण भागात जी सुबत्ता आली, ती सर्वांनाच लाभलेली नाही.

नियोजनबद्ध प्रगतीमुळे तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात घडून आलेल्या विकासाचा लाभही संघटित औद्योगिक आणि कृषी क्षेत्रांतील धनिक लोकांनाच झालेला आहे. या तक्रारीत बरेच तथ्य आहे. उत्पन्न आणि मालमत्ता यांबाबतची विषमता वाढली आहे. सामाजिक पक्षपात आणि विषमता यांपासून मुक्त असलेला व समतेवर आधारलेला समाज निर्माण करण्याच्या दिशेने गेल्या वीस वर्षांत जी कार्यपद्धती अवलंबण्यात आली, तिचेही अपयश उपेक्षणीय नाही. समताप्रधान समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने आपण बरेच प्रयत्न व आवश्यक ते कायदेही केले. तरी पण राष्ट्रिय जीवनात आपलाही सहभाग आहे, ही जाणीव समाजाच्या दलित आणि निरंतर उपेक्षित राहिलेल्या लोकांमध्ये निर्माण होऊ शकलेली नाही. त्या लोकांनी 'माणूस' म्हणून जगण्याचा आपला अधिकार बजावण्याचा प्रयत्न केला, की लगेच जात आणि वर्ण यांच्या उच्चतेचा कालबाह्य आणि उर्मट बडेजाव दाखवून त्यांना विरोध केला जातो. दलितांवरील हिंसक अत्याचार त्या उद्दाम वृत्तीचेच द्योतक

आहेत. आदिवासी लोकांचे सामाजिक आणि आर्थिक शोषण वाढले असून, राष्ट्रिय जीवनप्रवाहापासून ते दूर फेकले गेले आहेत.

त्यामुळेच सध्या आपल्याला सगळीकडे विफलता आणि अस्वस्थता यांचे वातावरण वाढत असल्याचे दिसत असून, त्यातच फुटीर हिंसाचाराची बीजे रुजली गेली आहेत. या हिंसाचाराला तोंड फुटले, तर जी ध्येये आपण उराशी जपलेली आहेत, त्यांच्या मुळावरच घाव बसेल.

म्हणून आता आपण आपल्या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्याची वेळ आलेली आहे. राज्यघटनेमध्ये ग्रथित करण्यात आलेले सामाजिक आणि आर्थिक न्यायाचे ध्येय साकार करण्यासाठी, आपल्याला अधिक मन:पूर्वक आणि अर्थपूर्ण प्रयत्न करायला हवेत. पक्ष-संघटनेच्या सर्वच पातळ्यांवर याबाबत तातडी दिसली पाहिजे. समाजाच्या सर्व यंत्रणेमध्ये अधिकाधिक सामाजिक न्याय प्रवर्तित होण्यासाठी निर्धारपूर्वक पावले टाकावयास हवीत, विकासाच्या प्रक्रियेमध्ये काही प्रमाणात त्याग आणि आत्मसंयम अभिप्रेत आहे, हे तर खरेच आहे. विकासाची विशिष्ट पातळी गाठल्याशिवाय उत्पन्न आणि संपत्ती यांबाबतीत समानता आणण्याचा प्रयत्न निरर्थक ठरणार आहे, हेही खरे आहे. परंतु त्याचबरोबर विकासविषयक प्रयत्नांचा अपरिहार्य भाग म्हणून सहन कराव्या लागणा-या अडचणी, समाजातील सर्व घटकांनी प्रत्यक्षपणे स्वीकारण्याची वेळ आलेली आहे, हेही नाकारून चालणार नाही. काही थोड्या लोकांनी उधळपट्टी करून विलासात राहावे, आणि ज्यांच्यापाशी अगदी नगण्य क्रयशक्ती आहे, त्यांनी आपली उपासमार तशीच चालू ठेवावी, ही परिस्थिती सहन होण्यासारखी नाही. काही थोड्या लोकांच्या चैनीवर मर्यादा घालण्यासाठी आणि त्यांच्याकडील संपत्ती समाजातील खालच्या घटकांकडे पोहोचविण्यासाठी सार्वजनिक सेवांचा विकास करायला अजून बराच वाव आहे.

उपेक्षित मानवतेपर्यंत पोहोचण्यासाठी शिक्षण, आरोग्य, वाहतूक अशांसारख्या सामाजिक सेवांची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणामध्ये वाढवावी लागेल, ज्या देशातील

बहुसंख्य लोक अत्यंत निकृष्ट जीवन व्यतीत करीत आहेत, अशा देशांमध्ये अनार्जित उत्पन्न आणि गुंतवणुकीवरचा भरमसाट फायदा या गोष्टींना स्थानच उरत नाही. म्हणून संपूर्ण परिवर्तनाच्या प्रक्रियेतून जात असलेल्या समाजाच्या सामाजिक व आर्थिक गरजांची सुसंवादी ठरेल, असे उत्पन्न आणि संपत्तिविषयक धोरण आखणे हा आपल्या आर्थिक कार्यपद्धतीचा विशेष ठरला पाहिजे. प्रगती किंवा विकास ही केवळ आर्थिक संकल्पना नसून तिला सामाजिक आणि मानवी असाही महत्त्वपूर्ण संदर्भ लाभलेला असतो, हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे. प्रगत भांडवलशाही देशांतही सामाजिक न्यायाचे महत्त्व मान्य केले जात आहे. जोपर्यंत सामाजिक न्याय आणि उपेक्षित नि दुर्बल घटकांचे कल्याण यांच्याशी द्रुतगतीने होणा-या आर्थिक विकासाचा संबंध जोडला जात नाही, तोपर्यंत मूठभर लोकांचे वैभव टिकूच शकणार नाही, स्वत:च्या ओझ्याखालीच ते वैभव कोलमडून पडेल.

काँग्रेसच्या विभाजनानंतर आणि विशेषत: वैचारिक निष्ठेच्या पुनर्घोषानंतर लोकांना नवा आशाकिरण दिसू लागला आहे. बँकांचे राष्ट्रियीकरण करणे आणि माजी संस्थानिकांचे तनखे नि विशेषाधिकार रद्द करणे यांसारख्या धाडसी आणि ऐतिहासिक उपाययोजनांमुळे तातडीने आणि प्रामाणिकपणे पावले टाकण्याची वाढती जाणीव निर्माण झालेली दिसत आहे. मात्र हा नव्या आर्थिक प्रगतीचा केवळ प्रारंभ ठरू शकेल, याचे भान सुटता कामा नये. कारण या आणि अशा प्रकारच्या अन्य उपाययोजनांचा लोकांवर तात्पुरताच परिणाम होऊ शकतो. त्याला चिरस्वरूप द्यावयाचे असेल, तर अगदी कमी अवधीमध्ये जनतेच्या जीवनमानामध्ये विशिष्ट स्वरूपाची सुधारणा घडून आली पाहिजे. आर्थिक आणि राजकीय सत्ता विकेंद्रित झाल्यामुळे विकासप्रक्रियाही विकेंद्रित झालेली आहे. हे कार्यक्रम कार्यवाहीत आणणा-या यंत्रणांची संख्या बरीच वाढलेली असल्यामुळे कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे अधिक गुंतागुंतीचे झालेले आहे. आपला देश विकसनशील असला, तरीही आपल्यापाशी निश्चितपणे कार्यक्षम प्रशासकीय यंत्रणा आहे. परंतु त्वरेने निर्णय घेण्याच्या आणि त्यांची कार्यवाही करण्याच्या दृष्टीने कामकाजाची पद्धत फारशी उपयुक्त ठरत नाही. केवळ कागदावर धाडसी निर्णय घेऊन काहीच साध्य होणार

नाही. अशा निर्णयांचे लाभ शक्य तितक्या लवकर सामान्य माणसापर्यंत जाऊन पोहोचले पाहिजेत.

एक राजकीय पक्ष म्हणून काँग्रेसला लोकमानसात जे स्थान लाभलेले आहे, त्या संबंधीचा विचार या संदर्भामध्ये माझ्या मनात येतो. स्वातंत्र्य-लढ्याची धामधूम सुरू असताना आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रारंभीच्या काळातही काँग्रेसचा जनतेशी घनिष्ठ आणि जिताजागता संबंध होता. खरे तर, लोकांच्या आशाआकांक्षांशी समरस झालेल्या संघटनेमध्ये आपण आहोत, याचा आपल्याला यावेळी किती तरी अभिमान वाटत असे. लोकांच्या अडीअडचणी आणि हालअपेष्टा दूर करण्यासाठी ही संघटना उत्स्फूर्तपणे धावून जात असे. गेल्या काही वर्षांमध्ये ही परिस्थिती राहिलेली नाही. सत्तासंपादनाच्या नादामध्ये, लोकांचे कल्याण करण्याचे सत्ता हे एक साधन आहे, याचाच आपल्याला विसर पडला. सत्ता हेच आपले एकमेव उद्दिष्ट झाले. सत्ताग्रहण केल्यानंतर आपल्या देशातील कोट्यवधी अर्धपोटी आणि अपु-या कपड्यांत राहणा-या जनतेची दुरवस्था नाहीशी करण्याची आपल्यावर जबाबदारी आहे, हे ध्यानातच घेतले गेले नाही.

एकीकडे जागृत आणि चोखंदळ मतदारांची संख्या सतत वाढत असताना सामान्य लोकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले गेल्यामुळे विभाजनापूर्वीच्या अविभक्त काँग्रेसला घरघर लागावी, यात आश्चर्यजनक असे काहीच नव्हते. असंतोषाने खदखदत असलेल्या जनतेला असह्य यातना सहन कराव्या लागत आहेत, त्याबद्दल आपण आस्था दाखविली नाही, तर विभाजनही निरर्थक ठरेल. काँग्रेस कार्यकर्त्यांना वास्तव परिस्थिती ध्यानात घ्यावीच लागेल. लोकांच्या आकांक्षांशी निगडित असलेला कार्यक्रम तातडीने अमलात आणण्याचा आपल्याला कसोशीने प्रयत्न केला पाहिजे.

नव्या परिस्थितीच्या संदर्भामध्ये काँग्रेस पक्षाच्या कार्य करण्याच्या पद्धतीमध्ये कोणते बदल करणे आवश्यक आहे, ते समजावून घेण्याची जरुरी आहे. अधिक वैचारिक स्पष्टता आणि कार्यक्रमांच्या पातळीवर अधिक एकवाक्यता यांच्या

आधारावर आपल्याला नवी आत्मजाणीव करून घेतली पाहिजे, हे गेल्या महिन्यांतील घटनांवरून दिसून आले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये काँग्रेस पक्षाला भिन्नभिन्न विचारसरणींच्या कार्यकर्त्यांच्या घोळक्यांचे जे स्वरूप आले आहे, ते नाहीसे करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. त्यासाठी आपल्याला पुन्हा वचनपूर्तीच्या राजकारणाला वाहून घेतले पाहिजे. तसेच वास्तवाचे भान राखणारे नेतृत्वही बळकट करावयास हवे. अखेरीस कोणताही खराखुरा राष्ट्रिय पक्ष हा विचार आणि पुरोगामी कृती यांचे साधन असते आणि बळकट आधार म्हणून त्याला कार्य करावे लागते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या आणि तो एकात्म करण्याच्या कार्यात काँग्रेस पक्षाने ऐतिहासिक भूमिका बजावलेली आहे. आता त्याला त्यापेक्षाही अवघड कार्य करावयाचे आहे. आणि ते म्हणजे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाचे आणि आपल्या स्वातंत्र्याला खरा अर्थ आणि आशय मिळवून देण्याचे.

आज देशात सर्वत्र हिंसाचाराचे वातावरण पसरल्याचे आपल्याला दिसत आहे. शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचे जागोजागचे प्रश्न हाताळता येण्यासारखे असले, तरी हिंसाचाराची प्रवृत्ती ही फार मोठ्या समाजघटकाला जाणवत असलेल्या वैफल्याचा प्रकट अविष्कार आहे, ही गोष्ट आपल्या नजरेआड करून चालणार नाही. लोकांना ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत, त्याची झळ तरुणांना बसत आहे. कारण त्यांना रोजगार पुरविण्याबाबत आपल्याला यश आलेले नाही. त्यामुळे हा फार मोठा जनसमूह पूर्णबेकारीचे किंवा अर्धबेकारीचे जीवन कंठत असून त्याला अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण यांसारख्या आपल्या प्राथमिक गरजाही भागविणे शक्य होत नाही. त्यामुळे देशाचे स्थैर्य आणि प्रगती यासंबंधी त्याला आस्था वाटत नाही. म्हणून बेकारांना रोजगार पुरविणे यावर आपल्या विचारांचा आणि साधनसंपत्तीचा सर्वाधिक भर असायला हवा.

शिक्षित युवकांमधील बेकारी ही आणखी एक गंभीर समस्या आहे. अर्थव्यवस्थेचा जलद विकास, ग्रामीण आणि नागरी विभागांमध्ये साधन-संपत्तीचा मोठ्या प्रमाणात वापर आणि उद्योगीकरणाच्या गतीस चालना या कार्यक्रमांद्वारेच आपल्याला या

परिस्थितीतून बाहेर पडता येईल. ग्रामीण व नागरी विभागांमध्ये स्वयंरोजगाराची सुविधा जास्तींत जास्त उपलब्ध करून देणे, हा बेकारीचा प्रश्न सोडविण्याचा एक मार्ग होऊ शकतो.

शेतीवर आधारित उद्योगांना आणि छोट्या कुटिरोद्योगांना नव्याने चालना देण्यात आली पाहिजे. याचा अर्थ असा आहे, की बेकारीची समस्या सोडविण्यासाठी आपल्याला प्रचंड प्रयत्न करावे लागणार आहेत. खरे म्हणजे या कार्यक्रमाला सर्वोच्च प्राधान्य दिले गेले पाहिजे. प्रत्येक कुटुंबातील किमान एका व्यक्तीला तरी रोजगार पुरविला जाईल आणि त्यायोगे त्याला दरमहा किमान शंभर रुपये मिळतील, हे आपले अगदी नजीकचे उद्दिष्ट असल्याचे आपण केरळमधील आपल्या निवडणूक जाहिरनाम्यामध्ये आश्वासन दिले आहे. अन्न, निवारा, वस्त्र, शिक्षण आणि आरोग्य या जीवनावश्यक गरजांच्या बाबतींत लोकांची किमान गरज भागविण्याच्या प्रयत्नांतील हे पहिले पाऊल ठरेल. कॉंग्रेस पक्षाची ही भूमिका लोकांना मान्य आहे, हे केरळमधील निवडणुकीच्या निकालावरून सिद्ध झालेले आहे. सर्वसामान्य माणसाच्या उन्नतीसाठी झटणा-या पुरोगामी शक्तींच्या पाठीशी केरळीय जनता उभी आहे आणि तिची लोकशाही मूल्यांवर दृढ श्रद्धा आहे, याचाच हा प्रत्यय आहे.

भूधारणा हे आपल्यापुढील आणखी एक महत्त्वाचे कार्य आहे. देशाच्या हजारो लोकांमध्ये विविध प्रकारच्या कूळपद्धती आहेत. काही राज्यांमध्ये जमिनीची मालकी कुळांकडे देण्यात आलेली असून, स्वत: जमीन न कसणा-या जमीनदारांचे हक्क हिरावून घेण्यात आलेले आहेत. 'कसणा-याची जमीन' हे तत्त्व देशाच्या काही भागांमध्ये अमलात आणण्यात आलेले आहे. परंतु काही भागांमध्ये जमीनदारी पद्धत अजून मूळ धरून आहे. केवळ राज्याराज्यांमध्येच नव्हे, तर एका राज्याच्या वा जिल्ह्याच्या भागातही जमिनीची प्रत आणि पावसाचे प्रमाण यांमध्ये तफावत आढळते. म्हणून भूधारणेसंबंधी संपूर्ण देशभर एकच पद्धत वा प्रमाण लागू करणे व्यवहार्य ठरणार नाही. परंतु छोटे शेतकरी, कुळे आणि भूमिहीन शेतमजूर यांना न्याय मिळेल, हे मार्गदर्शक तत्त्व स्वीकारलेच पाहिजे. भूधारणेसंबंधी गेल्या वीस

वर्षांमध्ये बरेच कायदे करण्यात आले आहेत. परंतु त्या कायद्यांच्या कार्यवाहीमध्ये ब-याच त्रुटी आढळून येतात. काही राज्यांमध्ये जमीनधारणेचे प्रमाण बरेच वरचे ठेवण्यात आलेले आहे. शिवाय त्याचीही अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे जादा जमीन भूमिहीन शेतमजूर आणि छोटे शेतकरी यांच्यामध्ये वाटपाचे कार्य फारसे झालेलेच नाही. म्हणून भूधारणेच्या प्रश्नांचा नव्याने विचार करण्याची तातडीची गरज निर्माण झालेली आहे. भूधारणेची मर्यादा ठरविताना व्यक्ती हा घटक न धरता कुटुंब हाच घटक मानला गेला पाहिजे. तसे केले, तरच फेरवाटपासाठी काही तरी जमीन उपलब्ध होऊ शकेल. देशाच्या अनेक भागांमध्ये कुळाची सुरक्षितता आणि त्याने निश्चित किती खंड द्यायचा, या दोन प्राथमिक गोष्टीही दुर्लक्षित राहिलेल्या आहेत. भूमिहीन शेतमजुरांची घरे ज्या जमिनीवर बांधलेली आहेत, त्या जमिनीची मालकी त्यांच्याकडे देण्याचे कार्यही अनेक राज्यांमध्ये घडून आलेले नाही. त्यामुळे भूमिहीन शेतमजूर आणि छोटे शेतकरी यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली असून ती विनाविलंब नाहीशी व्हावयास हवी.

हा असा एक प्रश्न आहे, की जो सोडविण्याच्या दृष्टीने आपल्याकडून आवश्यक ती कृती घडलेली नाही. आपल्या उपेक्षांचा एखाद्याला पुरावाच हवा असेल, तर ग्रामीण भागातील वाढते तणाव आणि अशांतता यांचा निर्देश करता येईल. जनसमूहाच्या फार मोठ्या विभागाकडून जेव्हा नैराश्य, असुरक्षितता, संताप आणि उतावीळपणा यांचे दर्शन घडते, तेव्हा तो केवळ शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचा प्रश्न राहत नाही. हरितक्रांती आणि पीक-लावणीच्या पद्धतीमधील तांत्रिक प्रगती यांमुळे ग्रामीण भागात जी विषमता निर्माण झाली आहे, तिने आता बरेच व्यापक रूप धारण केले आहे. आणि तिच्यात गंभीर सामाजिक तणावाची बीजे आहेत. भूधारणेच्या कार्यक्रमाच्या कालबद्ध कार्यवाहीवर भर देऊन काँग्रेसच्या १९६९ मध्ये मुंबई येथे भरलेल्या अधिवेशनाने या स्फोटक प्रश्नांची दखल घेतली आहे, हे मान्य केलेच पाहिजे.

छोट्या शेतकऱ्यांची आणि विशेषत: कोरडवाहू शेतीच्या विभागांतील छोट्या

शेतकऱ्यांचीही आपल्याकडून उपेक्षा झालेली आहे, हेही मुंबई अधिवेशनात मान्य करण्यात आले. म्हणून आपल्या कृती-कार्यक्रमांमध्ये बेकारी, भूधारणा आणि छोटे शेतकरी या प्रश्नांना अग्रक्रम देण्यात आला पाहिजे.

या तीन आघाड्यांवर आपण प्रत्यक्ष काय साध्य करतो, यावरूनच जागृत भारतीय जनता आपले यश वा अपयश मोजणार आहे. आपल्या देशापुढे जे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न आहेत, ते सोडविण्यासाठी सोपी वा तयार केलेली उत्तरे देणे सर्वस्वी अशक्य आहे. कोट्यवधी लोकांच्या या ज्वलंत आणि तातडीच्या प्रश्नांबाबत सैद्धांतिक किंवा साचेबंद दृष्टिकोण स्वीकारणे मुळीच पुरेसे ठरणार नाही. सध्याच्या बदलत्या काळामध्ये आपला दृष्टिकोणही अपारंपरिक आणि बदलता असला पाहिजे. या प्रश्नांची नवी उत्तरे शोधून काढण्यासाठी प्रयोग करण्याची आपल्यापाशी इच्छा असली पाहिजे.

राजकीय आघाडीवरही बरीच कामे बाकी आहेत, राष्ट्रउभारणीच्या कार्यामध्ये आपल्याला बरेच अडथळे सहन करावे लागत आहेत. काही दृष्टींनी ती आपल्या प्रदीर्घ इतिहासाचीच परिणती आहे. परंतु त्याचबरोबर सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमुळेही काही नवे सामाजिक तणाव निर्माण झालेले आहेत. जातीयवाद हा आपल्यापुढील एक अत्यंत गंभीर प्रश्न आहे. आधुनिक इहवादी भूमिकेवर राष्ट्राची उभारणी करण्याचे कार्य अद्यापि अपुरे राहिलेले आहे, याची दररोज उफाळणा-या जातीय दंगली आपल्याला आठवण करून देत असतात. दु:खाची गोष्ट ही आहे, की अशा दंगलींमध्ये निरपराध व्यक्ती आणि मालमत्ता यांचा नाहक बळी जात असतो. भारतीय राष्ट्राची आपली संकल्पना कोणत्याही धर्माशी निगडित नाही, हे आपण कधीही विसरता कामा नये. समान नागरिकत्व, समान अधिकार आणि समान जबाबदा-या या गोष्टी या संकल्पनेचा पाया आहे. येथे कोणीही खास नागरिक नाहीत. खरे म्हणजे भारतीय नागरिकत्वाची कल्पना हा भारतीय विविधतेचाच अविष्कार आहे. आधुनिक काळामध्ये, राष्ट्रियतेच्या तत्त्वावर कोणताही धर्म वा कोणतीही संस्कृती आपल्या एकट्याचा अधिकार सांगू च शकत

नाही, अशी आमची स्वातंत्र्य-लढ्याच्या काळामध्येही श्रद्धा होती, आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही ती तशीच कायम आहे. आपल्या लोकांपैकी काहीजणांची कल्पना वेगळी होती, धर्म म्हणजेच राष्ट्र, असे ते मानत होते. या दोन तत्त्वांमधील संघर्षात काय निष्पन्न झाले, ते सर्वांनाच ठाऊक आहे. देशाचे विभाजन पत्करावे लागल्यानंतरही, आपल्या नेत्यांची इहवादाच्या मूलभूत तत्त्वावरील श्रद्धा अविचल राहिली. समान नागरिकत्व आणि सर्व धर्मांना स्वातंत्र्य यांची ग्वाही देऊन, आपल्या राज्यघटनेने इहवादाचे मूलभूत तत्त्व आत्मसात केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इहवादावरील आपल्या श्रध्देची अनेक वेळा कसोटी लागली. पाकिस्ताननेही चिथावणी देऊन पाहिले. परंतु वाईट वाटते, ते याचे, की आपल्याच देशातील काही लोकांनी परधर्मीयांवर हल्ले करून या श्रद्धेशी विश्वासघात केला.

स्वतंत्र लोकशाही समाज हाही आपला आणखी एक श्रद्धाविषय आहे. याबाबतीतही दोन धोके संभवतात. आपली गाऱ्हाणी दूर करण्यासाठी हिंसेचा अवलंब करण्याची प्रवृत्ती वाढत आहे, हा एक धोका आहे. आणि लोकसत्ताक संसदीय यंत्रणांवर ज्यांची श्रद्धा नाही, अशा चळवळींच्या आणि विचारसरणींच्या वाढीतून दुसरा धोका जन्माला आलेला आहे. येत्या काही वर्षांमध्ये उत्पन्न होण्याची शक्यता असलेल्या प्रश्नांच्या संदर्भात या दोन्ही धोक्यांकडे गंभीर लक्ष देणे आवश्यक झाले आहे. आर्थिक विकासाची गती वाढविण्यासाठी आणि अर्थरचनेमध्ये मूलगामी परिवर्तन घडवून आणण्यासाठी आपल्याला अधिक परिश्रम आणि त्याग करावा लागणार आहे. समाजाच्या आर्थिक परिवर्तनामुळे आणि आधुनिकीकरणामुळे स्वाभाविकच अनेक स्तरांवर तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. लोकशाही समाजरचनेमध्ये आपण असे गृहीत धरतो, की राजकीय पक्ष आणि कामगार संघटना, किसान संघटना यांसारख्या अन्य संघटना; त्या ज्या समाजगटांचे हितरक्षण करतात, त्याचबरोबर संपूर्ण समाजाच्या हितसंबंधाची आणि आकांक्षाची जपणूक करतील. विचार किंवा हितसंबंध यांत संघर्ष निर्माण झाला, तर त्यात वावगे असे काहीच नाही. परंतु विधिमंडळांमध्ये, सभागृहांमध्ये, सार्वजनिक सभांमध्ये किंवा वृत्तपत्रांमध्ये यासंबंधीची चर्चा होण्याऐवजी, रस्त्यावर हिंसाचाराची भाषा घुमू

लागली, तर स्वतंत्र समाजातील राजकीय यंत्रणांवर भलताच ताण पडेल. हिंसेला हिंसेने उत्तर देण्याच्या प्रवृत्तीमुळे दहशतीचे वातावरण निर्माण होते. असे घडल्याची जगाच्या इतिहासात असंख्य उदाहरणे आहेत. उफाळत्या हिंसाचाराच्या झंझावातातही भारत लोकशाही वाचवायला समर्थ ठरू शकेल, असे मानणे भ्रामक ठरेल.

हिंसाचाराचा केव्हाही बीमोड करता येईल आणि सरकार सध्या ज्या पद्धतीने हिंसाचाराचा बंदोबस्त करीत आहे, त्यापेक्षाही कठोर उपाय सरकारने योजावेत, असे काहीजणांचे म्हणणे आहे. परंतु कायदा आणि सुव्यवस्था यांपुरताच हा प्रश्न मर्यादित नाही. आपल्या राज्यव्यवस्थेच्या पायाशीच तो निगडित आहे. जर आपल्याला द्रुतगतीने आर्थिक विकास साधायचा असेल, तर देशात शांतता नांदणेही तितकेच आवश्यक ठरते. म्हणून द्रुतगती व बहुविध परिवर्तनाच्या काळातील आपल्या जबाबदा-या नीटपणे पार पाडण्याची प्रशासनाला जाणीव करून देणे आणि त्यासाठी त्याला सार्वजनिक शांतता-रक्षणाची सर्व चांगली साधने उपलब्ध करून देणे हे आपले पहिले उद्दिष्ट ठरेल, यासंबंधी राष्ट्रिय सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हे आपले दुसरे उद्दिष्ट असावयास हवे. या प्रक्रियेमध्ये असंख्य अडचणी येतील, याची मला जाणीव आहे. स्वतंत्र समाजामध्ये निषेधाला वा मतभेदाच्या उच्चाराला वाव असलाच पाहिजे. परंतु त्याचबरोबर भारतातील कोट्यवधी गरीब नागरिकांना येत्या काही वर्षांच्या आत आशादायक भवितव्य निर्माण करावयाचे असेल, तर शांतताही तेवढीच आवश्यक आहे.

दुसरा धोका अधिक गंभीर आणि मूलभूत आहे. जेव्हा दंगल उत्स्फूर्तपणे उद्भवते किंवा संतप्त जमावाने हाती घेतलेली नसते, तेव्हा ती अधिकच चिंताजनक बनते. सामाजिक आणि राजकीय बदल घडवून आणण्यासाठी, हिंसाचार हाच एकमेव मार्ग आहे, अशी श्रद्धा बाळगणा-या गटांकडून केली जाणारी हिंसा या प्रकारात येते. संसदीय लोकशाहीचे संपूर्ण उन्मूलन करण्याची भाषा बोलणारे गट, अजून लहान आणि विखुरलेले आहेत, तोवर या दुस-या धोक्याची नीट कल्पना येत नाही. म्हणूनच अनेक ठिकाणी दंगली घडवून आणणा-या अशा या गटांच्या क्षमतेला कमी लेखून चालणार नाही. या बाबतीतील सर्वांत अधिक जबाबदारी, लोकशाही समाजवादावर ज्यांची निष्ठा आहे, अशा राजकीय पक्षांवर येते. अशा तऱ्हेच्या

उठावांचा सरकारने आपल्या लष्करांचा वापर करून बीमोड करावा, असे जर एखादा राजकीय पक्ष मानत असेल, तर तो गंभीर चूक करीत आहे, असेच म्हटले पाहिजे. ज्याप्रमाणे लोकांच्या मनातील जातीयवादी वृत्ती आणि मूल्ये नाहीशी करण्यासाठी निर्धारपूर्वक प्रयत्न करावे लागतील, त्याचप्रमाणे हिंसाचारावर विश्वास ठेवणा-या लोकांच्या कल्पना बदलण्यासाठीही तेवढ्याच निकराचा प्रयत्न केला पाहिजे. कारण एखाद्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठी हिंसाचार आवश्यक आहे, या कल्पनेचा उद्भव प्रथम माणसाच्या मनात होतो. आणि म्हणून माणसाच्या मनातच लोकशाहीचे श्रेष्ठत्व बिंबविण्याचा प्रयत्न व्हावयास हवा.

आपल्या विचारांची आणि कृतींची दिशा कोणती असली पाहिजे, यासंबंधीचे माझे विचार मी येथे मांडले आहेत. लोकशाही समाजवाद आणि धर्मनिरपेक्षवाद या मूल्यांचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी काँग्रेस झुंज देत आहे, असे मी मानतो. सार्वजनिक धोरणासंबंधी जागरूक आणि मोकळी चर्चा होत राहणे हाच ही मूल्ये जतन करण्याचा विश्वसनीय मार्ग आहे. अशा चर्चेमुळे लोकमत घडविता येते आणि त्याचबरोबर सार्वजनिक धोरण लोकांच्या आकांक्षांशी अधिक सुसंवादीही करता येते. राजकारण आणि अर्थकारण यांचा संबंध घनिष्ठ आहे. म्हणून आपल्यापुढील गुंतागुंतीचे आणि अवघड प्रश्न सोडविण्यासाठी आपल्यापाशी परिणामकारक आर्थिक नेतृत्वही हवे. हे प्रश्न हाताळताना हेतुनिष्ठ राजकीय एकजूट आणि सामंजस्य साधता आले, तर आपले कार्य नक्कीच सुकर होईल.

## १३. राजकीय समस्यांचा चक्रव्यूह : शोध, वेध आणि भेद

'केसरी' (१९७०)
दिवाळी अंकातील

मुलाखतीच्या आधारे.

हिंदुस्थानच्या विशिष्ट अनुभवांतून आणि अनुभूतींतून निर्माण झालेला समाजवाद या देशात असावा, असे मला वाटते. मार्क्सच्या संपूर्ण विचारांतून तयार झालेला शास्त्रशुद्ध समाजवाद, म्हणजेच काय तो खरा समाजवाद, असे मी मानीत नाही. मार्क्सला समोर ठेवून समाजवाद प्रस्थापित करू पाहणा-या देशांतूनही भिन्नभिन्न स्थिती दिसते. तिथल्या इतिहासानेही वेगवेगळी वळणे घेत प्रवास केल्याचे दिसून येते. समाजवादाच्या इतिहासाची निर्मिती ही एक लांब पल्ल्याची सफर आहे. इतिहासाचा हा प्रवाह बदलत, वळणे घेतच पुढे जाणार. त्याने एका विशिष्ट मार्गानेच गेले पाहिजे, असा हट्ट बाळगून चालणार नाही आणि म्हणूनच मी म्हणतो, की अनुभव आणि अनुभूती यांतूनच खरा समाजवाद प्रस्थापित होण्याची प्रक्रिया घडू शकते. अगदी शास्त्रशुद्ध समाजवादाचा दावा करणा-या देशांचाही अनुभव हाच आहे. समाजवाद-प्रस्थापनेचा त्यांचा प्रवास चार-पाच तपांचा काळ उलटला, तरी अजून चालूच आहे. आमचा इतिहास वेगळा. आमचा भूगोल वेगळा. म्हणून आमचा प्रयत्नही जरा वेगळा असायला हवा. इथे समाजवादाची रचना अगदी स्वतंत्र पद्धतीने करावयाची आहे. इथल्या समाजवादात ऐतिहासिक परिस्थितीचा संदर्भ असेल, लोकशाहीचे मूल्य हा त्याचा आधार असेल, आणि हरएक व्यक्तिमत्त्वाचा विकास, सर्वांना समान संधी, आर्थिक विषमतेचे उच्चाटन हे सर्व त्यात अभिप्रेत असेल. नव्हे, तसे ते असलेच पाहिजे आणि आहेही. भारतीय समाजवादाचे विश्लेषण वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून आणि दिशेने करता येईल; पण आमचा समाजवाद हा लोकशाही मूल्यांवर आधारित असणे अत्यंत आवश्यक आहे.

लोकशाही आणि हुकूमशाही या विचारांचा उच्चार राजकीय आणि राज्यकारभाराच्या संदर्भात केला जातो. लोकशाही राज्यकारभार करताना लोकांच्या प्रतिनिधींचा विचार घेऊन कारभार केला जातो, हे खरे, पण मर्यादित अर्थाने ती राजकीय स्वरूपाची लोकशाही झाली. समाजाच्या दृष्टीने लोकशाहीची कसोटी अगदी वेगळी आहे.

लोकप्रतिनिधींचा विचार राज्यकारभारासाठी घेतल्यामुळे, त्या कारभारातून लोकांना समाधान मिळेलच, असे नाही. आणि लोकांचे समाधान, ही तर लोकशाहीची खरी कसोटी आहे. लोकशाही मानणारे आणि लोकशाहीनुसार चालणारे सरकार जे काही करील, त्याने लोकांना समाधान दिले पाहिजे. अर्थातच असे समाधान मिळवून द्यावयाचे, तर लोकशाहीचे स्वरूप बदलते राहिले पाहिजे. बदलत्या परिस्थितीनुसार ते बदलले पाहिजे, असे लोकांना वाटते. संसदीय लोकशाही ही एक विशिष्ट पद्धत झाली. पण हे स्वरूपसुद्धा कायम राहील, याची खात्री नसते. म्हणूनच देशाच्या बदलत्या परिस्थितीमध्ये, त्या त्या काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी, लोकशाहीचे प्रातिनिधिक स्वरूप कायम ठेवण्यासाठी व भावी पिढ्यांच्या आकांक्षा साकार करण्यासाठी, राजकीय स्वरूपाच्या लोकशाहीला सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची सोबत आवश्यक ठरते.

समाजवादाला लोकशाही मूल्यांचा आधार असला पाहिजे, याचा अर्थच असा, की राजकीय क्षेत्राप्रमाणे सामाजिक व आर्थिक क्षेत्रांतही सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे. आणि इथेच नियोजनाचे महत्त्व ध्यानात येते. नियोजन हेसुद्धा लोकशाही तत्त्वांशीच सुसंगत असले पाहिजे. अखेर नियोजन म्हणजे तरी काय? देशातल्या साधन-संपत्तीचा विकास करून देशाच्या जीवनात समृद्धी आणणे हा नियोजनाचा हेतू झाला. परंतु नियोजनाच्या प्रयत्नांतून जी संपत्ती निर्माण होईल, जे सामर्थ्य प्राप्त होईल, त्याचा फायदा सामान्यांतल्या सामान्य माणसालाही मिळवून देणे, हा दुसरा आणि सर्वांत महत्त्वाचा हेतू होय. खरे नियोजन तेच. देशामध्ये जो बदल घडत जातो, तो बदल आणि जीवनाचे सातत्य या प्रक्रियेमध्ये समतोल राखून, देशाचे ऐक्य, स्थैर्य आणि सामर्थ्य यांची जोपासना करणे, हेच नियोजनात अभिप्रेत आहे. केवळ धाडसी निर्णय घेऊन यापुढे चालणार नाही. सामान्यांच्या पदरात नियोजनाचे  फळ किती पडते, ही कसोटीही अशा निर्णयातून लागली जाणार आहे.

सत्तासंघर्षात अडकून पडलेला पक्ष हे काँग्रेस संघटनेला प्राप्त झालेले स्वरूप बदलून स्वातंत्र्य-लढ्याचे वेळी सामान्य माणसांची संघटना म्हणून ओळखले जाणारे स्वरूप

त्याला प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करताना नव्या काँग्रेसने कशा पद्धतीने काम करावे, याचा काही आराखडाही आपण तयार करावयास पाहिजे. कारण आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे एक महत्त्वाचे कार्य या संघटनेला यापुढे करावयाचे आहे. काँग्रेसला अलीकडे प्राप्त झालेले जे भोंगळ स्वरूप आहे, ते टाकून निश्चित विचार आणि निश्चित कार्यक्रम यांना बांधलेली संघटना उभी केल्याशिवाय हे कार्य घडणार नाही.

तरुण पिढीमध्ये आज कमालीचे वैफल्य वाढल्याचे आढळून येते. देशातील हिंसात्मक प्रकार हे या वैफल्याचे प्रतीक आहे. लाखो तरुणांना कामधंदा देण्यात जी असमर्थता निर्माण झाली आहे, तीमुळे लक्षावधी तरुण आपल्या जीवनाच्या मूलभूत गरजाही आज भागवू शकत नाहीत. त्यामुळे बेकारांना कामधंदा देणे, ही आजची तातडीची गरज आहे. अग्रक्रमानेच हे करावे लागेल.
कृषि-औद्योगिक धंद्यांची वाढ आणि छोट्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांना उत्तेजन हेच या बेकारीवर त्यांच्या मताने प्रभावी इलाज आहेत. प्रत्येक कुटुंबातल्या निदान एका माणसाला तरी काम देण्याची जबाबदारी यापुढच्या काळात शासनाला पार पाडावी लागणार आहे.

समाजाच्या मूलभूत प्रश्नांशी हे सर्व प्रश्न निगडित आहेत. येत्या पाच-दहा वर्षांच्या काळात वेगाने विकास साध्य करावयाचा असेल, तर सर्वच क्षेत्रांत शांतता ही आवश्यक आहे. देशात लक्षावधी तरुण बेकार अवस्थेत ठेवून किंवा अन्य सामाजिक प्रश्न अनिर्णीत ठेवून शांततेची अपेक्षा कोणाला करता येणार नाही, हे जरी खरे असले, तरी देशातील करोडो लोकांच्या आशा-आकांक्षा साकार व्हावयाच्या, तर देशात शांततेचे वातावरण असल्याशिवाय ते शक्य होणार नाही, हेही तितकेच खरे.

म्हणून कुटुंबातल्या एका व्यक्तीला तरी काम मिळण्याने विकासाला आवश्यक असलेली शांतता उपलब्ध होण्यास मदत होईल का, या दृष्टीने विचार सुरू झाला आहे. बेकारी आणि वैफल्यामुळे हिंसेला प्रोत्साहन मिळते आणि त्यामुळे लोकशाहीच

संकटात सापडण्याचा धोका निर्माण होऊ लागतो. अशा वेळी हिंसा निपटून काढावी, नेस्तनाबूत करावी, असेही सांगितले जाते. पण दंडूकशाही मार्गाने हिंसा निपटून काढण्याचे मूळ प्रश्नांचे गांभीर्य कमी होत नाही. उलट वाढतच राहते. यासाठी समाजाच्या मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी, आर्थिक व सामाजिक विकासाच्या निश्चित कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे, देशाची राष्ट्रिय संपत्ती वाढवून संपत्ती व उत्पन्न यांच्यांत समता प्रस्थापित करणे आणि झालेल्या विकासाचा लाभ देशातील तरुणांनाही वाटला जात आहे, हे दाखवून देणे, अशी महत्त्वाची कार्ये आपल्याला शक्य करून दाखवावी लागतील.

निश्चित कार्यक्रमाचे बोट धरून वाटचाल सुरू केली, तर जनता त्या कार्यक्रमाबरोबर चालत राहते, नव्या उत्साहाने वाटचाल करते, असा बँकांच्या राष्ट्रियीकरणानंतरचा अनुभव आहे. बँकांच्या राष्ट्रियीकरणामुळे आकाश कोसळेल, अशी भीती प्रतिगामी मंडळींनी व्यक्त केली, अजूनही तशी ते करीत आहेतच. पण आकाश कोसळलेच असेल, तर ते फक्त बड्या भांडवलदारांवर ! कारण बँकांचे अधिकारी आता या नव्या बदलानंतर, बड्या भांडवलदारांच्या महालातून बाहेर पडून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांशीही बोलू लागले आहेत. बँकांचा पैसा हा उत्पादन करणाऱ्यांसाठी खुला असला पाहिजे. आजपर्यंत तसा तो होता, पण फक्त बड्यांसाठी. देशाचे सुमारे पन्नास टक्के उत्पादन हे शेतीचे, पण त्या उत्पादकाला बँकेची ओळख नव्हती. बँकाही त्याला ओळखत नव्हत्या. बँकांचे राष्ट्रियीकरण झाले आणि शेतकरीही मडक्याच्या उतरंडीतला पैसा बँकेत जमा करू लागला आहे. या प्रक्रियेला फार मोठा अर्थ आहे. कोट्यवधींची संपत्ती अशा रीतीने बँकेत जमा होत राहणे याला अर्थशास्त्राच्या दृष्टीनेही बरेच मोल आहे.

बँकेची गरज खेडुतांनाही उमजणे फार महत्त्वाचे आहे. बँक कर्ज देते, पण हा कर्जदाता वेगळा आहे, याची एक नवी प्रचीती येण्याने त्यांच्या जीवनाचे स्वरूपच बदलणार आहे. कारण आत्तापर्यंत जो जो धनिक खेड्यात पोहोचला, तो खेडुतांना लुटण्यासाठीच. तो सावकार असो अथवा व्यापारी. शेतक-याचे हित पाहणारा तिथे कोणी पोहोचलाच नाही. बँकांच्या रूपाने खेड्यात हा वेगळा कर्जदाता पोहोचला

असल्याने केवळ शेतीचे नव्हे, तर शेतीचे जोडधंदेही आता भांडवलाअभावी अडून राहणार नाहीत. कृषि-औद्योगिक क्रांतीची व त्याद्वारे बेकारी कमी होण्याची बीजे या निर्णयात आहेत.

नव्या काँग्रेसने ही स्थिती बदलायचे ठरवले आणि बँकांच्या राष्ट्रियीकरणाचा निर्णय करून त्याची अंमलबजावणी सुरू केली. कोणाला हे 'राजकारण' वाटते. पण माझे स्पष्ट मत आहे, की देशाचे राजकारण आणि अर्थकारण याचे संबंध अतिशय घनिष्ट असतात. राष्ट्रिय हिताचा विचार करता, राजकारण, अर्थकारण आणि समाजकारण हे अलग अलग असूच शकत नाहीत, ते एकमेव व एकसंध असले पाहिजेत. या तिन्हींना अलग अलग करायचे आणि मग प्रत्येकाची स्वतंत्र लांडगेतोड करायची, ही राजकारणी हिकमत झाली. या तिन्हींचा अलग अलग विचार करण्यात कदाचित राजकारण्यांचे हित असेल, पण देशाचे हित नाही, जनतेचे नाही. देशासमोर अनेकविध समस्या आहेत, त्या सोडवायच्या झाल्या, तर राजकारण आणि अर्थकारण यांचा विचारप्रवाह मिळता-जुळता असला पाहिजे. संघटित राजकीय सामर्थ्य आणि प्रभावी आर्थिक नेतृत्व यांमुळेच आपले बरेचसे प्रश्न सुटणार आहेत.

लोकशाही-रक्षणाच्या आव्हानाबाबतही आपल्याला विचार करावयास हवा. लोकशाही मार्गावर विश्वासच नसलेला एक गट, तर दुसरा एक गट असा आहे, की गाऱ्हाणी पुढे करायची आणि ती नाहीशी करण्याच्या मागणीसाठी हिंसेचे मार्ग धरायचे. लोकांना आपली गाऱ्हाणी मांडण्याबद्दल किंवा त्यांचा आग्रह धरण्याबद्दल कुणाचाही विरोध असायचे कारण नाही. पण हिंसेचा मार्ग पत्करून लोकशाहीला धोका उत्पन्न होऊ द्यावयाचा, याचा विचार आपणच करावयास हवा आहे. लोकशाही समाजात प्रतिकार हा आवश्यक आहे. किंबहुना लोकशाहीचे ते एक पवित्र अंग मानले गेले आहे; पण प्रतिकार, असंतोष हे व्यक्त करण्याचे काही लोकशाही संकेत असावेत, की नाही? ते असले पाहिजेत, असे मला वाटते. हिंसात्मक मार्गानेच समाजाचे स्थित्यंतर होईल वा परिवर्तन होईल, अशी श्रद्धा बाळगून राजकीय गट वावरू लागले, तर देशाला तो एक मोठा धोका आहे. कदाचित हा धोका आज लहान

प्रमाणात असेल. पण तो उपेक्षिण्यासारखा मात्र नाही. या बाबतीत खरे म्हणजे लोकशाही समाजवादाला बांधून घेतलेल्या राजकीय पक्षांनीच आपली जबाबदारी ओळखायला हवी. देशातील वातावरणात लोकशाही मार्गानेच बदल घडू शकतो किंवा समाज गतिमान होऊ शकतो.  म्हणून लोकशाही मार्ग हा हिंसात्मक मार्गापेक्षा श्रेष्ठ आणि हिताचा मार्ग आहे, हे नव्या काँग्रेसला दाखवून द्यावे लागेल. त्याचसाठी निश्चित विचार आणि निश्चित कार्यक्रम यांवर ही काँग्रेस स्थिर होत आहे, ही समाधानाची बाब आहे.

या काँग्रेसला राजकीय कारणासाठीही देशातील लोकमत जागृत करावे लागणार आहे. पुढील दशक हे देशाच्या जीवनातील निर्णायक दशक ठरणार आहे. शांतता टिकून विकासाचा वेग वाढेल आणि लोकांच्या विकासाबद्दलच्या आशाआकांक्षा लक्षात घेऊन कारभारयंत्रणा लोकाभिमुख बनेल, हे पाहिले पाहिजे. देशाची आजची स्थिती ही गेल्या वीस वर्षांतील धोरणातून निर्माण झालेली आहे, हे नाकारून चालणार नाही. यामध्ये बदल करणे आवश्यक ठरले आहे. कारण सामाजिक आणि आर्थिक विकासात नित्य नवे तणाव तयार होत आहेत. राष्ट्रउभारणीच्या कार्यात जातीयवादाचा अडसर उभा आहे. हे जातीयवादी अडसर मधून मधून हिंसात्मक संघर्ष उभे करीत आहेत. राष्ट्राचा पाया, नागरिकत्व, समान हक्क आणि समान कर्तव्य ही देशातील जनतेला पटवून द्यावी लागणार आहेत. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळातच वस्तुत: ही भूमिका आपण मान्य केलेली आहे. परंतु पुन्हा एकदा लोकांना सांगावे लागणार आहे. लोकशाही, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी नवी काँग्रेस लोकांना बरोबर घेऊन, लोकांच्या बरोबर राहून जास्तींत जास्त प्रयत्न करील, अशी माझी श्रद्धा आहे.

## १४. आमचा आर्थिक पवित्रा

'केसरी' (१९७१)
दिवाळी अंकातील
मुलाखतीच्या आधारे.

आर्थिक विकासामागे सामाजिक शक्ती काम करीत असतात, त्याचप्रमाणे राजकीय प्रश्नही त्यांमध्ये मिसळलेले असतात. त्यामुळे आर्थिक विकास, म्हणजे केवळ आर्थिक विकासाच्या तंत्राचा अभ्यास करणे नव्हे. सामाजिक, राजकीय व आर्थिक अशा सर्वांगीण भूमिकेवरून या प्रश्नाचा विचार करणे आवश्यक होय. अनेक वेळा या महत्त्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष झाल्याने आर्थिक विकासाच्या प्रश्नाचा आपल्याकडे समाधानकारक अभ्यास होताना आढळत नाही.

शेकडो सुशिक्षित बेकारांना पुढील वर्षांत कामधंदा उपलब्ध करून द्यावा लागणार आहे. तरुणांपुढे विधायक कार्यक्रम ठेवण्याची आणि त्यांनीही देशाच्या पुनर्रचनेच्या कार्यात सक्रिय भाग आवडीने घ्यावा, यासाठी स्फूर्तिदायी, पण प्रत्यक्ष लाभदायी, अशी उद्दिष्टे त्यांच्यापुढे ठेवण्याचीही आवश्यकता निर्माण झाली आहे. मूलभूत राजकारण, सामाजिक व आर्थिक विचारसरणींतील मौलिक आशय यांपासून तरुणांना किंवा तरुण विद्यार्थ्यांना वंचित करता येणार नाही. तरुणांविना देशाला उज्ज्वल भवितव्य नाही, याची दखल सत्ताधारी राजकीय पक्षालाही घ्यावी लागेल.
स्वातंत्र्योत्तर काळातील पिढी आता ऐन जवानीत आणि उमेदीत आहे.
स्वातंत्र्यासाठी लढलेल्या पिढीबद्दल त्यांच्या मनात आदराची भावना असेलही, पण हे स्वातंत्र्य दृढमूल करण्यासाठी आणि येणा-या नव्या आव्हानांचा स्वीकार करून त्यांच्यविरुद्ध मुकाबला करण्यासाठी, तरुण पिढीला कर्तव्याची जाणीव घ्यावीच लागेल. हे करावयाचे, तर सुशिक्षित बेकारांप्रमाणेच अशिक्षित अशा लाखो लोकांना जीवनांचे साधन उपलब्ध करून देऊन, त्यांना निराशेच्या गर्तेतून बाहेर काढावे लागणार आहे. ज्यांना दिवसभर पुरेसे काम नाही, अशा अर्धवेळ काम करणा-या लोकांच्या अतिशय गुंतागुंतीच्या प्रश्नाशीही मुकाबला करावयाचा आहे. या प्रश्नांचा

विचार मी जेव्हा गंभीरपणे करतो, तेव्हा या लोकांना कामधंदा मिळवून देण्याचे सूत्र आपल्या आर्थिक विकासाच्या सूत्रांतील महत्त्वाचे सूत्र असले पाहिजे, या निर्णयाप्रत येऊन ठेपतो. अर्थात हा प्रश्न जितका गंभीर, तितकाच अवघडही आहे, हेही मला मान्य आहे. तरीसुद्धा हा प्रश्न सोडवावयाचा, तर छोट्या छोट्या उद्योगधंद्यांच्या वाढीवर अधिक भर द्यावा लागणार आहे. त्याचप्रमाणे शेतीला पूरक अशा उद्योगधंद्यांची वाढ कशी होईल, याचीही काळजी घ्यावी लागेल. खेड्यापाड्यांतील अगदी लहान प्रमाणावरील उद्योगधंद्याच्या वाढीचा विचारही यामध्ये अनुस्यूत आहे. खेड्यात किंवा एकूण ग्रामीण भागातच जो कसबी(आर्टिझान) वर्ग आहे, त्यांना पुरेसे उद्योग उपलब्ध करून देणे, हा 'गरिबी हटाव' या प्रयत्नांतील फार मोठा जोखमीचा भाग ठरेल.

बेकारांची संख्या कमी करावयाची, तर या प्रश्नाच्या संदर्भात शिक्षणाच्या पुनर्रचनेचा प्रश्नही विचारात घ्यावा लागेल. सध्याच्या शिक्षणव्यवस्थेतून सुशिक्षित बेकारांची संख्याच केवळ वाढत असेल, तर आणि पुढेही वाढणार असेल, तर प्रचलित शिक्षणव्यवस्थेत बदल करणे अपरिहार्य ठरते. हा बदल कसा करावा, हा एक वेगळा अभ्यासाचा विषय आहे. पण अधिकाधिक लोकांना कामधंदा देऊ शकेल, असे शिक्षण कसे द्यावयाचे, याचा राष्ट्राला विचार करावाच लागेल. भारत सरकारला या प्रश्नाची तीव्रता आज प्रकर्षाने जाणवत आहे. १९७१च्या अखेरपर्यंत पाच लक्ष लोकांना कामधंदा देण्याचा निर्णय सरकारने केलेला आहे. पण एकूण बेकारांची प्रचंड संख्या ध्यानी घेता, यापुढील फार मोठ्या उपक्रमाचा हा एक लहानसा प्रारंभ आहे, एवढेच म्हणता येईल.

बेकारी कमी करण्याच्या उपक्रमातील एक लहानसा टप्पा म्हणून हा प्रारंभ झाला असला, तरी सामान्य माणसाच्या ज्या आशा-आकांक्षा-अपेक्षा आहेत, त्यांची यथायोग्य दखल घेण्याचे काम एवढ्याने पुरे होत नाही. सामाजिक विषमतेच्या दृष्टिकोणातूनही त्यांची दखल घ्यावीच लागणार आहे. गेल्या काही वर्षांतील स्थितीचा अभ्यास केल्यानंतर असे आढळून येते, की उत्पन्नांतील दरी ही वाढत

चालली आहे. ज्यांच्याजवळ संपत्ती होती, जमीन होती किंवा आहे, त्यांना सुरुवातीच्या काळात अधिक फायदा मिळणे व त्यांची संपत्ती वाढत जाणे काही प्रमाणात अटळ होते, हे नाकारण्यात हशील नाही. पण त्यातून जी परिस्थिती निर्माण झाली आहे व होत आहे, त्याबाबतीत आत्मसंतुष्टतेची भूमिका मात्र घेता येणारी नाही. समाजातील वेगवेगळ्या घटकांतील उत्पन्न व संपत्ती यांच्यातील तफावत कमी करणे, हा ही परिस्थिती पालटण्याचा मार्ग आहे. देशासमोर पुढची काही वर्षे तरी हे एक मोठे प्रश्नचिन्ह सतावत राहणार आहे. ही तफावत कमी करताना या बाबतीत अर्थातच, कोणीही ठोकळेबाज किंवा सैद्धांतिक भूमिका न घेता, अधिक वास्तववादी भूमिका तर घ्यावी लागेलच; पण त्याचबरोबर सामान्य माणसांच्या जीवनातील वाढत्या आशाआकांक्षा व अपेक्षांची प्रामुख्याने दखल घ्यावी लागणार आहे. आज दिसते, ते असे की समाजात एका बाजूला समृद्धीची, ऐश्वर्याची, वैभवाची क्षेत्रे आणि शिखरे निर्माण झाली आहेत, तर, दुस-या बाजूला दैन्याचे आणि गरिबीचे विदारक दृश्य दिसते आहे. त्यामुळे निर्धन बहुजन समाज, लहान लहान शेतकरी, औद्योगिक क्षेत्रातील कामगार वर्ग आणि देशातील मध्यमवर्गीय तरुण यांच्या महत्त्वाकांक्षेशी आपण तादात्म्य साधणार आहोत का? आणि त्या दृष्टिकोणातून कार्यक्रमाची आखणी करणार आहोत का? किंवा त्याचा विचार तरी करणार आहोत, की नाही? हे खरे आपल्यापुढील महत्त्वाचे प्रश्न आहेत. जनतेशी तादात्म्य साधण्याच्या मूलभूत नियमांचा आश्रय घेऊन आणि बहुजन समाजाच्या उपजीविकेचा आधार पुनरुज्जीवित करूनच देशाला समृद्धीचे दिवस आणता येणार आहेत, याबद्दल आता शंका बाळगण्याचे दिवस संपले आहेत. कारण, याच जाणिवेच्या आधाराने स्वातंत्र्य-संपादनाचे यश आपण प्राप्त कले आहे, हे दुर्लक्षिता येणार नाही. देशाच्या पुनर्रचनेसाठी जे जे काही करावयाचे, त्यामध्ये आता सर्व वर्गाला, सर्व थरांना, भाग घेण्याची संधी उपलब्ध करून घ्यावी लागणार आहे. एका बाजूला श्रीमंती आणि दुस-या बाजूला कमालीचे दैन्य अशी स्थिती समाजात निर्माण होणे केव्हाही इष्ट नाही. उत्पन्न आणि संपत्ती यांच्यातील ही विषमता केवळ शहरांतच आहे, असे नाही. अलीकडे खेड्यांतही त्याचा प्रत्यय येऊ लागला आहे. हरित-क्रांतीमुळे ही प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरू झालेली आहे. आणि त्यातून

काही गुंतागुंतीचे सामाजिक आणि राजकीय प्रश्नही निर्माण होऊ लागले आहेत. ही स्थिती केवळ भारतातच आहे, असे नाही. मोठ्या प्रमाणात उद्योगीकरण झालेल्या युरोपातील काही राष्ट्रांमधील स्थिती पाहिली, तर तेथेही याचा प्रत्यय येतो. यावरून आर्थिक विकास हा केवळ आर्थिक प्रश्न म्हणून न अभ्यासता त्याचे सामाजिक आणि राजकीय परिणामही विचारात घेण्याची नितांत गरज निर्माण होते. समाजात आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत एक घटक समृद्धीकडे जात आहे व दुसरा दारिद्र्याच्या दिशेने वाटचाल करतो आहे, ही स्थिती घातक ठरेल. मला वाटते, या संदर्भातच आपल्या देशातील हरित-क्रांती, औद्योगिक क्रांती आणि नागरीकरण या प्रश्नांचा खोलवर अभ्यास केला पाहिजे आणि निर्माण झालेल्या व भावी काळात निर्माण होणा-या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत.

हरित-क्रांतीचा विचार करताना खेड्यातील श्रीमंत शेतकरी व गरीब शेतकरी यांच्यातील वाढत्या विषमतेचा विचार हा आवश्यकच ठरतो. आणि असा एकदा विचार करू लागलो, म्हणजे मग जमीनसुधारणा व जमिनीवरील कमाल मर्यादा यांचाही विचार ओघानेच पुढे येतो. आज खेड्यांत लक्षावधी भूमिहीन आहेत. शेतमजूर आहेत. कारागीर आहेत. ते रोजगारासाठी, उद्योगांसाठी आणि जमिनीसाठी भुकेलेले आहेत. त्यांच्याकडे लक्ष द्यावेच लागेल. अर्थात यासंबंधी निर्णय करताना जमिनीमधून अधिकाधिक उत्पादन कसे निघेल, शेतीसाठी आधुनिक तंत्राचा वापर कसा करता येईल, याचाही विचार करावाच लागेल. खेड्यांतून गेल्या काही वर्षांत ज्या विकासाच्या योजना राबवल्या गेल्या, त्यांचा खरा फायदा सधन शेतकऱ्यांच्याच पदरात पडला. छोटे शेतकरी आणि शेतमजूर हा वर्ग जवळजवळ उपेक्षितच राहिला. अवतीभवती हरित-क्रांती होत आहे, काही शेतकऱ्यांना विकास योजनांचा फायदा मिळून त्यांचे उत्पन्न वाढत आहे, ते संपत्तिमान बनत आहेत. पण या वाढत्या समृद्धीचा फायदा आपल्याला काहीही मिळत नाही, ही भावना छोटा शेतकरी आणि शेतमजूर यांच्यांत निर्माण झाली आणि ती वाढतच राहिली, तर त्यांच्यात वैफल्य वाढेल. दुर्दैवाने छोट्या शेतकऱ्यांच्या वाट्यास आत्तापर्यंत उपेक्षा आणि वैफल्यच आले. खेड्यातील अर्थव्यवस्थेतील हे दोष वेळीच

दूर करावे लागतील. एरवी पुढच्या काही वर्षांत विषमता ही अशीच वाढत राहील, प्रसंगी ती धारदार बनेल आणि त्यातून मग स्फोटक परिस्थिती निर्माण होईल. अलीकडे काही राज्यांतून अशा स्फोटक परिस्थितीच्या घटना घडल्या आहेत. म्हणूनच जमीनसुधारणा व जमिनीवरील कमाल मर्यादा यांचा विचार क्रमप्राप्त ठरतो.

अर्थात हा विचार करताना, आपल्या देशात जमीनधारणेबाबत कमाल मर्यादा अमुकच असावी, असे ठाशीव मत सैद्धांतिक दृष्टिकोणातून मांडता येणार नाही. भारतातील निरनिराळ्या राज्यांत जमिनीची स्थिती वेगवेगळी आहे. जमिनीचा कसही वेगवेगळ्या प्रकारचा आहे. पण म्हणून जमिनीवरील कमाल धारणेचा मूलगामी विचार बाजूला टाकून चालणार नाही. उलटपक्षी, हा विचार अधिक गंभीरपणानेच केला पाहिजे. मला वाटते, कुटुंब हाच घटक धरून याचा विचार करणे श्रेयस्कर ठरेल. ग्रामीण भागांतून फिरताना तेथील लोकांमध्ये जो एक प्रकारचा असंतोष आढळतो, तो का? या प्रश्नाचा शोध घेताना असे आढळते, की खेडेगावांतील जीवनात निरनिराळ्या वर्गांच्या परस्पर आर्थिक संबंधांत पुरेसे रचनात्मक बदल घडविले गेलेले नाहीत. आपण समाजवादाची भाषा केली, म्हणजे कर्तव्य संपले, असे नव्हे. राष्ट्रियीकरण अथवा समाजीकरण एवढेच केवळ समाजवादाचे मूलभूत उद्दिष्ट आहे, असे म्हणता यावयाचे नाही. भूमिहीन, श्रमिक, मागासलेले यांच्या प्रश्नांची उकलही त्यामध्ये अभिप्रेत आहे. त्यासाठी समाजाच्या या मूलभूत आर्थिक उणिवांची कोंडी फोडावी लागेल.

हे झाले ग्रामीण भागाचे. पण ग्रामीण भागाप्रमाणेच शहरांतही हा श्रीमंती व गरिबीतला फरक उग्र रूप धारण करीत आहे. त्याकडेही तितक्याच गंभीरपणे लक्ष द्यावे लागणार आहे. समाजातील मूठभर श्रीमंत हे आज आपल्या श्रीमंतीचे असंस्कृत प्रदर्शन करीत असल्याचे दिसून येते. हे असंस्कृत प्रदर्शन अनिष्टच म्हटले पाहिजे. शहरांतील मालमत्तेवर मर्यादा घालावी लागणार आहे, ती यासाठीच. मालमत्तेवरील कमाल मर्यादेच्या तपशिलासंबंधी काही मतभेद असू शकतील,

त्याचप्रमाणे कोणत्या पद्धतीने उद्दिष्ट साध्य करावयाचे, याबद्दलही मतभिन्नता असेल. पण या तत्त्वांची अंमलबजावणी त्वरित झाली पाहिजे, यात मतभेदाला जागा नाही. यापुढच्या काळात या प्रश्नाची सोडवणूक करावीच लागणार आहे.

समाजातील मूलगामी अशा आणखी एका प्रश्नाचा विचार समोर येतो, तो महागाईचा-भाववाढीचा. किमती स्थिर करण्याच्या समस्येचा विचार आज जगातील अनेक राष्ट्राराष्ट्रांतून सुरू झालेला आहे. महागाईचा प्रश्न हा केवळ भारतासमोरच आहे, असे नव्हे. पुढारलेल्या औद्योगिक राष्ट्रांतही हा प्रश्न डोके वर काढीत आहे. आणि त्यामुळे त्यांनाही भडकलेल्या किमती स्थिर कशा ठेवावयाच्या, याचा विचार करण्यावाचून गत्यंतर उरलेले नाही. तथापि त्यांच्याकडील महागाईचे स्वरूप आणि आपल्याकडील स्वरूप यांत काही निश्चित फरक आहे. तिकडील महागाई ही जीवनावश्यक वस्तूंच्या कमतरतेतून निर्माण झालेली नाही, तर ती समाजातील वेगवेगळ्या घटकांमध्ये जीवनमान उंचावण्यासाठी जो संघर्ष चालू आहे, त्यातून निर्माण झाली आहे, असे आढळते. कामगार वर्गाचा पगार वाढत आहे. पण प्रमाणात उत्पादनवाढ होत नाही. म्हणूनच त्यांचा महागाईचा प्रश्न निर्माण होत आहे. परंतु त्याचबरोबर समाजातील संपत्तीची योग्य प्रमाणात जाणीवपूर्वक विभागणी हीही पुढारलेल्या राष्ट्रांतील एक महत्त्वाची समस्या बनली आहे. महागाईचा प्रश्न त्यातूनही उद्भवत आहे.

अर्थात या प्रश्नाचा विचार भारताच्या संदर्भात करताना आपल्याला केवळ वस्तूंच्या किंमती, पगार व उत्पन्न एवढ्याचाच विचार करून भागणार नाही. त्यापलीकडे जाऊन समाजातील मूलभूत अशा सामाजिक व आर्थिक प्रश्नांचाच विचार करावा लागणार असून जातिव्यवस्था, मालमत्तेवरील कमाल मर्यादा, संपत्तीच्या वारसाहक्काच्या कायद्यात बदल, व्यापार-उदीमामध्ये राज्यसरकारने उचलावयाचा वाटा इत्यादी अनेक प्रश्नांचा साकल्याने विचार व्हावा लागणार आहे. त्यामुळे महागाई किंवा भाववाढ रोखण्याच्या तात्कालिक उपायांपेक्षा दूरगामी प्रश्न डोळ्यांसमोर ठेवून या समस्येचा आपल्याला विचार करावा लागेल.

देशातील गरीब माणसांचे जीवनमान उंचाविण्यासाठी उत्पादनवाढ व राष्ट्रिय संपत्तीचा विकास यांवरच सतत भर द्यावा लागणार असल्याने, पुढच्या काही वर्षांतील औद्योगिक धोरण ठरविताना इतर मूलभूत प्रश्नही हाताळावे लागणार आहेत. 'गरिबी हटाव'ची घोषणा झाली. पण या कार्यक्रमात यशस्वी व्हावयाचे असेल, तर त्यासाठी राष्ट्रिय संपत्तीची वाढ करावी लागणार आहे, त्याचे काय? राष्ट्रिय संपत्ती न वाढविता केवळ संपत्तीच्या विभाजनाची चर्चा करीत राहणे व्यर्थ आहे. अर्थातच राष्ट्रिय संपत्ती वाढवत असताना काम, बचत, किंवा भांडवलसंचय आणि भांडवल-गुंतवणूक याला चालना मिळेल, अशी प्रेरक शक्ती निर्माण करण्याची गरज आहे. श्रीमंत व सुखवस्तू लोकांना अशा शक्ती देण्याचे फारसे कारण नाही. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रामध्ये नियोजनाची प्रक्रिया अनेक वर्षे चालू राहणार आहे. त्यामुळे लक्षावधी गरीब लोकांना अधिक काम करण्यास भांडवलसंचय करण्यास व अधिक गुंतवणूक करण्यास कोणत्या प्रेरणा उपयोगी पडतील, याचीच अधिक पोटतिडकीने आखणी करावी लागेल. किंबहुना भांडवलउभारणी हा पुढील काही वर्षे आपल्या आर्थिक धोरणाचा एक महत्त्वाचा भाग राहणार आहे. विषमता वाढत गेली, तर प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा होत राहणार असल्याने, समाजातील वेगवेगळ्या घटनांना योग्य स्वरूपाच्या प्रेरणा कशा द्याव्यात, हा विचार प्रमुख ठरतो. यामध्ये मध्यम वर्गाला डावलून मुळीच चालणार नाही. केवळ वरिष्ठ वर्ग आणि कनिष्ठ वर्ग यांनी कितीही त्याग केले, तरी कमी उत्पन्न, कमी बचत, कमी भांडवल-गुंतवणूक व कमी उत्पादनक्षमता या वर्तुळातून आपल्याला बाहेर पडता येणार नाही. आवश्यक त्या प्रेरणा म्हणूनच सर्वांसाठी खुल्या असल्या पाहिजेत.

आर्थिक विकासाचा काही तात्कालिक व दूरगामी स्वरूपाचा विचार करीत असताना, या आर्थिक विकासातून समाजातील लोकशाही शक्ती बलशाली कशा होतील, याचेही भान राखावे लागणार आहे. भारतीय राज्यघटनेत लोकशाही सारखी मूलगामी स्वरूपाची मूल्ये आपण स्वीकारली आहेत. आर्थिक विकासातून ही मूल्ये अधिक सामर्थ्य संपन्न होतील, याचा प्रयत्न झाला, तरच आर्थिक विकासाला काही

अर्थवत्ता प्राप्त होईल. तो प्रश्न अर्थपूर्ण होईल. भारतातील लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही. ही लोकशाही देशातील गरिबी हटवण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे येथील प्रश्न हा केवळ आर्थिक विकासाचा प्रश्न नव्हे. लोकशाही मूल्ये टिकविण्याचाही हा प्रश्न आहे.

पुढल्या काळातील आव्हाने स्वीकारताना हे सर्व संदर्भ ध्यानी घ्यावे लागतीलच. पण त्याचबरोबर आर्थिक विकासाच्या या कार्यात करोडो लोकांचा सहभाग निर्माण करावा लागणार आहे. कारण या करोडो हातांच्या परिश्रमातून, त्यागातून आणि सहकार्यातून देशाची गरिबी हटवता येणार आहे. दारिद्रयाविरुद्धची लढाई जिंकायची आहे. करोडो लोकांनी एकजुटीने आणि जिद्दीने दिलेल्या लढ्यामुळेच स्वातंत्र्य मिळविणे शक्य झाले आहे. दारिद्र्याविरुद्धचा लढाही असाच राष्ट्रिय दृष्टिकोणातून व प्रदीर्घ परिश्रम करून आणि वर्षानुवर्ष संघटित प्रयत्न करूनच सोडवायचा आहे. किंबहुना आपला आर्थिक पवित्रा अणि आवाज असाच राहिला, तरच त्याला अपेक्षित यश मिळणार आहे. आर्थिक विकासाची सुनिश्चित अभिवचने देऊन त्यांसाठी सर्वांनी जनसेवेला वाहून घेतले आणि तदनुषंगाने राजकारणाचा विचार आणि आचार करू लागलो, तर हा देश व लोकशाही समाजवाद स्वत:चे संरक्षण स्वत:च करील आणि कालांतराने सामाजिक समस्यांच्या सोडवणुकीच्या दिशेने आपल्या या कृतींचा अनुकूल परिणाम घडल्याचे अनुभवास येईल.

आर्थिक समस्यांना एक राजकीय अंग असते. सुराज्याची घोषणा आपण करतो, पण त्या सुराज्याची प्रचीती सर्वसामान्य जनतेला येणे महत्त्वाचे असते. परिस्थितीत योग्य ते फेरबदल घडून आपल्या समस्या सुटत असल्याची जाणीव लोकांना होणे ही आजची प्रमुख गरज मानली पाहिजे. राज्य करावयाचे, ते निर्जीव वस्तूंवर नव्हे. शासनकर्ते बनून गतिमान आर्थिक परिस्थितीशी झुंज द्यावयाची, ती सजीवांसाठी! संख्याशास्त्रीय आकडेमोड करीत राहणे, भांडवल-गुंतवणुकीत अधिक महत्त्वाच्या बाबींना अग्रहक्क देणे, विकासाची गती निश्चित करणे हा झाला त्यातला एक

तांत्रिक भाग. दुसरा महत्त्वाचा भाग असा, की आर्थिक समस्यांचे सामाजिक दृष्टिकोणातून सर्वांगीण परीक्षण करणे आणि त्यांतल्या आधी कोणत्या सोडवायच्या, हे निश्चित करणे. पहिला भाग यथाक्रम घडत राहतो. पण महत्त्वाच्या दुस-या भागावर लक्ष ठेवणे अगत्याचे आहे. आमचा आर्थिक पवित्रा वा आवाज या रोखाने आणि त्याच्या पूर्ततेसाठी असायला हवा.

## १५. नाणे-सुधारणा आणि विकसनशील देश

'कमिटी ऑफ ट्वेंटी'च्या तिस-या बैठकीपुढे
३० जुलै १९७३ रोजी अर्थमंत्री-पदावरून
केलेल्या भाषणाच्या आधारे.

आंतरराष्ट्रिय चलनपद्धती सुरळीत चालणे विकसनशील देशांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. म्हणून देशादेशांतील आर्थिक व्यवहारांचे समायोजन, हिशेबपूर्ती व परिवर्तनीयता यांत विकसनशील राष्ट्रे उत्साहाने रस घेतात. जगातील बहुसंख्य लोकवस्ती विकसनशील देशांमध्ये असल्याने जोपर्यंत जागतिक वातावरण सुधारत नाही, तोपर्यंत कोणतीही सुधारणा महत्त्वाची अशी म्हणता येणार नाही. चलनपद्धतीतील सुधारणेचा फायदा काही मोजक्या देशांपुरताच मर्यादित राहायचा नसेल, तर विकसनशील देशांपुढे असलेल्या समस्यांचे प्रभावी व परिणामकारक उत्तर शोधणे आवश्यक आहे. आजपर्यंत या ना त्या सबबीवर अशा समस्यांवर गंभीरपणे चर्चा करण्याचे टाळण्याकडे कल दिसून आला. यापुढे तसे होणार नाही, अशी आशा आहे.

आंतरराष्ट्रिय नाणेनिधीचे विशेष द्रव्याधिकार (S.D.R.) व विकासासाठी द्यावयाचे साहाय्य यांमध्ये निश्चित स्वरूपाचा दुवा कसा प्रस्थापित करता येईल, याचा विचार

व्हावयास हवा. आंतरराष्ट्रिय नाणेनिधीची निर्णय घेण्याची पद्धती व प्रत्येक देशाचा वाटा निश्चित करण्यामध्ये सुधारणा, या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत, परंतु त्यांबाबत अजून विचार झालेला नाही. आंतरराष्ट्रिय नाणेविषयक सुधारणांसंबंधी घेण्यात यावयाच्या निर्णयात सहभागी होण्याचा आपला हक्क अखेरीस मान्य करण्यात आला, याचा विकसनशील राष्ट्रांना आनंद होत आहे. परंतु केवळ आंतरराष्ट्रिय चर्चासत्रात विकसित देशांच्या प्रतिनिधींसमवेत बसावयास मिळावे, एवढ्यासाठी आमची धडपड नाही. तर जागतिक चलनपद्धतीत सर्वंकष सुधारणा घडवून आणण्याच्या ऐतिहासिक प्रसंगी, जुन्या जमान्यातील विषमता नाहीशी करण्यात आली पाहिजे. या विषमतेमुळेच विकसनशील राष्ट्रे दारिद्र्यात खितपत पडली आहेत. ही विषमता दूर झाली, तरच आंतरराष्ट्रिय सहकार्यावरील आमचा विश्वास टिकून राहील. या संदर्भात पुढील मुद्यांचा विचार करणे जरुरीचे आहे.

१) **जमाबंदीची प्रक्रिया व संचय निर्देशकाची भूमिका** : जमाबंदीच्या प्रक्रियेत सुधारणा होणे अगत्याचे आहे, या विषयी दुमत नाही. त्याचबरोबर या प्रक्रियेत येणा-या अडचणींचीही दखल घेतली पाहिजे. विविध संचयकेंद्रांच्या जबाबदाऱ्यांबाबत मतभिन्नता असल्यामुळे आणि काही मोजके देश आपल्या आंतरराष्ट्रिय देव-घेवीत सतत शिल्लक दाखवत आल्यामुळे या अडचणी उद्भवतात. या अडचणींचे निराकरण करण्यासाठी करण्यात येणा-या उपाययोजनेला आमचा पाठिंबा राहील. पण नवे नियम बनविताना वा काही सुधारणा सुचविताना विकसनशील देशांवर जादा बोजा पडता कामा नये, असे आमचे दृढ मत आहे. संकल्पित सुधारित आंतरराष्ट्रिय नाणेपद्धतीमध्ये ज्या 'विशेष सल्लामसलती'चा निर्देश करण्यात आला आहे, त्यात केवळ जागतिक दृष्ट्या दुष्परिणाम घडवू शकणा-या अशा वैयक्तिक वा सामूहिक असमतोलाचा समावेश करण्यात यावा, असे सर्वसाधारण एकमत झाले आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. याचा अर्थ आम्ही असा करतो, की अशा विशेष सल्लामसलतीतून विकसनशील राष्ट्रांना सूट मिळेल. योग्य अशा उपाययोजनेची गरज अजमावताना, तसेच एखादी उपाययोजना कितपत पुरेशी होईल, याचा अंदाज घेताना विकसनशील देशांच्या अर्थरचनेची वैशिष्ट्ये व त्यांच्या विकासाची कनिष्ठ

पातळी यांचा सर्वांगीण विचार होणे आमच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. विकसनशील देशांना आपल्या दीर्घ मुदतीच्या विकास-कार्यक्रमांना बाधा न येता हिशेबांचे तत्परतेने समायोजन करावे लागते. तसे करताना ज्या खास अडचणींना त्यांना तोंड द्यावे लागते, त्यांकडे असमतोलाच्या विशिष्ट घटनांचे मूल्यमापन करताना लक्ष देण्याचा विचार निश्चितच स्वागतार्ह वाटतो.

आजच्या परिवर्तनीयतेच्या जमान्यात समायोजन-प्रक्रियेत संचय निर्देशकांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. तथापि आधुनिक सामाजिक व आर्थिक संघटनांची गुंतागुंत लक्षात घेता या निर्देशकांचा उपयोग समायोजन-प्रक्रिया (Adjustment Action) काही प्रमाणात सुरू करण्यासाठी आपोआप करता येईल, असे आम्हांस वाटत नाही. संचयात (Reserves) फेरबदल (Changes) करताना, त्यांना संबंधित देशाची आर्थिक परिस्थिती व भावी प्रगती यांच्या सर्वांगीण मूल्यमापनाची जोड द्यावी लागते. सारांश, आंतरराष्ट्रिय नाणेनिधीने समायोजन-पद्धतीची (Adjustment Action) शिफारस करताना सर्व बाजूंनी व काळजीपूर्वक विचार करण्यात यावा. विशेष द्रव्याधिकार व आंतरराष्ट्रिय आर्थिक साहाय्य यांत दुवा प्रस्थापित केला, तर विकसनशील देशांच्या आंतरराष्ट्रिय देवघेवीविषयीच्या विविध उद्दिष्टांचा समन्वय करणे शक्य आहे. समायोजन-प्रक्रियेत सुधारणा कशी करता येईल, याचा शोध असताना या समन्वयाच्या शक्यतेकडे दुर्लक्ष होता कामा नये.

आदा करावयाच्या रकमांचे जागतिक सर्वेक्षण करताना दोन महत्त्वाच्या बाबी लक्षात घ्यावयास हव्या आहेत. एक विकसनशील देशाकडे ख-या साधनसंपत्तीचा ओघ, आणि दुसरे, त्यासाठी लागणारे द्रव्यबळ.

२) **दबावाऐवजी सहकार्य :** संकल्पित सुधारणांमध्ये अशीही एक सूचना आहे, की एखाद्या देशाच्या अर्थव्यवहारात उचित फेरबदल घडवून आणण्याकरिता क्रमश: अधिकाधिक दबाव आणण्यात यावा. अशा दबावांच्याबद्दल बोलायचे झाल्यास आमची अशी धारणा आहे, की आंतरराष्ट्रिय नाणेनिधीसारख्या संघटनेमध्ये - जी

मूलत: एक सहकारी संस्था आहे - दबावाऐवजी सहकार्यावर जास्तीत जास्त भर देण्यात आला पाहिजे. विकसनशील देशांच्या बाबतीत असा अनुभव आहे, की त्यांना परकीय चलनाची सतत चणचण भासते, त्यांच्या अर्थव्यवस्थेला आत्यंतिक दबावांना तोंड द्यावे लागते. तसेच मदत देणारे देश व यंत्रणा यांजकडून त्यांच्या आर्थिक प्रगतीची तपासणीही होत असते. म्हणून सुधारणांच्या आराखड्यात (Draft outline) उल्लेखिलेल्या दबावांचा आमच्या अर्थव्यवस्थेशी कितपत संबंध पोहोचतो, याबद्दल आम्ही साशंक आहोत. एखाद्या देशाबद्दल अहवाल प्रसिद्ध करून दबाव आणणे, किंवा याहून गर्वणीय गोष्ट म्हणजे दबावाचा अवलंब व्यापाराच्या आणि चालू आर्थिक देवघेवीच्या क्षेत्रात करणे, हे असमतोल दुरुस्त करण्याचे न्याय्य मार्ग आहेत, असे आम्हांस वाटत नाही. अशा दबावतंत्राचा वापर केल्यास परिणामी देशादेशांत अकारण संघर्षाचे वातावरण निर्माण होईल. त्यामुळे ज्या सहकार्याच्या भावनेवर राष्ट्राराष्ट्रांचे परस्पर-संबंध अवलंबून आहेत, ते दूर सारल्यासारखे होतील.

३) **परिवर्तनीयता** : देणीघेणी निश्चित करण्याच्या व्यवहारात पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणबद्ध पद्धती अंगीकारण्यात यावी, या सर्वसाधारण इच्छेशी आम्ही सहमत आहोत. आराखड्यातील दोन्ही प्रस्तावांमध्ये काही स्वीकार्य तरतुदी आहेत. पैकी पहिल्या पर्यायामध्ये असलेला दृष्टिकोण सर्व गोष्टी विचारात घेता आम्हांला मान्य आहे. कारण त्यायोगे जागतिक द्रव्यसंपत्तीवर, आंतरराष्ट्रिय नियंत्रण परिणामकारकपणे घालता येईल. त्याच वेळी दुस-या पर्यायाच्या समर्थकांना वाटणा-या चिंतेतही आम्ही सहभागी आहोत. कारण अकल्पित प्रसंगांना तोंड देता यावे, म्हणून थोड्याशा लवचिकपणाची गरज आहेच. असा लवचिकपणा नसला, तर जागतिक नाणे पद्धतीचा कल किंमती वाजवीपेक्षा जास्त घटविण्याकडे राहील.

जमाबंदीसंबंधीच्या प्रस्तावात नाणेनिधीच्या बदल्यात (Substitution) चालू जादा रोख रक्कम एकत्रित करण्याची एक योजना मांडण्यात आली आहे. जमाबंदीच्या प्रस्तावात अशीही एक योजना मांडण्यात आली आहे, की ज्यायोगे काही देशांकडे साठलेल्या रोख रकमांचे रूपांतर विशेष द्रव्याधिकारांत करता येईल. या सवलतीमुळे

नाणेनिधीजवळ प्रचंड प्रमाणात चलनी शिल्लक गोळा होईल. तो आकडा किती होईल, याची निश्चित कल्पना देता येत नाही. कदाचित तो ५० हजार दशलक्ष डॉलर्सपर्यंतही जाईल. याचा परिणाम निश्चितपणे असा होईल, की रोख रकमांच्याऐवजी विशेष द्रव्याधिकारांचे प्रचंड साठे निर्माण होतील. तसे घडल्यास एक खराच धोका संभवतो. काहींचा असा समज होईल, की ज्या अर्थी नाणेनिधीने निधी एकत्रित करण्याच्या हेतूने इतके खास अधिकार निर्मिले आहेत, त्याअर्थी येती कित्येक वर्षे सभासद राष्ट्रांमध्ये विशेष द्रव्याधिकारांचे नित्यनियमित वाटप करण्याची गरजच भासणार नाही. म्हणून आम्हांला अशी साधार भीती वाटते, की संचयाचे हे एकत्रीकरण-वरकरणी कितीही श्रेयस्कर वाटत असले, तरी विकसनशील राष्ट्रांच्या मुळावर येईल. आधीच विशेष द्रव्याधिकारांचे वाटप करण्याची प्रचलित पद्धती विकसनशील राष्ट्रांच्या दृष्टीने अतिशय असमाधानकारक आहे, आणि त्यातूनही वर उल्लेखिलेला धोका प्रत्यक्षात निर्माण झाला, तर विशेष द्रव्याधिकारांचे न्याय्य वाटप करण्याची समस्या अधिकच जटिल होऊन बसेल. एवढ्याचसाठी आमची अशी आग्रहाची मागणी आहे, की ह्या जादा शिलकेचा बहुतांश भाग द्विपक्षीय निधी उभारण्याच्या पद्धतीने एकत्रित करण्यात यावा. अगदी लहानसा भाग मोबदला पद्धतीने गोळा करावा, मग कोणतीही समस्या निर्माण होणार नाही.

४) **विशेष द्रव्याधिकार, त्यांचे मूल्यमापन आणि व्याजाचा दर** : विशेष द्रव्याधिकार हा जर सुधारित पद्धतीचा केन्द्रबिंदू राहणार असेल, तर त्यांचे भांडवली मूल्य आणि व्याजाचा दर असे असले पाहिजेत, की ते संबंधित राष्ट्रांना आकर्षक असे वाटावेत. मात्र ते आपण खर्ची घालू नये, असा मोह पडण्याइतके जास्त आकर्षकही असू नयेत. परंतु यासाठी विशेष द्रव्याधिकारांचे मूल्य व सर्वांत बलिष्ठ चलन यांची सांगड घातली पाहिजे, यावर आमचा विश्वास नाही. तसे केले, तर चलनात बेसुमार वाढ होऊन जागतिक द्रव्यसंपत्तीचे असमान वितरण घडून येईल. शिवाय हा विशेष अधिकार इतका आकर्षक बनल्यावर चलन व्यवहारातील शिखरसंस्था आंतरराष्ट्रिय हिशेब चुकते करण्यासाठी त्याचा वापर करतील, हे असंभवनीय आहे. परिणामी हा अधिकार गोठवला जाईल. हे द्रव्याधिकार स्वत:जवळ असावेत, असे वाटण्याइतपत

आकर्षक करण्यासाठी त्यावर बाजारपेठेच्या दराने व्याज दिले पाहिजे, असे आम्हांला वाटत नाही. कारण काही झाले, तरी सर्व देश आपल्या शिलकीचा काही भाग सोन्याच्या स्वरूपात ठेवतातच. त्यावरून शिलकी संपत्तीची स्वीकार्यता (Acceptability) ठरविण्याच्या कामी व्याजाचा दर हा सर्वाधिक महत्त्वाचा घटक गणला जात नाही, हे दिसून येईल.

जोपर्यंत जागतिक पातळीवरील द्रव्यसंपत्तीच्या गरजा लक्षात घेऊन विशेष द्रव्याधिकारांचे वाटप करण्यात येत आहे, तोपर्यंत रास्त अशा अल्प व्याजाच्या दरावर ही पद्धत चालू ठेवणे शक्य व्हावे.

५) **सुवर्णाचे स्थान :** आंतरराष्ट्रिय पद्धतीतील सोन्याची भूमिका क्रमश: कमी कमी करावयास हवी, हे आम्हांस मान्य आहे (Phased out). त्यादृष्टीने नाणेविषयक यंत्रणांनी खुल्या बाजारात सुवर्णविक्री करण्यास आमचा पाठिंबा आहे. या संबंधात अनेक सूचना करण्यात आलेल्या आहेत. त्यांपैकी सोन्याच्या अधिकृत किमतीत वाढ करण्याच्या प्रस्तावास मात्र आमचा सक्त विरोध आहे. सोन्याची अधिकृत किंमत सतत टिकवून ठेवणे आणि त्यावेळी नाणेविषयक यंत्रणांना सुवर्णविक्रय करण्यास मुभा देणे हा पर्याय आम्हांला अधिक श्रेयस्कर वाटतो.

(या चर्चेच्या ओघात नव्या मुखवट्याच्या (Revamped) कार्यकारी मंडळाचा उल्लेख ब-याच वेळा करण्यात आला. हे नव्या मुखवट्याचे मंडळ म्हणजे नेमके काय? त्याची चर्चा यावेळी अशा रीतीने करणे आवश्यक आहे का, किंवा सुधारणा कोणता आकार घेतात, हे ठरल्यानंतर याबाबत विचार करता येईल, इत्यादी गोष्टींचा उलगडा व्हावयास हवा. तो झाला नाही, तर एक धोका संभवतो. कार्यकारी मंडळाला नवा मुखवटा देण्याचा हेतू काय व तो कसा द्यावयाचा, हे कळण्यापूर्वीच आपण नव्या मुखवट्याच्या मंडळाला मान्यता देऊन बसू.)

**६) महत्त्वाचा दुवा** : विकसनशील देशांना देण्यात यावयाचे विकास-साहाय्य व

विशेष द्रव्याधिकार (S.D.R.) यांमध्ये  दुवा प्रस्थापित झाला पाहिजे, असे आमचे ठाम मत आहे. अशा प्रकारच्या दुव्याला सर्व विकसनशील देशांचा एकमुखी पाठिंबा आहे. हा दुवा प्रस्थापित करण्यास काही विकसित देशांचा विरोध असावा, ही दुर्दैवी घटना होय. तथापि बहुसंख्य विकसित देशांना हा दुवा निर्माण करण्याच्या मार्गात येणा-या अडचणी अनुल्लंघनीय वाटत नाहीत आणि कोणत्या तरी प्रकारचा दुवा असलाच पाहिजे, असे त्यांना वाटते, हे काही कमी उत्साहजनक नाही. विकसनशील देशांना साधनसंपत्ती उपलब्ध करून देण्याच्या यंत्रणेला पाठिंबा देणारे जे निवेदन फ्रान्सच्या वित्तमंत्र्यानी केले आहे, ते निश्चितच स्वागतार्ह आहे. जी थोडी राष्ट्रे या दुव्यास विरोध करीत आहेत, ती या दुव्याला मिळणारा प्रचंड पाठिंबा लक्षात घेऊन आपल्या भूमिकेचा पुनर्विचार करतील, अशी आशा वाटते.

असा दुवा निर्माण झाल्यास विशेष द्रव्याधिकारांवर आधारलेली पद्धती संकटात येईल आणि या अधिकारांवरील विश्वासाला तडा जाईल, या त्यांच्या आशंकेशी आम्ही सहमत नाही. द्रव्याधिकार हे चलननियामक संस्थांच्या हातांत राहतात, ते खाजगी बँकांना दिले जात नाहीत; हे सर्वश्रुतच आहे. तेव्हा विश्वास डळमळण्याची भीती आपोआपच निराधार ठरते. विकसनशील देशांची देणी विकसित देशांनी विशेष द्रव्याधिकारांच्या स्वरूपात स्वीकारण्याचे मान्य केले, तर विश्वासासंबंधीची समस्याच संपुष्टात येईल. विशेष द्रव्याधिकार जर विकसनशील देशांच्या जबाबदारीवर आधारित असतील, तर ते विश्वास निर्माण करू शकणार नाहीत, असे काहींचे म्हणणे आहे. पण प्रचलित पद्धतीत सुद्धा विकसनशील देशांच्या जबाबदारीचा आधार विशेष द्रव्याधिकारांना काही प्रमाणात मिळतोच आहे. आणि तरी देखील द्रव्याधिकारावरील विश्वास कमी झाल्याचे कुणीही म्हटले नाही. उलटपक्षी, विशेष द्रव्याधिकारांना नव्या नाणेपद्धतीचा केंद्रबिंदू करण्यास सर्व विकसनशील देश उत्सुक आहेत. आर्थिक बाजारपेठांमध्ये जागतिक बँकेच्या रोख्यांना सर्वांत जास्त भाव आहे, यावरून हेच सिद्ध होते, की विकसनशील देशांच्या आर्थिक बळाचा पाठिंबा असलेली ठेव (Asset) ही कमी दर्ज्याचीच गणली जाते, असे नाही. जागतिक बँक वाटत असलेल्या कर्जाचा मोठा भाग हा विकसनशील देशांना देण्यात येतो. तरी जागतिक

बँकेने काढलेल्या रोख्यांच्या विश्वासार्हतेबद्दल संशय व्यक्त केला जात नाही, याचे कारण त्यांच्यामागे अप्रत्यक्षरीत्या उभे असलेले विकसित देशांचे भांडवल. त्याचप्रमाणे विकसित देशांनी आंतरराष्ट्रिय हिशेब चुकते करताना विशेष द्रव्याधिकार स्वीकारण्याची तयारी दर्शविली, तर विश्वासाचा प्रश्न मुळीच उद्भवणार नाही.

तसेच असा दुवा प्रस्थापित झाल्यास भविष्यकाळातील विशेष द्रव्याधिकारांच्या वाटपावर त्याचा परिणाम होऊन चलनफुगवटा वाढेल, या युक्तिवादातही फारसे तथ्य नाही. विशेष द्रव्याधिकार वाटपासंबंधीचे निर्णय केवळ जागतिक गरजा लक्षात घेऊन देण्यात यावेत. विकासाशी त्यांचा कोणत्याही प्रकारे संबंध जोडू नये. यावर विकसित राष्ट्रांनी सतत भर दिला आहे. विकसनशील राष्ट्रांनी आपली भूमिका नि:संदिग्ध शब्दांत मांडली असतानाही विशेष द्रव्याधिकारांचे वाटप भरमसाट होईल, अशी भीती सतत का व्यक्त केली जात आहे, हे समजत नाही. आंतरराष्ट्रिय नाणेनिधीपैकी ७३ टक्के रक्कम विकसित देशांजवळ असताना, त्यांच्यावर यशस्वी रीत्या दडपण आणून त्यांच्या मर्जीविरुद्ध द्रव्याधिकारांचे भरमसाटी वाटप करण्यास त्यांची संमती मिळवता येईल, यावर कोणाचा तरी विश्वास बसेल का? विकसित देशांची तशी इच्छा असेल, तर विकसनशील देश इटालियन सदस्याने सुचविल्याप्रमाणे विशेष द्रव्याधिकारांच्या वाटपासंबंधी वस्तुनिष्ठ निकषांवर आधारलेल्या सूत्रांना मान्यता देतील, अशी भूमिका एकदा घेतली, की राष्ट्रांच्या कोणत्याही गटाला या अधिकारांच्या वाटपाबाबत दडपण आणण्यास कधी वाव मिळणार नाही. असा सर्व बाजूंनी विचार केल्यावर विकसनशील राष्ट्रांची आणि बहुसंख्य विकसित राष्ट्रांचीही खात्री पटली आहे, की दुवा प्रस्थापित करण्याच्या मार्गात अनिवार्य अशा कोणत्याही तांत्रिक अडचणी नाहीत. जागतिक संघटनेच्या राजकीय इच्छाशक्तीचीच काय ती गरज आहे.

विकसनशील देशांना दीर्घ मुदतीच्या शिलकी रकमा देता याव्यात, यासाठी 'विस्तारित निधी सवलती'ला (Extended Fund Facility) आमचा खंबीर पाठिंबा

राहील. पण ही योजना संकल्पित दुव्याला (Link) पूरक समजावी; त्याला पर्याय म्हणून मानता कामा नये.

विकसनशील राष्ट्रांपुढील समस्यांचं समाधानकारक निराकरण करण्यास असमर्थ असलेल्या सुधारणेस आम्ही पाठिंबा देणार नाही. विकसनशील राष्ट्रांना आपल्या ध्येयानुसार जागतिक नाणेनिधीस आकार देण्यास आवश्यक असणारा मताधिकार आज नसला, तरी पण न्याय, नीतिमत्ता व तर्क आमच्याच बाजूला आहे, अशी आमची धारणा आहे.

आंतरराष्ट्रिय नाणेनिधीच्या संचालक मंडळाने २६ जुलै १९७२ रोजी ठराव करून वीस सदस्यांची एक समिती नेमली व आंतरराष्ट्रिय नाणेविषयक सुधारणांसंबंधी सर्व प्रश्नांचा विचार करण्याचे कार्य तिजवर सोपवले. श्री. यशवंतराव चव्हाण भारताचे अर्थमंत्री या नात्याने समितीचे दोन वर्षे सदस्य होते. ही समिती Committee of Twenty म्हणून प्रसिद्ध आहे. या समितीच्या अमेरिका व युरोपमध्ये अनेक बैठका झाल्या. त्यांपैकी तिस-या बैठकीपुढे ३० जुलै १९७३ रोजी केलेल्या भाषणाच्या आधारे.

## १६. आजवरच्या वाटचालीमागील माझी भूमिका

'केसरी' १० मार्च १९७४
अंकातील मुलाखतीच्या आधारे

देश, देशातील लोक, त्यांचे जीवन आणि त्यांच्या समोरची संकटे यांचा विचार सर्वांनाच विधायक दृष्टिकोण ठेवून करावा लागेल. संकटे व्यक्तिगत असोत वा

राष्ट्राच्या जीवनातील असोत, ती कसोटी घेण्यासाठीच येत राहतात. अशा वेळी विचाराने दृढ आणि कृतीने स्थिर राहूनच त्यांतून निभावून जायचे असते. इतरांना न्यायचे असते. काँग्रेसपक्षावर याची जबाबदारी काहीशी अधिक. सुखावर लक्ष ठेवून किंवा सुखाच्या वेळीच फक्त एकत्र यायचे, एकत्र बसायचे आणि संकटाचे वेळी दोषदिग्दर्शनासाठी कुठे तरी बोट दाखवीत स्वत:ची जबाबदारी झटकायची, किंवा दिसेल तो रस्ता धरायचा, हे काही प्रशस्त नाही. या कातडीबचावू मार्गाचे समर्थन करावयाचे आणि इतरांनाही त्याची महती सांगायची, या क्रियेला, विचाराला किंवा प्रवृत्तीला विधायक कोण म्हणेल? देशात सध्या जी परिस्थिती निर्माण झाली आहे, तिचा खोलवर विचार करून उत्तरे शोधावी लागणार आहेत. एवढेच नव्हे, तर त्यांचा आपल्या कृतीशीही मेळ घालावा लागणार आहे.

गरिबी हा सामाजिक व आर्थिक रोग आहे आणि गरिबांच्या प्रयत्नांनीच तो निपटून काढला जाऊ शकतो, असा विश्वास 'गरिबी हटाव' घोषणेच्या मुळाशी आहे. गरिबी हटविण्याचा विश्वास आणि निर्धार गरिबांमध्ये निर्माण करणे, हेच या कार्यक्रमाचे मूळ सूत्र आहे. गरिबी हटविण्यासाठी राजकीय दृष्ट्या काही मांडणी करून कार्यक्रम तयार केला आणि तो समोर ठेवला, तर जनतेत चैतन्यशक्ती निर्माण करता येते हा यातील प्रमुख विचार आहे. या विचाराचे बीजारोपण त्या घोषणेने केले आहे, हे निश्चित. ही घोषणा आणि हा विचार, म्हणजे नव्या क्रांतीचे बीज आहे. हितसंबंधी मंडळी हे ओळखून आहेत. ही घोषणा ऐकायला ठीक आहे, पण त्यामुळे गरिबी हटली का? असा सवाल हा हितसंबंधी वर्ग कुत्सितपणाने करीत असतो. 'गरिबी हटाव' घोषणा करून सारी फसवणूक चालली आहे, असेही हा वर्ग सांगत आहे. याचा सरळ अर्थ असा आहे, की गरिबी जाऊच शकत नाही, असेच या हितसंबंधी वर्गाला सुचवावयाचे आहे. पूर्वापार चालत आलेला विचार नव्या परिस्थितीत त्यांना आजही त्याज्य वाटत नाही. 'गरिबी हटाव' घोषणेची हेटाळणी करण्यामागे, पूर्वापार चालत आलेली गरिबी कायम ठेवणे, किंबहुना ती वाढविणे हेच त्यांच्या विचारांचे सूत्र आहे. हितसंबंधीयांच्या मतलबी टीकेने भाळणाऱ्यांना हे समजून घ्यावे लागेल.

काँग्रेस पक्ष हा पुढील काळात ख-या अर्थाने गरिबांचा पक्ष झाला पाहिजे. या पक्षाचा नेता कोण आणि समाजाच्या कोणत्या स्तरावरचे तो प्रतिनिधित्व करीत आहे, हे पाहणे महत्त्वाचे आहे. ते सामर्थ्य काँग्रेस पक्षाच्या अंगी आहे का, हेही तपासून पाहावे लागेल. याचा स्पष्ट अर्थ असा, की ज्यांची गरिबी हटवायची, त्यांचे प्रतिनिधित्व करणारे नवे नेतृत्व त्याच वर्गातील नव्या पिढीमधून तयार केले पाहिजे. छोटा शेतकरी, शेतमजूर, दलित, हरिजन व कामगार यांचे नेतृत्व करणारे प्रतिनिधित्व काँग्रेस पक्षात जास्तींत जास्त वाढले पाहिजे. नव्हे, तसे ते वाढवावेच लागेल. कारण हे नवे नेतृत्वच देशात समाजवाद प्रस्थापित करील. छोटे शेतकरी, शेतमजूर, दलित वर्ग यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पक्षाच्या रचनेत बदल करणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

एक काळ असा होता, की राजकारणात फक्त वकील, शिक्षक, आदी पांढरपेशा वर्गच सक्रिय भाग घेत असे. संपन्न शेतकऱ्यांसंबंधी बोलायचे, तर या वर्गाने पुरोगामी राजकारण कधी हिरीरीने केले, असे मला तरी वाटत नाही. संपन्न शेतकऱ्यांचा वर्ग ब्रिटिश काळात ब्रिटिशांबरोबरच राहिला. कालांतराने सधन शेतकऱ्यांमधील सरंजामदार वर्ग शिंग मोडून राजकारणात शिरल्याचे आढळते, परंतु आजही हा वर्ग समाजवादाला पोषक कृती करण्यापासून काहीसा अलगपणा बाळगून आहे.

महाराष्ट्रातील लहान व मध्यम शेतकरी वर्गाचे विश्लेषण मात्र वेगळ्या पद्धतीने करावे लागेल. स्वातंत्र्य-लढ्यात तो आघाडीवर होता आणि आजपर्यंत तरी त्याने पुरोगामी विचारांची वाटचाल केली आहे. या संदर्भात महाराष्ट्र काँग्रेसलाच नव्हे, तर अखिल भारतीय काँग्रेस पक्षालाही संघटनेची बांधणी नव्याने करावी लागेल. ही नवी संघटना-वर्गसंघटना म्हटले, तरी चालेल. गरिबांच्या कार्यक्षेत्रातील कार्यकर्त्यांची असेल. अशी नवी संघटना बांधण्यासाठी जुन्या-नव्या काँग्रेस कार्यकर्त्यांनीच पुढाकार घेतला पाहिजे. शेतकरी, कामगार, व दलितांचे प्रश्न हाती घेऊन लढाऊ

कार्यक्रमाच्या पायावर या वर्गाला संघटित करावे लागेल आणि ते सुद्धा जनशक्तीचा तेजोमय (dynamic) विचार नजरेसमोर ठेवून !

नवी पिढी म्हणजे आपण अद्ययावत तरुण पिढी म्हणतो. पण तसे कधी नसते. १९४२च्या स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीतलाही माझा हा अनुभव आहे. देशातली सर्वच्या सर्व नवी पिढी एखाद्या कामात स्वत:ला बांधून घेते, असे सहसा घडत नाही. महत्त्वाची आव्हाने येतात, त्यावेळी नवी पिढी कामासाठी पुढे सरसावते. तरुणांपुढे विधायक विचार, ध्येय, कार्यक्रम ठेवला, तर ते संघटितही होतात. मानवतावादी विचार त्यांच्या मनात रुजवला, तर तरुणवर्ग अन्यायाच्या विरुद्ध आणि दलितांच्या बाजूने उभा राहतो, असे आजही आढळते. आजच्या तरुणांच्या ठिकाणीही नैतिक मूल्यांची चांगली जाण आहे; हाच याचा अर्थ. नवी पिढी जागृत आणि प्रामाणिक आहे, तसेच ती राष्ट्रवादाचा विचार कमी महत्त्वाचा मानीत नाही. तरुण मनाला निराशेने ग्रासले आहे, असे म्हटले जाते. याचा मी जो अर्थ करतो, तो असा, की समाजवाद प्रस्थापित करणारा दुसरा पक्ष तयार होईल, की नाही, या शंकेने त्यांना ग्रासले आहे.

प्रादेशिक पक्षांचे प्राबल्य वाढत आहे, हे तर खरेच; पण चिंतेची बाब ही, की हे प्रादेशिक पक्ष मूलत: प्रॉपर्टीवादी - खाजगी मालमत्तेचे पुरस्कर्ते - आणि जातीय परंपरा प्रशंसिणारे आहेत. अशा शक्ती आज समर्थपणे उभ्या राहात आहेत, हेही आढळून येते. उलटपक्षी, पुरोगामी व राष्ट्रिय दृष्टिकोण मांडणा-या शक्ती मात्र वाढल्याचे दिसत नाहीत आणि तरुण मनाच्या निराशेचा गैरफायदा अशा प्रतिगामी शक्ती वाढविण्यासाठी केला जात आहे, असाच गेल्या निवडणुकीमध्ये पडताळा आला.

भारताचे आर्थिक, राजकीय, सामाजिक प्रश्न गुंतागुंतीचे आहेत, हे तर स्पष्टच आहे. लोकशाही समाजवादाची प्रक्रिया ही संथ गतीची व सावकाशीची आहे. याचा अर्थ आपल्याला थांबून चालणार नाही. समाजवादी समाजाच्या प्रस्थापनेसाठी लोकांमध्ये

विश्वास निर्माण करावा लागेल आणि त्यासाठी अनुकूल अशा पक्षरचनेचाही विचार करावा लागेल. नेतृत्व समाजापासून दूर चालले आहे, याचा अर्थ असा, की लोकशिक्षणाची प्रवृत्ती कमी झाली आहे. नव्या पिढीतील गरीब वर्गातील तरुणांनी पुढे येऊन नेतृत्व ताब्यात घेतले पाहिजे, हाच यावर उपाय आहे, असे मला वाटते. ज्या समाजाचे चित्र आपल्याला बदलावयाचे आहे; ज्यांची गरिबी नाहीशी करावयाची आहे, त्या वर्गातील तरुणांनीच कोणाच्याही निमंत्रणाची वाट न पाहता पुढे येऊन, नव्या विचारांची कास धरून कामाला जुंपून घेणे जरूर आहे.

पोटनिवडणुका किंवा सार्वत्रिक निवडणुका यांच्या निकालाचे अर्थ जो तो आपापल्या सोयीने लावणारच. पण देशातल्या शहाणपणावर माझा विश्वास आहे. १९६७ च्या निवडणुकांनंतर देशात निरनिराळ्या 'सेनां'चे राजकारण सुरू झाले होते. परंतु त्यातले धोके जसजसे नजरेपुढे येत राहतील, तसतसे संकुचित विचार नाहीसे होण्यास मदतच होईल. प्रादेशिक विचाराचा धोका राष्ट्रवादाला तर आहेच, पण शिवाय पुरोगामी विचारालाही तो मोठा अडथळा आहे. कारण प्रादेशिक विचारप्रणालीतून प्रतिगामी वृत्तीचे लोक नेतृत्व करण्यासाठी सरसावतात आणि मोक्याच्या जागा अडवून बसतात. आज तर संकुचित विचारवृत्ती प्रादेशिक वादापुरतीच मर्यादित राहिलेली नाही. सर्वच क्षेत्रांत ती पसरली आहे.

चलनवाढ, महागाई व आर्थिक समस्या या सर्वच अविकसित राष्ट्रांसमोरील समस्या आहेत. या प्रश्नांतून बाहेर पडावयाचे, तर शेतकऱ्यांपासून तो कामगार आणि मध्यमवर्गीय संघटित वर्गाने केवळ 'ट्रेड युनियन'चा विचार आणि फायदा आपल्या नजरेसमोर ठेवून चालणार नाही. सर्व क्षेत्रांतील उत्पादन वाढविणे आणि राष्ट्रिय संपत्ती वाढविणे, यावरच आपले सर्वांचे लक्ष केंद्रित झाले पाहिजे. केंद्र सरकारने त्यासाठी काही धोरण निश्चित आखलेले आहे. त्याची पूर्णांशाने अंमलबजावणी होत नाही, ही मोठी उणीव मानावी लागेल. हे काम राज्यांचे किंवा ते काम केंद्राचे, अशी कामाची टोलवाटोलवी होत राहिल्याने साध्य दुरावते. खासगी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उद्‌योगांमधील कर्मचाऱ्यांमध्ये, तसेच शेतकरी, आणि कामगार यांच्या

ठिकाणीही समाजवादाची जाण आणि विश्वास निर्माण करणे हेच मूलभूत कार्य आहे, असे मी मानतो.

पुरोगामी विचाराचे व आचाराचे बोट धरून मी आजवर वाट चालत आलो. देशाला सुखी करण्याच्या शिखराकडे नेणारी ही वाट आपणा सर्वांनाच धरावी लागणार आहे. पुढचा पल्ला एकमेकांच्या साथीनेच गाठावयाचा आहे. 'सर्वे सुखिन: संतु' असे घडण्याची शक्ती लाभावी, हीच सदिच्छा.

## १७. अर्थमंत्रिपदाची चार वर्षे : एक ताळेबंद

'केसरी' (ऑक्टोबर ७४) अंकातील मुलाखतीच्या आधारे.

अर्थखाते हे नेहमीच इतर कोणत्याही खात्यापेक्षा अधिक रोकड्या व्यवहाराचे खाते आहे. तेथे मला अनेक गुंतागुंतीच्या आर्थिक प्रश्नांना सामोरे जावे लागले. पण त्यात सैद्धांतिकतेपेक्षा व्यावहारिकतेचे आव्हान अधिक असे. त्यामुळे या खात्यात बरेच काही नवे करावयास व काही शिकावयासही मिळाले. अर्थखात्यात मी अनेक नव्या उपक्रमांना प्रारंभ केला होता. त्यांतील बरेचसे क्रियाशील आहेत व काहींचे परिणाम हाती यावयास आणखी काही अवधी लागेल. थोडीशी खंत एवढीच आहे, की त्यांतील एकदोन उपक्रम पुरे करण्यासाठी मला पुरेसा वेळ मिळाला नाही. उदाहरणार्थ, वांछू समितीने केलेल्या अहवालावर आधारलेले काळ्या पैशासंबंधीचे विधेयक मी चिकित्सा समितीशी त्यातील प्रत्येक कलमाबद्दल सखोल व चौफेर चर्चा करून तयार केले आणि ते दिवाळी अधिवेशनात मी मांडणार होतो. असेच काहीसे गृहमंत्री असतानाही झाले होते. संस्थानिकांच्या तनख्याबाबतचे विधेयक तयार करून लोकसभेत मी सादर केले होते; पण त्यावरील पुढचे सोपस्कार होण्यापूर्वीच ते खाते

मी सोडले. यावेळीही असेच घडले. पण हे असे चालायचेच. राजकीय जीवनात बदल हाच नित्यक्रम आहे.

या बदलानंतर गेल्या चार वर्षांच्या (१९७०-७४) या माझ्या अर्थशास्त्राच्या कालखंडाकडे जेव्हा मी पाहतो, तेव्हा असे लक्षात येते, की गेली चार वर्षे दुनियेला आणि भारताला आर्थिक अरिष्टांची गेली. ७१च्या सार्वत्रिक निवडणुकी झाल्यानंतर परत येऊन मी अर्थसंकल्पाची तयारी करीत होतो. तेव्हाच बांगला देशात पाकिस्तानी सैन्याने अत्याचार सुरू केले व बांगला देशाच्या स्वातंत्र्ययुद्धाची ठिणगी पडली. लक्षावधी निर्वासितांचा लोंढा भारताकडे आला. या सर्व निर्वासितांची पडलेली सर्व जबाबदारी, बांगला देशच्या मुक्तिवाहिनीला करावी लागलेली मदत, प्रसंग पडला, तर करावी लागणारी युद्धाची तयारी व पुढे त्यावर झालेला खर्च, बांगला देशाच्या पुनर्रचनेखातर झालेला अवाढव्य खर्च हे सर्व ओझे भारतावर येऊन पडले. नंतर तीन वर्षे पर्जन्यराजाने केलेली अवकृपा आणि त्यामुळे लागोपाठ ३ वर्षे राज्यांत चालू असलेले दुष्काळ हे महत्त्वाचे संकट उभे राहिले. ही तिन्ही वर्षे परदेशातून अन्नधान्याची आयात करणे आणि दुष्काळग्रस्त भागातील जनतेला वाचविण्यासाठी विविध तऱ्हेचे प्रयत्न करण्यात गेली. त्यासाठी करावा लागलेला खर्च हे सर्व भारतीय तिजोरीवर पडलले अनपेक्षित पण न टाळता येण्यासारखे ओझे होते. हे झाले अंतर्गत परिस्थितीबाबत.

आंतरराष्ट्रिय दृष्ट्याही हा काळ आर्थिक अरिष्टांचाच होता. पेट्रोलियम उत्पादक देशांनी तेलाच्या किंमती भरमसाट वाढविल्या, त्यामुळे चलनवाढीचा प्रश्न १९७२ पासून जगातील एक चक्रव्यूहासारखा प्रश्न होऊन बसला. जगाची नाणेपद्धतीच संकटात आली. ही नाणेपरिस्थिती सुधारावी, म्हणून आंतरराष्ट्रिय नाणेनिधीला वीस देशांच्या अर्थमंत्र्यांची एक समिती नेमावी लागली. ही समिती (Committee of Twenty) म्हणून प्रसिद्ध आहे. हिंदुस्थानचा प्रतिनिधी म्हणून मी नाणेनिधीचा गव्हर्नर असल्यामुळे ह्या वीस देशांच्या अर्थमंत्र्यांच्या समितीचा सदस्य म्हणून काम करण्याची एक अपूर्व संधी या निमित्ताने मला मिळाली. या समितीचे काम

जवळ जवळ दोन वर्षे चालू होते. या समितीपुढे अविकसित देशांचे मूलभूत आर्थिक प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने नाणेपद्धतीत महत्त्वाचे बदल केले पाहिजेत, यासंबंधी अनेकविध सूचना व विचार भारतातर्फे मांडण्यात आले. या सर्व चर्चांनंतर काही निर्णयही झाले. परंतु माझ्या मताने ते मूलभूत स्वरूपाचे नव्हते.

चार वर्षांच्या या कालखंडाचे स्वरूप समजल्याशिवाय या ताळेबंदाच्या इतर बाबी स्पष्ट होणार नाहीत. म्हणून ही पार्श्वभूमी मी येथे देत आहे. काही नवी धोरणे आखली व नवी कामे सुरू केली. त्यांमधल्या एका कामाचा येथे मला उल्लेख केला पाहिजे. १९७०च्या राष्ट्रिय काँग्रेसच्या मुंबई अधिवेशनामध्ये ह्या एका महत्त्वाच्या गोष्टीचे आश्वासन आम्ही देशाला दिले होते आणि ते म्हणजे जनरल इन्शुअरन्सचे राष्ट्रियीकरण. या चार वर्षांच्या कालखंडामध्ये जनरल इन्शुअरन्सचे राष्ट्रियीकरण होऊन हे काम भारतात यशस्वी रीत्या सुरू झाले होते. या काळाची एक खूण म्हणून ही गोष्ट ध्यानात ठेवावी लागेल.

चलनवाढ, वाढत्या किमती यांनी या चार वर्षांच्या काळात सरकारचा आणि जनतेचा एकसारखा पाठलागच केला. वाढत्या किमतींच्या धोकादायक प्रश्नामुळे मी असे कित्येक महिने चिंतेत राहिलो. परंतु अर्थमंत्रिपद सोडण्यापूर्वी त्यावर जालीम उपाययोजना करावी लागली. ती म्हणजे १९७४चा पुरवणी अर्थसंकल्प व त्याचबरोबर वाढत्या महागाई भत्त्याचे रूपांतर सक्तीच्या बचतीत करण्याचा कठोर निर्णय यावेळी आम्ही अर्थशास्त्रज्ञांच्या सल्ल्यावरून घेतला. परंतु हे कबूल केले पाहिजे, की ह्या निर्णयाने या वादळी वर्षाच्या तडाख्यातून बाहेर पडण्याचा रस्ता काढून दिला. दर आठवड्याला येणा-या अर्थतज्ज्ञांच्या किमतींसंबंधीच्या अहवालात किमती खाली उतरत आहेत, असे मी या पुरवणी अर्थसंकल्पाच्या नंतरच पहिल्याप्रथम पाहिले. भारताच्या गुंतागुंतीच्या अर्थव्यवस्थेत पुन्हा कधी या योजनेची पुनरावृत्ती करावी लागली, तर मला आश्चर्य वाटणार नाही.

ह्या चार वर्षांच्या काळातील आणखी एक लक्षात घेण्यासारखे काम म्हणजे बँकांच्या

राष्ट्रियीकरणाच्या क्षेत्रातील आहे. १९६९ साली राष्ट्रियीकरणाचा कायदा पास करून एक वर्ष होऊन गेले होते. परंतु त्याचा तपशिलवार विचार करून निश्चित योजना करण्याचे काम शिल्लक राहिले होते. सर्व राज्यांच्या, सर्व अर्थक्षेत्रांतील व स्तरांवरील लोकांचे प्रतिनिधित्व असणारी संचालक-मंडळे पहिल्याप्रथम माझ्या अर्थमंत्रिपदाच्या कारकीर्दीत मला तयार करावी लागली.

आता कामाची दिशा ठरून गेली, यंत्रणा पक्की झाली. राष्ट्रियीकरणानंतर कर्ज देण्याच्या नीतीमध्ये तत्त्वत: फरक झाला. लहान व्यापारी, लहान शेतकरी, छोटे-मोठे धंदे करणारी गरीब माणसे यांना कमी व्याजाच्या दराने कर्ज देण्याची कल्पना मी मांडली. काही मर्यादेपर्यंत रिझर्व्ह बँकेने ती मान्य कली. आजही ती योजना चालू आहे. अधिक फायदा देणारे धंदे आणि निसर्गत: कमी फायदा असणारे धंदे यांच्या व्याजाच्या दरांत फरक असला पाहिजे, असे माझे मत आहे. मोठ्या कारखानदाराला तोच दर आणि पाच एकरांच्या शेतक-याला तोच दर. हजार, दोन हजाराच्या भांडवलावर धंदा करणा-या सुतार, गवंडी यांच्यासारख्या माणसांनाही तोच दर, अशी एक विचित्र अवस्था होती. ती बदलावी आणि कामाच्या स्वरूपावरून व्याज आकारण्याची योजना (Differential Rate of Interest) आणावी, असा माझा विचार होता. काही प्रमाणात ही योजना आता सुरू झालेली आहे. परंतु शासनाने या बाबतीमध्ये आग्रहपूर्वक प्रयत्न केल्याशिवाय बँका या योजनेची अंमलबजावणी करणार नाहीत. तरी पण एक नवा दृष्टिकोण स्वीकारण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे पडले, याचे मला समाधान आहे.

अर्थमंत्रिपद सोडून मी परराष्ट्रमंत्रिपद घेण्यासाठी ज्या दिवशी विदेश मंत्रालयात जाणार, त्या सकाळी आमचे बिहारचे एक ज्येष्ठ मित्र व संसद सदस्य श्री. विभूती मिश्र माझ्याकडे अनपेक्षितपणे आले. एका वेगळ्याच कारणासाठी त्यांनी माझे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले, की 'स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरच्या काळात आतापर्यंत राजीनामा न देता दुस-या खात्यात जाणारे तुम्ही पहिलेच अर्थमंत्री आहात. गेल्या सत्तावीस-अठ्ठावीस वर्षांचा इतिहास हा अर्थमंत्र्यांच्या राजिनाम्यांचा इतिहास आहे.

ती परंपरा तुम्ही मोडली आणि कठीण काळातही अर्थमंत्रिपद सांभाळून बचावून निघालात, याबद्दल अभिनंदन करतो.'

ही मनोरंजक नोंद मी एवढ्याचसाठी करतो, की श्री. विभूती मिश्र यांचे म्हणणे खरे होते. पण मी कधी त्याचा विचार केला नव्हता किंवा मला तो सुचलाही नव्हता. १९४७ पासून सर्व अर्थमंत्री राजकीय कारणांसाठी किंवा अर्थविषयक धोरणातील मतभेदांसाठी, तर कधी वैयक्तिक आरोपामुळे अर्थमंत्रिपदाचा राजीनामा देऊन बाहेर पडले होते, ही खरी कहाणी आहे, हे माझ्या ध्यानात आले. श्री. विभूती मिश्र यांचे मी आभार मानले, कारण त्यांनी नवीनच एका सुखकर विचाराचा अनुभव दिला होता. हा सुखद विचार मनात खेळवतच मी विदेश मंत्रालयात पहिले पाऊल टाकले.

माझी अर्थसंकल्पावरील भाषणे हीच माझी मार्गदर्शक सूत्रे दर्शवतील. उदाहरणार्थ, १९७१-७२ च्या माझ्या अर्थसंकल्पावरील पहिल्या भाषणात मी माझ्या करविषयक धोरणाची त्रिसूत्री सांगितली होती.

पहिले सूत्र : प्राप्तीतील विषमता कमी करणे. दुसरे : कर-योजनेचा पाया विस्तृत करणे आणि तिसरे : कर-आकारणी व कर-वसुली यांची प्रशासन-यंत्रणा अधिक कार्यक्षम करणे.

प्राप्तीतील विषमता कमी करण्याच्या अर्थमंत्र्याच्या हातातील उपाय म्हणजे कर-योजना, काळा पैसा, काळ्या पैशातून होणारा खर्च व काळ्या पैशाच्या कमाईचे विविध मार्ग या गोष्टींवर नियंत्रण ठेवणे हा होय. आज काळा पैसा वेगवेगळ्या रूपांत वावरतो आहे. तो जमिनीत लपला आहे, सोन्यात गुंतवलेला आहे आणि बँकांतील बेनामी ठेवींत आहे. एका हप्त्यात आयुर्विमे उतरले जातात. ऐशारामी खर्च, चैनीच्या वस्तू, परदेशी मालाची खरेदी यांच्याद्वारे बराचसा काळा पैसाच खर्च होतो. कर चुकवून हाती राहतो, तोही काळा पैसाच असतो. काळ्या पैशाची गुंतवणूकही काळ्या मार्गानीच होत असते. अशा अवैध मार्गांनी गुंतवणुकीतून निर्माण होतो, तो

पैसाही काळाच. असे हे दुष्ट वर्तुळ फिरत राहते. काळा पैसा या देशात नेमका किती आहे, हे  सांगणे कठीण आहे. कारण, सोने, चांदी, दागिने, हिरेमाणके, उद्योगोपयोगी कच्चा माल, दैनंदिन गरजेच्या वस्तू, शेअर्स आदी अनेक गोष्टींचा नेमका अंदाज येत नाही. वांछू समितीने ज्याच्यावरचा प्राप्तिकर चुकविला जातो, त्या मिळकतीचा अंदाज १९६८-६९ साली १४०० कोटी रुपयांचा केला होता; पण डॉ. रांगणेकरांनी त्याच वर्षाचा अंदाज २८३३ कोटी रुपये वर्तविला आहे.

संसदीय लोकशाहीत विलंब हा अपरिहार्य असतो. एकदा निर्णय राजकीय पातळीवर घेतला, की चौकशी समिती नेमणे आवश्यक ठरते. त्या समितीला आवश्यक तो वेळही द्यावा लागतो. त्यानंतर त्या समितीच्या शिफारशींचा प्रशासकीय खात्यात विचार केला जातो. अशा शिफारशींना कायद्याचे स्वरूप देण्यासाठीही वेळ द्यावा लागतो.

काळ्या पैशाला प्रतिरोध करणारे विधेयक आता लोकसभेपुढे येईल. यात झडती, जप्ती, यांच्यासाठी जादा अधिकार देण्यात येणार आहेत. हिशेबांची तपासणी, कर चुकविणाऱ्यांच्या विविध वाटा बुजविण्यासाठी उपाय योजण्यास मी सुरुवात केली आहे.

१९७३ च्या आर्थिक कायद्यानुसार शेतीचे उत्पन्न व बिनशेतकी मिळकत यांचा करपात्रतेसाठी एकत्र हिशेब करण्यात येईल. याखेरीज आणखी काही प्रशासकीय उपाययोजनाही केली आहे. प्राप्तिकर खात्यामार्फत ज्या झडत्या होतात, त्यांची संख्या १९७०-७१ मध्ये १९५ होती. त्यांत १४० लाख रुपयांची मालमत्ता जप्त झाली होती, १९७३-७४ च्या पहिल्या नऊ महिन्यांतच ३९५ झडत्या झाल्या आणि ३२७ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली. तसेच खटल्यांची संख्याही वाढली आहे. प्राप्तिकर चुकविणाऱ्यांची पाहणीही चालू आहे.

या सर्वांमध्ये महत्त्वाची मोहीम चालू आहे, ती स्मगलर्सना पकडण्याची. हीच

मोहीम साठेबाजांविरुद्ध चालू केली जाईल. या सर्व प्रशासकीय उपायांच्या संकलित परिणामामुळे काळ्या पैशाला आलेले स्थैर्य किंबहुना प्रतिष्ठाही नाहीशी होईल. त्यांना हादरा बसेल. प्रत्यक्ष होणा-या आर्थिक फायद्याइतकच ह्या सामाजिक तिरस्कारांच्या भावनेला व सरकार काही ठाम निर्णय घेऊन पावले उचलते, या जनतेमध्ये निर्माण होणा-या विश्वासाला अधिक महत्त्व आहे, असे मी मानतो.

उद्योगपती बँकांकडून पैसे घेतात. व्यापारीही बँकांच्या पैशावर उलाढाली करतात. साठेबाजीही यातूनच होते. तेव्हाही त्यांची रसद तोडली, तर असल्या जुगारी प्रवृत्तींना आळा बसेल, ही माझी भूमिका होती. यालाच काही लोकांनी पत गोठवणे (Credit Squeeze) म्हटले. खरे तर पत पुरवण्याची ती लोकाभिमुख योजना आहे. गरजेच्या उद्योगांना पतपुरवठा तर चालू ठेवायचा, पण तो पैसा अनिष्ट मार्गांनी जाऊ नये, म्हणून त्यावर नियंत्रण ठेवायचे, हे आमच्या धोरणाचे मुख्य सूत्र.

गरजेच्या उद्योगक्षेत्रांसाठी व शेतीसाठी राष्ट्रिय बँकांनी जो कर्जाऊ पैसा दिला, त्यात वाढ झालेली आढळेल. जून १९६९ मध्ये विभागासाठी ४४९ कोटी रुपये दिले होते, तर जून १९७३ मध्ये १२९५ कोटी दिले होते. तसेच निर्यात-व्यापारासाठी दिलेली पत जून १९६९ मध्ये २५८ कोटी रुपये होती, तर डिसेंबर १९७३ मध्ये ती ६७७ कोटी रुपये होती. त्याला व्याजाचा दरही कमी होता. तसेच बँकांचा पैसा अनिष्ट मार्गांनी वापरला जाऊ नये, म्हणूनही रिझर्व्ह बँकेने काही उपाय योजले. मला वाटते, या सर्वांचा परिणाम आता दिसू लागला आहे. मी जी प्रारंभी आर्थिक धोरणाची त्रिसूत्री सांगितली, तीनुसार हे सर्व उपाय योजले आहेत.

भारतातील चलनवाढ हा एकूण जागतिक चलनवाढीचाच एक भाग आहे, असे जेव्हा आम्ही म्हणतो, तेव्हा त्याचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. आपण उद्योगधंद्यासाठी काही यंत्रमालाची आयात करतो. धान्यही आयात करावे लागते. हे सर्व अपरिहार्य आहे. पेट्रोलच्या किमती वाढल्या आहेत. एकतर विकसनशील देशांनी साधारणपणे ३ ते ४ टक्के चलनवृद्धी केली, तर ती धोकादायक असत नाही.

पण आपल्या देशाची अर्थव्यवस्था ही मुळातच तोळामासा प्रकृती असणा-या माणसासारखी आहे, की नैसर्गिक संकटे, युद्ध यांच्यासारख्या आकस्मित संकटांनी किंवा संपासारख्या राजकीय कारणांनी त्यात थोडा जरी अडथळा आला, तरी ती लवकर विस्कळीत होते आणि सगळे अंदाज चुकतात.

शेतीचा विकास नियमित झाला, औद्योगिक उत्पादन सातत्याने वाढत गेले आणि लोकसंख्येचे प्रमाण कमी होत गेले, तरच आपल्या देशात काही आर्थिक स्थिरता येईल. नाही, तर त्याचा तोल सांभाळणे कठीण होऊन बसेल. त्यांच्या जोडीस समाजद्रोही शक्तींच्या कारवायाही आपल्या अडचणींत भर टाकतात, हे काळ्या पैशाच्या उदाहरणावरून दिसून येते. हा काळा पैसा गरजेच्या वस्तू विकत घेण्यात आणि त्यांचे साठे करून ठेवण्यासाठी वापरला जातो. मग महागाई होते, कामगारांच्या मागण्या वाढतात, असंतोष उत्पन्न हातो, उत्पादनाचे यंत्र बिघडते आणि या सर्वांच्या जोडीस दुष्काळासारख्या आपत्ती त्याच वेळेस आल्या, तर चलनवाढ होणे अटळ ठरते.

जनमानसात सामाजिक न्यायाची जाणीव निर्माण झाली, तरी प्रत्येक नागरिकात आंतरिक व सामाजिक शिस्त नसेल, तर या जाणिवेचा काही उपयोग होणार नाही. मला दिसते, ते असे, की सामाजिक न्यायाच्या किंवा समाजवादाच्या जाणिवेने आपण राजकीय निर्णय घेतले, त्यांसाठी काही संस्था निर्माण केल्या, काही पद्धती निश्चित केल्या, पण आपण जेवढे श्रम करतो आणि उत्पादन करतो, त्यापेक्षा अधिक प्रमाणात सरकार वा समाज परतफेड करेल, ही आपली अपेक्षाच आपण टाकून दिली पाहिजे. चीनने राष्ट्राची उभारणी केली, ती या सामान्य माणसांच्या ताकदीवर व निष्ठेवर. अगदी साधे उदाहरण साखरेचे घेऊ. आपल्या जीवनात गहू, तांदूळ, कापड यांच्याइतकी साखर आवश्यक आहे का? निश्चित नाही. ती काही प्रमाणात कमी वापरून ज्या देशात आपल्याला जास्त भाव मिळेल, तेथे पाठविली, तर आपल्या देशाचा आर्थिक फायदा होईल. रशियाने अनेक वस्तूंचा वापर स्वत:च्या नागरिकांसाठी मर्यादित केला. काहींवर बंदीही घातली. चीनने असेच सामाजिक

नियमन कठोरपणे केले. आणि त्यातूनच त्या राष्ट्राचे अर्थकारण समर्थ व स्वावलंबी केले. आपल्यापुढे प्रश्न असा आहे, की लोकशाहीमध्ये अशा प्रकारची सामाजिक शिस्त आणि कार्यक्षमता आपण आणू शकू का? केवळ राजकीय मान्यता (सँक्शन) येथे अपुरी पडते. व्यापक समाजहिताची बुद्धी व त्यासाठी त्यागाची बिनतक्रार सिद्धता यांची आज नितांत गरज आहे.

आशा-निराशेच्या हिंदोळ्यावर बसून नुसते झोके घेणे हितावह ठरणार नाही. आत्मविश्वासाने व निर्धाराने योग्य मार्ग आपण चोखाळणार किंवा नाही, हा प्रश्न आहे. केवळ रुपयाचे मूल्य हा आर्थिक विकासाचा निकष नव्हे. कारण, कदाचित या क्रमाने रुपयाची किंमत आणखी घटत गेली, तर देशाचा विकासच झाला नाही, असे म्हणावे लागेल. मला तरी असे वाटते, की सामान्य माणसाच्या दृष्टीने हा विचार गंभीर असला, तरी भारताच्या अर्थकारणाचे स्थित्यंतर आपण घडवून आणले आहे, ही जाणीव व प्रत्यक्ष वस्तुस्थिती महत्त्वाची आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण विकासाची यंत्रणा उभी केली आहे. काही पायाभूत उद्योगधंद्यांचा विकासही केला आहे. पण तरीही हवी तशी, अपेक्षित प्रगती होत नाही. ती का होत नाही, या समस्यांचे मूळ शोधायला हवे. जी विकास-यंत्रणा आपण उभी केली; वीज निर्मिती व पाटबंधाऱ्यांची उभारणी करण्यासाठी जो खर्च केला, त्याचे पुरेसे फायदे आपल्याला मिळत नाहीत. योजना आखताना किफायतशीर मूल्यप्रमाणाचा (Benefit cost ratio) विचार केला जातो. पण त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना त्याचा अभाव जाणवतो. या त्रुटीची अनेक कारणे देता येतील. पण असे समर्थन मला समर्थपणे करावेसे वाटत नाही. उदाहरणे देऊनच बोलायचे, तर आपण पाटबंधाऱ्यांचे पाणी पुरेसे वापरतो का? वीजउत्पादनाची आपली योजना कमी का पडते? रासायनिक खतांचे उत्पादन पुरेसे का होत नाही? शेतीचा विकास उद्योगधंद्यांना कच्चा माल पुरवण्याइतका होतो का? व शेतीचे उत्पादन अन्नाच्या बाबतीत स्वावलंबी होण्याइतक्या वेगाने व सामर्थ्याने का होत नाही? व्यवस्थापन व कामगारांचे औद्योगिक संबंध यांत त्रुटी आहेत का? या सा-या प्रश्नांचा विचार साकल्याने केला पाहिजे. भारताची अर्थव्यवस्था शेतकीप्रधान राहणार आहे, हे गृहीत धरलेच पाहिजे. पण अर्थव्यवस्था सरंजाम-युगातील तशीच ठेवली आणि बाकीच्या गोष्टींचे

आधुनिकीकरण करीत राहिलो, तर आपली अर्थव्यवस्था पांगळीच राहील. म्हणूनच शेतीविकास हा औद्योगिकदृष्ट्या व शेतीच्या धंद्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे.

अद्यापि आवश्यक त्या जमीनविषयक सुधारणा आपण करू शकलेलो नाही. परंतु अर्थखात्यापुरते बोलायचे झाले, तर ग्रामीण क्षेत्रातील शेतीवरील प्रत्यक्ष करयोजनेचा सर्वांगीण विचार १९७२ मध्ये डॉ. राज यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून केला आहे. शेतीविकासासाठी सरकार जो पैसा खर्च करते, त्याची परतफेड ग्रामीण क्षेत्रातील शेती-उत्पन्नातूनच झाली पाहिजे, ही त्यामागची भूमिका होती. या प्रश्नाबाबत मी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चाही केली होती. आता पुढची जबाबदारी राज्य सरकारांची आहे. शेतीवरील प्रत्यक्ष करातून येणारे उत्पन्न १९६७-१९७१ या काळात साधारणपणे १३० कोटी रुपये होते. १९७१ मध्ये एकूण कर-उत्पन्नाच्या ते ६.८ टक्के होते. राजसमितीने जमीनधारण-क्षेत्राचा कर बसवावा, असो सुचविले होते. त्यानुसार हरयाणा, हिमाचल सरकारांनी कायदे केले आहेत. काही वेळा राज्य सरकारांना पाटबंधाऱ्यांच्या योजनेत आर्थिक तूट येते. १९७१-७२ मध्ये ही तूट १४० कोटी रुपयांची होती. पाटबंधाऱ्यांतून दिल्या जाणा-या पाण्यावर कर बसवून ही तूट भरून काढावी, असे आम्ही राज्य सरकारांना सुचविले आहे.

राज्य सरकारांचे वेगळे आर्थिक प्रश्न आहेतच. त्यांची आर्थिक ताकद मर्यादित असते. आरोग्य, शिक्षण आदी सामाजिक कल्याण-योजनांची जबाबदारी त्यांच्यावर असते. त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांना मदतीची गरज असते. शिवाय दुष्काळ, महापूर यांसारख्या आपत्ती अधूनमधून त्यांच्या वाट्यास येतातच. राज्य सरकारांच्या आर्थिक समस्यांचा विचार मी प्रत्येक राज्याशी वेगवेगळ्या चर्चा योजून केला. त्यांच्या पंचवार्षिक योजना तयार होण्यापूर्वी त्यांचे उत्पन्न किती आहे, ते किती व कोणत्या क्षेत्रात वाढविणे रास्त आहे, त्यासाठी त्यांनी काय केले पाहिजे, याची तपशिलवार चर्चा केली. यापुढे ओव्हर-ड्राफ्टला मर्यादा असतील, याचीही त्यांना निर्धारपूर्वक जाणीव द्यावी लागली आहे. एके काळी ४०० कोटी रुपयांपर्यंत

ही रक्कम असावयाची. आधी अमर्यादित खर्च करावयाचा आणि मग केंद्र सरकारवर दडपण आणून त्याला मान्यता द्यायची, असेही प्रकार घडावयाचे. म्हणूनच हा या बाबतीत काही शिस्त आणण्याचा, आणि त्यांच्या खर्चाचे नियमन करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

राज्य सरकारांच्या अडचणींची ज्यांना कल्पना आहे व ज्यांनी राज्यात अर्थमंत्री व मुख्यमंत्री म्हणून काम केले आहे, त्या श्री. ब्रह्मानंद रेड्डींनाच आम्ही अर्थ मंडळाचे अध्यक्ष केले. त्यांनी सर्वांगीण अभ्यास करून आपल्या शिफारशी केल्या. केंद्र सरकारने त्या सर्व स्वीकारल्या आहेत. राज्य सरकारांना केंद्राच्या उत्पन्नातून निश्चित वाटा मिळतो. तसेच कर्जउभारणीची परवानगी दिली जाते. त्यांच्या पंचवार्षिक योजनांना केंद्र सरकार आर्थिक साहाय्य देतेच.

राज्य सरकारांच्या अर्थसंकल्पांची आम्ही छाननी करतो. नियोजन मंडळातही सांगोपांग विचार केला जातो. त्यांचा राज्यकारभारावरील खर्च, कर्जाच्या वसुलीचे प्रमाण, राज्याच्या वीज मंडळाचा कारभार आदीविषयीची पाहणी आम्ही करतो. आवश्यक तो पैसाही राज्य सरकारे उभारतात, की नाही, हेही पाहातो. राज्य सरकारांचे प्रश्न किंवा आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या प्रदेशांचे प्रश्न यांचाही विचार केंद्र सरकार करीत असतेच. प्रादेशिक विकास समतोल व्हावा, अशी माझी स्वत:ची भूमिका आहे. पण त्यासाठी राज्य सरकारांनीही उत्पन्नवाढीचे प्रयत्न केले पाहिजेत, असा आग्रह मी धरला. त्याचा परिणामही चांगला झाला. अनेक राज्यांनी आपले पुरवणी अर्थसंकल्प तयार करून तूट भरून काढली, हे त्याचे गमक. विक्रीकर वाढविण्यासारख्या सोप्या उपायापेक्षा अधिक व्यापक अशी करयोजना राज्यांनी करावी, असेही मी राज्यसरकारांना सुचविले होते. मला त्यांनी चांगले सहकार्य दिले. श्री. धनंजयराव गाडगीळांनी मागे एक सूचना केली होती, की नियोजनाच्या उद्दिष्टांशी सुसंगत अशी विविध योजनांची अंमलबजावणी होते, की नाही, यावर सतत नजर ठेवणारी यंत्रणा असणे आवश्यक आहे. अशा प्रकारची समीक्षा किंवा चिकित्सा वेळोवेळी होते. केवळ खर्चास संमती देणारे, ते अर्थमंत्रालय, या मर्यादित

अर्थानेच आपण अर्थखात्याकडे पाहात असल्याने योजनांची उद्दिष्टे सफल होतात, की नाही, याकडे खात्याचे म्हणावे तसे लक्ष असत नाही किंवा त्याचे नियंत्रण असत नाही. अपरिहार्यपणे, खर्च केल्यानंतर करावयाच्या हिशेबतपासणीसारखी अर्थखात्याची भूमिका असते. अर्थमंत्रालयाची ही भूमिका बदलून ती अधिक उपयुक्त करावी, यावर माझा भर होता. अशा प्रश्नांचा साकल्याने विचार करण्यासाठी माझ्या सूचनेवरून भारत सरकारने केंद्रीय अर्थ सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीने काही मूलभूत बदल सुचविले आहेत व केंद्रीय मंत्रिमंडळानेही ते संपूर्णत: स्वीकारले आहेत. एवढेच नव्हे, तर त्यांची अंमलबजावणीही सध्या चालू आहे. या अंमलबजावणीनंतर माझ्या मते अर्थ खाते अधिक व्यापक भूमिकेवरून परिणामकारकपणे काम करू शकेल.

आपल्या उणिवांप्रमाणेच काही जमेच्या गोष्टीही आपण समजावून घेतल्या पाहिजेत. यांपैकी दोन गोष्टींचा मी प्रथम उल्लेख करतो. पहिली म्हणजे बँकांच्या राष्ट्रियीकरणामुळे आपण एक अद्‌वितीय प्रयोग मोठ्या प्रमाणावर सुरू केला आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. राष्ट्रियीकरण एका विशिष्ट राजकीय पार्श्वभूमीवर झाले. त्यामुळे साहजिकच त्याबद्दलच्या लोकांच्या अपेक्षा वाढल्या होत्या. त्या पु-या झाल्या नाहीत, तर अपेक्षाभंग होण्याची शक्यता आहे. म्हणूनच आपल्या बँकांचे प्रश्न आपण समजावून घेतले पाहिजेत. म्हणजे हा अपेक्षाभंग होणार नाही. एक तर आपल्या बँकांचा धंदा हा व्यापारी व औद्‌योगिक क्षेत्रांतच मर्यादित होता. त्यामुळे त्यातील धोरण, त्याचे नेतृत्व, त्यातील प्रशिक्षण हे केवळ शहरी व औद्‌योगिक स्वरूपाचे व त्या घाटाचे होते. विकासाच्या प्रक्रियेशी त्याचा संबंध जोडणे हे आमचे पहिले कार्य होते. म्हणजे बँकांना काही सामाजिक कर्तव्ये व उद्दिष्टे असली पाहिजेत, ही आमची भूमिका आम्हांला राष्ट्रियीकरण झालेल्या बँकांना समजावून सांगावयाची होती. ग्रामीण क्षेत्राशी त्यांचा संबंध जोडावयाचा होता. ज्या राज्यांत या बँका कार्य करतात, तेथील राज्य सरकारे, स्थानिक आर्थिक संस्था यांच्याशी विचारविनिमय करणेही आवश्यक होते. म्हणून मी स्वत: हे काम अंगावर घेतले. बँकांचे अध्यक्ष संचालक व मंडळ यांच्याशी मी वर्षातून दोनदा बँकांचे गुंतवणूकीचे

धोरण, पतपुरवठा, इत्यादींविषयी सखोल चर्चा करीत असे. तसेच प्रत्येक राज्यात जाऊन तेथील राज्य सरकारचे प्रतिनिधी, बँकांचे प्रादेशिक अधिकारी व केंद्रीय अर्थ खात्याचे अधिकारी यांच्या संयुक्त बैठका घेत असे. अशा दोन फे-या मी सर्व राज्यांत केल्या. ग्रामीण अर्थव्यवस्थेत बँकांचा कसा हातभार लागेल, बँकांच्या शाखा सर्वत्र कशा काढता येतील, इत्यादींचा विचार आम्ही केला. बँकींग व्यवहार जनताभिमुख करून त्याची कार्यक्षमता व उपयुक्तता वाढवावयाची होती. अल्पावधीत घडणारे हे स्थित्यंतर नव्हे, हे आम्ही जाणतो. पण मी असे आत्मविश्वासाने म्हणेन, की आम्ही आता योग्य दिशेने वाटचाल व कृती करण्यास सज्ज आहोत. या साहसी उपक्रमांची फळेही आता लवकरच दिसू लागतील.

दुसरी जमेची बाजू म्हणजे आमचे सार्वजनिक उद्योगक्षेत्र. याच्यावर बरीच टीका केली जाते. काही अंशी ती रास्तही आहे. पण सरकारने स्वत:च तज्ज्ञांकडून या क्षेत्राची चिकित्सा करवून घेतली आहे. काही खाजगी उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञांना आम्ही त्यासाठी या क्षेत्रात आणलेही आहे. त्यांच्या सल्ल्याप्रमाणे काही बदलही होत आहेत. देशाचा मोलाचा पैसा या क्षेत्रात गुंतला असल्याने त्यात सुधारणा केल्याविना आपली प्रगती होणार नाही, याची आम्हांला जाणीव आहे. या क्षेत्रामध्ये आता निपुण व्यवस्थापनाला आम्ही अग्रक्रम दिला आहे. तेथील औद्योगिक संबंध सुधारत आहेत. त्या क्षेत्रातील अंतर्गत सहयोग वाढत आहे.

सार्वजनिक उद्योगक्षेत्रातही काही वेळा अपयश येते, याचे कारण त्यात आपल्याला पूर्वानुभव नसतो. माणसे नवीन असतात. ज्या धंद्याचे राष्ट्रियीकरण झालेले असते, त्यांचेही साचत आलेले काही गुंतागुंतीचे प्रश्न असतात. कोळशाच्या खाणीचे राष्ट्रियीकरण केले, तेव्हा या गोष्टीचा अनुभव आम्हांला आला. या व्यवसायात समाजद्रोही माणसे मोक्याची ठिकाणे अडवून बसली होती. खाणींची यंत्रसामग्री जुनी झाली होती. धंदाही विस्कळीत अवस्थेत होता. त्यातील उत्पादन व वाटप यात वाटा रोखून बसलेले दलाल होते. तेव्हां या सर्वांना तोंड देऊन पुढे जावयाचे कार्य अवघडच होते. पण अपयश आले, तरी ते तात्कालिक समजले पाहिजे. सार्वजनिक

उद्योगक्षेत्राचे भारतीय अर्थकारणातील स्थान अटळ आणि अढळही आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

काही अपरिहार्य अडचणींमुळे आणि वस्तूंचे भाव वाढल्यामुळे आपली नियोजनाची प्रक्रिया मंदावली आहे किंवा रुद्ध झाली आहे, हे खरे आहे. पण तरीही नियोजन अपरिहार्य आहे. किंबहुना माझे म्हणणे असे आहे, की आर्थिक क्षेत्रात विचारपूर्वक धोरण ठरवून त्याची अंमलबजावणी करण्यास पुरेसा अवधी दिला पाहिजे. तात्कालिक अपयशाने किंवा त्यामुळे येणा-या अप्रियतेच्या भीतीने हाती घेतलेली धोरणे अर्धवट सोडून कोणतेही बदल करता कामा नयेत. ही धरसोड आपल्याला अंती घातक ठरेल.

दुसरे सूत्र मी असे सांगेन, की विकासाच्या ज्या क्षेत्रात आपण भांडवल गुंतवीत आहोत, ते क्षेत्र व त्यातील गुंतवणूक चालू ठेवली पाहिजे. उदाहरणार्थ, विद्युत् उत्पादन, कालवे, रासायनिक खतांचे कारखाने इत्यादी आपल्याला आवश्यक असलेले विकास-प्रकल्प आपला लाभ होतो, की नाही, आणि त्या क्षेत्राची क्षमता पुरेपूर वापरली जाते, की नाही, यावर सतत लक्ष ठेवून त्याचा अर्थकारणास वाढता उपयोग कसा होईल, यासाठी सतत प्रयत्न केला पाहिजे. म्हणजेच विकासाची जी आयुधे, यंत्रणा आपण निर्माण केली, तिचा वापर झाला पाहिजे. तरच आपले औद्यौगिक उत्पादन वाढत राहील.

तिसरे सूत्र असे, की ज्या कार्यपद्धतीत ज्या विकाससंस्था आपण सुरू केल्या आहेत, त्यांत काही अडचणी येत असतील किंवा तेथे काही औद्योगिक संबंधांचे वा अन्य व्यवस्थापकीय प्रश्न उपस्थित होत असतील, तर त्यांकडे तातडीने लक्ष दिले पाहिजे. चवथे सूत्र म्हणजे आर्थिक विकासात सामाजिक न्यायाला प्राधान्य दिले पाहिजे व प्रादेशिक विषमता न येता समतोल विकास होईल, याची सतत काळजी घेतली पाहिजे.

पाचवे सूत्र औद्योगिक उत्पादनासंबंधीचे आहे. यात कामगारांचे हितसंबंध हा महत्त्वाचा प्रश्न आहे. पण येथे राष्ट्रिय हिताचा विचार सतत डोळ्यांसमोर ठेवला पाहिजे. संकुचित हितावर जास्त भर देणे कामगारांच्याही हिताचे ठरणार नाही. त्यांचे सर्व हक्क मान्य करूनही हे पथ्य पाळणे आवश्यक झाले आहे.

आता आपले औद्योगिक परवान्याविषयीचे धोरण व पद्धती यांत सुधारणा होत आहे. त्याचा योग्य तो परिणाम दिसू लागेल. औद्योगिक उत्पादनाचे धोरणही कारखानदारांना आता निश्चित करावे लागेल. समाजाला लागणा-या दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे प्रचंड प्रमाणावर उत्पादन करणे ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने व महागाई कमी करण्यासाठी आज आवश्यक आहे. गेल्या काही वर्षांत जी महागाई झाली आहे, तीत कारखानदारांनी केलेल्या कृत्रिम टंचाईचा, उत्पादनाचा व त्यातून वाढविलेल्या बेसुमार किंमतींचा वाटा आहे, हे विसरता कामा नये. म्हणून उत्पादनाची पातळीच वाढती ठेवली पाहिजे, एवढेच नव्हे, तर त्या उपभोग्य वस्तूंचे प्रकार किंवा त्यांचे वाटपही ग्राहकाला अनुकूल असे केले पाहिजे.

- आणि मला वाटणारी अगदी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाचा अशा प्रगतीबाबत निर्धार असायला हवा. त्यातून निर्माण होणारी वैयक्तिक व सामाजिक शिस्त व येणारी कार्यक्षमता महत्त्वाची आहे. आपण समाजाला किती देतो, याचा विचार करून मगच आपण समाजाकडे किती मागावयाचे, हे जर प्रत्येकाने ठरविले, तरच आज दिसणारा असंतोष कमी होईल. आणि आजच्या सर्व प्रकारच्या आर्थिक संकटांवर आपण मात करू शकू, असा माझा विश्वास आहे.

## १८. समाजाभिमुख शिक्षण

शिवाजी विद्यापीठात १ डिसेंबर १९७४ रोजी
केलेल्या दीक्षांत भाषणाच्या आधारे

महाराष्ट्राच्या आणि भारताच्या दृष्टीनेही हे वर्ष अत्यंत मोलाचे आहे. राजर्षी श्री. छत्रपती शाहू महाराजांची जन्मशताब्दी, छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्यारोहण त्रिशत संवत्सर आणि भगवान महावीर स्वामींचा २५०० वा निर्वाणदिन या वर्षातच आपण साजरे केले. त्यागभावनेला आवाहन करण्याचे, अहिंसेचा दिव्य आणि अक्षय संदेश देण्याचे, अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देण्याचे, जिद्द निर्माण करण्याचे आणि समतेचे नैतिक अधिष्ठान प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य आपल्या इतिहासात आहे. जीवनाच्या शाश्वत मूल्यांना उजाळा देणारे हे वर्ष आहे. असे असतानाही सभोवताली दलित समाजावर होत असलेले अन्याय पाहिले, म्हणजे उबग येतो, खंत वाटते, आत्मदंडन करावेसे वाटते. अशा घटनांमुळेच आपली सामाजिक आणि नैतिक मूल्ये धोक्यात येत आहेत. अर्थात शाश्वत मूल्यांना धक्का देणारी, सामाजिक जीवनात वा वर्तनात त्यांचे स्थान कमी अथवा नष्ट करणारी परिस्थिती आज निर्माण झाली आहे किंवा नाही, याबाबत कदाचित काहींचे मतभेद असू शकतात; परंतु तशी परिस्थिती निर्माण झाली आहे, असे मानल्यास मात्र ती गंभीर चिंतेची बाब ठरते. संभाव्य मतभेदाच्या पलीकडे असा चिंतेचा हा विषय आहे.

आजच्या आपल्या सगळ्याच समस्या दिवसेंदिवस मोठ्या गुंतागुंतीच्या आणि कठीण होत आहेत, हे खरे. ही गुंतागुंत आम्ही आपल्या वर्तनाने अधिक वाढवली, की कमी केली, हा प्रश्न क्षणभर बाजूस ठेवू या. सामान्यत: आपले लक्ष याच प्रश्नावर केंद्रित होत असते. आर्थिक संबंधांच्या, सामाजिक जातीजमातींच्या, धार्मिक वा भाषिक गटांच्या किंवा राजकीय पक्षोपक्षांच्या स्पर्धेत वा कलहात असे उद्रेक होणे स्वाभाविक आहे. तथापि विशिष्ट प्रसंग वा घटनांच्या बाबतीत दोष कुणाचा वा श्रेय कुणास द्यावयाचे, याचा विचार करीत असताना मूळ प्रश्नाच्या विस्ताराकडे,

स्वरूपाकडे दुर्लक्ष होता कामा नये, एवढेच मला सुचवायचे आहे. उदाहरणार्थ, अन्नधान्याच्या वाटप पद्धतीतील गुणदोष अवश्य तपासले पाहिजेत. परंतु तसे करीत असताना दरवर्षी अडीच टक्के वाढ होत असलेल्या साठ कोटी जनतेसाठी पुरेसे धान्य उत्पादन करण्याच्या वा पुरविण्याच्या प्रश्नाचे स्वरूप नजरेआड होऊ नये. निरनिराळ्या प्रश्नांच्या अशा तपासणीकडे लक्ष पुरविल्याने तात्कालिक गुणदोषांची कारणमीमांसा थोडीशी अधिक जबाबदारीने होऊ शकेल, असे वाटते. हे गुणदोष चर्चिलेच पाहिजेत. लोकशाही पद्धतीत अशा चर्चेतूनच योग्य मार्ग सापडू शकेल, असा माझा विश्वास आहे.

प्रत्यक्ष कृतीत गुंतलेल्या कार्यकर्त्याला योग्य मार्गदर्शन व्हावे, अशी अपेक्षा आपण विद्यापीठांकडून अग्रक्रमाने बाळगली आहे. परंतु आजच्या भारतातील विद्यापीठांचा वा सर्वच शिक्षणसंस्थांचा विचार करताना सर्वत्र निराशेचा सूर निघतो, ही माझ्या दृष्टीने अधिक चिंतेची बाब म्हणावी लागेल. वर्तमान परिस्थिती कठीण खरीच. सारेच प्रश्न अधिकाधिक अवघड होत चालल्यासारखे दिसतात. ते सोडविणे जसे आमच्या हाती आहे, तसे ते जागतिक परिस्थितीवरही अवलंबून आहे. याचा प्रत्यय अलीकडे सर्वच राष्ट्रांना येऊ लागला आहे. आधुनिक विज्ञान व तंत्रविद्या यांच्या योगाने सर्वांचेच भवितव्य परस्परावलंबी झाले आहे. सर्व घटकांचा संकलित विचार केल्यावाचून इत:पर कोणासही पुढे जाता येणार नाही. तथापि या बाबतीत भविष्यकाळात तरी आशेला जागा आहे काय? या प्रश्नाचे उत्तर देताना शिक्षणक्षेत्राकडेच वळून पाहावे लागते. म्हणूनच आजची परिस्थिती अधिक चिंताजनक वाटते. कारण शिक्षणाविषयीची निराशा ही भविष्याविषयीची निराशा होय.

या निरोशेचे आविष्कार विविध स्वरूपांत पाहावयास मिळतात. सभोवतालच्या प्रत्यही वाढत्या गुंतागुंतीच्या परिस्थितीवर मात करण्याच्या बाबतीत, तिला योग्य आकार देण्याच्या बाबतीत शिक्षण अपयशी ठरले आहे. यातून ही निराशा उद्भवते. आणि सामाजिक वातावरणाचे सर्व दोष शिक्षणक्षेत्रात प्रकर्षाने दिसू लागल्याने ती दुणावते. या निराशेच्या भावनेतून अनेक वडीलधारी मंडळी आजचे शिक्षण अगदी

कुचकामाचे झाले आहे, आजची शिक्षणपद्धती आमूलाग्र बदलली पाहिजे, थोडीफार सुधारणा केल्याने, लहानसहान बदल करून कार्यभाग साधणार नाही, असे म्हणू लागली आहेत. हे मूल्यमापन बरेच अर्थपूर्ण आहे, यात शंका नाही. तथापि सर्वच शिक्षणकार्याला दूषण देणे फारसे समर्थनीय वा योग्य होणार नाही, असे वाटते. कोणत्याही प्रकारचे असो, शिक्षण हे सर्वथैव दोषस्पद असू शकत नाही, ते काही दुष्कर्म नव्हे. त्यात दोष असू शकतात - नव्हे, आहेत. तथापि वाढत्या पिढीचा शिक्षणावरील विश्वासच नाहीसा करणे हा काही शिक्षणपद्धती सुधारण्याचा मार्ग नव्हे. भावी शिक्षणपद्धतीत आजचे अभ्यासक्रम, अध्यापन व परीक्षापद्धती इत्यादी गोष्टी पुष्कळच बदलाव्या लागतील, यात संशय नाही. आजचा औपचारिकपणाही बराच कमी होईल. तथापि हे सारे मान्य करूनही भावी पिढ्यांचा ज्यायोगे शिक्षणावरील विश्वास ढासळेल, असे काहीही करणे इष्ट नाही, असे मला वाटते.

वडीलधा-या मंडळींच्या निराशेची दुसरी बाजू म्हणजे तरुण पिढीतील वैफल्याची भावना, ही होय. आजकाल तरुण मंडळी काहीशी रागावलेली आहेत. आपण मिळविलेले शिक्षण प्रत्यक्ष जीवनातील काही प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत निरुपयोगी आहे; पदवी मिळाली, तरी नोकरी मिळत नाही, सामाजिक दर्जा सुधारत नाही, आर्थिक परिस्थिती बदलत नाही, असा अधिकाधिक नकारात्मक अनुभव आल्याने तरुणांचा भ्रमनिरास होऊ लागला आहे. आपली फसवणूक झाल्याने त्यांना वाटते, कोणी तरी आपला जणू विश्वासघातच केला आहे, असे वाटून त्यांच्या वर्तनात काही वेळा कटुताही दिसू लागते. जीवनातील स्पर्धा अधिक तीव्र बनत चालल्याने नोकरी वा कामधंदा मिळणे कठीण होते, पुढील मार्ग दिसेनासा होतो. अशा वेळी प्रस्थापित शिक्षणयंत्रणा व समाजरचनादेखील उलथून टाकावीशी वाटते. अशाच काहीशा भावनेमुळे कित्येकजण देश सोडून कायमच्या वास्तव्यासाठी अन्यत्र जातानाही दिसतात. इतर अनेकांच्या बाबतीत ते करीत असलेली कामे आणि त्यांनी मिळविलेले शिक्षण यांचा मेळ घालणे कठीण होते.

वडीलधा-या मंडळींची निराशा आणि तरुणांचे वैफल्य या एकमेकांना पूरक आणि

पोषक स्वरूपाच्या प्रतिक्रिया होत. शिक्षणपद्धतीवरील टीका जो जो कठोर होत जाते, तो तो तरुणांचा तिच्यावरील विश्वास अधिकाधिक ढासळत जातो. टीका होते, परंतु सुधारणा मात्र होत नाही, अशी परिस्थिती वर्षानुवर्ष पाहिल्यानंतर तरुणांनी बंडास प्रवृत्त होऊ नये, तर काय करावे? या प्रश्नाचे उत्तर सोपे नाही. आपण चालू पद्धतीचे समर्थनही करीत नाही आणि तिच्यात सुधारणाही करीत नाही. यामुळे निर्माण होणा-या अवस्थेत भावनांचा उद्रेक दृष्टीस पडला, तर आश्चर्य कसले?

शिक्षणकार्य हे केवळ नैतिक कार्य आहे, असे नाही. कोणत्याही सामाजिक कार्यास नैतिकतेचे अधिष्ठान लागते. त्यावाचून ते टिकाऊ व परिणामकारक होऊ शकणार नाही. शिक्षणकार्य हे तर याहून मौलिक स्वरूपाचे, म्हणजे चारित्र्य घडविण्याचे कार्य आहे.  त्यामुळे त्या क्षेत्रात आज आढळणारे अराजक समाज-जीवनाचे सारेच प्रश्न अधिकाधिक कठीण करीत जाणार, की काय, अशी भीती वाटते. ही भीती दूर करण्याचे व्यवहार्य मार्ग शोधले पाहिजेत. त्यासाठी आजच्या परिस्थितीचे काळजीपूर्वक विश्लेषण होणे आवश्यक आहे. मला तसा प्रयत्न करता येणे शक्य नाही. शिक्षणशास्त्रज्ञांचे, शिक्षकांचे, विचारवंतांचे ते कार्य आहे. केवळ विश्लेषण करून न थांबता प्राप्त परिस्थितीत सुधारणा करण्याचा मार्ग त्यांनी दाखवावा व तो प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्याची पद्धतही स्पष्ट करावी, एवढेच मी म्हणेन. तसे करताना विशिष्ट हितसंबंध व त्यांतून निर्माण होणा-या दुराग्रही वृत्तीला वा अन्य दोषांना मात्र त्यांनी बळी पडू नये.

हे आवर्जून सांगण्याचे कारण राजकीय नेते वा कार्यकर्ते यांच्यावर अशा दोषांचा आरोप नेहमी केला जातो, हे होय. राजकारणी लोकांना शिक्षणक्षेत्राच्या बाहेर ठेवले पाहिजे, असे शिक्षणक्षेत्रातील मंडळी आग्रहाने प्रतिपादन करताना आढळतात. शिक्षणक्षेत्राची स्वायत्तता टिकविण्यासाठी हे आवश्यक आहे, असे त्यांचे म्हणणे. उच्च शिक्षणाबाबत ही भूमिका योग्य आहे, असे म्हणता येते. परंतु समाजजीवनाच्या विविध गरजांशी शिक्षणाचा सांधा जोडला पाहिजे, त्यावाचून आजची निराशेची व वैफल्याची भावना जाणार नाही, ही भूमिका एकदा स्वीकारली,

की त्यातून स्वायत्ततेऐवजी पारस्परिक आदराची भावना व तिच्यातून उद्भवणारा संवाद-वितंडवाद नव्हे, यालाच प्राधान्य द्यावे लागते. अशा प्रकारच्या शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद सुरू व्हावा, या हेतूनेच मी काही विचार पुढे मांडीत आहे.

शिक्षणक्षेत्राविषयी सार्वत्रिक असमाधान आणि तरी देखील सुधारणेचा अभाव या वस्तुथितीचा उलगडा कसा करणार? तिच्या मुळाशी इच्छाशक्तीचा अभाव आहे, की विचारांची वाण आहे, की त्या वस्तुस्थितीतच अंतर्भूत होणा-या सुधारणेच्या मार्गातील काही अडचणी आहेत? याचं उत्तर शोधलं पाहिजे. अडचणी निर्माण होण्याचे एक कारण गेल्या पंचवीस वर्षांत शिक्षणाची झपाट्याने झालेली वाढ होय. या वाढीमुळे शिक्षणाला एक प्रकारचे सामुदायिक (mass) स्वरूप प्राप्त झाले आहे. दारिद्र्यामुळे पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी पालकांऐवजी राज्यावर वाढत्या प्रमाणात पडू लागली आहे. शिवाय, निरीक्षणाची व नियंत्रणाची जबाबदारी ब-याच प्रमाणात राज्याकडे आहेच. यामुळे रचनात्मक किंवा कार्यपद्धतीतील कोणताही बदल असो, त्याचे पडसाद व्यापक स्वरूपात सर्वत्र उमटतात. शासनात्मक (administrative) आणि शैक्षणिक प्रश्न ही विभागणीदेखील समाधानकारक ठरेल, की नाही, याबद्दल शंकाच नाही. उदाहरणार्थ, अभ्यासक्रमातील एखादा विषय बदलून त्याऐवजी दुसरा घालणे हा वास्तविक शैक्षणिक प्रश्न. परंतु त्यायोगाने लागलीच काही शिक्षक बेकार होण्याचा वा अन्य काहींची कमतरता भासण्याचा, आणि म्हणून एका परीने राजकीय स्वरूपाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. जे आहेत, त्यांच्यावरच भागवावे, असे म्हटल्यास शिक्षणाचा दर्जा खालावण्याचा धोका निर्माण होतो आणि अभ्यासक्रम बदलण्याचे प्रयोजनच नाहीसे होते. काही वेळा स्वायत्ततेचा विचार केवळ उच्च शिक्षणापुरताच मर्यादित आहे, असे म्हटले जाते. परंतु तेथेही माध्यमिक शाळांसाठी लागणारे शिक्षक तयार करण्याची जबाबदारी विद्यापीठांवर असल्याने अडचणी संभवतात. म्हणून शासन आणि शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्ते यांनी एकमेकांविषयी आदर बाळगून देवाणघेवाणीच्या भूमिकेतूनच शैक्षणिक प्रश्न हाताळणे उचित ठरते.

जातीजातींत विभागल्या गेलेल्या आणि जन्मसिद्ध उच्चनीचतेच्या कल्पनांवर आधारलेल्या आमच्या समाजात बहुसंख्य लोक शिक्षणाला हजारो वर्षे वंचित झालेले होते, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. ज्ञानोपासना, ज्ञानाचे संवर्धन हे या समाजात विशिष्ट जातीचेच कार्य होते. अशा समाजात शिक्षण सर्वांना खुले होणे, हा एक महान क्रांतीचाच आरंभ होता. जन्मसिद्ध श्रेष्ठतेऐवजी गुणांच्या आधारावर तो ठरणे म्हणजे या समाजाचा कायापालट होणे, ही एक महान क्रांतीच होय. या क्रांतीचा आरंभ सुमारे दीडशे वर्षांपूर्वीच आमच्याकडे झाला. शिक्षणाचे हे रहस्य ओळखून त्या दिशेने प्रत्यक्ष कार्यप्रवण होणारांत, महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास, महात्मा ज्योतिराव फुल्यांनाच अग्रपूजेचा मान दिला पाहिजे. दादाभाई नौरोजी, जगन्नाथ शंकरशेट, छत्रपती शाहू महाराज, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, आगरकर, महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख अशा अखिल भारताला ललामभूत झालेल्या विभूतींनी शिक्षण-प्रसाराची उज्ज्वल परंपरा निर्माण केली. शिक्षणप्रसाराची कल्पना त्यांच्या थोर कार्यामुळे आमच्या मनोभूमीत खोलवर रुजली. भारतीय पातळीवरही राजा राममोहन रॉय, सय्यद अहमद अशांसारख्या थोर व्यक्ती होत्याच. अलिकडच्या काळातील आम्हांला परिचित उदाहरण म्हणजे सयाजीराव महाराजांचे. तात्पर्य, मनोभूमीत रुजलेल्या या आकांक्षेला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वाव मिळणे अगदी स्वाभाविक होते. मर्यादा होत्या, त्या फक्त साधनसामग्रीच्याच.

स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर झालेला शिक्षणप्रसार हा या वैचारिक आणि सामाजिक परंपरांचा परिपाक म्हणावयास हवा, पण त्यातही एक मोलाचा विचार होता. आपल्यापुढील निरनिराळे प्रश्न सोडवायचे झाल्यास त्यासाठी अर्थिक विकास झपाट्याने केला पाहिजे, याविषयी या सर्व विचारवंतांचे एकमत होते. आपल्या देशात प्रांत, भाषा, धर्म यांची असलेली विविध रूपे अशी गुंतागुंतीची आहेत, की त्यामुळे आर्थिकच काय, परंतु इतर राजकीय, सामाजिक क्षेत्रांतील प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे कामही अधिक गुंतागुंतीचे व अवघड होते. यासाठी देशाच्या या विविधतेत अंतर्भूत असे जे

ऐक्य आहे, ते आधी शोधावे लागेल. आणि ते शोधण्यासाठी लोकशाहीची पद्धती हीच योग्य निर्णयपद्धती आहे, हे मान्य करावे लागते.

लोकशाही म्हणजे केवळ बहुमताने निर्णय घेण्याची पद्धती, असे न मानता ती जीवननिष्ठा बनावी लागेल, तरच तिचा पाया भक्कम होईल, याची जाणीवही अनेकांना होते. जात, गोत, धर्म, भाषा, प्रदेश, प्रतिष्ठा, पैसा इ. सर्वांपेक्षा व्यक्तीचे व्यक्ती म्हणून प्राथम्य मान्य केल्यावाचून लोकशाही ही जीवननिष्ठा होऊ शकत नाही. तशी ती झाली पाहिजे. लोकशाही निर्णयपद्धती वा राज्यव्यवस्था राबवून, डोईस मत ही तरफ वापरून समतेवर आधारलेला समाज निर्माण करण्याचे उद्दिष्ट आपण पुढे ठेवले आहे. असा समाज निर्माण करण्याचे आर्थिक विकास हे देखील एक महत्त्वाचे साधन आहे. अशा समाजरचनेचे स्वप्न साकार व्हावे, यासाठी शिक्षणाची आवश्यकता आणि उपयुक्तता ध्यानी घेऊन आपण प्रयत्नशील राहिलो. स्वातंत्र्यात्तर काळात झालेल्या शिक्षणप्रसाराची ही खरी पार्श्वभूमी आहे, असे मला वाटते.

शिक्षणप्रसाराचा हा मूळ हेतू लक्षात घेता त्याबाबतची आपली जबाबदारी ध्यानात येईल. हा शिक्षणाचा प्रसार वाढता राहिल्याने त्याचा दर्जा खालावेल, अशी तक्रार अनेक वेळा कानांवर येते, परंतु हा केवळ तात्कालिक परिणाम मानावा लागेल. उलट, समाजाची औद्योगिक विकासाकडे वाटचाल सुरू झाली, की त्यातील सगळे व्यवहार अधिक वैशिष्ट्यपूर्ण होत जातात आणि ते चालविण्यासाठी विशिष्ट स्वरूपाचे ज्ञान, कौशल्य व क्षमता असणे आवश्यक ठरते. शिकलेले लोक मूठभर असतील, तर अशा प्रगतशील समाजाचे व्यवहार सुरळीतपणे चालूच शकणार नाहीत, ही गोष्ट आजच्या सुशिक्षितांनी ओळखली पाहिजे. शिक्षणाचा प्रसार सुरू झाला, की त्याचा कस वा दर्जा सुधारण्याची इच्छा समाजातच निर्माण होईल आणि कालांतराने आमचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोणही बदलू लागेल. शिक्षण ही ख-याखु-या अर्थाने समाजाची जबाबदारी बनेल.

शिक्षणाच्या दर्ज्याचा विचार करताना परंपरागत चौकटीतून आम्हांला बाहेर पडावे लागेल. मूठभर लोक शिकत असताना शिक्षणक्रमाचे जे स्वरूप योग्य ठरेल, ते आता सर्व समाजच बहुसंख्येने शिक्षणाकडे वळत असताना बदलावयास नको काय? प्रश्न केवळ शिक्षणाचा आलेख बदलून सुटणार नाही. शालेय शिक्षणक्रमाची ११ वर्षे आणि महाविद्यालयाची ४ वर्षे याऐवजी १०+२+३ असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा त्यात फक्त आकड्यांचे कोष्टक बदलून बेरीज सारखीच काढण्याची कल्पना अभिप्रेत आहे, असे मला वाटत नाही. शिक्षण समाजाभिमुख करण्याच्या दिशेने टाकलेले ते पहिले महत्त्वाचे पाऊल होय. ते फलदायी होण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमात विविध प्रकारच्या कौशल्यांना, व्यावसायिक हुन्नरांना, बौद्धिक क्षमतेला स्थान मिळाले पाहिजे आणि त्याची नव्याने उभारणी झाली पाहिजे. हे बदल करणे वाटते तितके सोपे नाही. कारण एका परीने ते शिक्षकांतील बदलच होतात. त्यासाठी शिक्षकांचा दृष्टिकोण बदलणे इष्ट व आवश्यक ठरते. नवे कौशल्य व ज्ञान प्राप्त करून घेण्याची शिक्षकांची तयारी नसेल, तर विद्यार्थ्यांना ते कसे प्राप्त होणार? निदान तरुण शिक्षकांनी तरी प्रतिष्ठेची खोटी कल्पना उराशी न बाळगता, पगार, महागाई, नोकरीचे स्थैर्य इत्यादी प्रश्नांबरोबरच इकडेही लक्ष द्यावे आणि आपला जबाबदारीचा वाटा उचलावा, असे मी सुचवीन. यापुढे सर्व समाजच सतत शिकत राहिला पाहिजे. विद्यापीठातून बाहेर पडलो, की शिक्षण संपले, हा औपचारिक दृष्टिकोण झाला. त्याच्यापुढे जाण्याची गरज आता निर्माण होत आहे. अधिकाधिक होणार आहे. आणि या बाबतीत सुशिक्षितांनी-विशेषत: शिक्षकांनी-चांगला आदर्श घालून दिला पाहिजे, असा मी आग्रह धरीन.

सभोवतालचे जीवन आज झपाट्याने बदलत आहे, या बदलाची गती वाढविण्याचे प्रयत्नही आपण करीत आहोत. विज्ञान आणि तंत्रविद्या यांच्या योगाने आजच्या जगात प्रचंड क्रांती होत आहे. जग लहान होत आहे. जीवनाची सर्व अंगोपांगे तंत्रविद्येने व्यापली आहेत. सर्व क्षेत्रांत होत असलेल्या या बदलांची गती पाहिली, म्हणजे मन क्षणभर भांबावून जाते. या घटनेचा एक साधा अर्थ असा, की यापुढे भविष्यकाळातील प्रश्न

सोडविताना भूतकाळाचा फारसा उपयोग होऊ शकणार नाही. परंपरेचे प्राबल्य असलेल्या आमच्या समाजात परंपरेचा अर्थ पुन्हा नव्याने तपासण्याची गरज निर्माण होईल आणि भविष्याकडे अधिकाधिक दृष्टी वळवावी लागेल. आजची श्रद्धास्थाने समूळ नाहीशी होती, असे नाही, परंतु आजवर चालत आलेल वाद, कलह, भेदाभेद हे सारेख अप्रस्तुत व अयोग्य म्हणून सोडावे लागतील, यात मुळीच शंका नाही. श्रद्धांचा अर्थ पुन्हा नव्याने लावावा लागेल, ध्येयसृष्टी नीट पारखावी लागेल. ही जबाबदारी नव्या तरुणांना घ्यावी लागणार आहे - हे सर्व सापेक्षाने साधता यावे, यासाठी केवळ ज्ञानाची उपासना वा बुद्धीची जोपासनाच करून चालणार नाही, तर भावनांची प्रगल्भता आणि अंत:करणाचा मोठेपणा अंगी असणे आवश्यक आहे. या दृष्टीने आजच्या शिक्षणक्रमातील खेळ, सांस्कृतिक कार्य इत्यादींचा व त्याचबरोबर राष्ट्रिय छात्रसेना, नॅशनल स्टुडंटस् सर्व्हिस किंवा महाराष्ट्रातील भूसेना अशांसारख्या उपक्रमांकडे पाहिले पाहिजे. तरुण विद्यार्थी मित्रांना सामाजिक परिस्थितीचे ज्ञान यथार्थ आकलन व्हावे आणि त्यांच्या भावनांचे शुद्धीकरण होऊन सामाजिक समता-स्थापनेच्या तीव्रतेची त्यांच्या मनात वाढ व्हावी, हा या उपक्रमांमागील हेतू आहे. कोण उत्तम खेळतो, याला महत्त्व आहेच, परंतु त्या बरोबरच जिंकला किंवा पराभूत झाला असताना तो कसा वागतो, याला तितकेच किंबहुना त्याहूनही अधिक महत्त्व आहे, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

शिक्षणक्षेत्राची स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या गेल्या सत्तावीस वर्षांत पुष्कळच वाढ झाली आहे. शिक्षणसंस्थाही वाढल्या आहेत. येथील दरडोई उत्पन्नाच्या मानाने प्राथमिक शिक्षण घेणाऱ्यांची संख्या पाहिल्यास आपल्यासारख्या इतर विकसनशील राष्ट्रांच्या तुलनेने ती दुपटीहून अधिक आहे. विज्ञान क्षेत्रातील दरवर्षी तयार होणा-या स्नातकांची (पदवीधरांची) संख्या पाहिल्यास जगात आमचा तिसरा क्रमांक लागतो. आमच्या आजच्या समस्या अत्यंत कठीण आहेत, हे मान्य केलेच पाहिजे. त्यातून उपाय काढण्याचे आमचे आजवरचे प्रयत्न अपेक्षेप्रमाणे सफल झाले नाहीत, हेही नाकारता येत नाही. यामुळे आमची तरुण पिढी आज रागावलेली आहे, हे मला माहीत आहे. शिक्षणाच्या साहाय्याने सामाजिक प्रश्नांचे आकलन झाल्यामुळे त्यांना राग आला आहे, हे उघड आहे. आणि म्हणूनच हे आकलन व्यर्थ जाणार नाही, अशी आशा बाळगण्यास आधार आहे. जमिनीत टाकलले बी

एकदा अंकुरले, की वरच जाणार, खाली नव्हे ! गेल्या सत्तावीस वर्षांत पेरलेल्या शैक्षणिक बीजाला आता अंकूर फुटू लागले आहेत. आजच्या-एरवी निराशाजनक वाटणा-या परिस्थितीत हा एक महत्त्वाचा आशेचा किरण आहे, असे मानणारा मी आहे.

## १९. राजकीय निर्णय आणि परिवर्तनाची प्रक्रिया

२ सप्टेंबर १९७५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघातील भाषणाच्या आधारे

आर्थिक क्षेत्रात सा-या जगाला जाणवत असलेल्या काही तातडीच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाचे ऐतिहासिक महत्त्वाचे सहावे विशेष अधिवेशन दीड वर्षापूर्वी भरले होते. सर्व देशांना परस्परांवर अवलंबून राहावे लागत असल्यामुळे नवी आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे, यावर त्या अधिवेशनात एकमत झाले होते. बलिष्ठ आणि श्रीमंत देशांचे यापुढे जगावर वर्चस्व राहता कामा नये, असेही त्यावेळी म्हटले गेले होते.

त्या अधिवेशनात जे ठरले होते, त्याची अंमलबजावणी करण्याची काही देश टाळाटाळ करीत आहेत, ही दुर्दैवाची बाब आहे. परस्पर-सहकार्याच्या भूमिकेपासून ते देश दूर जात असून, त्यांच्या दृष्टिकोणात पारंपरिक वसाहतवादी प्रवृत्ती दिसून येत आहे. काही थोड्या देशांनाच संपत्ती संपादन करण्याचा आणि सामर्थ्य जोपासण्याचा अधिकार आहे, असे हे देश मानतात. जागतिक साधनसंपत्तीमध्ये आपल्याला रास्त आणि न्याय्य हिस्सा मिळाला पाहिजे, या विकसनशील देशांच्या मागणीबाबत काही विकसित देशांची प्रतिकूल प्रतिक्रिया आढळून आली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सहाव्या खास अधिवेशनामध्ये आर्थिक पेचप्रसंगांचा विचार झाला, तर त्या पेचप्रसंगाला तोंड देण्यात अपयश का आले, आणि तो पेचप्रसंग सोडविण्यासाठी नवे कोणते प्रयत्न करावयास हवेत, यासंबंधीचा विचार सातव्या खास अधिवेशनात करावा लागणार आहे.

नवी आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्था पुढील सर्वमान्य सिद्धांतांच्या आधारावर अस्तित्वात यावयास हवी, असे आम्ही मानतो:

(१) सध्याच्या परस्परावलंबी जगात एका देशाच्या वा समूहाच्या प्रगतीचा वा पीछेहाटीचा इतर देशांवर वा समूहांवर तात्काळ प्रत्यक्ष परिणाम होत असतो.

(२) परस्परावलंबित्वामध्ये सामुदायिक जबाबदारीचा सिद्धांत अटळपणे सूचित आहे. कारण सामुदायिक जबाबदारी मानली, तरच विषमता आणि अन्याय नाहीसा करता येईल.

(३) सध्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये कोणते बदल करावयास हवेत, यासंबंधीचे निर्णय घेताना सर्व देशांना आपापली मते मांडण्याची मुभा असली पाहिजे आणि
(४) राष्ट्रिय आणि जागतिक विकासाचा विचार करीत असताना प्रादेशिक परस्परावलंबनाचे महत्त्व जाणून घेतले पाहिजे.

राष्ट्रिय विकासाची जबाबदारी त्या त्या देशाच्या सरकारवर पडत असली, तरी जागतिक विकासाची जबाबदारी आंतरराष्ट्रीय व्यापार, गुंतवणूक, उद्योगव्यवसाय आणि तंत्रज्ञान यांची सूत्रे ज्यांच्या हातांत आहेत, त्यांनीच मुख्यत: स्वीकारली पाहिजे. थोडक्यात सांगायचे, तर विकसित आणि विकसनशील देश यांच्या दरम्यानची आर्थिक विषमता नाहीशी झाली पाहिजे आणि जागतिक आर्थिक विकासातील आपला उचित वाटा आपल्याला मिळाला पाहिजे, ही विकसनशील देशांची मुख्य मागणी आहे. त्यासाठी सध्याच्या अन्याय आणि विषमता कायम ठेवणा-या आणि वाढविणा-या यंत्रणा नाहीशा करून त्या जागी नव्या यंत्रणा उभारल्या गेल्या पाहिजेत. हा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न पूर्वी करण्यात आलेला नसला, तरी जागतिक अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करणे आपल्याही हिताचे आहे, याची जाणीव विकसित देशांना होऊ लागलेली आहे, हे मान्य केलेच पाहिजे. एका देशाने

वा गटाने इतरांवर वर्चस्व प्रस्थापित करावे, ही परिस्थिती अनिष्ट असल्यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण करायला हवे, हा विचारही पुढे येऊ लागला आहे. विकासाच्या विविध बाजूंचा विचार करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावर आणि अन्यत्र अनेक देशांच्या परिषदा भरत आहेत, हा या नव्या जाणिवेचा पुरावाच म्हटला पाहिजे.

सातव्या विशेष अधिवेशनात विकास आणि आंतरराष्ट्रिय सहकार्य यांचाच मुख्यत्वेकरून विचार होणार आहे. प्रत्येक विकसनशील देश आपल्या लोकांसाठी न्याय्य समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असताना त्या प्रयत्नांना आंतरराष्ट्रिय साहाय्य आणि सहकार्य यांचे पाठबळ मिळायला हवे. नवी आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्था आवश्यक आहे, असे विकसित देशांनी नुसते मान्य करून काहीच साध्य होणार नाही. गरीब देशांचे उत्पन्न वाढविण्यासाठी, भुकेलेल्यांना अन्नधान्य पुरविण्यासाठी आणि विकसनशील देशांच्या व्यापारविषयक अटी सुधारण्यासाठी विकसित देशांनी प्रत्यक्ष पावले टाकली पाहिजेत. १९७० मध्ये म्हणजे या विकास-दशकाच्या प्रारंभी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व देशांनी असे मान्य केले होते, की 'विकसनशील देशांच्या विकासाची मुख्य जबाबदारी त्या देशांवरच पडत असली, तरी जोपर्यंत विकसित देश त्यांना अधिक अर्थसाहाय्य उपलब्ध करून देत नाहीत आणि त्यांच्या बाबतीत अधिक उदार आर्थिक आणि व्यापारविषयक धोरण स्वीकारत नाहीत, तोपर्यंत विकसनशील देशांनी कितीही प्रयत्न केले, तरी त्यांना आपला अपेक्षित आर्थिक विकास द्रुतगतीने साध्य करता येणार नाही.' म्हणूनच आंतरराष्ट्रिय विकासाचे योजनाकार्य येत्या काही सप्ताहांतच केले गेले पाहिजे. आणि ही योजना अधिक प्रत्ययकारी, दूरदृष्टीची, व पुरोगामी होण्यासाठी या विशेष अधिवेशनानेच त्याला आवश्यक ती राजकीय गती आणि चालना द्यावयास हवी. मदत आणि व्यापार या दोन मुख्य खांबांवरच विकासविषयक आंतरराष्ट्रिय सहकार्य उभे असते. पूर्वी मदत आणि व्यापार यांच्यावर वेगवेगळा भर देण्यात येत असे. अलीकडे श्रीमंत देशांकडून गरीब देशांना होत असलेल्या स्वयंस्फूर्त साहाय्याबाबत उदासीनताच दिसून येते आहे. ब-याचशा श्रीमंत देशांकडून मदतीचा ओघ

वाढण्याऐवजी कमी झाल्याचेच आढळते. आंतरराष्ट्रीय विकास मोहिमेमध्ये आर्थिक साहाय्याची जी उद्दिष्टे निर्धारित करण्यात आलेली होती, ती पुरी करण्यात आलेली नाहीत. उलट या साहाय्यामध्ये घटच होत चाललेली आढळते. यासंबंधी असेही म्हटले जाते, की विकासविषयक साहाय्य देण्याबाबत काही देश खळखळ करू लागले असून, विकसनशील देशांना आपल्या प्रगतीचा निर्धारित टप्पा गाठण्याइतके विकसित देशांकडून साहाय्य मिळण्याची शक्यता कमी आहे. याबाबत हे स्पष्ट केले पाहिजे, की विकसनशील देशांचा वाढता आयात-खर्च आणि निर्यात-व्यापारातील घट यांच्यांतील सांधा जुळविण्यासाठी विकसित देशांकडून स्वयंस्फूर्त साहाय्य होणे अत्यावश्यक आहे. श्रीमंत देशांच्या राजकीय इच्छाशक्तीवरच हे अवलंबून राहणार आहे, हेही खरे आहे; म्हणूनच याबाबतीत आग्रहाने बोलले पाहिजे. परदेशांना द्यावयाच्या मदतीत विकसित देशांमधील नागरिकांचा सहभाग असतो, हे जितके खरे आहे, तितकेच हेही खरे आहे, की विकसित देशांमध्ये तयार होणा-या मालासाठी विकसनशील देशांतील खरेदीदार पैसे मोजत असतात. येथे आणखीही एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. आपली मूल्येच आपल्या आंतरराष्ट्रिय कृतींमध्ये प्रतिबिंबित होत असतात. अधिकृत विकासविषयक साहाय्य जेमतेम ७०० कोटी डॉलर्सच्या आसपास असताना विनाशकारी शस्त्रास्त्रे निर्माण करण्याचा जागतिक खर्च भरमसाट वाढलेला असावा, ही चिंताजनक बाब आहे.

व्यापार हा आंतरराष्ट्रिय सहकार्यातील दुसरा आधार आहे. जे आंतरराष्ट्रिय साहाय्याबाबत म्हटले आहे, ते आंतरराष्ट्रिय व्यापारालाही लागू पडते. जागतिक व्यापार, उद्योग आणि तंत्रविज्ञान यांच्यामध्ये विकसनशील देशांना फारसे स्थान लाभलेले नाही. विकसनशील देशांकडून निर्यात होत असलेल्या मालाच्या किमती एक तर त्या कमी असतात किंवा सतत अस्थिर तरी असतात. त्यामुळे विकसनशील देशांचा आयात-खर्च इतका वाढला आहे, की निर्यात-उत्पन्नात १०० टक्के वाढ झाली, तरी त्यांना आयात आणि निर्यात यांच्यातील समतोल साधता येणार नाही. असे असले, तरी देखील विकसनशील देशांना परदेशांकडून जे उत्पन्न मिळते, ते मुख्यत: व्यापाराद्वारेच मिळत असते. मदतीचा भाग त्यात अत्यल्प

असतो. म्हणून आयात व निर्यात करणा-या विकसनशील देशांचे हितसंबंध सुटसुटीत राहतील, अशा पद्धतीने वस्तूंच्या आंतरराष्ट्रिय व्यापारामध्ये निश्चित आणि समन्वित मांडणी करण्याची तातडीची गरज आहे. या दृष्टीने योजना पुढे आलेल्या आहेत. वस्तूंचा समन्वित विचार करावा, असे एका योजनेमध्ये म्हटलेले आहे. या समन्वित कार्यक्रमाबाबत आता राजकीय करार करण्यात आला, तर त्याचा तांत्रिक तपशील पुढल्या वर्षी नैरोबी येथे ठरवता येईल. समन्वित कराराची कल्पना नवीही नाही आणि क्रांतिकारकही नाही. कारण काही विकसनशील देश आणि युरोपीय सामुदायिक बाजारपेठ यांच्यांतील करार ब-याच प्रमाणात असाच आहे. हा करार याच मूलभूत गोष्टींवर आधारलेला आहे. साठा करण्याची यंत्रणा, सामूहिक अर्थनिधी, अनेक पक्षीय तरतुदी, भरपाईसाठी उदार स्वरूपाची आर्थिक यंत्रणा आणि प्रक्रिया नि विविधता यांबाबतीत नवा दृष्टिकोण हा या योजनेचा गाभा आहे. ही योजना सर्व विकसनशील देशांच्या बाबतीत स्वीकारण्याचे मान्य झाले, तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या चौथ्या व्यापार विकास परिषदेला तिचा तपशील ठरविता येईल. कच्च्या मालाच्या व्यापाराबाबत खास लक्ष द्यावे लागेल.

कोणत्या कच्च्या मालाचा या करारात अंतर्भाव करावयाचा, याचा विचार केला जात आहे. परंतु त्याहीपेक्षा उत्पादित आणि अर्धउत्पादित वस्तूंच्या व्यापाराचा प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. व्यापार आणि जकात यासंबंधीच्या संघटनेमार्फत आंतरराष्ट्रिय व्यापाराबाबत सध्या जी बोलणी चालू आहेत, ती फारशी फलद्रूप होण्याची शक्यता दिसत नाही.

म्हणूनच उत्पादित वस्तूंच्या व्यापाराचा प्रश्न विशिष्ट दृष्टिकोणातून हाताळला पाहिजे. आंतरराष्ट्रिय व्यापारामध्ये जकात कराच्या रूपाने वा अन्य स्वरूपात ज्या अडचणी निर्माण झालेल्या आहेत, त्याही दूर केल्या पाहिजेत. तसेच उत्पादित वस्तूंचा पुरवठा आणि निर्मिती, विक्री आणि वितरण या प्रश्नांचाही विचार व्हावयास हवा. अग्रक्रमाबाबत सर्वसाधारण पद्धत अवलंबिण्याचा विकसित देशांचा निर्णय स्वागतार्ह असला, तरी या पद्धतीत आणखी वस्तूंचा अंतर्भाव होणे, जकातीचे प्रमाण

कमी करणे व करबाह्य अडचणी शिथिल करणे या उपायांचा समावेश व्हावयास हवा.

आंतरराष्ट्रिय चलन-पद्धतीमध्ये सुधारणा व्हावयास हवी, ही सर्व विकसनशील देशांची आणखी एक महत्त्वाची मागणी आहे. आंतरराष्ट्रीय चलनपद्धतीच्या व्यवस्थापनात भाग घेता आला पाहिजे. या गोष्टींची फारशी दखल आजपर्यंत घेण्यात आलेली नाही. नव्या आंतरराष्ट्रिय राखीव निधीच्या निर्मितीत आणि विकासविषयक साहाय्यामध्ये काही तरी दुवा असला पाहिजे, ही विकसनशील देशांनी सातत्याने केलेली मागणी दुर्लक्षितच राहिलेली आहे. एकूण जागतिक लाकसंख्येपैकी ७० टक्के लोकसंख्या विकसनशील देशांत राहत असताना, गेल्या वीस वर्षांत निर्माण झालेल्या जादा निधीपैकी ४ टक्कयांपेक्षाही कमी रक्कम विकसनशील देशांना मिळालेली नाही.

म्हणून आंतरराष्ट्रिय नाणेविनिमयाबाबत केवळ नव्या पद्धती सुरू करून भागणार नाही. विनिमयातील मेळ जमविताना पडणा-या बोज्याचे समान वाटप, स्थिर आणि जुळवून घेता येण्याजोगे विनिमयदर, मुख्य राखीव साठा म्हणून सोन्याऐवजी पैसे काढण्याच्या विशेष अधिकारांना मान्यता, विकसनशील देशांना द्यावयाच्या अल्पकालीन मदतीची व्याख्या असे इतर अनेक प्रश्नही चलनविषयक सुधारणेत निगडित आहेत.

अर्थकारणाच्या क्षेत्रांत कर्जाचा प्रश्न सर्वांत महत्त्वाचा आहे. कारण गेल्या काही वर्षांमध्ये विकसनशील देशांचे कर्ज प्रचंड प्रमाणात वाढले आहे. या प्रश्नांचा अभ्यास करण्याचा थोडासा प्रयत्न झालेला असला, तरी हे काम इतक्या संथ गतीने होते आहे, की कर्ज घेणा-या देशांच्या समस्यांची धनिक देशांना जाणीवच झालेली नाही, असे अनुमान काढावे लागते.

सध्याच्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आणि बदलत्या आर्थिक परिस्थितीशी

जुळवून घेण्यासाठी विकसनशील देशांना आधिक निधी उपलब्ध झाला पाहिजे. हा निधी मिळविण्यासाठी विकसनशील देशांना आपल्या जवळची मूलभूत साधनसंपत्ती विकसित देशांकडे पाठविण्याची परिस्थिती निर्माण होता कामा नये. कारण त्यामुळे त्यांचा आर्थिक बोजा वाढेल. सवलतीच्या दराने अर्थसाहाय्य होत नसल्यामुळे भारतासह अनेक देशांना केवळ गुंतवणुकीसाठी नव्हे, तर दैनंदिन गरजांसाठीही चढ्या दराने कर्ज घ्यावे लागत आहे. त्यामुळे विकसनशील देशांना मिळत असलेली मदत कर्जफेडीतच खर्च करावी लागत आहे.

विकासविषयक आर्थिक साहाय्याचा कोणताही कार्यक्र म आखताना गरीब देशांकडून श्रीमंत देशांकडे मूलभूत संपत्तीचा ओघ वाहणार नाही, अशी दक्षता घ्यावयास हवी. त्याचप्रमाणे बिकट आर्थिक परिस्थितीचा तडाखा अनेक देशांना बसलेला असल्यामुळे खास कार्यक्रमात जी लक्षणे निर्धारित केलेली आहेत, तीही ध्यानात घेतली पाहिजेत. या देशापुढील प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे ही यापुढील कोणत्याही कार्यक्रमाची प्रमुख दिशा असायला हवी. जागतिक चलनफुगवटा, पाश्चिमात्य देशांमधील मंदी, चलनविषयक अस्थिरता, आयातीचा आणि विशेषत: अन्नधान्ये, इंधन, खते आणि तयार माल यांच्या आयातीचा वाढता खर्च यांमुळे विकसनशील देशांच्या विकासात मोठाच अडसर निर्माण झालेला आहे.

प्रत्येक देशाने आपल्या परीने प्रयत्नांची पराकाष्ठा केली, तर सगळ्यांचाच भार कमी होऊन कोणत्याही एका देशाला जादा त्याग करावा लागणार नाही. यापुढे आयात-खर्चात वाढ होणार नाही, असा सर्व देशांनी तातडीने प्रयत्न केला पाहिजे. तसे झाले, तरच विकासासाठी आवश्यक असलेल्या आयातीपासून विकसनशील देशांना वंचित राहावे लागणार नाही. सध्याच्या कर्जाच्या बोज्यामध्ये आणखी असह्य वाढ होणे विकसनशील देशांना झेपण्यासारखे नाही.

उत्पादन, व्यापार, खते दीर्घकालीन गुंतवणूक आणि सुरक्षितता अशा सर्व बाजूंनी अन्नधान्यांच्या समस्येचा गेल्या वर्षी रोम येथे भरलेल्या जागतिक अन्नधान्य परिषदेने विचार केला. या परिषदेत अनेक निर्णय घेण्यात आले. या निर्णयांची

त्वरेने व परिणामकारकरीत्या अंमलबजावणी करणे ही प्रत्येक देशाची जिम्मेदारी आहे. अन्यथा विकसनशील देशांच्या इतर क्षेत्रांतील विकास-योजनांचे फलित हाती येणे अशक्य आहे.

सा-या जगभर आर्थिक प्रगतीचा विस्तार करावयाचा असेल, तर विकसनशील देशांना परस्परांशी सहकार्य केल्याशिवाय गत्यंतरच उरत नाही. आपापसांतील व्यापार एखाद्या विकसित देशाच्या मध्यस्थीतून करण्याचा जुना वसाहतवादी प्रकार सोडून दिला पाहिजे. विकसनशील देशांनी परस्परांसंबंधीचे पूर्वग्रह टाकून दिले, तरच परस्परांच्या सहकार्याने प्रत्येक देश समर्थ होऊ शकेल.

विकसनशील देशांपाशी साधनसंपत्ती, तज्ज्ञ, तांत्रिक ज्ञान, कुशल कामगार, इत्यादी गोष्टींचा मुळीच तुटवडा नाही. या सर्व गोष्टींची परस्परांच्या विकासासाठी देवाणघेवाण करणे मुळीच अवघड ठरू नये. या दृष्टीने डाकार (सेनेगल) येथे भरलेल्या अलिप्त देशांच्या बैठकीत काही निर्णय घेण्यात आलेले आहेत. बरेचसे विकसनशील देश नव्यानेच स्वतंत्र झालेले आहेत. एखाद्या साम्राज्यसत्तेमार्फतच त्यांचा परस्परांशी संबंध येत असे. ही परिस्थिती यापुढे कायम राहता कामा नये. विकसनशील देशांनी परस्परांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित केले, तर ते स्वत:च आपापला विकास साध्य करू शकतील. या कार्यामध्ये विकसित देशांनी मदत केली, तर ठीकच; पण ती मिळाली नाही, तरीही अडून राहता कामा नये.

व्यापार, अर्थकारण आणि तंत्रविज्ञान या क्षेत्रांमध्ये विकसनशील देशांना परस्परांशी कसे सहकार्य करता येईल, याचा समग्र विचार करण्याचे लिमा येथे भरलेल्या अलिप्त देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांच्या बैठकीत ठरले आहे. आंतरराष्ट्रिय व्यासपीठावरून जागतिक प्रश्नांच्या सोडवणुकीचा विचार होत असला, तरी देखील विकसनशील देशांनी आपले प्रश्न सोडविण्यासाठी एकमेकांना साहाय्य करण्याचा मार्ग अवलंबिलाच पाहिजे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा विद्‌यमान आणि संभाव्य साठा, उपलब्ध तंत्रविज्ञान आणि मानवी कसब यांच्या कक्षेत राहूनही विकसनशील देशांना

अनेक परस्परपूरक क्षेत्रे शोधता येतील, हे कार्य करण्यासाठी आम्ही विकसित देश आणि आंतरराष्ट्रिय संघटना यांचे सहकार्य अपेक्षीत आहोत. कारण त्यायोगे विकसनशील देश आणि विकसित देश यांच्यात नवे दुवे निर्माण होऊ शकतील.

विकसनशील देशांमधील सहकार्य सुकर आणि वृद्धिंगत करण्यासाठी नव्या संघटना, यंत्रणा आणि साधने निर्माण केली पाहिजेत, असे आम्ही मानतो. हे सहकार्य दोन तऱ्हांनी करता येईल. देवाणघेवाणीमध्ये समानता आणण्यासाठी समन्वित कृती करणे, ही एक रीत होय आणि प्राधान्य स्वरूपाचे व्यापारी करार करून व्यापारवृद्धी करणे, हा दुसरा मार्ग आहे. विकसनशील देशाच्या एकूण निर्यात-व्यापारातील अवघा २० टक्के व्यापारच विकसनशील देशांमध्ये होत असतो. याउलट, विकसित देशांचे परस्परांतील व्यापाराचे प्रमाण ७५ टक्के आहे. म्हणून विकसनशील देशांनी आपापसांतील व्यापार वाढविण्यास प्राधान्य दिले पाहिजे. तसाच त्यांनी आपापल्या वैशिष्ट्यांचा परस्परांना लाभ करून द्यावयास हवा. ही पद्धत परिणामकारक होण्यासाठी या व्यापारामध्ये कच्च्या मालाप्रमाणे उत्पादित मालांचाही समावेश होणे आवश्यक आहे.

जे विकसनशील देश जागतिक बाजारपेठेला कच्चा माल पुरवितात, त्यांनी आपले निर्णय एकजुटीने घेतले, तर विकसित देशांशी किंवा बहुराष्ट्रिय महामंडळाशी व्यापारविषयक अटी निश्चित करताना त्यांना निश्चितच आत्मबळ येईल. अशा काही कल्पना, नव्या यंत्रणा स्थापन करून त्यांची व्यवहार्यता अजमावून पाहता येईल.

श्रीमंत देश आणि गरीब देश यांनी एकमेकांविरुद्ध संघर्षाचा पवित्रा घेण्याऐवजी सहकार्याची भूमिका स्वीकारावी, असे आम्ही सतत म्हणत आलेलो आहोत. श्रीमंत आणि गरीब देशांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण केल्याने केवळ विकसनशील देशांचेच नव्हे, तर सा-या जगापुढील जटिल प्रश्न सुटू शकणार नाहीत. जागतिक

साधनसंपत्तीचा सुजाण आणि सुयोग्य वापर करावयाचा असेल, तर सहकार्य आणि परस्परसामंजस्य यांचाच आधार घ्यावयाला हवा, अशी आमची दृढ निष्ठा आहे.

पूर्वी कधीही नव्हता, एवढा गंभीर आर्थिक पेचप्रसंग सध्या जगापुढे उभा आहे. हा पेचप्रसंग इतका व्यापक आहे, की तो सोडविण्यासाठी प्रारंभ कोठून करावयाचा, हेही नीटसे उमजत नाही. हे सर्व प्रश्न चटकन् सुटतील, असेही आम्ही मानत नाही. परंतु म्हणून आपण उशीर करूनही चालणार नाही. यांपैकी कोणत्याही एका प्रश्नावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी सर्व प्रश्न सोडविण्यासाठी एकाच वेळी अनेक बाजूंनी निर्धारपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे.

उत्पन्न आणि संपत्ती यांच्या वाढत्या असमर्थनीय विषमतेला रोखायला विद्यमान राष्ट्रिय आणि आंतरराष्ट्रिय यंत्रणा अपु-या पडलेल्या आहेत. साधनसामग्री आणि तंत्रज्ञान यांच्यांतील सध्याची गुंतवणूक मुख्यत: बहुराष्ट्रिय महामंडळाकडूनचा कारभार अशा अव्यवहार्य रीतीने चालतो, की त्यामुळे विकसनशील देशांना आपल्या साधनसंपत्तीचा आपल्या विकासासाठी वापर करण्यावर बंधने पत्करावी लागतात. विकसनशील देशांच्या सार्वभौमत्वावर आणि स्वातंत्र्यावर हा आघात आहे. म्हणून बहुराष्ट्रिय महामंडळाच्या कामकाजावर अधिक नियंत्रणे घालण्याची आवश्यकता आहे. विकास आणि सहकार्य यांना ही महामंडळे साहाय्यभूत ठरतील, अशा रीतीने त्यांचे कामकाज व्हावयास पाहिजे. याबाबतीत विकसित देशांच्या शासनसंस्थांवर विशेष जबाबदारी येऊन पडते. साधनसंपत्ती आणि तंत्रज्ञान यांच्या देवाणघेवाणीबाबत त्यांनी पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात प्रत्यक्ष भाग घेतला पाहिजे. त्याचबरोबर विकसनशील देशांतील विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञान विकसित करण्यावरही भर द्‌यायला हवा. तसे झाले, तरच या देशांना आपल्या जनतेची गरिबी दूर करण्यासाठी आपली साधनसंपत्ती वापरण्याची क्षमता प्राप्त होईल. विकसनशील देशांनी दारिद्र्याविरुद्ध सुरू केलेल्या लढ्याला चालना मिळेल, अशाच रीतीने आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्थेची फेररचना करावयास हवी.

मानवजातीचे भवितव्य हा संयुक्त राष्ट्रसंघाच्या विचाराचा केंद्रबिंदू आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व सार्वभौम सभासद देशांनी एकजुटीने पुढे आले पाहिजे. हे कार्य बहुराष्ट्रिय महामंडळाच्या आणि खाजगी भांडवलदारांच्या लहरीवर सोपवून चालणार नाही. कारण आतापर्यंतचा अनुभव असा आहे, की बहुराष्ट्रिय महामंडळांनी विकसनशील देशांचे सदैव शोषणच केलेले आहे. म्हणूनच उद्याच्या नव्या जगाला आकार द्यायचा अधिकार त्यांच्याकडे यापुढे तरी सोपविता कामा नये.

आंतरराष्ट्रिय व्यापारातील तूट, वाढता चलनफुगवटा आणि अस्वस्थ करून टाकणारी मंदी यांमुळे एक वर्षापूर्वी जागतिक अर्थकारणात मोठीच अवघड परिस्थिती निर्माण झालेली होती. या सर्व अनिष्ट घटनांची झळ मुख्यत: विकसनशील देशांनाच सहन करावी लागली आहे. भारतही त्यापासून अलिप्त राहू शकलेला नाही. या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी भारताने चलनविषयक, उत्पन्नविषयक, आणि आर्थिक स्वरूपाचे अनेक उपाय योजिले आहेत. त्यामुळे किमतींचा एकूण निर्देशांक हळूहळू खाली येत आहे. गेल्या वर्षापेक्षा भारतातील सध्याची भावपातळी खाली आलेली आहे. असे करणे फारच थोड्या देशांना शक्य झाले आहे.

मात्र विकसित देशांत अजूनही चलनफुगवट्याची परिस्थिती आणि भीती कायम असल्यामुळे, भारताला तयार मालाच्या आयातीसाठी जादा खर्च करावा लागत आहे. १९७२ पासून इंधनाच्या आयातीवरचा खर्च सतत वाढतच चालला आहे. गेल्या वर्षभरात आयात-खर्चात साठ टक्के वाढ झालेली आहे. निर्यात-व्यापारातून भारताला जे परकीय चलन मिळते, त्यापैकी ८० टक्के रक्कम अन्नधान्य, खते आणि इंधन यांच्या आयातीवर खर्ची पडते. त्या प्रमाणामध्ये चहा, ताग, तंबाखू आणि कच्चे लोखंड यांच्या किमतींत वाढ झालेली नाही. या बिकट अवस्थेतून मार्ग काढण्यासाठी आम्ही अनेक उपाय योजिले आहेत. तेलाच्या वापरात काटकसर करण्यात येत आहे. खतांचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न होत आहे. कारखान्यांनी तेलाऐवजी कोळशाचा इंधन म्हणून वापर करावा, असा बदल केला जात आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या

वाटपात समानता आणणे, शिक्षणाचा प्रसार करणे, आरोग्य आणि आहार यांत सुधारणा करणे आणि विकासकार्यामध्ये स्त्रिया आणि युवक यांचा सहभाग वाढविणे इत्यादी गोष्टींना आम्ही आमच्या नियोजन-कार्यक्रमामध्ये अग्रक्रम दिलेला आहे. भारतातील परिस्थितीवर ५६ कोटी लोकांचे भवितव्य अवलंबून आहे. हे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही राष्ट्रिय पातळीवर अनेक प्रयत्न करीत असलो, तरी आमची विकासविषयक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आम्हांला काही क्षेत्रांत तरी आंतरराष्ट्रिय सहकार्याची आणि मदतीची गरज लागणार आहे. लिमा येथे भरलेल्या अलिप्त राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांच्या बैठकीत १०७ देशांचे प्रतिनिधी हजर होते. यांत काही मुक्ति-संघटनांचे नेतेही होते. या १०७ देशांचा आवाज हा बहुसंख्य मानवजातीच्या आशाअपेक्षांचा आवाज आहे. सर्व विकसनशील देशांपुढे अनंत अडचणी उभ्या आहेत. त्या सर्वांना वसाहतवादाच्या शोषणाचा विदारक अनुभव आलेला आहे, म्हणून आता त्यांना न्याय हवा. पूर्वीच्या काळात त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन व्हावे आणि यापुढे त्यांना विकसित देशांकडून सहकार्य मिळावे, एवढीच अपेक्षा आहे.

हे सर्व देश आत्मनिर्भरता आणि परस्पर-सहकार्य यांची कास धरीत असतानाच त्यांना विकसित देशांकडून मदत हवी आहे. आपल्या जनतेला अन्न, पाणी, आरोग्य, निवारा, शिक्षण यांचा लाभ करून देता यावा, आर्थिक विकासाची प्रक्रिया अबाधित चालू राहावी आणि आजच्या परस्परावलंबी जगात समान सार्वभौमत्वाच्या भूमिकेवरून स्वातंत्र्य आणि सुरक्षितता लाभावी, हीच त्यांची तळमळ आहे.

विकसनशील देशांच्या या अपेक्षा रास्त असल्यामुळे, त्या पु-या करण्यासाठी विकसित देशांना अवाजवी त्याग करावा लागणार नाही, अशी माझी खात्री आहे. राजकीय स्वातंत्र्य म्हणजेच काही सर्वस्व नव्हे. खरे तर आर्थिक स्वातंत्र्य संपादन करण्याचे ते एक प्रमुख साधन आहे. राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले, की आर्थिक सुरक्षितता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करता येतो. म्हणून आपली आवश्यक ती आर्थिक प्रगती करून घेण्यासाठी विकसनशील देशांनी आपल्या राजकीय

शक्तीचा व्यक्तिश: आणि सामूहिक वापर केला, तर त्यांना आक्रमक भूमिका घ्यायची आहे, असा गैरसमज करून घेण्याचे कारण नाही.

विकसनशील देशांच्या मूलभूत प्रश्नांची चर्चा करण्याचे संयुक्त राष्ट्रसंघ हेच प्रमुख व्यासपीठ असले, तरी समान हितसंबंधांच्या पूर्ततेसाठी सर्व देशांनी एकजुटीने प्रयत्न करण्याकरिता या संघटनेच्या रचनेमध्ये काही बदल करणे जरूरीचे झाले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना आज करण्यात आली असती, तर विकसनशील देशांच्या न्याय्य गरजांचा आणि अपेक्षांचा अधिक चांगला विचार कशा तऱ्हेने होऊ शकेल, हे ध्यानात घेऊनच संयुक्त राष्ट्रसंघाची रचना झाली असती.

अर्थकारण आणि राजकारण यांचा परस्परसंबंध अविभाज्य आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या जाहिरनाम्याच्या प्रास्ताविकात असे म्हटले आहे, की 'व्यापक स्वातंत्र्याच्या पायावर सामाजिक प्रगतीला आणि चांगल्या जीवनमानाला गती देण्याचा आम्ही निर्धार केलेला आहे. तसेच सर्व लोकांचा सामाजिक आणि आर्थिक विकास व्हावा, यासाठी आंतरराष्ट्रिय यंत्रणा वापरण्याचेही आम्ही ठरविले आहे.'

सर्व जगातील सर्व लोकांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीचे साधन म्हणून कार्य करण्याची संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व सभासद देशांच्या सरकारांनी प्रतिज्ञा घेतलेली आहे. यादृष्टीने परिवर्तनाच्या प्रक्रियेला गती देण्याचे कार्य सातव्या खास अधिवेशनाला करावयाचे आहे. या परिवर्तनाचे स्वरूप सहाव्या खास अधिवेशनात निश्चित करण्यात आलेले आहेच. म्हणून यावेळी आपण दोन गोष्टींवर लक्ष केंद्रित करायला हवे. विकसित आणि विकसनशील देशांमध्ये सध्या जे विषम आर्थिक संबंध आहेत, ते बदलून समानता आणि न्याय या तत्त्वांवर आधारलेली नवी आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्था निर्माण करण्याची व तिच्या आधारे विकसनशील देशांशी सहकार्य करण्याची राजकीय इच्छाशक्ती विकसित देशांनी व्यक्त केली पाहिजे, ही

एक गोष्ट होय. दुसरे असे, की आपणां सर्वांना भेडसावत असलेल्या अनेक प्रश्नांची सर्वसंमत सोडवणूक करण्यासाठी विचारविनिमयाची स्वतंत्र यंत्रणा स्थापन करायला हवी. कारण नव्या आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्थेचे स्वरूप ठरविण्यासाठी बराच विचारविनिमय करावा लागणार आहे. तसेच ती अर्थव्यवस्था मान्य करण्याचे विकसित देशांनी आश्वासनही दिले पाहिजे. म्हणून शांततामय सहजीवनासाठी आवश्यक असलेल्या नव्या सुव्यवस्थेत चौकटीच्या प्रत्येक घटकासंबंधी करार करण्यासाठी गंभीरपणे आणि विनाविलंब विचारविनिमय सुरू होणे, ही राजकीय गरज आहे, हे आपण मान्य केले पाहिजे.

## २०. भविष्यकाळाचे अभूतपूर्व आव्हान

संयुक्त राष्ट्रसंघाच्या तिसाव्या अधिवेशनामध्ये परराष्ट्रमंत्री या नात्याने २६ सप्टेंबर १९७५ रोजी केलेल्या भाषणाच्या आधारे.

अखिल मानवजातीला शांतता आणि न्याय यांचा लाभ करून देणे हे संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रमुख कार्य आहे. म्हणूनच सर्व देशांतील लोकांना ही संघटना जिम्मेदार आहे. तणाव आणि विषमता यांनी तीन किंवा अधिक गटांत विभागलेल्या जगाला शांतता आणि सहकार्य यांच्या आधारावर एकत्र आणणे, असा आपणां सर्वांचा प्रयत्न असला पाहिजे. सर्वच देश काही ना काही प्रमाणात परस्परांवर अवलंबून आहेत आणि प्रत्येक देशाने इतरांच्या मूलभूत गरजांची आणि न्याय्य आकांक्षांची दखल घेतली पाहिजे, यासंबंधी सर्वच राष्ट्रांत वाढती जाणीव दिसून येत आहे.

भावी पिढ्यांना युद्धाची झळ लागू नये आणि व्यापक स्वातंत्र्याच्या पार्श्वभूमीवर सामाजिक प्रगती आणि सुधारित जीवनमान लाभावे, हा उद्देश डोळ्यांपुढे ठेवून तीस वर्षांपूर्वी संयुक्त राष्ट्रसंघाच्या संस्थापकांनी सर्व देशांच्या दृष्टिकोणांत आणि

कार्यक्रमांत सुसंवाद निर्माण करण्यासाठी या संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. परंतु दुस-या महायुद्धाच्या विनाशकारी ज्वालांनी उद्ध्वस्त झालेले जग एक होण्याऐवजी परस्परविरोधी लष्करी करारांच्या रूपाने जगाचे अनेक विभाग पडले असून त्यांनी एकमेकांविरुद्ध आक्रमक पवित्रा धारण केल्याचे दिसून आले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेमध्ये ग्रथित केलेल्या उद्दिष्टांना या शीतयुद्धांमुळे मोठाच धोका निर्माण केला. तसेच त्यावेळी अनेक देशांची वसाहतवादाच्या वर्चस्वातून सुटका झालेली नव्हती. त्यामुळे जोपर्यंत त्यांची गुलामी नष्ट होत नाही, तोपर्यंत त्यांच्या दृष्टिकोणातून तरी संयुक्त राष्ट्रसंघाची सनद निरर्थकच ठरत होती.

गेल्या काही वर्षांमध्ये मात्र अनेक जुनी साम्राज्ये विलयास गेली असून, जगाच्या ब-याच भागांतून वसाहतवादाचेही उच्चाटन झाले आहे. राष्ट्रिय मुक्ती आंदोलनाच्या विजयाचेच हे द्योतक आहे. या प्रक्रियेमध्ये संयुक्त राष्ट्रसंघानेही आपला वाटा उचललेला आहे. त्यामुळे आता या संघटनेमध्ये निम्म्याहून अधिक प्रतिनिधी नवस्वतंत्र देशांतील आहेत. सर्व जगाचे प्रतिनिधित्व करण्याचे आपले मूलभूत उद्दिष्ट ही संघटना साध्य करीत आहे, ही समाधानाची घटना आहे.

भारतासह अनेक नवस्वतंत्र देशांनी शीतयुद्धाची कल्पना झिडकारून दिलेली असून, अलिप्ततावाद आणि शांततामय सहजीवन यांचा मार्ग अनुसरला आहे. अलिप्ततावादाचे धोरण सध्याच्या परिस्थितीत किती अर्थपूर्ण आणि उपयुक्त आहे, हे आता अधिकाधिक देशांना पटू लागलेले आहे. आंतरराष्ट्रिय संबंधांमध्ये जास्तीत जास्त सामंजस्य निर्माण व्हावे आणि संघर्ष नि पेचप्रसंग टाळून सहकारी प्रयत्न व्हावेत, असाच विकसनशील देशांचा संयुक्त राष्ट्रसंघामध्ये प्रयत्न असतो. अलिप्त राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांची लिमा येथे बैठक भरलेली असताना न्याय आणि समानता यांवर आधारलेली नवी आंतरराष्ट्रिय व्यवस्था निर्माण करण्याच्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार करण्यात आला.

शांततेचे जतन हे आपले सर्वांत महत्त्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे. म्हणून शांततेत

बिघाड आणणा-या प्रश्नांची सोडवणूक करण्यास प्राधान्य मिळायला हवे. ब-याच वर्षांच्या युद्धांनंतर इंडोचीनमध्ये आता शांतता प्रस्थापित झालेली आहे. त्यामुळे सर्वांनाच समाधान वाटणे स्वाभाविक आहे. परंतु काहीजणांच्या डोक्यातून अजूनही भूतकाळ गेलेला दिसत नाही. व्हिएटनामी लोकशाहीवादी प्रजासत्ताक आणि दक्षिण व्हिएटनामी प्रजासत्ताक यांचे संयुक्त राष्ट्रसंघात प्रवेश करण्यासंबंधीचे अर्ज सुरक्षा समितीन फेटाळून लावले, ही दु:खाची बाब आहे. या संघटनेत दाखल व्हायला ते दोन्ही देश पात्र असताना खरे म्हणजे आपण त्यांचे स्वागत करायला हवे. त्यांच्या सहकार्याचा संयुक्त राष्ट्रसंघाला लाभच होईल. इंडोचीनमधील देशांचे युद्धामुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी आणि त्यांची आर्थिक पुनर्रचना करण्यासाठी सर्व देशांनी मदतीचा हात पुढे केला पाहिजे. या बाबतीतील आपली जबाबदारी पार पाडायला भारत तयार आहे.

पश्चिम आशियातील परिस्थिती अजूनही स्फोटक आहे. आक्रमण करून जिंकलेले अरब प्रदेश इस्त्रायलने सोडून दिल्याशिवाय आणि पॅलेस्टाईनमधील अरबांचे न्याय्य अधिकार मान्य केल्याशिवाय पश्चिम आशियात चिरस्थायी शांतता नांदणार नाही. मध्यंतरीच्या काळात, सिनायमधून इस्त्रायलने मर्यादित माघार घेण्याबाबत इजिप्त आणि इस्त्रायल यांच्यांत करार झालेला आहे. या करारामुळे त्या विभागातील तणाव कमी झाला आणि मूलभूत प्रश्न सुटायला मदत झाली, तर हा करार महत्त्वपूर्ण ठरेल. व्याप्त अरब प्रदेशांतून इस्त्रायलने माघार घ्यावी, यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने सर्व प्रयत्न करणे त्याच्या सनदेशी आणि सुरक्षा समितीने वेळोवेळी केलेल्या ठरावांशी सुसंगतच ठरणार आहे. त्याचप्रमाणे पॅलेस्टाईनमधील अरबांना त्यांचे न्याय्य अधिकार प्राप्त होतील, असाही आपण प्रयत्न केला पाहिजे. अरब देशांनी आपली एकजूट कायम राखली, आणि त्यांना संयुक्त राष्ट्रसंघाकडून सतत पाठिंबा मिळत गेला, तर त्यांना आपले प्रदेश परत मिळविणे आणि पॅलेस्टाईनी जनतेस न्याय्य अधिकार प्राप्त होणे मुळीच कठीण जाणार नाही, असे मला वाटते.

पोर्तुगालच्या आफ्रिकेतील साम्राज्याचा झपाट्याने विलय होत चालला आहे.

आफ्रिकेतील मुक्ति-आंदोलनांना हे यश लाभल्याबद्दल सर्वांनाच समाधान वाटत आहे. परंतु राष्ट्रिय स्वातंत्र्य संपादन करण्याचा आफ्रिकी देशांचा लढा अजूनही संपलेला नाही. म्हणून आफ्रिकेतील जे देश अजूनही गुलामीत राहत आहेत, त्यांच्या मुक्ति-आंदोलनांना गती कशी लाभेल, याचा आपण विचार केला पाहिजे.

अंगोलामध्ये स्वातंत्र्य मिळताच अंतर्गत संघर्ष निर्माण व्हावा, ही सगळ्यांच्याच दृष्टीने चिंतेची बाब आहे. कारण सत्तेसाठी सुरू झालेल्या या संघर्षाची झळ अखेरीस तेथील जनतेलाच सहन करावी लागणार आहे. अंगोलामधील निरनिराळ्या गटांमध्ये शांतता आणि सहकार्य प्रस्थापित करण्याच्या कार्यात आफ्रिकी ऐक्य-संघटनेला यश येईल, अशी आशा आहे.

आफ्रिकेच्या दक्षिण भागात तीन प्रश्न अंतर्गत राहिलेले आहेत. नामिबियाचे स्वातंत्र्य, झिंबाब्वेमध्ये बहुसंख्याकांची राजवट आणि वर्ण-विद्वेषाचे उच्चाटन, हे ते तीन प्रश्न होत. हे प्रश्न परस्परांशी निगडित असल्यामुळे त्यांचा एकत्रच विचार व्हावयास हवा. दक्षिण आफ्रिकेच्या गो-या आणि वर्ण-विद्वेषी राजवटीने नामिबियाचे प्रशासन स्वत:कडे ठेवणे बेकायदेशीर आहे, हे यापूर्वीच जाहीर करण्यात आले आहे. नामिबियातील जनतेला स्वातंत्र्य देण्यात येईपर्यंतच्या मधल्या काळात तेथील प्रशासन स्वत:कडे घ्यायला संयुक्त राष्ट्रसंघाने तयारी दर्शविली आहे. परंतु अजूनही दक्षिण आफ्रिकी सरकार संयुक्त राष्ट्रसंघाचा हा आदेश धुडकावून लावत आहे. म्हणून आता संयुक्त राष्ट्रसंघाने हस्तक्षेप केला पाहिजे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध प्रभावी आणि निर्धारपूर्वक कृती केली पाहिजे, अशी आमची मागणी आहे.

दक्षिण आफ्रिकी सरकारच्या पाठिंब्यावरच झिंबाब्वेमधील स्मिथ यांची बेकायदेशीर राजवट टिकून आहे. स्मिथ यांना या प्रश्नात सन्माननीय तडजोड करावयाची असेल, तर त्यांनी प्रथम सर्व राजकीय स्थानबद्धांची सुटका करून तेथील लोकनेत्यांची घटना परिषद बोलावली पाहिजे आणि अखेरीस बहुसंख्याकांकडे सत्ता सुपूर्त केली जाईल, या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत. स्मिथ राजवटीविरुद्ध सुरक्षा

समितीने केलेल्या उपाययोजनेचा मर्यादित परिणाम दिसून येत असला, तरी परिस्थिती फारशी बदललेली नाही, हे मान्य केलेच पाहिजे. तेथील लोकनेत्यांमध्ये फूट पडावी आणि त्यांना मान्य नसलेला तोडगा स्वीकारायला भाग पाडावे, यादृष्टीने स्मिथ राजवट प्रयत्न करीत असल्याचे कळते. स्मिथ यांचा हा प्रयत्न यशस्वी होऊ न देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने झिंबाब्वेमधील मुक्ति-आंदोलनाला पाठिंबा दिला पाहिजे.

दक्षिण आफ्रिकेच्या वर्णविद्वेषी धोरणाचा प्रश्न या ना त्या स्वरूपात १९४६ पासून संयुक्त राष्ट्रसंघासमोर आहेच. या बाबतीमध्ये महासमितीने वेळोवेळी केलेल्या आवाहनांना दक्षिण आफ्रिकेने काहीच किंमत दिलेली नाही. दक्षिण आफ्रिकेशी सर्वांनी राजनैतिक संबंध तोडले, तरी त्याचीही तिने पर्वा केलेली नाही. दक्षिण आफ्रिकेशी व्यापार करू नये आणि तिला शस्त्रे पुरवू नयेत, असा संयुक्त राष्ट्रसंघाने आदेश जारी केला असला, तरी त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे वेगवेगळी बांटुस्ताने निर्माण करून आदिवासी जनतेला त्या त्या वस्तीत स्थानबद्ध ठेवण्याचे कुटिल धोरण दक्षिण आफ्रिकेने चालूच ठेवले आहे. तसेच आदिवासी जनतेला आपल्या घरांमधून हुसकावून लावण्यात येत आहे, तिच्यावर अमानुष बंधने लादली जात आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या ठरावांची संपूर्ण अवहेलना करून दक्षिण आफ्रिकेने अजूनही वर्णविद्वेषी धोरण चालू ठेवल्यामुळे त्यांच्या प्रतिनिधींवरचा विश्वास नाहीसा झाला आणि म्हणूनच त्यांना महासमितीच्या अधिवेशनातून घालवून देण्यात आले. दक्षिण आफ्रिकेच्या गो-या वर्णविद्वेषी राजवटीवर आणि तिच्या समर्थकांवर काहीच परिणाम झालेला दिसत नाही. म्हणून, या बदनाम राजवटीच्या वर्चस्वातून मुक्त होण्यासाठी तेथे चालू असलेल्या लढयाला मदत करण्याशिवाय पर्यायच उरलेला नाही.

आंतरराष्ट्रिय तणाव वाढविणा-या घटनांचे विवेचन करीत असताना युरोपमधील

काही आशादायक घटनांचाही निर्देश करायला हवा. युरोप खंडातील शांतता आणि भावी सहकार्य यांची रूपरेखा ठरविण्यासाठी उपराष्ट्र नेत्यांची हेलेसिंकी येथे परिषद भरली होती. त्या परिषदेत युरोपमधील शांतता आणि सहकार्य यासंबंधी करण्यात आलेल्या कराराचे स्वागत केले पाहिजे. आतापर्यंतच्या जागतिक महायुद्धांचा उद्भव युरोपात झालेला असल्यामुळे या कराराला जागतिक शांततेच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त होते. या कराराची कक्षा इतर खंडांपर्यंत आणि विशेषत: सध्याच्या तणावग्रस्त विभागापर्यंत विस्तारित करण्यात आली, तरच युरोपमधील या सामंजस्याला जागतिक परिणाम लाभणार आहे. लष्करी उपकरणांवर होणारा खर्च सर्व मानवजातीच्या कल्याणासाठी उपयोगात आणावयाचे ठरले, तर या सामंजस्याचे अधिक भरीव परिणाम दिसून येतील. संयुक्त राष्ट्रसंघ महासमितीच्या पहिल्या बैठकीतील पहिला ठराव नि:शस्त्रीकरणासंबंधी होता. तो तसा असणे स्वाभाविकही होते. कारण दुस-या महायुद्धापूर्वीच्या राष्ट्रसंघाला याच प्रश्नाने घेरले होते आणि त्यामुळे दुस-या महायुद्धानंतर अस्तित्वात आलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाने नि:शस्त्रीकरणाच्या प्रश्नाला प्राधान्य देणे, हे ओघानेच आलेले होते.

संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या स्थापनेपासून गेल्या तीस वर्षांमध्ये नि:शस्त्रीकरणासंबंधी आणि विशेषत: अण्वस्त्र-निर्मितीवर बंदी घालण्याबाबत अनेक ठराव आणि आवाहने केली. परंतु त्या दिशेने फारशी प्रगती झालेली नाही. तसे घडून येण्याऐवजी शस्त्रास्त्र-स्पर्धा वाढीलाच लागल्याचे दिसून आले आहे. अण्वस्त्रांचा आणि अन्य संहारक शस्त्रांचा साठा आता इतका झालेला आहे, की असे करण्यात काही शहाणपण आहे का, असा प्रश्न उत्पन्न होतो. उपासमार, दारिद्र्य आणि सामाजिक अन्याय नाहीसा करण्यासाठी पैसा कसा उपलब्ध करावयाचा, याचा एकीकडे जग विचार करीत असताना शस्त्रस्पर्धेवर दरवर्षी तीस हजार कोटी डॉलर्स उधळले जात आहेत. अण्वस्त्रबंदीला सर्वांत अधिक प्राधान्य देण्याची गरज जाणवत असताना त्याबाबत कोणते उपाय योजावेत, याचा अजूनही गंभीरपणे विचार होत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

शांतता हा प्रगतीचा पाया आहे. त्याचबरोबर जोपर्यंत जगातील वाढती विषमता रोखली आणि नाहीशी केली जात नाही, तोपर्यंत चिरंतन शांतता निर्माण होणे अशक्य आहे.

सा-या मानवजातीला कोणते प्रश्न भेडसावत आहेत, ते सोडविण्यासाठी साधनसामग्री कशी उपलब्ध होईल, प्रमुख प्रश्नांचा सखोल अभ्यास कसा करता येईल आणि मुख्य म्हणजे मने एकत्र येण्याची कितपत शक्यता आहे, यांचा विचार करण्याच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्रसंघाच्या सातव्या विशेष अधिवेशनाने बरीच प्रगती केली आहे. या फलनिष्पत्तीला जसे अवास्तव महत्त्व देता कामा नये, तशीच ती कमीही लेखून चालणार नाही. या खास अधिवेशनातील अंतिम निवेदनाबद्दल विकसनशील देशांना संपूर्ण समाधान वाटणे शक्य नाही, याची मला जाणीव आहे. तरी देखील प्रारंभ झालेला आहे आणि या निर्णयांची कसोशीने आणि द्रुतगतीने अंमलबजावणी करण्यात आली, तर उर्वरित प्रश्नांसंबंधी अधिक विचारविनिमय करणे सुकर जाईल. अशा विचारविनिमयातून आंतरराष्ट्रिय आर्थिक समतोल कसा नाहीसा करता येईल, याचा उलगडा होऊ शकेल. कारण सध्याच्या परिस्थितीचे नव्या आणि समान अर्थव्यवस्थेत रूपांतर होणे आवश्यक आहे, या बाबींची ग्वाही विकसित देशांनी प्रत्यक्ष कृतीनेच द्यावयाची आहे.

स्वातंत्र्यप्राप्ती हा प्रश्न राजकीय दृष्ट्या जेवढा महत्त्वाचा आहे, तेवढेच महत्त्व आर्थिक आणि सामाजिक विकसनशीलतेला मिळाले पाहिजे. संयुक्त राष्ट्रसंघापुढे तेच मोठे आव्हान आहे. कारण समतेवर आधारित सहकार्य निर्माण करण्याचे ते एकमेव साधन आहे. भविष्यकाळाने सा-या मानवजातीपुढे टाकलेले हे अभूतपूर्व आव्हान स्वीकारण्यासाठी, संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व यंत्रणा आणि कार्यपद्धती यांची सुजाणपणे नि दूरदृष्टीने वापर करणे अगत्याचे झालेले आहे.

## २१. परराष्ट्रिय धोरणाची दिशा

'गतिमान'(१९७५) दिवाळी अंकातील
मुलाखतीच्या आधारे.

गेल्या वर्षात जागतिक स्तरावर परिणाम करणा-या दोन अतिशय महत्त्वाच्या घटना घडल्या. पहिली व्हिएटनाम युद्धाची समाप्ती आणि दुसरी हेलेसिंकीत भरलेली युरोपीय समझोता परिषद. आंतरराष्ट्रिय क्षेत्रात या वर्षात घडलेल्या या दोन अतिशय महत्त्वाच्या घटना आहेत. व्हिएटनामी जनतेने प्रदीर्घकाळ चाललेल्या युद्धात जो विजय मिळविला आहे, त्याने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे, की शस्त्रास्त्राच्या दृष्टीने सामर्थ्य असणारी कोणतीही मोठी शक्ती राष्ट्रवादावर आधारलेल्या जनसामर्थ्याविरुद्ध कधीच यशस्वी होऊ शकणार नाही. जनशक्तीचा व पुरोगामी राष्ट्रवादाचा हा विजय आहे.

दुस-या महायुद्धानंतर पहिल्या प्रथमच इंडोचायनामध्ये शांतता व स्थिरता स्थापित होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. शांतता हा विचारच मूलत: एकजिनसी आहे. त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात शांततेच्या दिशेने पडलेली पावले जागतिक शांततेला अंतत: शक्ती देणारीच गोष्ट ठरत असते. व्हिएटनामच्या विजयाचे या दृष्टीने महत्त्व आहे, असे मला वाटते.

हेलेसिंकी इथे झालेली परिषद व तिथे झालेले करार-मदार ही युरोपच्या इतिहासातील एक महत्त्वाची आणि भविष्याला कलाटणी देऊ शकणारी आशादायी घटना आहे. युरोपात शांतता व सामंजस्य प्रस्थापित होण्याच्या मार्गावरील तो एक महत्त्वाचा टप्पा आहे, असे मला वाटते. अर्थात या करारामुळे युरोपमध्ये असलेल्या लष्करी गटांच्या या अस्तित्वावर परिणाम झालेला नाही, ही गोष्ट खरी आहे. त्यांच्यांतील संघर्ष संपला, असेही म्हणता येणार नाही. परंतु त्यांच्यांत सहकार्य

निर्माण होण्याची शक्यता उद्भवली आहे, असे मला वाटते. म्हणूनच जागतिक शांतता प्रस्थापनेच्या दृष्टीने या दोन्ही घटना महत्त्वाच्या आहेत, यात शंकाच नाही.

युरोपमध्ये शांतता परिषदेच्या यशस्वी वाटाघाटीनंतर कदाचित सोवियत रशिया या प्रश्नांना चालना देण्याची व त्याच्या पाठीमागच्या तत्त्वाची मांडणी करण्याची शक्यता आहे. परंतु आशियाई सुरक्षा कराराच्या कल्पनेची अजूनही सुनिश्चितपणाने व तपशिलवार मांडणी झालेली नाही. सोवियत नेते व तज्ज्ञ यांनी या बाबतीत एक गोष्ट केली आहे, की ही योजना कोणाही राष्ट्राच्या विरुद्ध मांडलेला असा लष्करी करार किंवा योजना नाही.

या पार्श्वभूमीवर सोवियत रशिया व चीन यांचे संबंध या कारणामुळे बिघडावेत, असे समजायला सबळ कारणे दिसत नाही. सोवियत रशियाची व भारताची मैत्री अनेक संकटप्रसंगी तावून सुलाखून निघालेली आहे व ती दोन्ही राष्ट्रांच्या परस्पर हिताच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. तरीसुद्धा ही मैत्री भारताचे चीनशी संबंध सुधारण्याच्या आड यावी, याचे मला तरी कारण दिसत नाही. आमची ही भूमिका आम्ही अनेक वेळा स्पष्ट केली आहे. दुर्दैवाने आमची ही विचारसरणी चीनने अजूनही स्वीकारलेली नाही किंवा समजावून घेण्याचा प्रयत्नही केलेला नाही.

आशियाई सुरक्षा कराराच्या पाठीमागच्या भूमिकेचे परीक्षण जागतिक सामंजस्य व सहकार्य (Global detente) यांच्या आधारावर झालेल्या हेलेसिंकी येथील निर्णयाच्या संदर्भात केले पाहिजे. माझ्या कल्पनेप्रमाणे या विचारधारणेमागे आशियाई राष्ट्रांमध्ये परस्पर-सहकार्य व सल्ला-मसलत वाढावी; त्याचप्रमाणे आशियाई राष्ट्रांत सुरक्षा व सहकार्याची शक्यता निर्माण होईल, असे वातावरण निर्माण व्हावे, अशी भावना आहे. रशियाने या कामी पुढाकार घेतलेला आहे, आणि भारतही या संकल्पनेत सहभागी आहे. परंतु याचा अर्थ चीनची नाकेबंदी करण्याचा हेतू आहे, असे म्हणणे विपर्यस्त ठरेल. आशियाई शांतता कराराची योजना सुनिश्चित स्वरूपात अद्यापि मांडलेली नाही. परंतु कधी काळी ही योजना अमलात येणार

असेल, तर ती अर्थातच सर्व आशियाई राष्ट्रांच्या मान्यतेनेच येऊ शकेल. त्यासाठी या योजनेमध्ये धोरणांची लवचिकता व सामंजस्य आणि वातावरणाचा विकास होण्यासाठी लागणारा संयम यांची गरज आहे. यासंबंधी मी जो विचार केला आहे, त्यानुसार या संकल्पनेत चीनसह सर्व आशियाई राष्ट्रे मैत्री-भावनेने सम्मीलित असावी, अशीच कल्पना आहे. त्याचप्रमाणे हेही स्पष्ट केले आहे, की हा काही कोणा एका राष्ट्राविरुद्ध मांडलेला लष्करी करार नाही.

भारताची भूमिका याबाबत स्पष्ट आहे. सर्व आशियाई राष्ट्रांत शांततेचे, सुरक्षिततेचे व सहकार्याचे वातावरण वाढविले पाहिजे. यासाठी भारत प्रयत्नशील आहे. त्याचप्रमाणे हिंदी महासागरात परकीय लष्करी शक्तींना वाव मिळू नये, यासाठीही भारत प्रयत्न करीत आहे. हिंदी महासागर शांततेचे प्रांगण बनले पाहिजे, हे भारताच्या परराष्ट्र-नीतीचे महत्त्वाचे सूत्र आहे. भारताच्या नीतीची ही सूत्रमाला नजरेसमोर ठेवून उपखंडात आणि पूर्व रशिया अरब राष्ट्रे यांच्यामध्ये आर्थिक व राजकीय सहकार्य वाढावे, या धोरणाचा भारत सरकार सतत पाठपुरावा करणार आहे व या दिशेने निश्चित पावले टाकण्यास सुरुवातही झाली आहे.

युरोपीय करार व व्हिएटनाममधील पराभव यांमुळे अमेरिका अलिप्त बनेल, अशी शक्यता काहीजण व्यक्त करतात. परंतु अमेरिका एकाकी अलिप्ततावदी (Isolationist) कधी काळी बनेल, असे मला वाटत नाही. उलटपक्षी, लहानमोठ्या आंतरराष्ट्रिय प्रश्नांमध्ये लक्ष घालण्यात त्यांना नुसता रसच आहे, असे नव्हे, तर त्यात त्यांचे हितसंबंधही गुंतलेले आहेत. किंबहुना इतरांची अडचण होईल, इतक्या टोकापर्यंत जाऊन राजकीय पुढाकार घेण्याची अमरिकेची तयारी असते. हेलेसिंकी परिषदेत सोवियेत रशियाच्या बरोबरीने अमेरिकेने भाग घेतला. पश्चिम आशिया प्रश्नातही ते अट्टाहासाने मध्यस्थी करीत आहेत. अलीकडे झालेल्या राष्ट्रसंघाच्या अधिवेशनातील काही आर्थिक प्रश्नांत थोड्याशा समजूतदारपणाने भाग घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पण त्यातून काय घडेल, हे सांगणे अवघड आहे. सांगण्याचा महत्त्वाचा मुद्दा असा, की विकसनशील देशांतील प्रश्नांपासून स्वत:ला अलग

ठेवण्याचे त्यांचे धोरण दिसत नाही. परंतु लहान व गरीब देशांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपल्या हितसंबंधाला बाधा न येता जेवढे करता येईल, तेवढेच करण्याची त्यांची आपमतलबी भाषा आहे. जगातील आर्थिक रचनेची पुरोगामी पुनर्मांडणी करण्याच्या कल्पनेला विरोध दिसतो. याबाबतीत विकसनशील देशांचा दृष्टिकोण अमेरिकेच्या धोरणापासून मूलत: वेगळा आहे. विकसनशील राष्ट्रे आपली मते जास्त हिरीरीने जगापुढे मांडीत राहतील.

आजच्या जगात, राजकीय व आर्थिक क्षेत्रांत मूलभूत आणि लक्ष्यवेधक प्रश्न आहे, तो मानवजातीच्या दारिद्र्याचा आणि विकसित व विकसनशील राष्ट्रांमधील अक्षम्य विषमतेचा. अविकसित राष्ट्रांना समर्थ बनविण्यासाठी आवश्यक ती साधने पुरविण्याकरिता विकसित राष्ट्रांनी त्यागपूर्वक पुढाकार घेऊन प्रयत्न केला पाहिजे, असा विकसनशील राष्ट्रांचा आग्रह आहे. ही आग्रही मागणी करताना संघर्ष टाळून सहकार्य-भावनेने हे घडावे, असा त्यांचा मानस आहे. असे घडले, तर उज्ज्वल मानवी भविष्याबद्दल आशा बाळगण्यास जागा आहे. पण तसे घडले नाही, तर मात्र संघर्ष अटळ आहे. परंतु असा संघर्ष होणे मानवजातीच्या हिताचा नाही, ही जाणीव मात्र हळूहळू सर्वांना होत आहे, ही आनंदाची बाब आहे.

अमेरिकेचे लष्करी विस्तारवादी धोरण हे रशियाच्या साम्यवादी आक्रमणाला थोपविण्याचे शस्त्र आहे, अशी नीती अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री जॉन एफ्. डल्लस यांनी प्रचलित केली. परंतु डल्लसचा जमाना आता मागे पडला आहे. अमेरिकेच्या राजकीय धोरणाच्या डावपेचांत काही मूलभूत
फेररचना झालेली दिसते. सध्या तरी ते सामंजस्य आणि शांततापूर्ण सहजीवनाची भाषा बोलत आहेत. निव्वळ सामर्थ्याच्या जोरावर चीनला काबूत ठेवण्याची कल्पनाही त्यांनी सोडून दिलेली दिसते. कारण ती व्यवहार्य नाही, हे त्यांना कळून चुकले असावे. त्यांचे सध्याचे धोरणही समजुतीचे आणि तणाव कमी करण्याचेच दिसते. अर्थात या दोन राष्ट्रांमधील संघर्षाची, तणावांची आणि स्पर्धांची क्षेत्रे ब-याच प्रमाणात आजही अस्तित्वात आहेत.

आजच्या जगामध्ये लष्करी व विस्तारवादी नीतीला स्थान असता कामा नये, असे भारताला वाटते. मानवजातीचे सुख व कल्याण जागतिक सहकार्यामध्ये व मानवतेतील विषमता दूर करण्याच्या निर्धारपूर्ण प्रयत्नांवर अवलंबून आहे. हे मूळ सूत्र नजरेसमोर ठेवूनच भारत आपल्या विदेश-नीतीची रचना करीत आला आहे. परंतु असे असले, तरी हेलेसिंकी परिषदेमुळे जागतिक युद्ध किंवा अणुसंघर्ष होणार नाही, असा माझा भोळाभाव नाही. ते टळावे, असे प्रयत्न मात्र झाले पाहिजेत व ते प्रखरपणे केले पाहिजेत, यावर माझा विश्वास आहे. एक चांगली गोष्ट अशी आहे, की अशा संघर्षातून होणा-या भयानक परिणामांची जाणीव मोठ्या राष्ट्रांनाही आता झाली आहे. गेल्या काही वर्षांत या दिशेने काही आशादायी पावलेही पडली आहेत. हेलेसिंकी शिखर परिषद हा त्याचाच एक पुरावा आहे. शीतयुद्धाच्या वेळी जग ज्या दोन समर्थ गटांत विभागले गेल्यासारखे दिसत होते, तशी स्थिती आज राहिलेली नाही. जगातील बहुसंख्य देश आज लष्करी गटाच्या बाहेर राहून अलिप्ततावादाचा पुरस्कार करीत आहेत. अलिप्ततावादाचा विचार आज जगात मान्यता पावला आहे, एवढेच नव्हे, तर त्याला सामर्थ्यही प्राप्त झाले आहे. अलिप्ततावादी राष्ट्रे कुठल्याही एका मोठ्या राष्ट्राचा कोणत्याही प्रकारचा अग्रहक्क वा नेतृत्व मान्य करीत नाही. अलिप्तततावादी राष्ट्रांच्या या विचाराच्या सामर्थ्याची बूज राखली गेली पाहिजे. जगाची वैचारिक राजकीय वाटणी केवळ दोन मतप्रणालींच्या पायावर करणे, माझ्या मते चुकीचे आहे. वस्तुत: राजकीय व आर्थिक मतप्रणालीच्या विविध तऱ्हा व छटा सर्व जगभर आपआपल्या परिस्थितीनुरूप व अनुभवावरून बनलेल्या आहेत व यापुढेही बनत राहतील. अनेक राष्ट्रे आपल्या परंपरा, इतिहास, गरजा व अनुभव यांच्या अनुरोधाने आपापल्या आर्थिक व राजकीय पद्धती विकसित करीत आहेत. या वेगवगळ्या पद्धतींमध्ये काही प्रमाणात जर आरोग्यदायी स्पर्धा राहिली, तर त्यात काही गैर नाही व ही गोष्ट त्यांच्या सहजीवनाच्या आड येईल, असे मानण्याचेही कारण नाही.

नेहरू, टीटो, नासर यांनी मांडलेली पंचशील तत्त्वे बांडुंग परिषदेच्या वेळी जेवढी

महत्त्वाची होती, तेवढी ती आजही तितकीच महत्त्वाची आहेत. पंचशील तत्त्वांचा पुरस्कार सुरुवातीस अगदी थोड्या राष्ट्रांनी केला. पण आज शेकडो राष्ट्रांनी तो स्वीकारलेला आहे, ही गोष्ट त्या विचारांच्या तत्त्वांची आणि उद्देशांची आजच्या काळात किती गरज आहे, हेच दाखवून देते. अलिप्ततावादाच्या भूमिकेवरून स्वतंत्र व पुरोगामी परराष्ट्र-नीती आखण्याचे मूलभूत तत्त्व भारताने स्वीकारले आहे व त्याचे निर्धारपूर्वक पालनही केले आहे.

बांगला देशाच्या नव्या राजवटीने भारताशी झालेले व इतर आंतरराष्ट्रिय करार सन्मानपूर्वक पाळण्याचे जाहीर केले आहे. त्यांच्या या धोरणाचे आम्ही स्वागतच केले आहे. या उपखंडात समानतेच्या भूमिकेवर परस्पर हितसंबंध ध्यानात घेऊन कोणाही राष्ट्राच्या सार्वभौम हक्कांमध्ये किंवा त्यांच्या अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेप न करण्याचे धोरण ठेवले पाहिजे. बाहेरील राष्ट्रांचा हस्तक्षेप बिलकूल होऊ न देता तडजोडीने व चर्चेने आपसांतील प्रश्न सोडविले पाहिजेत, हीच नीती यशस्वी होऊ शकेल. सिमला कराराचा हाच अर्थ मला तरी अभिप्रेत आहे.

धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व हे भारताच्या दृष्टीने एक अत्यंत मूलभूत असे तत्त्व आहे व भारत त्याचे पालन अत्यंत प्रामाणिकपणाने व निश्चयाने करीत आहे, कारण त्या मूलभूत तत्त्वांवर भारताची श्रद्धा आहे. धर्मभावना राजकीय विचारांच्या आड येऊ देणे चुकीचे आहे. यामुळे जनतेच्या मूलभूत मैत्रीच्या भावनेमध्ये संकटे निर्माण होतात. इस्राएलविरुद्ध अरब देशांच्या मागण्यांना केवळ सोयीस्कर राजकीय धोरण म्हणून आम्ही मान्यता देत नसून, न्यायाच्या तात्त्वि भूमिकेवर आम्ही त्यांना पाठिंबा देत आलो आहोत. हिंदुस्थान स्वतंत्र होण्यापूर्वी-महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य-लढा आपण लढत होतो, तेव्हापासून पॅलेस्टाईन अरबांच्यावर अन्याय झालेला आहे, अशी आमची भूमिका होती आणि आजही तीच आहे. कुठल्याही एखाद्या राष्ट्राने सक्तीने दुस-या राष्ट्राची भूमी बळकवावी, याला आमचा विरोध आहे. अरब राष्ट्रांनीही आमच्या मैत्रीला मित्रत्वाची साथ दिली आहे. त्यांनी तसा प्रतिसाद दिला नाही, असे जर कोणी मानत असेल, तर ते अत्यंत चूक आहे.

सौदी अरेबियाने प्रथमत: तेल पुरवठ्याच्या बाबतीत भारताची 'खास मित्रांत' गणना केली नव्हती, परंतु ही चूक त्यांनी तातडीने दुरुस्त केली आहे. काही प्रमुख अरब पुढारी हिंदुस्थानला भेट देऊन गेले आहेत आणि या दोन राष्ट्रांत सहकार्याची भूमिका तयार होत आहे. तेलांच्या वाढत्या किमतीमुळे प्राप्त झालेल्या संपन्नतेमुळे अरब राष्ट्रांशी विविध क्षेत्रांत तांत्रिक आणि आर्थिक सहकार्य करण्याची संधी भारताला प्राप्त झाली आहे. अलीकडे त्या राष्ट्रांशी आपला निर्यात-व्यापारही वाढला आहे.

इस्लामी धर्म परिषद ही आमच्या सहकार्याच्या आड येऊ देता कामा नये. बांगला देशामध्ये झालेल्या बदलामुळे अरब राष्ट्रांमध्ये व हिंदुस्थानमध्ये मतभेद होण्याचे कोणतेच कारण नाही. याचे कारण अरब राष्ट्रे व हिंदुस्थान यांचे संबंध परस्परांच्या आदरावर, मैत्रीवर व हितसंबंधावर अवलंबून आहेत.

आग्नेय आशियातील राष्ट्रांनी (ASEAN) शांतता, स्वातंत्र्य व अलिप्ततेचे क्षेत्र निर्माण व्हावे, अशी मागणी केली आहे. या मागणीला भारताने हार्दिक पाठिंबा देऊन असे सुचविले आहे, की हिंदी महासागरात शांततेचे क्षेत्र निर्माण करण्यासंबंधीची जी मागणी आहे, त्याबरोबरच आग्नेय आशियातील राष्ट्रांच्या मागणीचीही अंमलबजावणी केली पाहिजे. आग्नेय आशियातील देशांशी राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रांत सर्व तऱ्हेचे सहकार्य वाढविण्याचा भारत नेहमीच प्रयत्न करीत आलेला आहे. यासंदर्भात इंडोचायनामधील देशांनी अलिप्ततेच्या धोरणाचा पुरस्कार करण्याचा जो निर्णय घेतला आहे, तो स्वागतार्ह आहे.

भारताने गेल्या पंचवीस वर्षांत औद्योगिक व तांत्रिक क्षेत्रांत बरीच प्रगती केली आहे व आज भारतात या क्षेत्रांतील तंत्रज्ञांचा फार मोठा संचय आहे. त्यांच्या आधारावर भारत व आग्नेय आशियातील देशांमध्ये औद्योगिक क्षेत्रात वाढते सहकार्य नजिकच्या भविष्यकाळात होऊ शकेल. याशिवाय या देशांचे आपसांतील सांस्कृतिक संबंधही ऐतिहासिक काळापासून दृढ आहेत आणि ते सतत वाढत राहिले पाहिजेत.

मी तरी असे मानतो, की सोविएत रशियाने शांततामय सहजीवनाचे तत्त्व मान्य केलेले आहे आणि सोविएत रशियाची परराष्ट्र-नीतीही त्या तत्त्वावर आधारलेली आहे. किंबहुना असेही म्हणता येईल, की एकूणच सर्व जगात शांततामय सहजीवनाच्या तत्त्वाला अधिकाधिक मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे कोणत्याही देशातील राजकीय पद्धती किंवा आर्थिक प्रणाली यामुळे मैत्रीच्या संबंधांत बाधा येण्याचे काही कारण नाही.

भारताने धर्मनिरपेक्षता व समाजवाद यांवर आधारित संसदीय लोकशाहीचा मार्ग पत्करलेला आहे आणि त्याच मार्गाने आपली आर्थिक व सामाजिक उन्नती करून घेण्याचा भारताचा निर्धार आहे. भारतातील संसदीय लोकशाही जर टिकवून धरावयाची असेल, तर अखेरीस त्यासाठी जरूर आहे, ती एकतेची, सामर्थ्याची व दृढ निष्ठेने केलेल्या परिश्रमांची.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारताचे आफ्रिकेशी फार निकटचे संबंध राहिले आहेत. महात्मा गांधींच्या सत्याग्रहाची सुरुवात आफ्रिकेतच झाली. तेव्हापासून सातत्याने भारताने आफ्रिकेतील देशांच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षांचा व चळवळींचा पाठपुरावा केलेला आहे. आफ्रिकेतील सर्व स्वतंत्र देशांची संघटना आहे आणि त्या संघटनेने अलिप्ततेच्या धोरणाचाच सतत पुरस्कार केलेला आहे. त्यावरून भारत व आफ्रिकेतील स्वतंत्र देश यांच्या परराष्ट्र-नीतींतील जवळीक स्पष्ट होईल. दक्षिण आफ्रिका सोडून आफ्रिकेतील इतर देशांशी भारताने राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रांत सहकार्याचे धोरण अवलंबिले आहे. संयुक्त राष्ट्रसंघातही वसाहतवाद व वर्णद्वेष यांविरुद्ध भारताने आफ्रिकी देशांशी सतत सहकार्य केलेले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाला आज जगात फार महत्त्वाचे स्थान आहे. जागतिक शांतता व सुरक्षितता या राष्ट्रसंघाच्या सनदेत समाविष्ट असलेल्या उद्दिष्टांपासून जग अजूनही खूप दूर आहे, यात शंका नाही. परंतु देशादेशांतील तणाव कमी करण्यात आणि

जागतिक शांततेसाठी केलेल्या प्रयत्नांना पाठबळ देण्यात राष्ट्रसंघाने लक्षणीय कामगिरी बजाविली आहे. विशेषत:, वसाहतवादाचे उच्चाटन करण्यास संयुक्त राष्ट्रसंघाने बजावलेली कामगिरी दूरगामी व उल्लेखनीय आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाचे आतापर्यंतचे कार्य पाहता, भविष्यकाळातही राष्ट्र संघाचे महत्त्वपूर्ण स्थान अबाधित राहील, अशी माझी तरी धारणा आहे. याचा अर्थ असा नाही, की आतापर्यंत जे काही यश संयुक्त राष्ट्रसंघाने मिळविले आहे, त्यापलीकडे काही करण्यासारखे उरलेले नाही. जगातील विकसनशील देशांतील दारिद्र्य दूर करणे व विकसनशील व विकसित देशांतील विषमता कमी करणे, या दृष्टीने अनेक पावले उचलणे आवश्यक आहे. नुकत्याच संपलेल्या विशेष अधिवेशनात संमत झालेला एकमुखी प्रस्ताव हे या दिशेने टाकलेले पहिले पाऊल होय. वेगवेगळ्या देशांची अर्थरचना व संपन्नता ही एकमेकांशी किती निगडित आहे, याची सर्वांनाच जाणीव व्हावयास लागली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. विशेषत:, विकसनशील देशांच्या प्रगतीशिवाय विकसित देशांतील संपन्नता अतिशय अस्थिर आहे, विकसित देशांना अधिक तीव्रतेने जाणीव होण्याची गरज आहे. जगातील अर्थरचना अधिक न्याय्य आधारावर पुनर्गठित करण्याच्या दृष्टीने अनेक ठाम पावले उचलणे आवश्यक झाले आहे.

एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण करण्याच्या दृष्टीने व जागतिक समस्यांवर सहकार्याच्या आधारावर काही उपाय शोधण्याच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्रसंघ हे एक फार उपयुक्त असे स्थान आहे. त्यामुळे आजच्या जगातील जे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न आहेत, मग ते राजकीय क्षेत्रांतील असोत किंवा आर्थिक असोत किंवा सामाजिक क्षेत्रातील असोत, त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या राष्ट्रसंघाच्या घटक-संस्थांची कार्यक्षमता वाढविणे व त्यासाठी जरूर तर संयुक्त राष्ट्रसंघाची संघटनात्मक पुनर्रचना करणे हे विकसनशील राष्ट्रांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे उद्दिष्ट नजरेसमोर असायला हवे, असे मला वाटते.

## २२. परराष्ट्रिय धोरणाची मार्गदर्शक मूलतत्त्वे

१९७६ साली लोकसभेत वादविवादाला
दिलेल्या उत्तराचे भाषण.

आपल्या देशाच्या परराष्ट्रिय धोरणाचा विचार करताना आपण या प्रश्नाकडे संकुचित पक्षीय दृष्टिकोणातून पाहत नाही, असा सर्वसाधारण अनुभव आहे. तसे पाहिले, तर आपल्या स्वातंत्र्य-आंदोलनातच आपल्या देशाच्या परराष्ट्रिय धोरणाचे काही विशेष निश्चित केले गेले होते. अर्थातच जसजशी आंतरराष्ट्रिय परिस्थिती बदलत गेली, तसतशी या विशेषांमध्ये आणखी काही विशेषांची भर पडली. कधी कधी मांडणी करताना थोडेफार फेरफारही करावे लागले. हे असे कालोचित बदल वगळता परराष्ट्रिय धोरणाची मूळ बैठक नेहमीच कायम राहिलेली आहे. आणि मला वाटते, याचमुळे परराष्ट्रनीतीच्या क्षेत्रात आपल्या देशाचे महत्त्वाचे निर्णय व परिस्थितीचे मूल्यमापन बिनचूक ठरत आले आहे.

जागतिक शांततेच्या प्रस्थापनेसाठी क्रियाशील राहणे, सर्व देशांशी सहजीवनाच्या आणि सहकार्याच्या भूमिकेवरून संबंध प्रस्थापित करणे, समान आणि न्याय्य अर्थव्यवस्था उभारण्यासाठी प्रयत्नशील असणे आणि जगात जेथे कोठे स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठा संघर्ष चालू असेल, त्याला मन:पूर्वक पाठिंबा देणे, ही आपल्या परराष्ट्रिय धोरणाची मार्गदर्शक मूलतत्त्वे आहेत. आपल्या सांस्कृतिक परंपरेचा आणि स्वातंत्र्यसंग्रामाचा तोच वारसा आहे.

मार्टिन ल्यूथर किंग (ज्यूनियर) यांनी १९६५ मध्ये पं. नेहरूंसंबंधी काय म्हटले होते, ते नुकतेच माझ्या वाचनात आले. मार्टिन ल्यूथर किंग (जूनियर) हे केवळ

कृष्णवर्णीयांचेच नव्हे, तर सा-या मानवजातीचे महान नेते होते. त्यांनी नेहरूंच्या जीवनाचा किती सूक्ष्म अभ्यास केला होता, हे पाहून मी थक्क झालो. मार्टिन ल्यूथर किंग (ज्यूनियर) यांचे ते उद्गार केवळ नेहरूंसंबंधी नसून आपल्या परराष्ट्रिय धोरणासंबंधीही असल्यामुळे मी येथे उद्धृत करतो. ते म्हणाले होते: 'जवाहरलाल नेहरू हे तीन अनन्यसाधारण युगांचे जनक होते. आपली मातृभूमी वसाहतवादाच्या पाशातून मुक्त व्हावी, यासाठी झालेल्या प्रदीर्घ संघर्षाचे त्यांनी नेतृत्व केले. त्याचप्रमाणे इतर परतंत्र देशांतील जनतेलाही त्यांनी स्वातंत्र्य-प्राप्तीसाठी प्रेरणा दिली.'

हे नेहरूंचे पहिले युग होते.

नंतर त्यांचे दुसरे युग सुरू झाले. 'आपला देश स्वतंत्र करण्यात नेहरू यशस्वी झाल्यानंतर त्यांना एका ऐतिहासिक संघर्षाला तोंड द्यावे लागले. दुस-या महायुद्धानंतर जागतिक शांततेसाठी त्यांना झटावे लागले. या महान संघर्षामध्ये त्यांना महात्मा गांधींची प्रत्यक्ष साथ शक्य नव्हती. पण सर्व भारतीय जनता त्यांच्या पाठीशी उभी होती. कारण आता ती स्वतंत्र झालेली होती आणि भारतीय प्रजासत्ताक अस्तित्वात आलेले होते. तो काळ लक्षात घेतला, म्हणजे जागतिक शांततेसाठी नेहरूंनी आणि भारताने केवढी अवघड कामगिरी बजावली, याची कल्पना येऊ शकते. सारी मानवजात नष्ट होऊन जाते, की काय, अशी शक्यता वाटावी, एवढी भयावह परिस्थिती निर्माण झालेली होती. कोणत्याही क्षणास अणुयुद्ध भडकण्याचा संभव दृष्टिआड करता येत नव्हता. या अशा स्फोटक काळामध्ये पौर्वात्य आणि पाश्चिमात्य महासत्तांमधील वाढते वैमनस्य कमी होऊन त्यांच्याकडून जागतिक शांततेचा भंग होणार नाही, ही भारतीय जनतेची इच्छा त्यांच्या गळी उतरविण्याची अत्यंत नाजूक कामगिरी नेहरूंनी जागतिक मुत्सद्द्याच्या कौशल्याने पार पाडली.'

नेहरू ज्या तिस-या युगाचे जनक होते, यासंबंधी लिहिताना मार्टिन ल्यूथर किंग (ज्यूनियर) म्हणतात:

'हे तिसरे युग नेहरूंच्या निधनानंतर अवतरत आहे. त्यांचे पार्थिव शरीर जरी पंचत्वात विलीन झाले असले, तरी त्या व्यक्तित्वाचा आध्यात्मिक आशय आजही तितकाच चैतन्यशाली आहे. महासत्तांनी परस्परांशी अजून सौहार्दाचे संबंध प्रस्थापित केलेले नाहीत, हे खरे असले, तरी आपल्या महत्त्वाकांक्षेवर नियंत्रण कसे घालायचे, हे त्यांनी अलिप्ततावादी जगाच्या मदतीने जाणून घेतले आहे. या संयमावरच चिरस्थायी सामंजस्य नांदणार आहे. शांततामय सहजीवनावरील नेहरूंची दृढ श्रद्धा आणि या श्रद्धेला त्यांनी दिलेले कृतिरूप हाच मानवजातीस लाभलेला तेजस्वी आशाकिरण आहे.'

आपल्या परराष्ट्रिय धोरणाचा हाच खराखुरा आधार आहे. अलिप्ततावादाची संकल्पना, वसाहतवादविरोधी संकल्पना, साम्राज्यवादविरोधी संकल्पना, शांततेसाठी प्रयत्नशील असण्याची आणि त्याचबरोबर शांततामय सहजीवनाचा पुरस्कार करण्याची संकल्पना या सगळ्या संकल्पना त्या मूलभूत परराष्ट्रिय धोरणाचे आंतरराष्ट्रिय अविष्कार ठरतात.

आपण आपापसांत सामंजस्य निर्माण करावे, असे आता महासत्तांना वाटू लागले आहे, यामागे बरीच कारणे आहेत. विकसनशील अलिप्ततावादी देशांनी आंतरराष्ट्रिय राजकारणामध्ये आपले स्वत:चे असे वेगळे स्थान आणि सामर्थ्य निर्माण केले आहे. आंतरराष्ट्रिय परिस्थितीला एक वेगळी दिशा दिलेली आहे. हे त्यांपैकी एक प्रमुख कारण आहे. दुसरे असे, की तांत्रिक प्रगतीनेही ते अपरिहार्य केले आहे. आपणच सर्वांत शक्तिशाली आहोत, असा दावा कोणालाही करता येणार नाही. इतक्या प्रमाणामध्ये सर्वत्र तांत्रिक प्रगती झालेली दिसून येते.

'द्विकेंद्रात्मक' किंवा 'त्रिकेंद्रात्मक' किंवा 'पंचकेंद्रात्मक' अशा शब्दांनी सध्या काहीजण जागतिक परिस्थितीचे वर्णन करतात. ही अशी केंद्रे किती आहेत, ते मला माहीत नाही. आपल्याला मूलत: दोनच केंद्रे दिसतात. आता जर युद्ध झाले, तर ते अण्वस्त्रांचेच राहणार असल्यामुळे कोणालाही विजय मिळणे अशक्य आहे, हे या दोन्ही केंद्रांनाही कळून चुकलेले आहे. त्यामुळे त्यांना परस्परांशी समझोता करण्यावाचून गत्यंतरच उरलेले नाही. वस्तुस्थिती अशी आहे, की तंत्रविज्ञानातील क्रांतीमुळे आंतरराष्ट्रिय क्षेत्रामध्ये काही अपरिहार्य राजकीय मर्यादा निर्माण झालेल्या आहेत. आपल्याजवळील संहारक अस्त्रांचा आपण उपयोग करूच शकत नाही, याची कमालीची जाणीव प्रभावी शस्त्रास्त्रे बाळगणा-या महासत्तांना झालेली आहे. ही त्यांपैकीच एक मर्यादा होय.

त्यामुळे सामंजस्य ही एक चांगली घटना आहे, असे आपण म्हणत असलो आणि तिचे स्वागत करीत असलो, तरी हे सामंजस्य एका विशिष्ट खंडापुरतेच किंवा एका विविक्षित परिस्थितीपुरते मर्यादित राहता कामा नये, असेही आपण प्रतिपादन करतो. केवळ एखादा पेचप्रसंग टाळण्याचे तंत्र म्हणून समझोत्याचा अवलंब केला जाऊ नये;  तर जगातील सर्व खंडांना, सर्व परिस्थितींना आणि सर्व तणावांना समाविष्ट करण्याइतकी खरीखुरी क्षमता त्यात यावयास हवी, यावर आपला भर आहे. त्यामुळे आपण जेव्हा अलिप्ततावादाचा विचार करतो, तेव्हा आपण अलिप्ततेचा अधिक विधायक विचार केला पाहिजे, असे मला वाटते.

खरे म्हणजे, सुरुवातीपासूनच अलिप्तता ही केवळ एकपदरी संकल्पनाच नव्हती. अनेक मूलभूत घटकांना सामावून घेणारी अशी ती अनेकपदरी संकल्पना आहे. अलिप्ततावादाची उद्दिष्टे जवाहरलाल नेहरूंच्या शब्दांत सांगावयाची, तर:

'कोणत्याही एका महासत्तेचा किंवा सत्तागटाचा आधार न घेता प्रत्येक विवाद्य किंवा संघर्षमय प्रश्नाकडे स्वतंत्र दृष्टिकोणातून पाहून शांततेचा मार्ग चोखाळायचा

आहे. परतंत्र समाजाची मुक्तता, राष्ट्रिय आणि आंतरराष्ट्रिय स्वातंत्र्याचे जतन, वांशिक भेदाभेदांचे निर्मूलन आणि जागतिक लोकसंख्येच्या फार मोठ्या भागाची उपासमार, रोगराई व अज्ञान या दु:स्थितीतून सुटका ही अलिप्ततावादाची उद्दिष्टे आहेत.' नेहरू अलिप्ततावादाकडे मानवतेच्या भूमिकेतून पाहात होते. अलिप्तता हे मानवजातीच्या हातांतील एक विधायक साधन बनावे, असा त्यांचा प्रयत्न होता. अलिप्ततावादाचा हा प्रमुख विशेष सदैव ध्यानात ठेवायला हवा.

बदलती जागतिक परिस्थिती लक्षात घेता, त्या त्या परिस्थितीनुसार अलिप्ततावादाच्या विविध विशेषांपैकी एखाद्या विशेषाला अधिक प्राधान्य मिळणे क्रमप्राप्त आहे. मात्र अलिप्ततावादाचा कोणताही एक पैलू सध्याच्या परिस्थितीमध्ये निरर्थक झालेला आहे, असे मानणे माझ्या मताने अगदी चूक आहे. शीतयुद्धाचे युग आता समाप्त झालेले आहे, असा युक्तिवाद ऐकू येऊ लागल्यामुळे मला ही गोष्ट विशेष जोर देऊन सांगावीशी वाटते. कदाचित काही जण म्हणतात, त्याप्रमाणे शीतयुद्धाचे युग अस्तंगत झाले असेलही; परंतु मूलभूत परिस्थितीमध्ये बदल घडून आलेला आहे का, हा खरा सवाल आहे. मी त्यासंबंधी साशंक आहे. सर्व विकसनशील देशांना संपूर्ण स्थैर्य वाटत आहे का? सर्वांची भीती लोपली आहे, अशी ग्वाही आपण देऊ शकतो का?

१९६१ मध्ये बेलग्रेड येथे पहिली अलिप्ततावादी राष्ट्रांची शिखर परिषद भरल्यानंतरच्या काळामध्ये जागतिक परिस्थिती बदललेली आहे, हे कोणीच नाकबूल करणार नाही. परंतु अजूनही जग संघर्षमुक्त, दारिद्र्यमुक्त आणि तणावमुक्त झालेले नाही. म्हणूनच बदललेल्या आणि सतत बदलत असलेल्या जगामध्ये अलिप्ततावादाची चपखल संकल्पना १९६१ पेक्षाही अधिक अर्थपूर्ण ठरली आहे. ज्या देशांनी पूर्वी परस्परांविरुद्ध संघर्षाचा पवित्रा घेतला होता, ते देश आता तणाव कमी करण्याच्या मार्गावर आलेले आहेत, हे खरे आहे. येथे मी मुद्दामच सामंजस्य हा शब्द वापरत नाही, कारण काही लोकांना या शब्दाचे वावडे आहे. तणाव कमी करण्याच्या विधायक घटनेचे आपण स्वागत केलेले आहे.

वस्तुस्थिती अशी आहे, की सर्व खंडांना आणि सर्व संघर्ष-क्षेत्रांना अर्थपूर्ण सामंजस्याचे (Detente) तत्त्व लागू व्हावे, याच भूमिकेचा आपण सतत पुरस्कार केलेला आहे. इतकेच नव्हे, तर ज्या विभागात आपला देश आहे, त्या विभागात चिरस्थायी शांतता आणि मित्रतापूर्ण सहकार्य प्रस्थापित व्हावे, यासाठी आपण सतत प्रयत्न करीत आलेलो आहोत. असे असले, तरीही लष्करी करारमदार रद्द झालेले नाहीत. उलट, चित्र असे दिसते, ते असे, की जुन्या लष्करी करारांना पुन्हा उजाळा देण्यात येत आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट ही आहे, की मूलभूत साधनसामग्री, कच्चा माल आणि इंधन यांचा संभाव्य जागतिक तुटवडा लक्षात घेऊन पूर्वीच्या लष्करी गटांमध्ये नवा आर्थिक आशयही समाविष्ट केला जात आहे.

बड्या सत्तांच्या समझोत्यावर कोणते ताण पडत आहेत, हे जाणून घेण्याच्या दृष्टीने आफ्रिकेतील ताज्या घटनांकडे आणि हिंदी महासागरावर प्रभुत्व मिळविण्याच्या कारवायांकडे पाहिले पाहिजे, म्हणून लष्करी करार ही इतिहासजमा झालेली गोष्ट आहे, असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरते.

नव्याने मुक्त झालेल्या देशांचे स्वातंत्र्य जतन करण्यात, परतंत्र देशांतील स्वातंत्र्यसंग्रामांना बळ पुरविण्यात आणि साम्राज्यवाद, वसाहतवाद आणि वर्णवाद यांच्या विरुद्धच्या लढ्यांना पाठिंबा देण्यात अलिप्ततावादी चळवळीने मोठीच भूमिका बजावली आहे. नवी आणि न्याय्य आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्था साकार व्हावी, यासाठी चाललेल्या लढ्यातही अलिप्ततावादी देश आघाडीवर आहेत. म्हणून अलिप्ततावादी चळवळीच्या वाढत्या बळाचे आणि पाठिंब्याचे आपण स्वागत करतो.

मात्र त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे, की किती देश या चळवळीत सहभागी झालेले आहेत वा होत आहेत, यावर या चळवळीचे सामर्थ्य अवलंबून राहणार नाही. तर अलिप्ततावादी देशांची एकजूट आणि परस्पर-सहकार्य यावरच ही चळवळ बलवान होणार आहे. तात्कालिक गरजेपायी या चळवळीमागील मूलभूत उद्दिष्टांना

फाटा देण्यात आला, तर ही एकजूट आणि सहकार्य टिकू शकणार नाही, हेही तितकेच खरे आहे. भारताच्या राष्ट्रिय हितसंबंधांची जपणूक करणे हे भारताच्या परराष्ट्रिय धोरणाचे मुख्य सूत्र आहे, हे तर खरेच आहे. आपल्या देशाच्या परराष्ट्रिय धोरणाला ते सूत्र सोडता येणारच नाही. परंतु त्याबरोबरच या धोरणाचा आंतरराष्ट्रिय संदर्भ विसरता येत नाही. खरे पाहता, कोणत्याही देशाच्या परराष्ट्रिय धोरणाचे अंतर्गत आणि आंतरराष्ट्रिय संदर्भ परस्परांशी अत्यंत निगडित असतात. कारण राष्ट्रिय संदर्भातूनच आंतरराष्ट्रिय संदर्भ जन्म पावतात.

काही देशांशी आपली 'खास' मैत्री असावी आणि इतरांबरोबर मात्र 'आम' मैत्री ठेवावी, असे काही जण म्हणतात. परंतु मैत्रीमध्ये असा फरक करणे मला मंजूर नाही. 'आपण आपल्या मित्रांची निवड केली पाहिजे', असे म्हणणाऱ्यांना आपण आपल्या शत्रूंचीही निवड केली पाहिजे, असेच सुचवायचे असते. परंतु मला हे अभिप्रेत नाही. मला हे मान्य आहे, की काही वेळा असे घडते, की काही ऐतिहासिक कारणांमुळे काही देशांबरोबरचे संबंध आपोआपच दृढ होत जातात. असे घडणे स्वाभाविक असले, तरी 'खास मैत्री' आणि 'आम मैत्री' असा आपण फरक करता कामा नये, असे मी मानतो. 'जागतिक सत्ता' हा शब्दप्रयोग ज्या अर्थाने वापरण्यात येतो, त्या अर्थाने भारताला 'सत्ता' प्राप्त करून घेण्याची इच्छा नाही. भारत बलिष्ठ असलाच पाहिजे, याविषयी दुमत नाही. शांततेत नांदता यावे आणि सहकार्याने वागता यावे, असाच भारत आम्हांला हवा आहे. तांत्रिक आणि वैज्ञानिक क्रांतीमध्ये सहभागी होऊनच आपल्याला हे उद्दिष्ट साध्य करता येईल.

विकसित देशांतील लोकांपाशी जेवढी बुद्धी आणि कर्तृत्व आहे, तेवढेच ते आपल्या लोकांपाशीही आहे, असे मी मानतो. आपण बुद्धिमत्तेत मुळीच मागे नाही. हा कालावधीचा प्रश्न आहे. विकसित देशांनी तांत्रिक क्रांतीच्या कार्याला दोनशे वर्षांपूर्वी प्रारंभ केला. आपल्याला तो आता करायला मिळत आहे, ही खरी अडचण आहे. असे असले, तरी तांत्रिक क्रांती घडवून आणण्याच्या कार्याला आपण गती दिली आणि

तशी ती देऊ, याची मला खात्री आहे. आणि त्याचबरोबर या उद्दिष्टाला अनुसरून आपण आपल्या आर्थिक, व्यापारी आणि परराष्ट्रिय धोरणाची आखणी केली, तर अखेरीस आपण तेथेही तांत्रिक क्रांती घडवून आणू शकू. आपल्या अंतर्गत राजकीय, आर्थिक आणि शास्त्रीय धोरणांवरच आपल्या परराष्ट्रिय धोरणाचे यश आणि सामर्थ्य अवलंबून आहे, हे मी वारंवार सांगत आलो आहे. म्हणून ज्याप्रमाणे आपण आपले परराष्ट्रिय धोरण आखताना आणि अनेक देशांबरोबरचे संबंध ठरविताना काळजी घेतो, तशीच काळजी राजकीय, आर्थिक आणि शास्त्रीय धोरण ठरवितानाही घेतली पाहिजे. कारण भारताच्या सामर्थ्याचा तोच मूलाधार आहे. हा आधार आपण जेवढा बळकट करू, तेवढ्या प्रमाणात आपण भारताला आणि भारतीय जनतेला समर्थ करणार आहोत. कारण अखेरीस भारतीय जनतेचे सामर्थ्यच भारताचे परराष्ट्रिय धोरण समर्थ आणि यशस्वी करणार आहे.

## २३. अलिप्ततावाद आणि पाचवी कोलंबो शिखर परिषद

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने ऑगस्ट १९७६ मध्ये
प्रसिद्ध केलेल्या पुस्तिकेतील लेख.

बेलग्रेड येथे १९६१ मध्ये भरलेल्या पहिल्या शिखर परिषदेपासून अलिप्ततावादी आंदोलनास प्रारंभ झालेला असला, तरी या आंदोलनामागचे धोरण आणि तत्त्वे पं. जवाहरलाल नेहरू यांनी त्यापूर्वीच सांगितलेली होती. भारत स्वतंत्र व्हायच्या अगोदरपासूनच त्यांनी अलिप्ततावादाचा पुरस्कार आरंभिला होता. हंगामी सरकारचे प्रमुख या नात्याने ७ सप्टेंबर १९४६ या दिवशी भारताच्या भावी परराष्ट्रिय धोरणाची सूत्रे विशद करताना जवाहरलाल नेहरू म्हणाले होते :

'परस्परांविरुद्ध उभ्या ठाकलेल्या सर्वच सत्तागटांपासून स्वत:ला जास्तीत जास्त अलिप्त ठेवण्याचा भारताचा प्रयत्न राहील. कारण या अशा परस्परविरोधी गटांमुळेच पूर्वी जागतिक महायुद्धे भडकली होती आणि पुन्हा जर संघर्षाचा भडका उडाला, तर पूर्वी कधीही झाला नव्हता, इतका संहार होण्याचा संभव आहे. म्हणून शांतता आणि स्वातंत्र्य यांचे अतूट नाते आहे, असे आम्ही मानतो. म्हणून कोणत्याही देशाच्या स्वातंत्र्याला नकार देणे, म्हणजे अन्य ठिकाणचे स्वातंत्र्य धोक्यात आणण्यासारखे ठरणार असून त्यातूनच महायुद्धाचा उद्भव होऊ शकेल. सर्वच परतंत्र देश स्वतंत्र व्हावेत, कारण सर्वच समाजांना केवळ तात्त्विक पातळीवर नव्हे, तर प्रत्यक्षातही समान संधी मिळाली पाहिजे, अशी आमची धारणा आहे.'

नेहरूंनी अलिप्ततावादाची ही संकल्पना अत्यंत स्पष्ट शब्दांत विशद केल्यानंतरच्या गेल्या तीस वर्षांच्या काळामध्ये अलिप्ततावादी आंदोलनाला आंतरराष्ट्रिय व्यासपीठावर खूपच सामर्थ्य आणि प्रतिष्ठा लाभलेली आहे. जागतिक शांतता आणि स्थैर्य कायम टिकण्याच्या कार्यात या आंदोलनाने मोठाच वाटा उचललेला आहे. वसाहतवाद, वंशवाद आणि वर्णीय पक्षपात यांच्या निर्मूलनाचे आणि न्याय्य नि समान आर्थिक व सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचे कार्यही या आंदोलनाला ब-याच प्रमाणामध्ये करता आलेले आहे.

प्रारंभीच्या काळामध्ये या आंदोलनाच्या उभारणीस चालना देण्यामध्ये दोन परिषदांचा वाटा बराच होता. या दोन्ही परिषदा आशियाई भूमीवरच भरल्या होत्या. यांपैकी पहिली आशियाई संबंध परिषद १९४७ मध्ये दिल्लीला भरली होती. आफ्रिका-आशियाई राष्ट्रांची दुसरी परिषद १९५५ मध्ये इंडोनेशियातील बांडुंग येथे आयोजित करण्यात आली होती. नवस्वतंत्र आशियाई आणि आफ्रिकी देशांना अलिप्ततावादासंबंधी वाटणा-या आस्थेचा प्रत्यय या दोन परिषदांमुळे आला. दोन्ही सत्तागटांपैकी कोणाचेही वर्चस्व वा नियंत्रण नवस्वतंत्र देशांना पत्करावे लागता

कामा नये, या निर्धाराच्या दोन्ही परिषदा निदर्शक ठरल्या. आंतरराष्ट्रिय राजकीय व्यवस्थेचे लोकशाहीकरण करण्याची आवश्यकताही या परिषदांनी प्रतिपादन केली.

अलिप्ततावादी आंदोलनाला लाभत चाललेल्या वाढत्या पाठिंब्याच्या पार्श्वभूमीवर १९६१ मध्ये बेलग्रेड येथे अलिप्ततावादी राष्ट्रांची पहिली शिखर परिषद बोलाविण्यात आली. बेलग्रेड येथील पहिल्या शिखर परिषदेला सदस्य म्हणून पंचवीस देश उपस्थित राहिले. त्यांपैकी तेरा आशियाई देश होते. या पहिल्या परिषदेनंतर या आंदोलनाची कक्षा सतत विस्तारत राहिली. नंतरच्या शिखर परिषदा कैरो (इजिप्त) येथे १९६४ मध्ये, लुसाका (झांबीया) येथे १९७० मध्ये आणि आल्डोयर्स (आंजेरिया) येथे १९७३ मध्ये भरल्या. या प्रत्येक परिषदेच्या वेळी अलिप्ततावादी देशांची संख्या वाढत होती. कोलंबो येथे १९७६ च्या ऑगस्टमध्ये भरलेल्या पाचव्या शिखर परिषदेमध्ये संपूर्ण सदस्य म्हणून ८६ देशांनी, निरीक्षक म्हणून १० देशांनी व निमंत्रित म्हणून ७ देशांनी भाग घेतला. अलिप्ततावादाचे महत्त्व आणि परिणामकारकता किती आहे, हे या आंदोलनाला द्रुत गतीने लाभलेल्या वाढत्या पाठिंब्यावरून दिसून येते. तसेच या आंदोलनामागील धोरण आणि कार्यक्रम यांची निर्विवाद उपयुक्तताही सिद्ध होते.

गेल्या वीस वर्षांमध्ये अलिप्ततावादी आंदोलनाने काय साध्य केले? तिची ध्येये आणि उद्दिष्टे कोणती आहेत? दुस-या महायुद्धाच्या विनाशकारी आघातातून स्वत:ला सावरणा-या आणि नवोदित देशांची संख्या सतत वाढत चाललेल्या जगाला, अलिप्ततावादी आंदोलनाच्या रूपाने, मानवजातीला अत्यावश्यक असलेल्या शाश्वत आणि अर्थपूर्ण शांततेचा आशादीप दिसला. नवस्वतंत्र देशांचे स्वाभाविक आणि प्रामाणिक राष्ट्रिय हितसंबंध हेच आंदोलनाला सुरक्षित ठेवू शकतात, हे सिद्ध झाले. कारण अविरत कष्टांनंतर लाभलेल्या राष्ट्रिय स्वातंत्र्याचे जतन आणि संवर्धन करण्याची क्षमता या आंदोलनात आहे.

आपल्या स्वातंत्र्याचे संरक्षण करणे आणि आर्थिक नि सामाजिक विकासाच्या

मार्गाने हे स्वातंत्र्य प्रत्यक्ष आणि अर्थपूर्ण करणे हाच या आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या देशांचा दृढ निश्चय असल्यामुळे अलिप्ततावादाला आज चिरस्थायी महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणून लष्करी करार आणि आघाड्या यांच्या किंवा वसाहतवादी आणि साम्राज्यवादी शक्तींच्या धोक्यांपासून नवस्वतंत्र देशांना सुरक्षित ठेवण्याचे कार्यच केवळ अलिप्ततावादाने पार पाडले आहे, असे नसून, या आंदोलनाने राष्ट्रिय स्वातंत्र्याचे जतन आणि जागतिक शांततेची ग्वाही ही विधायक कामगिरीही बजावली आहे.

अलिप्ततावाद ही अकारणात्मक, स्थितिशील किंवा नकारात्मक संकल्पना नाही, हे गेल्या काही वर्षांत अलिप्ततावादाचा जो विकास झालेला आहे, त्यावरून स्पष्ट होते. उलटपक्षी, या काळात अलिप्ततावादी आंदोलनाला जे यश लाभले, ते म्हणजे बदलत्या आंतरराष्ट्रिय परिस्थितीशी हे आंदोलन किती सुसंवादी आहे, याचा पुरावाच ठरते.

वेगवेगळी रूपे घेणा-या वसाहतवादाविरुद्ध आणि साम्राज्यवादाविरुद्ध लढण्याचे एक प्रभावी साधन म्हणून अलिप्ततावादी आंदोलनाने आपले सामर्थ्य प्रकट केले आहे. त्याचप्रमाणे नववसाहतवादी परकीय वर्चस्वामुळे राष्ट्राराष्ट्रांमध्ये जे विषम संबंध निर्माण होतात, त्यांमुळे उद्भवणा-या समस्यांविरुद्धही या आंदोलनाने झुंज घेतली आहे. परदेशांकडून येणा-या दबावाचा विचार करण्याची शक्ती या आंदोलनाने नवस्वतंत्र देशांना पुरविली, ही तर आंदोलनाच्या दृष्टीने जमेची मोठीच बाजू आहे.

प्रत्येक राष्ट्राला आणि समाजाला आपल्या विकासाचा मार्ग स्वतंत्रपणे अनुसरण्याचा अधिकार आहे, हे अलिप्ततावादाचे प्रमुख सूत्र असल्यामुळे या आंदोलनात सहभागी झालेले देश आपल्या अंतर्गत कारभारामध्ये परराष्ट्रांकडून होत असणारा हस्तक्षेप मोठ्या विश्वासाने आणि निर्धाराने रोखू शकतात. या बाह्य हस्तक्षेपाचे अनेक प्रकार असतात. कधी हा हस्तक्षेप वृत्तपत्रांसारख्या जनसंपर्क माध्यमांच्या मार्फत केला जातो, तर काही वेळेला त्यासाठी आर्थिक आणि राजकीय यंत्रणा आणि संस्था

यांचा वापर केला जातो. नवस्वतंत्र देशात गोंधळ आणि अराजक निर्माण करणे, हाच या हस्तक्षेपाचा उद्देश असतो.

कोलंबो येथील शिखर परिषदेमध्ये मुख्यत: अलिप्ततावादाच्या महत्त्वपूर्ण विशेषांवर भर देण्यात आला. त्यामुळेच अलिप्त राष्ट्रांची एक स्वतंत्र वृत्तसंस्था स्थापन करण्यासाठी भरावयाच्या परिषदेत यजमानत्व स्वीकारण्याच्या भारताच्या पुढाकाराचे सर्व देशांनी मन:पूर्वक स्वागत केले. अलिप्त राष्ट्रांच्या स्वतंत्र वृत्तसंचयामुळे जनसंपर्क माध्यमांच्या क्षेत्रात एक नवी आंतरराष्ट्रिय व्यवस्था कार्यवाहीत येईल, असा सर्वांनाच विश्वास वाटतो. कारण त्यामुळे बातम्या पाठविण्याबाबत सध्या काही बड्या देशांवर अवलंबून राहावे लागते, ती परिस्थिती नाहीशी होणार आहे. त्यामुळे एका अर्थाने ही नवी व्यवस्था म्हणजे वृत्तसंचय आणि वृत्तवितरण या बाबतींतील वसाहतवादाचे उच्चाटन ठरेल. सर्व अलिप्ततावादी देश परस्परसहकार्याच्या भावनेने एकत्र येऊन आपली साधनसंपत्ती एकजुटीने वापरू लागले, तर प्रत्यक्षामध्ये केवढे मोठे कार्य करता येते, याचे अलिप्ततावादी वृत्तसंचय योजना हे एक उल्लेखनीय उदाहरण आहे. वसाहतवादाच्या जोखडाखाली खितपत पडलेल्या देशांना स्वतंत्र होण्याची प्रेरणा दिली, ही अलिप्ततावादाची महायुद्धोत्तर काळातील अत्यंत महत्त्वाची फलश्रुती म्हटली पाहिजे. वसाहतवादी देशांनी इतर देशांच्या भूमीवरून चालते झाले पाहिजे, अशी अलिप्ततावादी देशांनी सतत एकमुखाने संयुक्त राष्ट्रसंघामध्ये आणि अन्य आंतरराष्ट्रिय व्यासपीठांवर मागणी केली आणि वसाहतवादाच्या उच्चाटनाचे कार्य आता अंतिम आणि निर्णायक अवस्थेपर्यंत पोहोचले, हे या आंदोलनाला लाभलेले भरघोस यश म्हटले पाहिजे.

अंगोला, केप बर्द, कोमोरोस, गिनो बिसाऊ, मोझांबिक, साओ टोमो नि प्रिन्सिपे आणि सेशेलिस हे अगदी अलीकडे स्वतंत्र झालेले देश परिषदेत सहभागी झाले, याबद्दल कोलंबो येथे भरलेल्या शिखर परिषदेने आनंद व्यक्त केला. त्याचप्रमाणे वसाहतवादाचे उरलेसुरले अवशेषही उखडून काढल्याशिवाय हे आंदोलन स्वस्थ बसणार नाही, हा निर्धारही व्यक्त करण्यात आला.

मुख्य म्हणजे झिंबाब्वे आणि दक्षिण आफ्रिका येथे अद्यापही वर्णविद्वेष, वंशवाद आणि वांशिक पक्षपात यांचे जे थैमान सुरू झालेले आहे, त्याचा पूर्णपणे बीमोड करण्याच्या प्रतिज्ञेचा या शिखर परिषदेत पुनरुच्चार करण्यात आला. दक्षिण आफ्रिकी सरकारने बेकायदेशीरपणे नामिबिया आपल्या ताब्यात ठेवावा आणि सोवोटो, लांगा, इत्यादी दक्षिण आफ्रिकी शहरांमधील रहिवाशांवर अत्याचार करावेत, याबद्दल तर कोलंबो शिखर परिषदेने दक्षिण आफ्रिकी सरकारचा तीव्र निषेध केला. अलिप्ततावादी देशांनी आपले प्रयत्न यापुढेही नेटाने जारी ठेवले, तर संपूर्ण आफ्रिका खंड वसाहतवादाच्या ग्रहणातून मुक्त करण्याचे उद्दिष्ट लवकरच सफल झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास वाटतो.

उपस्थितीच्या दृष्टीने पाचवी शिखर-परिषद सर्वांत मोठी ठरली. कारण तिला ४२ राष्ट्रप्रमुख किंवा शासनप्रमुख आणि ६५ परराष्ट्रमंत्री हजर होते. अलिप्ततावादी आंदोलनाच्या मूलभूत उद्दिष्टांना वाढता पाठिंबा मिळत आहे, याचे प्रत्यक्ष दर्शनच या पाचव्या शिखर परिषदेच्या रूपाने पाहता आले. शांततामय सहजीवनाची तत्त्वे हाच आंतरराष्ट्रिय संबंधाचा पाया असला पाहिजे, या अलिप्ततावादी आंदोलनाच्या मूलभूत भूमिकेला जागतिक लोकसमूहाकडून व्यापक पाठिंबा लाभला आहे. अनेक महत्त्वाचे आंतरराष्ट्रिय प्रश्न सोडविण्यासाठी एक स्वतंत्र आणि प्रभावी माध्यम म्हणून अलिप्ततावादी आंदोलन किती उपयुक्त ठरू शकते, याचाही या परिषदेच्या रूपाने पुनर्प्रत्यय आला. अनेक आंतरराष्ट्रिय प्रश्न सोडविण्यामध्ये अलिप्त राष्ट्रांच्या एकजुटीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे, हे मान्य केलेच पाहिजे. आफ्रिकेच्या दक्षिण भागातील वंशविद्वेषी राजवटी उलथवून पाडण्याच्या कार्यात अलिप्त राष्ट्रांनी केलेल्या लक्षणीय कार्याचा उल्लेख यापूर्वीच करण्यात आलेला आहे. अशी आणखीही अनेक उदाहरणे देता येतील.
पॅलेस्टाईनच्या प्रश्नावरून पश्चिम आशियातील वातावरण चिघळलेले असताना अलिप्त राष्ट्रांनीच तेथील शांतता टिकविण्याचा प्रयत्न केला. सायप्रस आणि कोरिया या देशांतील स्फोटक परिस्थितीबाबतही हेच म्हणता येईल. हिंदी महासागर हा

शांतता विभाग म्हणून मान्य केला जावा, या आग्रहास इतर राष्ट्रांची मान्यता मिळविण्याचे कार्य अलिप्त राष्ट्रांनीच पार पाडले. या सर्व प्रश्नांच्या बाबतीत अलिप्त राष्ट्रांचा एकत्रित आवाज, हेच स्वयंपूर्ण आणि व्यावहारिक मार्ग शोधून काढण्याचे परिणामकारक साधन ठरले. म्हणून यापुढे हे अलिप्ततावादी आंदोलन अधिक बळकट करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. अलिप्ततावादी देशांनी परस्परांतील सहकार्य वाढविले, तर जागतिक शांततेचे रक्षण करण्याची या आंदोलनाची क्षमता निश्चितच वृद्धिंगत होईल.

कोलंबो येथील शिखर परिषदांमुळे अलिप्ततावादी देशांना अनेक आंतरराष्ट्रिय समस्यांसंबंधी आणि गेल्या पंधरा वर्षांमध्ये या आंदोलनाने केलेल्या प्रगतीसंबंधी विचारविनिमय करण्याची चांगली संधी लाभली. या आंदोलनात सहभागी होणा-या देशांची संख्या जशी वाढू लागली, तसे संघटनात्मक बाबींकडे अधिक लक्ष पुरवावे लागणे, हेही क्रमप्राप्तच होते. या संबंधात भारताची भूमिका स्पष्ट आहे. या आंदोलनासाठी एखादे कायम स्वरूपाचे सचिवालय उभारणे किंवा तत्सम स्वरूपाची साचेबंद यंत्रणा निर्माण करणे इष्ट ठरणार नाही, असे भारताचे मत असून या मताचा कोलंबो शिखर परिषदेस जमलेल्या ब-याच देशांनी पाठपुरावा केला. कायम स्वरूपाचे सचिवालय उभारण्याऐवजी समन्वय समितीच अधिक मजबूत आणि कार्यक्षम करावी, ही भारताची कल्पना एकमताने मंजूर करण्यात आली.

शिखर परिषदांच्या मधल्या काळामध्ये अलिप्ततावादी देशांच्या कार्यामध्ये सुसूत्रता राखण्याचे आणि निर्णयाची कार्यवाही करण्याचे कार्य ही समन्वय समिती करीत असते. या आंदोलनाची तीच एकमेव प्रातिनिधिक समिती आहे. शिखर परिषदेने दिलेल्या आदेशांची कार्यवाही करण्याची जबाबदारी जरी समितीवर पडत असली, तरी तिला आपल्या कार्यात खूपच मोकळेपणा असतो. तिच्या कामकाजामध्ये गैरवाजवी साचेबंदपणा येणार नाही, इतके स्वातंत्र्य ती घेऊ शकते. या समितीचा विस्तार आणि सातत्य नि समतोल, भौगोलिक प्रतिनिधित्व यांच्या संदर्भात तिची रचना यासंबंधी या सूचना होत्या. त्यानुसार समन्वय समितीची सदस्यसंख्या १७ वरून २५

पर्यंत वाढविण्यात आली असून त्यांची विभागीय विभागणी पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे. आफ्रिका १२ जागा, आशिया ८ जागा, दक्षिण अमेरिका ४ जागा आणि युरोप १ जागा. अलिप्ततावादी आंदोलनामध्ये भारताने प्रारंभापासून स्वीकारलेली महत्त्वपूर्ण भूमिका लक्षात घेऊन कोलंबो शिखर परिषदेने भारताची समन्वय समितीवर फेरनिवड केली. नव्या समन्वय समितीवर पुढील देशांना घेण्यात आलेले आहे :

**आफ्रिका** : अल्जेरिया, अंगोला, बाट्सवाना, छाड, गिनी, लायबेरिया, नायजर, नायजेरिया, सुदान, टांझानिया, झहिरे, आणि झांबिया.

**आशिया** : व्हिएटनाम, इंडोनेशिया, अफगाणिस्तान, बांगला देश, सीरिया, इराक, पॅलेस्टाईन मुक्ती संघटना आणि श्रीलंका.

**दक्षिण अमेरिका** : क्यूबा, पेरू, गयाना आणि जमैका.

**युरोप** : युगोस्लाव्हिया.

कोलंबो शिखर परिषदेमधील भारताच्या भूमिकेचा विधायक आणि परिणामकारक असा गौरव करण्यात आला. अलिप्ततावादी आंदोलनाची एकता आणि सामंजस्य टिकविण्यात आले पाहिजे, यावर या शिखर परिषदेमध्ये भारताने भर दिला होता. या शिखर परिषदेमध्ये करण्यात आलेल्या निर्णयांची आणि प्रस्तावांची पुरेशी कार्यवाही करण्यात आली, तरच या आंदोलनाची विश्वासार्हता कायम राहील, या गोष्टीकडे भारताने इतर देशांचे लक्ष वेधले. त्याबाबतीत सहमतीच्या तत्त्वाचा अवलंब करण्यात आला पाहिजे, हे सर्वांनाच मान्य झाले. अलिप्ततावादी देशांची एकजूट टिकविण्याच्या दृष्टीने सहमतीचे तत्त्व उपयुक्त ठरते, अशी आमची श्रद्धा आहे. कोलंबो शिखर परिषदेमध्ये काही देशांना सहभागी व्हायला आम्ही मान्यता देण्यामागे आमचा तोच दृष्टिकोण होता. मात्र याचा अर्थ, या परिषदेमध्ये कोणास

सहभागी होता येईल, यासंबंधीच्या मूळ धोरणापासून आपण च्युत झालेलो आहोत, असा करणे निखालस चुकीचे ठरेल. उलट, त्या धोरणाचा शिखर परिषदेत पुरस्कार करण्यात आला. कारण त्याची उपयुक्तता स्थिर झालेली आहे. सभासद आणि निरीक्षक यांच्या बाबतीचे १९६१ मधील पहिल्या शिखर परिषदेत जे निकष ठरविण्यात आले, तेच यापुढेही स्वीकारले पाहिजेत, यावर परिषदेमध्ये एकमत झाले. कोलंबो शिखर परिषदेमध्ये जो राजकीय जाहिरनामा मान्य करण्यात आला, त्यात अनेक आंतरराष्ट्रिय प्रश्नांचा समावेश करण्यात आलेला आहे. हा जाहिरनामा तयार करीत असताना बरीच मोकळी आणि स्पष्ट चर्चा झाली व जाहिरनाम्यामध्ये विवाद्य प्रश्नांचा समावेश करतानाही अलिप्ततावादी देशांच्या एकजुटीला तडा जाणार नाही, अशी काळजी घेण्याबाबत कोणाचेच दुमत नव्हते. त्यामुळेच राजकीय जाहिरनाम्यामध्ये अंतर्भूत करण्यात आलेल्या अनेक आणि तऱ्हेतऱ्हेच्या प्रश्नांबाबत उल्लेखनीय मतैक्य आढळून आले.

भारतीय शिष्टमंडळाने ज्या अनेक कल्पना आणि सूचना मांडल्या, त्यांपैकी ब-याचशा कल्पना-सूचनांचा अंतिम मसुद्यामध्ये अंतर्भाव करण्यात आला. राजकीय जाहिरनाम्यामध्ये अलिप्ततावादी आंदोलनाचे मुख्य स्वरूप आणि मूलभूत तत्त्वे आणि उद्दिष्टे यांचा जोरदार पुनरुच्चार करण्यात आला पाहिजे, असा आमचा आग्रह होता. दुसरे असे, की कोलंबो परिषदेच्या निमित्ताने आशियामध्ये प्रथमच शिखर परिषद भरत असल्यामुळे अलिप्ततावादी आंदोलनाच्या उभारणीमध्ये आशिया खंडाने बजाविलेल्या भूमिकेचा राजकीय जाहिरनाम्यामध्ये उल्लेख होणे आवश्यक आहे, असेही आम्ही सुचविले. या दोन्ही सूचना अंतिम मसुद्यात अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत.

नि:शस्त्रीकरण हा आमच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचा विषय होता. म्हणून केवळ नि:शस्त्रीकरणाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी १९७८ च्या आत संयुक्त राष्ट्रसंघाने आपले खास अधिवेशन बोलवावे, अशी कोलंबो परिषदेने मागणी केली. जागतिक नि:शस्त्रीकरण परिषदेऐवजी हे अधिवेशन बोलवावे, असा या मागणीचा

अर्थ नसून, जागतिक नि:शस्त्रीकरण परिषद बोलावणे भाग पडावे, याचे एक परिणामकारक साधन म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाचे खास अधिवेशन उपयोगी पडावे, असे अभिप्रेत आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मूळ जाहिरनाम्यामध्ये जी तत्त्वे आणि उद्दिष्टे नमूद करण्यात आलेली आहेत, ती साध्य होण्यासाठी अलिप्ततावादी देशांनी आपले वाढते बळ संयुक्त राष्ट्रसंघाच्या पाठीशी उभे करावे, हा निर्धारही कोलंबो शिखर परिषदेमध्ये एकमताने व्यक्त करण्यात आला. हिंदी महासागर हा शांतता विभाग म्हणून घोषित करण्यात आला पाहिजे, ही भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची घटना ठरणार असल्यामुळे त्याबाबतीत भारतीय शिष्ट मंडळाने या विभागातील इतर राष्ट्रांशी घनिष्ठ सहकार्य करण्याचे ठरविले आहे. म्हणून बड्या सत्तांच्या या विभागातील संघर्षाचे आणि स्पर्धेचे निर्मूलन व्हावे, तसेच या सत्तांनी हिंदी महासागरातील आपले लष्करी तळ आणि अण्वस्त्र-केंद्रे काढून घ्यावीत, असे कोलंबो परिषदेने आवाहन केले. कोलंबो जाहिरनाम्यामध्ये दिएगो गार्सिया येथील लष्करी तळाचा निषेध करण्यात आला असून, बड्या सत्तांच्या स्पर्धेपायी या विभागामध्ये जे लष्करी करार वा तह करण्यात आलेले आहेत, त्यांपासून या विभागातील तटवर्ती आणि भूवेष्टित देशांनी दूर राहावे, असे जाहिरनाम्यामध्ये म्हटले आहे. या विभागातील सध्याचे वातावरण लक्षात घेता हिंदी महासागराभोवतालचे तटवर्ती व भूवेष्टित देश, महासत्ता आणि या महासागराचा व्यापारी नौकानयनासाठी वापर करणारे देश अशा सर्वांची परिषद बोलाविणे आवश्यक झाले आहे, हेही जाहिरनाम्यात नमूद करण्यात आलेले आहे. व्हिएटनामच्या एकीकरणाबाबत परिषदेत समाधान व्यक्त करण्यात आले. त्याचप्रमाणे साम्राज्यवादाविरुद्धच्या लढाईत यशस्वी झाल्याबद्दल कंबोडिया, लाओस आणि व्हिएटनाम येथील जनतेचे अभिनंदन करण्यात आले. या देशांच्या आर्थिक पुनर्रचनेमध्ये सर्वतोपरी साहाय्य करण्याचे आश्वासनही कोलंबो परिषदेने दिले.

न्याय आणि समानता या तत्त्वांवर आधारलेली नवी आंतरराष्ट्रिय आर्थिक व्यवस्था

अस्तित्वात यावी, यासाठी सुरू झालेल्या प्रयत्नांमध्ये अलिप्ततावादी देश परस्परांशी अधिक सहकार्य करू लागले आहेत. हा या आंदोलनाच्या यशाचा आणखी एक ढळढळीत पुरावा म्हटला पाहिजे. आर्थिक विमोचनाशिवाय राजकीय स्वातंत्र्याला पूर्णत्व प्राप्त होत नाही, हे तत्त्व अलिप्ततावादी आंदोलनाने प्रथमपासूनच स्वीकारलेले असल्यामुळे या आंदोलनात आर्थिक आशय अनुस्यूत झालेला आहे. प्रत्येक अलिप्ततावादी देशाची ऐतिहासिक आणि राजकीय पार्श्वभूमी वेगवेगळी आहे, हे तर खरेच आहे, पण या प्रत्येक देशापाशी असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे प्रमाणही भिन्न आहे. असे असले, तरीही गेल्या काही वर्षांपासून अनेक आंतरराष्ट्रिय संघटनांमध्ये त्यांनी संयुक्त आणि समन्वित कृती करण्याचे धोरण स्वीकारले आहे.

विकसनशील देशांमधील एक मोठा गट ७७ देशांचा गट म्हणून ओळखला जातो. या गटातील अलिप्ततावादी देशांनी अनेक नव्या कल्पनांचा आणि समान धोरणांचा पुरस्कार केलेला आहे.

नवी आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्था निर्माण करण्याच्या अलिप्ततावादी देशांच्या मागणीमागे तीन मूलभूत घटक आहेत. श्रीमंत आणि गरीब देशांमधील आर्थिक विषमता नाहीशी झाली पाहिजे, औद्योगिक देशांकडून होत असलेल्या दडपणांना रोखण्यासाठी अलिप्ततावादी देशांनी परस्पर-सहकार्याची कक्षा वाढविली पाहिजे आणि आपल्या विकासाच्या योजना नि अग्रक्रम ठरविण्याचा अलिप्ततावादी देशांना संपूर्ण अधिकार असला पाहिजे, या तीन घटकांवर नव्या आंतरराष्ट्रिय व्यवस्थेची मागणी आधारित आहे. या मागणीचे अनेक प्रत्यक्ष परिणामही दिसून येऊ लागले आहेत. बेलग्रेड येथील १९६१ मधल्या शिखर परिषदेनंतर १९६४ मध्ये जिनिव्हा येथे संयुक्त राष्ट्रसंघाच्या वतीने पहिली व्यापार-विकासविषयक परिषद भरली. आल्जिअर्स येथे भरलेल्या चौथ्या शिखर परिषदेनंतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासमितीच्या सहाव्या आणि सातव्या खास अधिवेशनांची मागणी करण्यात आली.

याच अधिवेशनांमध्ये देशांच्या आर्थिक अधिकारांचा आणि जबाबदाऱ्यांचा तसेच नव्या आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्थेचा जाहिरनामा स्वीकारण्यात आला.

आपल्याला जास्तीत जास्त आर्थिक स्वायत्तता मिळाली पाहिजे, यासाठी अलिप्ततावादी देशांनी सुरू केलेल्या लढ्यांच्या दृष्टीने कोलंबो शिखर परिषदेने आणखी एक पाऊल पुढे टाकले. अलिप्ततावादी आणि विकसनशील देशांना परस्परांशी आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करण्याखेरीज पर्यायच उरलेला नाही. हे मत या परिषदेस हजर राहिलेल्या जवळजवळ सर्व राष्ट्रप्रमुखांनी आणि शासनप्रमुखांनी व्यक्त केले. अलिप्ततावादी आंदोलनाला आर्थिक आशय देण्यासाठी आणि नवी आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्था अमलात येण्यासाठी सामूहिक स्वावलंबनाचा मार्ग अनुसरला पाहिजे, याची या देशांना वाढती जाणीव होऊ लागली आहे. या शिखर परिषदेत जो कृतिकार्यक्रम मंजूर करण्यात आला आहे, तो अलिप्ततावादी आणि इतर विकसनशील देशांना परस्परांशी अधिकाधिक सहकार्य करण्याची गरज वाटत असल्याचाच निदर्शक आहे. आर्थिक जाहिरनाम्यामध्ये आणि कृति-कार्यामध्ये सहकार्याची अनेकविध क्षेत्रे निर्देशित करण्यात आलेली आहेत. व्यापार, चलनविषयक आणि आर्थिक सहकार्य, अन्नधान्य आणि शेती, उद्योगीकरण, आरोग्य, शास्त्रीय आणि तांत्रिक विकासातील सहकार्य, पर्यटन, रोजगार-निर्मिती अशा अनेक क्षेत्रांत अलिप्ततावादी विकसनशील देशांना भरीव वाटचाल करता येऊ शकेल. अलिप्ततावादी आणि विकसनशील देशांनी आपल्या विद्यमान आर्थिक क्षमतेचा परस्परांना अधिकाधिक उपयोग करून दिला, तर विकसित देशांवर अवलंबून राहण्याचे प्रमाण बरेच कमी होईल, यावर भर देण्याचे ठरले आहे.

अशा तऱ्हेच्या आर्थिक सहकार्याबाबत अलिप्ततावादी आणि विकसनशील देशांपाशी प्रचंड क्षमता असून या प्रक्रियेस चालना मिळावी, या दिशेने भारत पुढाकार घ्यायला तयार आहे. सहकार्य करू इच्छिणा-या देशांच्या पुढाकारानेच वर निर्देशित केलेल्या क्षेत्रांमधील कृति-कार्यक्रम अमलात यावयाचा आहे. कोलंबो शिखर परिषदेच्या अगोदरपासूनच अलिप्ततावादी आणि विकसनशील देशांमधील आर्थिक व

चलनविषयक सहकार्याबाबत जो समन्वयक गट स्थापन करण्यात आलेला आहे, त्यात भारताचा समावेश आहे. कोलंबो परिषदेमध्ये शास्त्रीय आणि तांत्रिक विकास तसेच तांत्रिक सहकार्य आणि मार्गदर्शन या बाबींसंबंधीही भारतास समन्वयक म्हणून नेमण्यात आले. या सर्व क्षेत्रांमध्ये भारताने जी उल्लेखनीय प्रगती केली आहे, तिचीच ही पावती आहे. कोलंबो जाहिरनाम्यामध्ये एका प्रकल्प विकास यंत्रणेची शिफारस करण्यात आलेली आहे. आपल्या देशांतील प्रकल्पासंबंधी पाहणी-अहवाल तयार करण्यासाठी इतर विकसनशील देशांतील तज्ज्ञांचे साहाय्य घेता यावे, हा या मागचा हेतू आहे. विकसनशील देशांमधील कौशल्ये, उपकरणे आणि तंत्रज्ञान यांची आपापसांत देवाणघेवाण होत राहावी, असे अपेक्षित आहे. विकसनशील देशांनी संयुक्त प्रकल्प आणि बहुउद्देशीय कार्यक्रम हाती घेतला, तर त्यांना औद्योगिक विकास द्रुत गतीने करून घेता येईल, यावरही त्या जाहिरनाम्यात भर दिलेला आहे. तसेच विकसित देशांवर अन्नधान्यांच्या आयातीसाठी अवलंबून राहावे लागू नये आणि विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांमधील रचनात्मक स्वरूपाचा समतोल सुधारावा, यासाठी अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आंतरराष्ट्रिय व्यापारामध्ये वाजवी अटी अमलात आणण्याची आणि विकासाच्या प्रक्रियेत सर्वांना समान वाटा मिळण्यासंबंधी विकसित देशांवर निश्चित जबाबदारी येऊन पडते, असे सध्याच्या आंतरराष्ट्रिय आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करताना कोलंबो परिषदेने नि:संदिग्ध शब्दांत म्हटले आहे. जागतिक अर्थव्यवस्थेचे सध्याचे परस्परावलंबी स्वरूप ध्यानात घेऊन श्रीमंत राष्ट्रांना पूर्वीप्रमाणे विकसनशील देशांच्या मागण्यांची उपेक्षा करून चालणार नाही, असा परखड इशाराही कोलंबो परिषदेने दिला आहे.

विकसनशील देशांच्या अपेक्षांची विकसित देश दखल घेतील, ही आशा फलद्रूप झालेली नाही. हे चौथ्या संयुक्त राष्ट्रसंघ व्यापारविकास परिषदेवरून आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेसंबंधी भरलेल्या पॅरिस येथील परिषदेवरून दिसून

आलेले आहे. असे असले, तरी देखील, कोलंबो शिखर परिषदेने संघर्षाऐवजी सहकार्यावर भर देण्याचा निर्धार केला आहे. काही तातडीच्या समस्या सोडविण्यासाठी त्वरित समन्वित कृती करण्याची गरज जाणवत आहे. विकसनशील देशांचा कर्जविषयक प्रश्न हा त्यापैकीच एक आहे. विशेषत:, काही देशांना तर या प्रश्नाने खूपच अडचणीत आणले आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी सध्याच्या आंतरराष्ट्रिय चलनव्यवस्थेची पुनर्रचना करून, विकसनशील देशांच्या गरजांशी तो अधिक सुसंवादी करणे अगत्याचे झाले आहे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यापार विकास परिषदेने संमत केलेल्या कच्च्या मालासंबंधीच्या एकात्मिक कार्यक्रमाची कार्यवाही व्हावयास हवी. त्यासाठी एक समान निधीही उभारण्यात आला पाहिजे. कारण त्यायोगेच विकसनशील देशांना निर्यात व्यापाराद्वारा मिळणारे उत्पन्न सुरक्षित राखता येईल. विकसनशील देशांना आपले निर्यात उत्पन्न वाढविता यावे, याकरिता कच्च्या मालाच्या उत्पादकांचे संघ स्थापन करण्यात यावेत, असेही कोलंबो परिषदेने म्हटले आहे.

उत्पादकांची संघटना निर्माण करण्यासाठी लवकरच एक मंडळ स्थापन करण्यात येणार आहे. या बाबीमध्ये सर्वांनी समान धोरण स्वीकारावे, म्हणून त्यांच्यांत अनुभवांची देवाणघेवाण करण्याच्या दृष्टीने हे मंडळ उपयोगी ठरेल.

अलिप्ततावादी आंदोलनाच्या उभारणीत भारताचा सहभाग फार महत्त्वाचा आहे, हे सा-या जगाने आता मान्य केलेले आहे. अलिप्ततावादाची मूलतत्त्वे आणि उद्दिष्टे यांचे जतन करण्यात आणि आंतरराष्ट्रिय क्षेत्रामध्ये या आंदोलनाची परिणामकारकता वाढविण्यात भारत सतत प्रयत्नशील राहिलेला आहे. याचा आतापर्यंत भरलेल्या याच शिखरपरिषदांमध्ये आणि शिखरपरिषदांच्या दरम्यानच्या काळामध्येही गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आलेला आहे. मुख्य म्हणजे, या आंदोलनाने जे आदर्श स्वीकारले आहेत, त्यांच्याशी भारताने खरीखुरी आणि प्रामाणिक बांधिलकी पत्करलेली आहे, ही जाणीव सर्वत्र आढळते. एखाद्या

राष्ट्राबरोबरच्या आपल्या मतभेदांना वाचा फोडण्यासाठी भारताने या आंदोलनाचा कधीही वापर केलेला नाही.

अलिप्ततावादी देशांच्या आपापसांतील मतभेदांना शिखरपरिषदांच्या व्यासपीठांवर स्थान मिळता कामा नये, हे तत्त्व स्वीकारण्यात आले, ही कोलंबो परिषदेतील भारताची आणि समविचारांच्या देशांची मोठीच कामगिरी म्हटली पाहिजे. अलिप्ततावादी देशांनी परस्परांशी प्रत्यक्ष वाटाघाटी करूनच असे प्रश्न सोडविले पाहिजेत, हे आता मान्य झाले आहे. याबाबतीत भारताने केलेल्या प्रयत्नांमुळे अलिप्ततावादी आंदोलनाची एकता, सामंजस्य आणि संघटनासामर्थ्य यांना मोठेच बळ लाभले आहे.

## २४. जागतिक शांततेचे एकसंध स्वरूप

संयुक्त राष्ट्रसंघ महासमितीच्या ३१ व्या
अधिवेशनामध्ये ४ ऑक्टोबर १९७६ रोजी
परराष्ट्रमंत्री या नात्याने केलेल्या भाषणाच्या आधारे.

संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाल्याला आता तीस वर्षे होत आहेत. या तीस वर्षांच्या कालावधीत जागतिक राजकारणामध्ये अनेक बदल घडून आलेले आहेत. दोन महासत्तांमधील शीतयुद्धाचा काळही या संघटनेने पाहिला आहे आणि या महासत्ता समंजसपणाच्या पर्वात प्रवेश करीत आहेत, हेही संयुक्त राष्ट्रसंघ पाहात आहे. जगात जेथे जेथे प्रत्यक्ष संघर्षाची परिस्थिती उद्भवली, तेथे ही परिस्थिती निवळावी, यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने पुढाकार घेतला. त्यामुळे शांतता-रक्षणाच्या कार्यात या संघटनेला उपयुक्त अनुभव मिळू शकला. वसाहतवादाचे जोखड फेकून

देऊन अनेक देश या कालखंडात स्वतंत्र झाले. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाची सदस्यसंख्या भराभर वाढत गेली.

शांतता, न्याय आणि जगातील प्रत्येक माणसाला विकासाची संपूर्ण संधी हे संयुक्त राष्ट्रसंघाचे अभिवचन आहे. गेल्या वीस वर्षांमध्ये जगात एक शांततामय क्रांती घडून आली आहे, हे संयुक्त राष्ट्रसंघाचे आत्तापर्यंतचे विविध प्रश्नांसंबंधीचे प्रस्ताव पाहिले, तर कळून येते. ही क्रांती मुख्यत: शांतता कशा प्रकारची असावी, या संबंधीच्या आणि भविष्यकाळात सर्व मानवमात्राचे जीवन कशा प्रकारचे असावे, यासंबंधीच्या क्षेत्रात घडून आलेली आहे.

प्रचलित प्रश्न आणि वाद हाताळणे, हे संयुक्त राष्ट्रसंघाचे एक प्रमुख कार्य झाले आहे. यांपैकी काही प्रश्न असे असतात, की जे संबंधित देशांना संयुक्त राष्ट्रसंघाबाहेरही सोडविता येऊ शकतात. म्हणून भविष्यकालीन प्रश्न समर्थपणे सोडवू शकणारी संघटना, हे संयुक्त राष्ट्रसंघाचे स्वरूप टिकवायचे असेल, तर राष्ट्रसंघाच्या सनदेनुसार आपापसांत सोडविता येण्यासारख्या प्रश्नांचा बोजा आपण या संघटनेवर टाकता कामा नये, असे आपण मानले पाहिजे. कारण, सर्व देशांनी आपापले वाद आंतरराष्ट्रिय शांतता, सुरक्षितता आणि न्याय यांना धोका निर्माण होणार नाही, अशी काळजी घेऊन आपापसांत शांततेने सोडवावेत, असे संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेतील दुस-या कलमातील तिस-या परिच्छेदात म्हटले आहे.

याउलट, काही प्रश्न असे असतात, की त्यांचा अनेक देशांशी संबंध येतो आणि म्हणून ते सोडविण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या मदतीची अपरिहार्य गरज भासते. परंतु अशा प्रश्नांच्या बाबतीतही अखेरीस असे आढळून येते, की संबंधित देशांनाच एकत्र येऊन परस्परांच्या विचारविनिमयातून सन्माननीय तडजोड शोधून काढावी लागते. ब-याच प्रश्नांच्या बाबतीत प्रारंभीच्या काळात तरी ही वस्तुथिती विसरली जाते. त्यामुळे साहजिकच संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यक्षमतेबद्दल अकारणच संशय व्यक्त होत असतो.

ज्या प्रश्नांमुळे आंतरराष्ट्रिय शांततेला आणि सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होण्याचा संभव आहे, अशा प्रश्नांना अग्रक्रम देणे संयुक्त राष्ट्रसंघाच्या दृष्टीने आवश्यकच ठरते. पश्चिम आशियातील परिस्थिती हा असाच एक सतत अस्वस्थ करणारा प्रश्न झालेला आहे. येथे आणखी एखादे युद्ध उद्भवले, तर त्याची झळ सर्वांनाच बसणार आहे. त्या विभागातील लोकांवर तर अभूतपूर्व असे प्रचंड संकट कोसळेल. लेबनॉनमधील अंतर्गत यादवी युद्ध, हाही सध्या असाच एक काळजी करण्याजोगा प्रश्न झालेला आहे. कारण तेथे जीवितवित्ताचा फार मोठ्या प्रमाणावर विनाश होत आहे. लेबनॉनमधील यादवी युद्धांमुळे पश्चिम आशियातील आधीचीच स्फोटक परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

या युद्धग्रस्त प्रदेशात शांतता प्रस्थापित व्हायलाच हवी. ही शांतता कोणत्या सिद्धांताच्या आधाराने निर्माण करता येईल, याचा निर्देश सुरक्षा समितीच्या २४२ आणि ३३८ या ठरावांत करण्यात आलेला आहे. त्यानंतरच्या ठरावांमध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने पॅलेस्टिनी जनतेचा प्रादेशिक अधिकार मान्य केला असून त्या विभागामध्ये शांतता नांदण्यासाठी या अधिकारांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, असेही म्हटले आहे. इस्रायलने काही अरब प्रदेश आपल्या ताब्यात ठेवल्यामुळे हा संघर्ष उद्भवला आहे. म्हणून सुरक्षा समितीच्या ठरावांची अंमलबजावणी केली जाईल, हे पाहिले पाहिजे. जिनिव्हा परिषदेचे कामकाज पुन्हा लवकर सुरू झाले, तर अंमलबजावणीसाठी अनुकूल वातावरण निर्माण होऊ शकेल.

आफ्रिकेचा दक्षिण भाग वगळला, तर अन्यत्र वसाहतवादाच्या निर्मूलनाच्या प्रक्रियेला चांगली गती आलेली आहे. पोर्तुगीजांनी आपली वसाहतवादी राजवट संपुष्टात आणल्यानंतर आफ्रिकेच्या दक्षिण भागातील इतर असंख्य गो-या राजवटी त्याचे अनुकरण करतील, अशी अपेक्षा होती. परंतु ती चुकीची ठरली. त्यामुळे त्या भागातील मुक्ती आंदोलनांना सशस्त्र लढ्याचा मार्ग अनुसरण्याव्यतिरिक्त पर्यायच उरलेला नाही. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आफ्रिकेच्या दक्षिण भागातील लोकांना

आपले रक्त सांडावे लागत आहे, ही अतिशय दु:खाची बाब आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने अशा वसाहतवादी राजवटींविरुद्ध जर कडक उपाय योजले, तर आफ्रिकी जनतेला आणखी त्याग करण्याची गरज उरणार नाही.

झिंबाब्वेमध्ये बहुसंख्य जनतेची राजवट खरे म्हणजे यापूर्वीच प्रस्थापित व्हायला हवी होती. तेथील आफ्रिकी जनतेला तो अधिकार मिळाल्यानंतर गो-या अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची घटनात्मक तरतूद करता येईल. झिंबाब्वेमधील पेचप्रसंग शांततामय आणि लोकशाहीसंमत मार्गाने सुटावा, यासाठी काही प्रमुख आफ्रिकी आणि इतर देश प्रयत्न करीत आहेत. इआन स्मिथ यांच्या राजवटीला कोणताही कायदेशीर अधिकार नाही आणि तिला लोकांची मान्यताही नाही, ही गोष्ट स्पष्ट आहे. म्हणून झिंबाब्वेमध्ये आणखी रक्तपात टाळावयाचा असेल, तर इआन स्मिथ यांनी तेथील बहुसंख्य जनतेच्या प्रतिनिधींकडे तात्काळ सत्ता सुपूर्द केली पाहिजे. झिंबाब्वेबाबत इंग्लंडवर कायदेशीर जबाबदारी येत असल्यामुळे पेचप्रसंग दूर करण्यासाठी त्यालाही महत्त्वाची भूमिका बजावता येण्यासारखी आहे.

नामिबिया या प्रदेशाला स्वतंत्र आंतरराष्ट्रिय दर्जा आहे आणि म्हणून तेथील सत्ता दक्षिण आफ्रिकेने स्वत:कडे ठेवणे बेकायदेशीर आहे, याचे आपल्याला विस्मरण होता कामा नये. दक्षिण आफ्रिकेने संयुक्त राष्ट्रसंघाचा अधिकार धुडकावून लावल्यानंतरही संयुक्त राष्ट्रसंघाकडून दक्षिण आफ्रिकेबाबत कोणतीही परिणामकारक उपाययोजना झालेली नाही. नामिबिया देश आणि तेथील जनता यांचे विश्वस्त म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाकडे कायदेशीर अधिकार असताना देखील हा अधिकार संयुक्त राष्ट्रसंघाकडून वापरला जात नाही. दक्षिण आफ्रिकेकडे शिफारसवजा ठराव धाडण्याव्यतिरिक्त राष्ट्रसंघाने आतापर्यंत काहीच केलेले नाही. अशी कायदेशीर जबाबदारी स्वीकारण्यास संयुक्त राष्ट्रसंघाकडून हयगय होत राहिली, तर त्या जागतिक संघटनेवरील विश्वासालाच तडा जाईल. नामिबियासंबंधीच्या कायदेशीर अधिकाराला मान्यता द्यायची, पण या अधिकाराची अंमलबजावणी करण्याची टाळाटाळ करायची, असे धोरण जे देश अवलंबीत आहेत, त्यांच्यावरही तेथील

घटनांची जबाबदारी येऊन पडते. नामिबियातील लोकप्रतिनिधींनी एकत्र यावे आणि लौकरांत लौकर स्वातंत्र्य कसे संपादन करता येईल, याची त्यांनी योजना आखावी, या दिशेने चालू झालेल्या प्रयत्नांत संयुक्त राष्ट्रसंघाला अलिप्त राहून चालणार नाही. कारण नामिबियाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व सभासद देशांवर सामुदायिक जबाबदारी आहे.

आपल्या सत्तेला झळ पोहोचू नये, या हेतूपायी दक्षिण आफ्रिकेतील गो-या अल्पसंख्याक राजवटीने अवलंबिलेल्या वर्णीय पक्षपाताच्या असंस्कृत धोरणाचा संयुक्त राष्ट्रसंघाच्या जवळजवळ सर्व सभासदांनी निषेध केलेला आहे. हे धोरण कमालीचे वंशवादी असून बहुसंख्य लोकांवर गुलामी लादणारे आहे. म्हणून या धोरणातच त्यांच्या हिंसक विनाशाची बीजे अंतर्भूत आहेत. प्रत्येक मानव - मग त्याचा वर्ण वा वंश कोणताही असो - हा समान आहे, या मूलभूत भूमिकेचा वर्णविद्वेष हा उघडउघड भंग आहे. म्हणून वर्णविद्वेषाला मूठमाती देण्याचे जे कार्य तेथे सुरू झालेले आहे, ते लवकर आणि शांततामय मार्गाने पूर्णत्वाला जावे, असेच कोणीही इच्छील. सोवेटो आणि केपटाऊन येथील जे नागरिक वर्णवादी दडपशाहीचे बळी झालेले आहेत, त्यांच्याबद्दल आम्हांला सहानुभूती वाटते.

जीवितवित्ताचा आणखी विनाश टाळण्यासाठी दक्षिण आफ्रिकेचे गौरकाय राज्यकर्ते वर्णीय पक्षपाताचे धोरण सोडून देऊन सर्व लोकांना संपूर्ण समानतेच्या भूमिकेवरून एकत्र राहता येईल, असे सम्यक् धोरण स्वीकारतील, अशी आशा आहे. ट्रान्सकोला नाममात्र स्वातंत्र्य बहाल करून आणि आणखी बांटुस्ताने निर्माण करून आपण हा प्रश्न सोडवू शकू, अशी जर दक्षिण आफ्रिकेच्या गो-या राज्यकर्त्यांची कल्पना असेल, तर तो भ्रम ठरेल. कारण असे करणे म्हणजे वर्णद्वेषाचे धोरण पुढे चालविण्यासारखेच होणार आहे. खरे स्वातंत्र्य न देता कृष्णवर्णीयांच्या वेगळ्या वसाहती स्थापन करण्याचाच तो डाव आहे. या धोरणामुळे वर्णभेद नष्ट होण्याऐवजी जोराने उफाळून येईल. म्हणून दक्षिण आफ्रिकेचा हा प्रस्ताव संयुक्त राष्ट्रसंघाने फेटाळून लावला पाहिजे.

अमेरिका आणि रशिया यांच्यात सामंजस्याचे पर्व सुरू होत आहे, ही स्वागतार्ह घटना आहे. या दोन देशांनी इतर देशांच्या अपेक्षा आणि आकांक्षाही विचारात घेतल्या पाहिजेत, असे आम्ही नेहमीच म्हणत आलेलो आहोत. नि:शस्त्रीकरणाचे परिणामकारक उपाय, नव्या न्याय्य आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्थेची उभारणी आणि विकसनशील देशांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करण्याचा निर्धार या मार्गांनी हे साध्य होऊ शकेल. सामंजस्याचे वातावरण सर्वत्र निर्माण होण्यासाठी आणि सर्व देशांमध्ये परस्पर-पूरक सहकारी संबंध प्रस्थापित व्हायला चालना मिळण्यासाठी हे उपाय आवश्यक ठरतील, असा आमचा विश्वास आहे.

काही थोड्या देशांच्या हातांत भरमसाट लष्करी सामर्थ्य एकवटलेले आहे, हा मानवजातीपुढील सर्वांत भयावह प्रश्न आहे. ही शस्त्रास्त्र-स्पर्धा कमी करण्याच्या मन:स्थितीत हे देश नाहीत. शस्त्रास्त्रांच्या बाबतीत आपण दुस-यापेक्षा कमी पडता कामा नये, या ध्यासातून हे देश अधिकाधिक शस्त्रास्त्र-निर्मितीत गुंतले आहेत. बड्या शस्त्रास्त्र-निर्मितीवर सध्या दरवर्षी तीस हजार कोटी डॉलर्स खर्ची पडत आहेत. प्रक्षेपणास्त्रांच्या बाबतीत तथाकथित समतोल साधण्याच्या ध्यासापायी हे देश आपली साधनसंपत्ती अमाप प्रमाणामध्ये वाया घालवीत आहेत. त्यामुळे जग सतत युद्धाच्या छायेत वावरत आहे. सध्याच्या कोणत्याही प्रादेशिक संघर्षाचे विश्वयुद्धात पर्यवसान होण्याच्या शक्यतेचा अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्र्यांनी उल्लेख करावा, हे या संदर्भात महत्त्वाचे ठरते.

विश्वयुद्धाच्या या संभाव्यतेबाबत जग उदासीन राहूच शकत नाही. जागतिक लष्करी खर्च जोपर्यंत सतत वाढता आहे, तोपर्यंत विकसनशील देशांना आपल्या सामाजिक आणि आर्थिक विकासाकडे पूर्णपणे लक्ष देता येणे अशक्य आहे. भारताने १९५० पासून सतत नि:शस्त्रीकरणाचा पुरस्कार केलेला आहे. परंतु या दिशेने फारशी प्रगती झालेली नाही, हे खेदाची बाब आहे. म्हणून जागतिक नि:शस्त्रीकरण परिषद विनाविलंब बोलाविण्यात आली पाहिजे. ही परिषद केवळ याच प्रश्नाचा विचार

करण्यासाठी भरणा-या राष्ट्रसंघाच्या महासमितीच्या खास अधिवेशनाची पूर्वतयारी म्हणून उपयुक्त ठरू शकेल. आपण अवकाशसंचार, अणुऊर्जेचा वापर, पर्यावरण, मानवी वसाहती, व्यापार-विकास अशा अनेकविध विषयांचा ऊहापोह करण्यासाठी जागतिक परिषदा भरवीत असतो. तेव्हा नि:शस्त्रीकरणाचा विचार करण्यासाठी जागतिक परिषद आयोजित करणे हे अत्यंत महत्त्वाचे आणि तितकेच निकडीचेही आहे.

अण्वस्त्रांच्या प्रसारावर बंदी घालण्याचा प्रश्नही सध्या पुढे आलेला आहे. अण्वस्त्रांची निर्मिती करता कामा नये, असे भारत नेहमीच आग्रहाने सांगत आलेला आहे. परंतु शांततामय कार्यासाठी अणुऊर्जेचा विकास करण्याचा सर्व राष्ट्रांना न्याय्य अधिकार असताना, त्या अधिकाराशी विसंगत ठरेल, अशा तऱ्हेने अण्वस्त्रप्रसारबंदीचा प्रश्न निगडित करण्याचे सतत प्रयत्न व्हावेत, याचे आश्चर्य वाटते. अणुऊर्जेचा लाभ घेण्याचा अधिकार काही ठरावीक देशांनाच असला पाहिजे, या मागणीला भारताचा ठाम विरोध आहे. अणुऊर्जेचा शांततामय (peaceful) कार्यासाठी उपयोग करण्याची जबाबदारी काही विशिष्ट देशच सांभाळू शकतील, असे मानणे आम्हांला गैर वाटते.

आंतरराष्ट्रिय संघर्ष हाताळतांना शस्त्रबळाचा वापर करू नये, अशा आशयाचा करार करण्यात यावा, ही सोव्हिएत रशियाची सूचना विधायक स्वरूपाची असल्यामुळे, तिची महासमितीने दखल घेतली पाहिजे. खरे म्हणजे आंतरराष्ट्रिय प्रश्न सोडविताना कोणत्याही देशाने शस्त्रबळ वापरू नये, असे संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेतील दुस-या कलमातील चौथ्या परिच्छेदात म्हटले आहे, त्याचाच हा पुनरुच्चार आहे. सोव्हिएत रशियाच्या परराष्ट्रमंत्र्यांनी नुकतीच आणखी एक घोषणा केली, तीही भारताच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची ठरते. ते म्हणाले, की 'हिंदी महासागरामध्ये लष्करी तळ उभारण्याचा आमचा मुळीच विचार नाही. त्याचप्रमाणे हिंदी महासागर विभागात महासागराच्या किना-यावरील देशांव्यतिरिक्त इतर सत्तांच्या लष्करी हालचाली कशा कमी करता येतील, यासंबंधी इतर देशांशी विचार करायलाही सोविएत रशियाची तयारी आहे'.

सोविएत रशियाच्या परराष्ट्रमंत्र्यांची ही घोषणा स्वागतार्ह आहे. रशियाने व्यक्त केलेल्या या विचाराला अन्य महासत्तांकडूनही प्रतिसाद मिळेल, अशी आम्हांला आशा आहे. त्यामुळे दिएगो गार्सियासारखे लष्करी तळ नाहीसे करण्यात येतील आणि हिंदी महासागर हा शांतता विभाग व्हावा, ही महासमितीची घोषणा प्रत्यक्षात येईल.

सागरी कायद्याविषयीच्या संयुक्त राष्ट्रसंघ परिषदेच्या कार्यात भारताला विशेष महत्त्व वाटते. अनेक महत्त्वाचे प्रश्न सोडविण्याबाबत या परिषदेत सहमती दिसून आलेली असली, तरी अद्याप उर्वरित प्रश्नांबाबत सहमती व्हावयाची असून त्याचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सागराच्या तळाशी असलेली साधनसंपदा ही सा-या मानवजातीच्या मालकीची आहे, हे तत्त्व अद्याप मान्य व्हावयाचे आहे. साम्राज्यवादी देशांकडून झालेल्या घोषणांमुळे आणि विषम आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्थेमुळे विकसनशील देशांना आतापर्यंत सागरतळाशी असलेल्या संपत्तीमधील रास्त वाटा मिळालेला नाही. तांत्रिक बाबतीत प्रगत असलेल्या देशांनीच त्या संपत्तीचा एकतर्फी लाभ उठविला आहे.

सर्व देशांना भेडसावत असलेल्या आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेशी निगडित असलेल्या आणखी एका प्रश्नाचाही मला उल्लेख करावासा वाटतो. राजकीय वा अन्य कारणांकरिता निरपराध नागरिकांना ओलीस ठेवण्याचे प्रकार अलीकडे बरेच वाढले आहेत. या अमानुष तंत्राचा सर्वच देशांनी कडाडून निषेध केला पाहिजे, असे मला वाटते. त्याहीपेक्षा या प्रकारांना आळा घालण्यासाठी आपण कठोर उपाय योजणे महत्त्वाचे आहे. प्रवाशांना ओलीस ठेवण्याच्या तंत्राविरुद्ध एक आंतरराष्ट्रिय करार करावा, असे पश्चिम जर्मनीने सुचविले आहे. या कराराला सर्व देशांचा पाठिंबा मिळेल, अशा रीतीने त्याची आखणी करायला हवी.

सर्व शेजारी देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचे धोरण भारताने सातत्याने

अवलंबिले आहे. या मैत्रीसंबंधातून कोणीही वगळला जाऊ नये, असा आम्ही कसोशीने प्रयत्न करीत असतो.

पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांनी तथाकथित जम्मू-काश्मीर वादाचा उल्लेख केला आहे. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे. या संदर्भामध्ये पाकिस्तानी परराष्ट्रमंत्र्यांनीसुद्धा समितीच्या १९४८ आणि १९४९ मधील प्रस्तावांचा निर्देश केला आहे. या प्रस्तावामध्ये ज्या अटी घालण्यात आलेल्या होत्या, त्यांपैकी काही अटी पाकिस्तानने न पाळल्यामुळेच ते प्रस्ताव अमलात येऊ शकले नाहीत. त्यामुळे ते प्रस्ताव कालबाह्य ठरले आणि तसे सुरक्षा समितीला कळविण्यातही आले होते. म्हणून पाकिस्तानने पुन: पुन्हा त्या प्रस्तावांचा उल्लेख करण्यात काहीच हशील नाही. भारत आणि पाकिस्तान यांच्या दरम्यानचे सर्व विवाद्य प्रश्न सोडविण्याचा वास्तव आणि व्यवहार्य मार्ग सिमला करारात नमूद करण्यात आलेला आहे. सिमला करारामुळे अनेक क्षेत्रांतील संबंध सुधारण्यास प्रारंभही झालेला आहे. हीच प्रक्रिया यापुढे चालू राहावी, अशी भारताची इच्छा आहे. कारण त्यायोगेच भारत उपखंडात स्थैर्य आणि चिरस्थायी शांतता नांदू शकेल.

बांगला देशाबरोबर समानतेच्या भूमिकेवरून मैत्रीसंबंध स्थापन करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. तसे संबंध दोन्ही देशांनाही उपकारक ठरतील. परंतु दुर्दैवाची बाब ही आहे, की गंगेच्या पाण्याचे वाटप उन्हाळ्यात कसे करावे, यासंबंधीचा वाद बांगला देशाने महासमितीच्या बैठकीपुढे मांडला आहे. पाणी-वाटपाबाबत बांगला देशाने काही चुकीच्या कल्पना करून घेतल्या आहेत, हे यावरून दिसून येते. हा प्रश्न महासमितीपुढे विचारार्थ आला, तेव्हा आम्ही आमची भूमिका विशद केली आहे. हा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघापुढे नेण्याने तो अधिकच गुंतागुंतीचा होईल आणि द्विपक्षीय वाटाघाटींत व्यत्यय येईल, असे आम्ही मानतो.

विकसनशील देशांना न्यायोचित वागणूक मिळाली पाहिजे, यासंबंधीचा लढा गेली दहा-एक वर्षे संयुक्त राष्ट्रसंघामध्ये चालू आहे. परंतु ही मागणी मान्य होण्याजोगी

परिस्थिती अजूनही निर्माण झालेली नाही. विकसनशील देशांच्या गाऱ्हाण्यांचा आणि अपेक्षांचा उच्चार महासमितीच्या पूर्वीच्या अधिवेशनांमध्ये आणि अन्य परिषदांमध्येही वारंवार करण्यात आलेला आहे; परंतु या प्रश्नांचा विचार करण्यासाठी एकामागोमाग एक परिषदा बोलाविण्याव्यतिरिक्त काहीच घडलेले नाही. या परिषदांमध्ये जुने ठराव मांडण्यात येतात आणि तेवढ्यावरच कामकाज थांबते. विकसनशील देश राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झालेले असले, तरी आंतरराष्ट्रिय आर्थिक व्यवस्थेमध्ये त्यांना काहीच स्थान मिळालेले नाही. जुन्या वसाहतवादी अर्भकावस्थेतून त्यांची अजूनही सुटका झालेली नाही. विकसित देश स्वत:च्या फायद्यासाठी जे धोरण आखतात, तेच विकसनशील देशांना निमूटपणे मान्य करावे लागते. ही परिस्थिती अशी राहिली, तर विकसनशील देशांची दारिद्र्यातून सुटका होणार नाही. विकसनशील देशांच्या शोषणावर विकसित देश अधिक समृद्ध होत आहेत. ही परिस्थिती न्यायोचित नाही. म्हणून यासंबंधी पूर्वीच्या परिषदांमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी विधायक वाटाघाटी सुरू व्हायला हव्यात.

विकसनशील देशांना दरवर्षी वाढती कर्जफेड करावी लागत असल्यामुळे त्यांचा कर्जबाजारीपणा १५०० कोटी डॉलर्सवर गेलेला आहे. त्यामुळे आता परिस्थिती अशी झालेली आहे, की विकसनशील देशांना एक तर कर्जफेड बंद करावी लागेल किंवा राष्ट्रिय विकासाची गती रोखून ठेवावी लागेल. कर्जदार देशांना कोणत्या सवलती द्यायला हव्यात, यासंबंधी सर्व देशांनी एकत्र येऊन वास्तववादी विचार केला, तरच हा प्रश्न सुटू शकेल. विकसित देशांनी आपल्या लष्करी खर्चामध्ये अवघी पाच टक्के कपात केली, तरी देखील दोन तृतीयांश मानवजातीच्या विकासासाठी आवश्यक असलेली साधनसंपत्ती उपलब्ध होऊ शकते.

परस्पर-सहकार्याच्या समान क्षेत्रांची सुनियोजित वाढ करण्यावरच विविधतेने नटलेल्या मानव-जातीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. त्यासाठी आपल्याला जागतिक पातळीवर काही निश्चित तत्त्वे आणि आचारसंहिता ठरवावी लागेल.

जगातील सर्व विभागांची नियमित व सुसंगत आर्थिक प्रगती होण्यासाठी परस्परसाहाय्याचा आराखडा तयार केला पाहिजे. परस्पर-साहाय्याचा कार्यक्रम आखताना काही पथ्येही पाळली गेली पाहिजेत. प्रत्येक राष्ट्राचे सार्वभौमत्व अबाधित राहिले पाहिजे, अशा सहकार्यामध्ये भिन्नभिन्न राजकीय विचारप्रणालींचा सुसंवाद व्हायला हवा, मुख्य म्हणजे दुर्बल देश इतके बलशाली व्हायला हवेत, की त्यामुळे त्यांना श्रीमंत देशांकडून होणा-या शोषणाचा प्रतिकार करता आला पाहिजे. दाता आणि याचक असे श्रीमंत आणि अविकसित देशांमधील नाते असता कामा नये. म्हणून निर्णय घेताना सर्वांना समान अधिकार असायला हवा.

सर्वच देशांचे संबंध परस्परपूरक असतात. तरीसुद्धा सध्याच्या आंतरराष्ट्रिय अर्थव्यवस्थेची अधिक न्याय्य पातळीवर पुनर्रचना करण्याची गरज आहे. या दोन गोष्टी श्रीमंत देशांनी ध्यानात घेतल्या, तर विकसनशील देशांची राष्ट्रिय विकासाची माफक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांनी पुढे आले पाहिजे. श्रीमंत देशांतील नागरिकांनाही हे पटेल - आपल्यासाठी ते आपल्या राज्यकर्त्यांना आनंदाने परवानगी देतील. परंतु अद्याप तरी श्रीमंत देशांतील राज्यकर्ते तशी इच्छा दर्शवीत नाही. विद्यमान परिस्थितीमधील आव्हाने आणि संधी यांना सामोरे जाण्याबाबत ते टाळाटाळ करीत आहेत. पॅरिस परिषदेतील संथ प्रगती हा अशा इच्छाशक्तीच्या अभावाचाच पुरावा म्हटला पाहिजे. कदाचित त्यामागे अज्ञात भवितव्याची भीती असावी किंवा आपल्या नागरिकांच्या प्रचंड उपभोगात कपात करण्याची त्यांना हिंमत होत नसावी.

विकसनशील देशांनी विकसित देशांवर अवलंबून राहावे, ही परिस्थिती अनिश्चित काळापर्यंत चालू दिली जाणार नाही, ही गोष्ट समृद्ध देशांनी नजरेआड करून चालणार नाही. सध्याच्या परिस्थितीतून परस्परपूरक आणि समान सहकार्यावर आधारलेली नवी अर्थव्यवस्था निर्माण झालीच पाहिजे. स्वतःचे हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी विकसित देश जर आपली तात्पुरती उपाययोजना करू पाहतील, तर त्यातून दीर्घकालीन सोडवणूक निघणार नाही, हे त्यांनी ध्यानात घेतले पाहिजे.

त्याचप्रमाणे विकसनशील देशांनीही, अंतर्गत आणि सामूहिक आत्मनिर्भरतेची कास धरून आणि आपापसांत सहकार्य करून आपल्या न्याय्य हितसंबंधाचे संरक्षण करण्याचा मार्ग अनुसरला पाहिजे.

आपली एकजूट आणि समान उद्दिष्टांची जाणीव यांवरच अखेरीस विकसनशील देशांचे सामर्थ्य अवलंबून राहणार आहे. केवळ विकनशील देशांची संख्या अधिक आहे, म्हणून नव्हे. शांततेची इच्छा बाळगणा-या जगाचा आपण आधार आहोत, याची जाणीव त्यांना ज्या प्रमाणात होत जाईल, त्या प्रमाणात त्यांचे बळ वाढणार आहे. कारण विकसनशील देश केवळ संख्येने अधिक आहेत, असे नव्हे, तर जागतिक लोकसंख्येपैकी बहुसंख्य लोक याच देशात राहात आहेत. म्हणून मानवजातीच्या भवितव्याच्या दृष्टीने त्यांच्या आकांक्षांना विशेष महत्त्व प्राप्त होते. कारण विकसनशील देश दारिद्रयात खितपत पडलेल्या मानवजातीचे प्रतिनिधित्व करीत आहेत. म्हणून त्यांनी जर एकजुटीने प्रयत्न केले, तर विकसित देशांना आणि त्या देशांतील लोकांना या प्रयत्नांची दखल घ्यावीच लागेल, याबद्दल किंचितही संदेह नाही.

संयुक्त राष्ट्रसंघ एकतिसाव्या वर्षांत पदार्पण करीत असतांना आमचे भूतपूर्व पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनी काय म्हणाले, त्याचा उल्लेख मला करावासा वाटतो. ते म्हणाले होते, 'शांतता अविभाज्य आहे, असे म्हटले जाते. परंतु त्याचबरोबर समृद्धी आणि विनाश हेही अविभाज्यच असतात. कारण यापुढे जगातील कोणत्याही भूभागाला जागतिक प्रवाहापासून अलिप्त राहताच येणार नाही'.

## २५. लोकमताचा कौल आणि त्याचा अर्थ

५ एप्रिल १९७७ रोजी विरोधी पक्षाचे नेते म्हणून
राष्ट्राला उद्देशून आकाशवाणीवरून केलेले भाषण.

काँग्रेसने आपल्या स्थापनेपासून राष्ट्राच्या जीवनामध्ये ऐतिहासिक भूमिका बजावली आहे. काँग्रेसने देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व तर केलेच, शिवाय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तीस वर्षे देशाला स्थिर आणि प्रागतिक शासन दिले. या कालावधीत तिने लागोपाठ पाच सार्वत्रिक निवडणुका जिंकल्या. लोकांनी वेळोवेळी व्यक्त केलेल्या या विश्वासामुळे काँग्रेसने देशाची अनेकविध क्षेत्रांमध्ये प्रगती घडवून आणली.

नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मात्र प्रथमच काँग्रेसला लोकसभेतील बहुमत गमवावे लागले. काही राज्यांमध्ये काँग्रेसला घवघवीत यश मिळाले असले, तरी ब-याच राज्यांतील मतदारांनी काँग्रेसऐवजी नवोदित जनता पक्षाला यशस्वी केले. लोकमताचा हा कौल आम्ही मानतो आणि नव्या सरकारला आणि पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांना सुयश चिंतितो. नुकत्याच झालेल्या निवडणुकीने पुन्हा एकदा भारतीय लोकशाहीच्या आंतरिक सामर्थ्याचे दर्शन घडवले आहे. भारतीय जनतेने कमालीची राजकीय प्रगल्भता आणि सुज्ञता दाखविली, याचा सा-या देशाला अभिमान वाटतो. कोणता पक्ष यशस्वी वा पराभूत झाला, हे या संदर्भात महत्त्वाचे नाही.

लोकमताच्या ताज्या कौलावरून केवळ काँग्रेसनेच नव्हे, तर सा-या देशाने योग्य बोध घेतला पाहिजे. राष्ट्रिय एकता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि लोकशाही यांचा काँग्रेसने नेहमीच पुरस्कार केलेला आहे. लोकमताचा कौल या मूलभूत तत्त्वांच्या विरुद्ध गेलेला आहे काय? शतकानुशतकांचे आर्थिक दारिद्र्य, सामाजिक कुचंबणा आणि सांस्कृतिक ऱ्हास यांच्या गर्तेतून देशाला बाहेर काढून लोकांच्या जीवनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी नियोजनबद्ध विकास आवश्यक आहे, असे काँग्रेस मानते. लोकमताचा कौल या भूमिकेविरुद्ध आहे काय? उद्‌योगधंद्‌यांचा द्रुतगतीने विकास करून आर्थिक जीवनाच्या अधिकाधिक क्षेत्रांत देश स्वयंपूर्ण व्हावा, हे काँग्रेसचे धोरण आहे. गेल्या ३१ मार्च रोजी संपलेल्या वर्षामध्ये देशातील पोलाद कारखान्यांनी उत्पादनाचा नवा विक्रम प्रस्थापित केला, हे या धोरणाचेच

निर्देशक आहे. लोकमत याविरुद्ध गेले काय? देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विशेषत: ८० टक्के भारतीय जेथे राहतात, या ग्रामीण भागाच्या समन्वित विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा उपयोग करून घेतला पाहिजे, असेही काँग्रेसचे धोरण आहे. गेल्या वर्षात आपल्या शेतकऱ्यांनी अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन केले आहे. सुयोग्य नियोजनामुळेच देशात ही हरित-क्रांती घडून आली. ती लोकांना मान्य नाही काय? अलिप्ततावाद, आफ्रिकी देशांच्या मुक्तिलढ्यांना पाठिंबा, अरब लोकांच्या न्याय्य मागण्यांचा पुरस्कार आणि शेजारी देशांबरोबर मैत्रीचे संबंध ही काँग्रेस सरकारच्या परराष्ट्रिय धोरणाची सूत्रे होती. लोकांनी त्याविरुद्ध मतप्रदर्शन केले काय?

या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी आहेत, हे मला स्पष्टपणे सांगितलेच पाहिजे. काँग्रेसची मूलभूत धोरणे किंवा तिने घडवून आणलेली प्रगती याविरुद्ध लोकांनी कौल दिलेला नाही. यांपैकी काही धोरणांची आणीबाणीमध्ये जी अतिरेकी आणि कठोर अंमलबजावणी झाली, तिच्याविरुद्ध लोक संतापले, हे खरे आहे. अधिकाराचा हा असा गैरवापर ही मी राष्ट्रिय शोकांतिका मानतो. या अनुभवापासून काँग्रेसला मोठाच धडा मिळाला आहे. लोकहितकारी धोरणे आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांत अंतर पडले, की काय घडते, हे यावरून कळून आले. दीर्घकालीन राष्ट्रिय हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला कुटुंबनियोजनाचा कार्यक्रमही काही राज्यांमध्ये अशा रीतीने हाताळण्यात आला, की त्यामुळे तेथे संतापाची लाट उसळली. आणीबाणीचे आणि निवडणुकीचे धडे काँग्रेस शिकली आहे, असे मी देशाला आश्वासन देतो; परंतु त्याचबरोबर मला असेही सांगायचे आहे, की या एका विशिष्ट घटनेमुळे, काँग्रेसने जी प्रदीर्घ देशसेवा केली आहे, तिचे विस्मरण होता कामा नये.

भारत हा विशाल आणि वैविध्यपूर्ण देश आहे आणि त्यामुळे त्याचे शासन सांभाळणे ही सोपी गोष्ट नाही. हे कार्य नव्या सरकारने स्वीकारले आहे. श्री. मोरारजी देसाई यांच्यासारख्या स्वातंत्र्यसंग्रामातील नेत्याने आणि काँग्रेसच्या राज्य नि केंद्र

शासनांमधील महत्त्वाची अधिकारपदे सांभाळलेल्या प्रशासकाने या नव्या सरकारचे धुरीणत्व अंगीकारले आहे. राष्ट्रउभारणीच्या कार्यामध्ये आमचा पक्ष नव्या सरकारशी सहकार्य करील, असे मी त्यांना आश्वासन देतो. नवे सरकार आमच्या सहकार्याचा आदर करील, अशी मला आशा आहे.

राज्यकारभार करताना नकारात्मक दृष्टिकोण उपयुक्त ठरणार नाही, असे मला आग्रहाने सांगावेसे वाटते. म्हणून सूडबुद्धीने वागण्याचा मोह कटाक्षाने टाळला पाहिजे. आपण सर्वचजण लोकशाही मूल्ये मानतो. म्हणून भूतकाळात जे प्रमाद घडले असतील, ते विसरून जाऊन परस्पर सहकार्याने पुढील वाटचाल केली पाहिजे. गेल्या काही वर्षांमध्ये देशात जो कडवटपणा निर्माण झाला, तेवढा तो बस्स झाला, असे मानून विशाल राष्ट्रिय सामंजस्याचा मार्ग चोखाळू या. तसे झाले, तरच आपल्या या प्रिय मातृभूमीचा आपण सर्व क्षेत्रांमध्ये विकास घडवून आणू शकू. तसेच आपल्या सर्व देशबांधवांना सामाजिक मुक्तता, आर्थिक प्रगती आणि बौद्धिक नि आध्यात्मिक विकास यांचा लाभ करून देता येईल.

## **२६. पक्षावर अभंग निष्ठा**

'केसरी' १२ नोव्हेंबर १९७७ मधील लेखाच्या आधारे.

हिंदुस्थानची सर्वांगीण बांधणी करण्यासाठी प्रतिज्ञाबद्ध असलेल्या काँग्रेस पक्षाचे सध्याचे स्वरूप हे निश्चित धोरण आणि निश्चित कार्यक्रम स्वीकारलेला, अखिल भारतीय स्वरूपाचा एकसंध पक्ष, असे आहे. संसदेत आणि संसदेबाहेर काँग्रेस पक्ष आज विरोधी पक्षाची भूमिका बजावीत आहे.

स्वातंत्र्यसंपादनानंतर पक्षाच्या धोरणाची आणि कार्यक्रमाची दिशा निश्चित करून काँग्रेसने गेली तीस वर्षे राज्यकारभार केला. स्वातंत्र्यपूर्व काळातील आणि स्वातंत्र्योत्तर काळातील प्रेरणा आणि अनुभव यांतून पक्षाची धोरणे आणि दिशा

निश्चित झालेल्या आहेत. सर्वसामान्य जनतेच्या संसदेत हा पक्ष आज विरोधी पक्ष म्हणून काम करीत असला, तरी धोरणे आणि कार्यक्रमाची दिशा यांपासून तो मुळीच विचलित झालेला नाही. होऊ शकणार नाही.

स्वातंत्र्यलढ्याच्या काळात काँग्रेस ही बहुसंख्य जनतेशी एकरूप झाली होती. समाजोपयोगी कार्यक्रमाच्या आधारे नंतरच्या काळातही बव्हंशी हीच भूमिका टिकून राहिली. कार्यक्रमावर आधारलेल्या कार्यामुळे गेली पन्नास-पाऊणशे वर्षे, 'एकजीव, प्रवाहित पक्ष', असे या पक्षाचे स्वरूप बनलेले आहे. या पक्षाच्या पिढ्यांमागून पिढ्यांचा जो इतिहास आहे, त्यामध्ये प्रत्येक पिढीनंतर नवा विचार उदयाला येत राहिलेला असून विचाराचा नवा धागा पकडून पक्षाने देशाला नवा कार्यक्रम व नवी दिशा दिली आहे. माणसांच्या मनात उत्साह निर्माण करून त्यांना उज्ज्वल भवितव्याकडे खेचण्याचे कार्यच या पक्षाने केले आणि त्याच्या जोडीला प्रागतिक धोरणांचा आणि कार्यक्रमाचा पक्का पाया तयार केला.

विरोधी पक्ष म्हणूनही काँग्रेसला जिद्दीने, आत्मविश्वासाने हेच ऐतिहासिक कार्य पुढे करावयाचे आहे. त्याच भूमिकेतून संसदेत हा पक्ष कार्य करीत आहे. माझी मूलभूत धारणा अशी आहे, की धोरणाच्या आणि कार्यक्रमाच्या निश्चित दिशा असलेल्या काँग्रेस पक्षाने संसदेत व बाहेरही विधायक 'पर्यायी पक्ष' म्हणून काम केले पाहिजे. जिद्दीने, आत्मविश्वासाने आणि लोकशाहीला शोभायमान ठरणा-या प्रतिष्ठेने हे काम करावयाचे आहे.

'पर्यायी पक्ष', म्हणून काँग्रेसची लोकमानसात प्रतिमा तयार व्हावयाची, तर पक्षाची एकजीव संघटना अधिक भक्कम करणे, लोकशाहीची प्रतिष्ठा व शक्ती वाढेल, अशा विचारानुरूप प्रत्यक्ष कार्य करणे आणि त्यासाठी येणा-या सर्व अडचणी ओलांडून डोळ्यासमोर फक्त सामान्य माणूस आणि त्याचे हित व राष्ट्राचे भवितव्य एवढीच उद्दिष्टे ठेवून प्राणपणाने कार्य करीत राहणे, हेच विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसचे कार्य राहील. देशहित साधणे, सामाजिक आणि आर्थिक विषमता दूर करणे, परराष्ट्रिय

धोरणात अलिप्ततेचा अवलंब करणे आणि देशांतर्गत स्वयंपूर्णता प्रस्थापित करणे अशा कोणत्याही कसोटीवर काँग्रेस पक्ष हा 'पर्यायी पक्ष' बनू शकतो, हे मान्य करावे लागेल. योग्य क्षण येताच स्वत: सरकार बनविणे आणि आपल्या धोरणांची मांडणी त्या पद्धतीने करणे हे काम विरोधी पक्षाला करावेच लागते. संसदीय प्रथांची प्रतिष्ठा ठेवून, पण काहीशा आक्रमक पद्धतीनेच हे काम काँग्रेस पक्षाला करावे लागणार आहे.

पर्यायी पक्षाची भूमिका यथायोग्य रीतीने पार पाडावयाची, तर त्यासाठी विरोधी पक्षाजवळ संसदीय कामकाज, राज्यकारभार, प्रशासन इत्यादि आवश्यक विषयांवर अभ्यासपूर्ण आणि नेमकेपणाने विचारांची मांडणी करू शकतील, असे विशेष प्रवक्ते असावे लागतात. ब्रिटनमध्ये असे विशेष प्रवक्ते नियुक्त करण्याची त्यांची नवी पण परिणामकारक प्रथा आहे. भारताचा विचार करताना अलिकडील काळात या देशातील प्रश्नांची गती आणि गुंतागुंत वाढली असल्याचे आढळते. यांतील काही प्रश्न स्वतंत्रपणे हाताळावे लागणार असल्यामुळे केवळ त्यासाठी अभ्यासू प्रवक्ते तयार करावे लागतील. पर्यायी पक्षाचे शॅडो कॅबिनेट तयार व्हावयाचे, तर अशा अभ्यासू प्रवक्त्यांमधूनच ते आकाराला येऊ शकते.

देशांतर्गत प्रश्न सोडविण्याची ताकद काँग्रेस पक्षामध्ये आजही शाबूत आहे. हे प्रश्न सुटण्यासाठी काँग्रेसने आजवर जी वाटचाल केली, तीतून ही ताकद पक्षाला मिळालेली आहे. या ताकदीचा वापर पुढच्या काळात करीत राहून लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे आणि त्यासाठी जनतेशी असलेला जागता व जिव्हाळ्याचा संपर्क कायम ठेवणे, वाढवीत राहणे, यालाच मी काँग्रेसचा कार्यक्रम म्हणेन. देशासमोर असलेले महत्त्वाचे व मूलभूत प्रश्न आर्थिक आणि सामाजिक स्वरूपाचे आहेत. वर्षानुवर्ष या प्रश्नांशी काँग्रेस झुंज घेत आहे आणि यापुढेही तिला ती घ्यावी लागणार आहे. देशाच्या आर्थिक-रचनेत बदल आणि उत्पादन-पद्धतीत क्षमता वाढवून बहुसंख्य लोकांना रोजगार मिळण्याची व त्यांच्या किमान गरजा भागविण्याची व्यवस्था करणे याला अग्रक्रम दिला आहे. आर्थिक क्षेत्र, तंत्रज्ञानाचे क्षेत्र, उद्योग,

शेती, आधुनिक विज्ञान, शिक्षण अशी जी महत्त्वाची क्षेत्रे आहेत, त्यांमध्ये कोणत्याही कारणासाठी परावलंबन राहणार नाही आणि त्याचबरोबर देशाच्या ज्या मूलभूत गरजा आहेत, त्या पूर्ण करून सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक असणारी शक्ती आपण निर्माण करू शकतो, याचे प्रत्यंतर काँग्रेस पक्षाच्या गेल्या तीस वर्षांतील धोरणात्मक निर्णयाने आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीने आणून दिले आहे. देशांतर्गत प्रश्न सोडविण्याची ताकद काँग्रेस पक्षात निश्चित आहे, अशी खात्री मी त्यामुळेच व्यक्त करू शकतो.

मूलभूत विचार असा आहे, की ज्या राष्ट्राजवळ आधुनिक तंत्रज्ञानाची भरभक्कम सामग्री असते, तेच राष्ट्र जगात श्रेष्ठ ठरते. बदलत्या गतिमान दुनियेत ज्या राष्ट्राने ही तंत्रज्ञानाची अमोघ शक्ती प्राप्त करून घेण्याचे, वाढविण्याचे सामर्थ्य संपादन केलेले असेल, ते राष्ट्र किंवा तो देश, संरक्षण दृष्ट्या व आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर राहू शकतो. आत्मनिर्भरता निर्माण होण्यासाठी सरकारला तसे धोरण ठरवावे लागते. कार्यक्रमाची दिशा निश्चित करावी लागते. जनता पक्षाच्या सरकारवरची टीका या संदर्भात ही आहे, की या सरकारला काही दिशाच नाही.

आर्थिक रचनेप्रमाणेच, सामाजिक रचनेचा प्रश्नही माझ्या दृष्टीने तितकाच किंबहुना अधिक महत्त्वाचा आहे. ऐतिहासिक कालापासूनचा मागोवा घेतला, तरी दिसते, ते असे, की सामाजिक विषमता ही भारताच्या रोमरंध्रांत भिनलेली आहे. या सामाजिक विषमतेचे खरे कारण आर्थिक विषमता हे आहे. या दोन्हींची सरमिसळ इतकी झाली आहे, की आर्थिक दृष्ट्या वरचढ असणारा वर्ग हा पुढे पुढे सामाजिक अर्थानेही वरचढ ठरत राहिला आहे. शतकानुशतके येथे हे असेच चालले आहे. हा उच्च, हा कनिष्ठ, हा पहाडात राहणारा, हा समुद्रकाठी राहणारा, हा म्हणे, मैदानात राहणारा, एक स्पृश्य, तर दुसरा अस्पृश्य असे फरक भारताच्या इतिहासाच्या सर्वच कालखंडांत पाहावयास मिळतात. कोण, कुठे, कसा राहतो, यावरूनच त्याची सामाजिक प्रतिष्ठा जोखावयाची, ही आपली परंपरागत पद्धती. सामाजिकदृष्ट्या समाज एकजिनसी व एकबद्ध असल्याचे चित्रच उपलब्ध नाही. सामाजिक समतेचे अपेक्षित चित्र त्यासाठी कायदे करून निर्माण करता येईल का? मला वाटते, कायदा

यासाठी फार तर साहाय्यभूत ठरेल. सामाजिक एकजिनसीपणाचे चित्र ख-या अर्थाने निर्माण करावयाचे, ते भारतीय माणसांनी आपल्या कृतीने व विचारानेच निर्माण केले पाहिजे. सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत सारख्याच निष्ठेने प्रतिज्ञापूर्वक प्रयत्न केले, तरच हे शक्य होणार आहे.

काँग्रेस कार्यकर्त्यांना आता हाच एक कार्यक्रम स्वीकारावा लागेल. हरिजनांना आता पुन्हा एकदा वेठबिगार म्हणून बांधले व राबवले जात आहे. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी भूमिहीन हरिजनांना जमिनीचे वाटप केले. परंतु जमिनी ताब्यात आल्यावर त्या जमिनीचे संरक्षण करणे यांना अशक्य होऊ लागले आहे. बेघराला घर दिले, भूमिहीनांना, दलितांना, हरिजनांना जमीन दिली, तरी घरांचे आणि जमिनीचे रक्षण करण्यासाठी त्यांना कसलेही साधन नाही, कुणाचे सहकार्य नाही, किंवा पाठबळ नाही. हरिजन व गरीब शेतकरी याला जीवन जगता येणार नाही, जिवंत राहता येणार नाही, असे वातावरण वरिष्ठ वर्ग म्हणविणारे तयार करीत आहेत. उत्तर प्रदेश, बिहारमध्ये तर या वरिष्ठ वर्गांच्या अत्याचाराने कळस गाठला आहे. अन्न, पाणी आणि हवा या माणसाच्या कमीत कमी गरजा. यांपैकी गरिबांना, हरिजनांना जमिनीवरून हुसकावून लावून त्यांना अन्नापासून वंचित केले जात आहे. पाणी हे तर निसर्गाने दिलेले साधन. परंतु माणसांत, जाती-जातींत, फरक करून हरिजनांना पिण्याच्या पाण्यापासून दूर हाकलले जात आहे. माणूस म्हणून जगण्याचे पाणी हे एक साधन. परंतु त्याचे वाटप करताना माणसा-माणसांत, जाती-जातींत फरक केला जात आहे. निसर्गाची कृपा, की त्याने हवा मोकळी ठेवली. हवेची सुद्धा मर्यादित पुरवठ्याची व्यवस्था माणसांच्या हातात राहती, तर हरिजनांना जगणेच कठीण होते !

लोक मला विचारतात, काँग्रेससाठी नवा कार्यक्रम काय? माझे त्याला उत्तर आहे, की गरिबांवर, मग तो शेतकरी असो वा शेतमजूर असो, हरिजन असो किंवा आदिवासी असो, यांपैकी कोणावरही अन्याय होऊ नये, यासाठी तरुणांनी, कार्यकर्त्यांनी कंबर बांधून उभे राहिले पाहिजे. गरिबांची संघटना उभी करून

गरिबांचे, दलितांचे प्रश्न हाती घेऊन त्यांच्यावर होणा-या अन्यायाविरुद्ध उभा राहणारा पक्ष म्हणजे काँग्रेस पक्ष, असे प्रत्यक्ष कृतीने सिद्ध केले पाहिजे. हे सिद्ध करावयाचे, तर गरिबांचे शोषण करणारे जे असतील, त्यांना जाब विचारणारे कोणी नाहीत, असे चित्र दिसून येता उपयोगी नाही. कार्यकर्त्यांनी याची जाण ठेवली पाहिजे, की शोषकांच्या मागे जातीची, पैशाची, परंपरेची शक्ती उभी असते. त्याच्या बळावरच तो श्रीमंत वा शोषक, जमीनदार गरिबाला, हरिजनाला जमिनीवरून दूर ढकलण्यास सिद्ध असतो. अशा वेळी कार्यकर्त्यांनी काँग्रेसची संघटनेची शक्ती गरिबांच्या, दलितांच्या पाठीशी उभी करावयास हवी.

गरिबांच्या पाठीशी शक्ती उभी करावयाची, ती त्यांचे शोषण होऊ नये, यासाठी तर खरेच, परंतु त्याचबरोबर आर्थिक विषमता हे या सर्व अन्यायाचे मूळ आहे, हे लक्षात घेऊन विषमतेचे ते मूळ छाटण्याचा प्रयत्न काँग्रेस कार्यकर्त्यांनी केला पाहिजे. विषमतेचे मूळ छाटावयाचे, याचा अर्थ विकासाच्या नवनवीन कार्यक्रमांत गरिबांना, दलितांना सहभाग दिला जाईल, यासाठी धोरणात्मक जपणूक करावयास हवी. म्हणजे असे, की विकासाकरिता नवीन कार्यक्रम हाती घेतला जाईल, तेव्हा त्यासाठी नवीन संस्था निर्माण होतील, अशा वेळी गरीब व मागासलेल्या वर्गाच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे लागेल. सहकारी चळवळीवर तर याची विशेष जबाबदारी आहे. छोट्या जमातीच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन, विधायक दृष्टिकोणातून सहकारी चळवळीने त्यांचे प्रश्न हाताळले पाहिजेत. गावात नवी संस्था सुरू होत असली किंवा गावातील जुन्या संस्थेचे कार्यक्षेत्र वाढविण्याची संधी प्राप्त झालेली असेल, किंवा विकासाच्या प्रगतीतून रोजगाराची नवी संधी निर्माण होत असेल, तर अशा वेळी रोजगाराची संधी उपलब्ध करून देताना एक पथ्य जरूर पाळले गेले पाहिजे, की त्या गावातील ज्या घरात मिळवता कोणी नसेल, अशा घरातील तरुणाला अग्रक्रमाने ही संधी दिली जाईल. याकडे जागरूकपणे लक्ष ठेवले पाहिजे. अशी संधी देत असताना, जात-पोटजात, रक्ताचे नाते, असा विचारसुद्धा करता कामा नये. ग्रामीण भागात काय किंवा नागरी विभागात काय, गरिबी ही अमुकच एका जातीपुरती मर्यादित नाही. या देशातील साठ टक्के जनता दारिद्र्य-रेषेखाली आहे,

अशी आकडेवारी जेव्हा आपण उद्धृत करतो, त्याचा अर्थच हा, की गरिबीला जात-पोटजात-धर्म-पंथ असे काही नसते.

अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची शिकवण लो. टिळक व म. गांधींनी काँग्रेसला आणि कार्यकर्त्यांना दिली, याचे कारण, अन्याय हा गरिबांविरुद्ध, मागासलेल्यांविरुद्धच होत असतो, हे त्यांनी देशात आणि परदेशातही पाहिले होते. अनुभवले होते. म्हणूनच लहानमोठ्या अन्यायांविरुद्ध ते सातत्याने उभे राहिले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी या शिकवणुकीचे कसोशीने पालन केले पाहिजे. समाजाला एकजिनसी बनवावयाचे, तर कार्यकर्त्यांनी व्रत म्हणून हे धोरण स्वीकारणे अत्यावश्यक आहे. आपल्या गावापासून काँग्रेस कार्यकर्त्यांनी याचा प्रारंभ करावा. गावातले कोणते घर, कोणते कुटुंब दारिद्र्याच्या पेचात सापडले आहे, कोणत्या घरातले हात मिळवते नाहीत, याची माहिती त्या गावातल्या कार्यकर्त्यांना असलीच पाहिजे. तरच गावात नव्याने उदयास येणा-या संस्थेत कोणाला अग्रक्रमाने सामावून घ्यावयाचे, याचा आग्रह ते धरू शकतात.

नव्याने उपलब्ध होणा-या सामाजिक व आर्थिक सुविधांचे रक्षण करणे, त्या वाढविणे, गरीब शेतक-यांना, शेतमजुरांना, हरिजनांना रोजगार मिळवून देणे, जाती-पोटजातींची प्रतिबिंबे कामात पडू न देणे, 'एक गाव-एक पाणवठा' यासारखे प्रतीकात्मक कार्यक्रम राबविणे, गावागावांतून त्यांची कसोटी लागते, की नाही, हे पाहणे आणि जेणेकरून समाज एकजिनसी बनेल, आर्थिक विषमता दूर होईल, असाच प्रमुख कार्यक्रम भारतासमोर असायला पाहिजे. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर गेल्या तीस वर्षांत काँग्रेसने या कार्यक्रमाचा पाठपुरावा केला. देशात निर्माण झालेल्या नव्या राजकीय परिस्थितीत तर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हा एक नवा कार्यक्रम म्हणून जिद्दीने, आत्मविश्वासाने, कसोशीने त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. गावागावांत ज्यांच्या शब्दाला वजन आहे, प्रतिष्ठा आहे, असा कार्यक्रम राबविण्यासाठी ज्यांच्याजवळ साधनांची अनुकूलता आहे, किमानपक्षी हा कार्यक्रम राबविण्याची इच्छा आहे अशा कार्यकर्त्यांनी हे काम अग्रक्रमाने हाती घेणे

उचित ठरेल. काँग्रेससाठी कार्यक्रम काय, अशी विचारणा करणाऱ्यांना माझे हे आवाहन आहे.

देशांतर्गत नव्या परिस्थितीने उभे केलेले आणखी एक महत्त्वाचे कार्य काँग्रेससमोर आहे, ते म्हणजे विशिष्ट विचाराने बांधलेल्या ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांची फळी उभी करणे हे होय. एका दिलाने आणि विचाराने बांधलेले कार्यकर्ते असल्याशिवाय पक्ष कार्यक्षम बनत नाही, हे खरे; परंतु राजकीय पक्ष हा जेव्हा जन-आंदोलनाच्या स्वरूपाचा, लोकांचा पक्ष (मास-पार्टी) बनतो, त्यावेळी एकाच विचाराने बांधलेल्या कार्यकर्त्यांचा पक्ष म्हणून त्याचे स्वरूप मर्यादित करणे अवघड ठरते. तसे ते आवश्यकही नसते, कारण सर्वच कार्यकर्ते समान अनुभवाचे असतील, याची शाश्वती नसते.

लोकपक्ष किंवा 'मास-पार्टी' आंदोलनाच्या रूपाने कार्य करीत असते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून काँग्रेस पक्ष आंदोलनाच्या रूपाने कार्य करीत राहिला. सर्व समाजाचे प्रश्न हाती घेऊन या पक्षाला काम करावयाचे असल्याने काँग्रेस हा कधी बांधीव पक्ष बनू शकला नाही. पक्षाचे व्यापक स्वरूप हे त्याचे एक कारण आहे. कम्युनिस्टांप्रमाणे किंवा रा. स्व. संघासारखी या पक्षाला आपली रेखीव बांधणी करणेही परवडले नाही. आवश्यकही वाटले नाही.

लोकशाही ख-या अर्थाने शक्तिशाली करावयाची, तर साचेबंद, लष्करबंद, झापडबंद कार्यकर्त्यांच्या टोळ्या बनवून चालणार नाही. 'केडर-पार्टी' ही नेहमीच झापडबंद होण्याची शक्यता असते. विचार करण्याचे यंत्र बंद करून, कान व हात मोकळे ठेवावयाचे, फक्त 'आज्ञा' ऐकायच्या आणि त्या अमलात आणीत राहावयाचे, एवढेच 'केडर पार्टी' करू शकते.

काँग्रेस पक्ष अशा स्वरूपाचा असावा काय? माझे उत्तर असे, की एका विचाराने बांधलेले कार्यकर्ते पक्षाच्या संग्रही असलेच पाहिजेत. परंतु एका विचाराने म्हणजे

काय? तो विचार कोणता? माझ्या मते तो विचार हाच असला पाहिजे, की सामाजिक, आर्थिक, नव्या राष्ट्रउभारणीचे काम करावयाचे आहे, हाच तो विचार. म्हणूनच सामाजिक, आर्थिक न्यायावर अव्याभिचारी निष्ठा आणि दारिद्र्याविरुद्ध, अन्यायाविरुद्ध, विषमतेविरुद्ध पोटतिडीक हे दोन महत्त्वाचे गुण ज्या कार्यकर्त्यांच्या ठिकाणी आहेत, तो पहिल्या प्रतीचा कार्यकर्ता होऊ शकेल. विचारांच्या या दोन बाजू पक्क्या व्हाव्यात, यासाठी जरूर 'केडर' निर्माण करावे. त्यासाठी कार्यकर्त्यांना आवश्यक ते शिक्षण द्यावे. स्वातंत्र्यपूर्व काळात असे विचाराने बांधलेले कार्यकर्ते तयार करण्याची, प्रशिक्षित कार्यकर्ते घडविण्याची प्रक्रिया अवलंबिली जात असे.

परंतु आजच्या भारतासमोरील प्रश्नांचे स्वरूप आता वेगाने बदलत आहे. १९६० मध्ये तयार झालेला कार्यकर्ता १९७० मध्ये किंवा १९७७ मध्ये निकामी ठरेल, की काय, अशी ही स्थिती बदलली आहे. सारेच झपाट्याने बदलत आहे. सार्वजनिक कामाची मी सुरुवात केली, ती त्या काळात कार्यकर्त्यांची बांधणी करण्याचा मला मनस्वी छंद होता, म्हणून मी ते काम केले. स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेच्या राजकारणात आल्यानंतर सत्तेच्या मदतीने कार्यकर्त्यांच्या फळ्या निर्माण केल्याचा आरोप माझ्याविरुद्ध करण्यासाठी जे सरसावत, त्यांना याची जाणीव नसावी, की काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणूनच मी सत्तेत वावरलो, वागलो आणि कार्यकर्त्यांची बांधणी करण्याचे प्रारंभापासून स्वीकारलेले कामच करीत राहिलो. महाराष्ट्रात अगदी प्रारंभी, मी स्वत: सत्तेवर नसताना आणि नंतर सत्तेवर असताना, कार्यकर्त्यांच्या बांधणीच्या कामाचा ध्यास मी नित्य ठेवला आहे.

महाराष्ट्रासंबंधी लोक मला विचारतात, त्यावेळी मी त्यांना हेच सांगत आलो आहे, की महाराष्ट्र काँग्रेसची शक्ती ही तेथील असंख्य कार्यकर्त्यांची शक्ती आहे. हे कार्यकर्ते चळवळीत वाढले आहेत. शेकडो गावांतून ते विखुरले आहेत. काँग्रेसबरोबर ते सातत्याने उभे राहिले आहेत. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाने सरकारमार्फत व पक्षातर्फे विविध क्षेत्रांत पुढाकार घेऊन नागरी व ग्रामीण जीवनात नवीन आशा व उत्साह निर्माण केला. समाजातल्या विविध वर्गाचे, जातीजमातींचे व धर्मांचे लोक

त्यात आहेत. शेतकरी आहेत; कामगार आहेत, मध्यमवर्गीय आहेत. खेड्यांतील आहेत आणि शहरांतलेही आहेत. सदासर्वकाळ जागरूक न राहिल्याने कामात काही त्रुटी किंवा अपुरेपणा निर्माण झाला असेलही, परंतु या सर्वांतून निर्माण झालेली शक्ती ही महाराष्ट्र काँग्रेसमध्ये संमीलित झाली आहे. ही शक्ती आणखी वाढवावी लागणार आहे. त्याची आज गरज आहे.

गरज अशासाठी आहे, की देशातील प्रमुख सत्तेचे, कारभाराचे तारू दिशाहीन असलेल्यांच्या हाती गेले आहे. लोकांची गाऱ्हाणी वाढत आहेत. गरीब, हरिजन, शेतकरी, कामगार, मजूर अस्वस्थ आहेत. या सर्वांना दिलासा देण्याचे आणि त्यांची गाऱ्हाणी ही आपली स्वत:ची गाऱ्हाणी समजून उभे राहण्याचे काम करावे लागणार आहे. लोकांच्या दैनंदिन गाऱ्हाण्यांनुसार कामगारांत, शेतकऱ्यांत, आदिवासी लोकांत प्रत्यक्ष जाऊन काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना काम करावे लागेल. त्यासाठी कामाची शिस्त सांभाळून कार्यक्रमाची मांडणी केली पाहिजे. अशिक्षितांच्या रोजगारीचा प्रश्न आहे, तसा सुशिक्षितांच्या रोजगारीचाही प्रश्न तितकाच तीव्र असल्याने त्यासाठी वेगवेगळे काम सातत्याने करावे लागेल. जसा काळ जाईल, तसे हे प्रश्न अधिक सूक्ष्म बनतील. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांनी आपल्या वागण्यात आणि बोलण्यात टोकदारपणा आणण्याची गरज आहे. विचाराचे वेगवेगळे संस्कार माणसावर सतत होत राहतात. परंतु कार्यकर्त्याने पक्षासाठी एकदा दिलेल्या निष्ठा या विचाराधिष्ठित असतील, तर विचलित होऊ द्यावयाच्या नसतात. बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे वैचारिक संघर्ष व वादळे अधूनमधून उठतात. त्यांपासून काही शिकावेही लागते. पण त्यांच्या दडपणाखाली मी स्वत: माझ्या पक्षावरील निष्ठांपासून कधी ढळलो नाही. मी काँग्रेस पक्षातच आहे आणि अखेरपर्यंत असेन. माझी ती उमेद आजही अभंग आहे. देशातील नव्या परिस्थितीच्या संदर्भात काँग्रेस कार्यकर्त्यांनी निश्चित कार्यक्रमाचे बोट धरून ठामपणे उभे राहावे, असे मी सुस्पष्टपणे सांगतो आणि त्याच वेळी त्याची कारणमीमांसा करताना आजच्या सत्ताधाऱ्यांच्या उणिवांचा परखडपणे समाचार घेतो, तेव्हा या आक्रमकतेचा, स्वत:ला विचारवंत मानणारेही चुकीचा अर्थ लावून लोकांची मने कलुषित बनविण्याच्या प्रयत्नात असतात, याची

मला जाणीव आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याखेरीज मी काय करणार? जनता पक्षासारख्या एका दिशाहीन असलेल्या पक्षाविरुद्ध जनतेला जागे करणे, या देशाचे तारू जनता पक्षाच्या हाती राहणे कसे धोक्याचे आहे, याची कारणमीमांसा मांडणे यात चूक काय? मी आक्रमक भूमिका स्वीकारतो, याचा अर्थ जनता पक्षाच्या उणिवा, स्पष्टपणे-कोणाचाही मुलाहिजा न ठेवता बोलून दाखवतो. परंतु माझ्या या कृतीचा राजकीय पातळीवरून प्रतिवाद करण्याचे टाळून, ज्याच्या मनात माझ्याविषयी पूर्वग्रह आहेत, लिहिण्या-बोलण्यात विकृतता आहे, त्यांनी माझ्या बोलण्याचा चुकीचा अर्थ लावला, तर त्यांची कीव न करावी, तर काय करावे?

या संदर्भात काँग्रेस पक्ष आणि जनता पक्ष यांचे स्वरूप पुन्हा एकदा तुलनात्मक दृष्ट्या समजावून घेण्याची गरज आहे, असे मला वाटते. काँग्रेस पक्षाचे स्वरूप हे राष्ट्रिय आंदोलन-काळातील चळवळीचे स्वरूप राहिलेले आहे. या राष्ट्रिय चळवळीत सर्वच समाज सामील झाला होता, हे त्याचे कारण आहे. या पक्षाचा जो कार्यक्रम आहे, संघटनेची आजची रचना व वस्तुस्थिती आहे, ती पाहिल्यावर काँग्रेस पक्षाला राष्ट्रिय पक्ष संबोधणेच सयुक्तिक ठरते. काँग्रेस पक्षाला कोणी बहुजन समाजाचा पक्ष म्हणूनही संबोधतात. 'बहुजन' हा शब्द मी 'मासेस्' या अर्थाने वापरतो. बहुजन समाज म्हणजे 'अमुक एका जातीचा समाज' असा त्याचा अर्थ नव्हे. परंतु महाराष्ट्र या सारख्या प्रांतात बहुजन समाज या शब्दाला एक विशिष्ट, मर्यादित अर्थ प्राप्त करून दिला गेला आहे, काही विचारवंतांना या शब्दातून तसा मर्यादित अर्थ काढण्याची खोड आहे, एवढेच फार तर या संदर्भात मी म्हणू शकेन. मी स्वत: तरी 'बहुजन' शब्दाचा अर्थ 'मासेस्' असाच केला आहे आणि आजही तोच अर्थ मला अभिप्रेत आहे.

एखाद्या पक्षाला बहुजन समाजाचा पक्ष म्हणून राहावयाचे असेल, तर त्या पक्षाला राष्ट्रिय आंदोलनाचे स्वरूप द्यावे लागेल. भारतात काँग्रेस पक्षाला राष्ट्रिय आंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले आहे, याचे कारण बहुसंख्य समाजाला लागू असलेले दारिद्र्याचे, सामाजिक, सांस्कृतिक उत्थापनाचे जे प्रश्न आहेत, ते आणि असे अन्य

प्रश्न काँग्रेस पक्ष स्वत:चे म्हणून आजवर हाताळीत राहिला आहे. दलित समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे कार्यक्रमच या पक्षाने आजवर स्वीकारले. बहुजन समाजाचा पक्ष म्हणून राहायचे असेल, तर हेच कार्यक्रम पक्षाच्या कार्यकर्त्यांना राबवावे लागतील, हे उघड आहे.

बहुजन समाजातील दारिद्र्याचा प्रश्न पाहा. हा प्रश्न ग्रामीण भागात आहे, तसा नागरी भागातही आहे. नागरी भागात तर श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी स्पष्टपणे जाणवत असल्यामुळे नागरी भागातील दारिद्र्याचा प्रश्न अधिक बोचक ठरतो. ग्रामीण भाग असो वा नागरी असो, तेथील बहुजन समाजाचे आरोग्य, शिक्षण, रोजगार, स्पृश्य-अस्पृश्य यांसारखे प्रश्न सोडवावयाचे असतील, तर ते एक राष्ट्रिय आंदोलन म्हणूनच पक्षाने त्याचा स्वीकार केला पाहिजे. काँग्रेस कार्यकर्त्यांचा आजही हा एक कार्यक्रम होऊ शकतो. समाज हा कोणत्याही जाती-जमातींचा असो, त्या ठिकाणी दारिद्र्य हे असतेच. महाराष्ट्रात तर सामाजिक दृष्ट्या स्वत:ला जे वरच्या थरांतील समजतात, त्यांच्यांतही दारिद्र्य आहे आणि इतर खालच्या समाजातही आहे. याचा अर्थ दारिद्र्याचा प्रश्न हा बहुसंख्य समाजाचा प्रश्न आहे. काँग्रेस पक्षाने दारिद्र्याच्या  या प्रश्नाशी मुकाबला करण्यासाठी स्वत:ला वाहून घेतले, त्यामुळेच तो बहुजन समाजाचा पक्ष बनला आहे.

जनता पक्षाचा विचार करताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते, ती ही, की मूलत: राजकीय शक्तीच्या हिशेबाने, हिंदी भाषिक प्रांतापुरत्या एका विभागीय पक्षासारखे त्याचे मर्यादित स्वरूप दिसते. ग्रामीण भागापर्यंत या पक्षाची मुळे खरी तर रुजलेली नाहीत. जनता पक्षाची कमजोरी ही त्यांचा हा पक्ष स्थापन होतानाच अभावात्मक कारणांनी तो बनवला गेल्यामुळे मुळातच तो कमजोर व कच्च्या आधारावर उभा आहे. काँग्रेस पक्षाला विरोध करण्यासाठी सात्त्विक रागाची जी मनोभूमिका तयार झाली, त्याचा आधार घेऊन ज्यांचा कार्यक्रम एक नाही, अशा विविध पक्षांनी एकत्र येऊन काही प्रांतांत निवडणूक जिंकली व मग सरकार बनविले. आज केंद्रात ते सत्तेवर असले, तरी हीच खरी जनता पक्षाची कमजोरी आहे.

निवडणूक जिंकण्यासाठी काँग्रेस-विरोध, सात्त्विक राग जनता पक्षाला उपयोगी पडला. सरकार चालवायचे, तर निश्चित धोरण हवे, त्याचप्रमाणे निश्चित कार्यक्रमाची दिशा हवी.

केंद्रीय शासनात या दृष्टीने अजून तरी 'ना सरकार, ना पक्ष' (Non Govt., Non Party) अशी स्थिती आहे. जनता सरकारचा काही ठोस कार्यक्रम आहे, अशी भावना व खात्री लोकांच्याही मनात नाही. त्यामुळेच सर्वत्र चलबिचल आहे. जनता पक्षाबद्दल एकूणच भ्रमनिरास व्हायला लागला आहे. जो दुर्बल समाज आहे, हरिजन समाज आहे, त्यांच्यांत हा भ्रमनिरासाचा वेग जबरदस्त आहे. ज्या वेगाने लोकांचा भ्रमनिरास होतो आहे, त्याची कल्पना खुद्द जनता नेत्यांना तरी आहे, की नाही, याची शंका वाटते.

कोणत्याही सरकारला जनमानसात आपली यशस्वी प्रतिमा उभी करावयाची, तर त्यासाठी निश्चित कार्यक्रमाची आणि विचारांची चौकट बनवावी लागते. आर्थिक उद्दिष्टांची अशी जाणीव आज जनता सरकारच्या बोलण्यात, वागण्यात आढळत नाही. जनता पक्षाला मी 'नॉन पार्टी' म्हणून संबोधतो, याचे कारण, या पक्षात निरनिराळे पक्ष सामील झाले आहेत; पण ते एकजीव झालेले नाहीत. प्रत्येक पक्ष स्वतंत्रपणे बोलतोय, वागतोय, हे पक्ष जनता पक्षातून फुटणार, असेही लोक बोलतात. परंतु वस्तुत: जनता पक्षातील विविध पक्ष फुटण्याचा प्रश्न आहेच कुठे? एकतर ते एकजीव झालेलेच नाहीत. मुळात ते फुटलेलेच होते. आजही ते तसेच विभक्त आहेत. यांवर काँग्रेस पक्षात दुफळी नाही काय, असा प्रश्न साहजिकच विचारला जातो. काँग्रेससारख्या जुन्या व मोठ्या पक्षाला दुफळीचा, मतभेदाचा प्रश्न नेहमीच भेडसावीत असतो. परंतु गेल्या नव्वद वर्षांच्या या पक्षाचा इतिहास पाहिला, तर अशा प्रसंगोपात्त निर्माण होऊ पाहणा-या दुफळ्या पचवून, कार्यक्रमाच्या बांधीवपणाने जनतेच्या पाठिंब्याने पक्षाचे सातत्य कायम राहिले आहे. हा इतिहास आहे.

असे असले, तरी या मतभेदाचा परिणाम या पक्षाने स्वीकारलेल्या कार्यक्रमावर होणार नाही, याची पक्षाच्या कार्यकर्त्यांना चिंता बाळगावी लागेल. आर्थिक विषमता दूर करण्याचा, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा किंवा राजकीय दृष्ट्या निवडणुकी लढवण्याचा कार्यक्रम असो; अंत:स्थ मतभेदाचा यत्किंचितही परिणाम या कोणत्याही गोष्टीवर होणार नाही, याची काळजी पक्ष-कार्यकर्त्यांनी घेतलीच पाहिजे. महाराष्ट्रातील काँग्रेस कार्यकर्त्यांना तर या बाबतीत अधिकच जागरूक राहावे लागेल. यावेळी तर सर्व कार्यकर्त्यांना अन्य कशाचाही विचार न करता एकजुटीने आपली सारी शक्ती काँग्रेसच्या पाठीशीच उभी केली पाहिजे.

कार्यकर्त्यांना मी जेव्हा असे आवाहन करतो आणि जनता पक्षाच्या उणिवा सांगतो त्यावेळी शहाणीसुरती, विचारवंत मंडळीही माझ्यावर जातीयवादाचा आरोप करण्यासाठी सरसावतात. जाणती माणसे असे काही विपर्यस्त बोलतात, तेव्हा मला खेद होतो. वाईट वाटते, मन कष्टी होते. राजकारणातल्या वादात विचारवंत टीका करण्याचे जमत नाही, म्हणून जातीयवादाची शिवी देण्याचा या मंडळींचा प्रयत्न असावा काय? मला तरी तसेच वाटते.

माझा नम्र दावा आहे, की महाराष्ट्रातील राजकारण हे जातीयवादापासून अलिप्त राहावे, यासाठी मी मनस्वी कष्ट घेतले आहेत. महाराष्ट्रात असताना तेथील माझ्या कर्तेपणाच्या दिवसांत आणि नंतरही मी त्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न केले. मनातून स्वत: मी कधी जातीयवादी भावनेला बळी पडलो नाही. उलट, समाजात एकजिनसीपणा आणण्याचेच ध्येय मी मनाशी निरंतर बाळगले.

महाराष्ट्रात कोणत्या पक्षाचे सरकार बनवायचे, हे अखेरीस जनतेच्या स्वाधीन आहे. काँग्रेसचे सरकार यावे, यासाठी अर्थातच मी शर्थीचे प्रयत्न करीन. परंतु याचा अर्थ महाराष्ट्राचा समाज दुभंगावा, फुटावा किंवा जातीयवादाने डोके वर काढावे, असा नव्हे. राजकारण करण्यासाठी म्हणून जातीयवाद राबवावा, या विचारापासून मी

नेहमीच अलिप्त राहिलो आहे. माझ्यावर जातीयवादाचा आरोप करणारांना मला असे विचारायचेय, की माझे कोणते विधान जातीयवादाला आवाहन आणि प्रोत्साहन देणारे आहे? जनता पक्षावर टीका करताना, जनसंघावर आणि रा. स्व. संघावर मी जरूर टीका करतो आणि यापुढेही करीन. परंतु मी ही टीका करतो, त्यावेळी माझ्यासमोर समाजातील एक विशिष्ट वर्ग असतो, अशी शहाण्यासुरत्या पुढाऱ्यांची टीका जेव्हा ऐकतो, तेव्हा खेद वाटतो. जनसंघावर आणि रा. स्व. संघावर टीका करणारा मी कोण एकटाच आहे? टीकाकारांना अभिप्रेत असणा-या वर्गात संघ-जनसंघाचे टीकाकार नाहीत, असे त्यांना म्हणावयाचे आहे काय?

जनसंघ, रा. स्व. संघावर मी टीका करताच श्री. एस्. एम्. जोशी यांच्यासारखे राजकारणी विचारवंत 'म्हणजे ब्राह्मण समाजावरच ना ही टीका?' असे स्वत:चे विधान त्याला जोडून पुढे सरसावतात, याला काय म्हणावे? श्री. एस्. एम्. जोशी यांच्याबद्दल मला नेहमीच आदर वाटत आला आहे. परंतु माझ्या भाषणावरचे असे हे विपरीत भाष्य जोशीबुवा व त्यांचे सहकारी करीत आहेत, ही आश्चर्याची गोष्ट आहे. यातल्या वैयक्तिक बदनामीची मला चिंता वाटत नाही. पण या मंडळींनाच महाराष्ट्रातील निवडणूक-प्रचाराला जातीय स्वरूप द्यावयाचे आहे, की काय, अशी चिंता मनात निर्माण होते आणि खेद वाटतो. वस्तुत: महाराष्ट्रातले सार्वजनिक जीवन गेल्या पाव शतकात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादापासून मुक्त झाले आहे. माझ्या थोर मित्रांना मी विनंती करेन, की मी जे उच्चारले नाही, माझ्या मनात जे नाही, त्याचा आरोप करून कृपया माझ्यावर अन्याय करू नका. माझी शक्ती कमी व्हावी, ही त्यांची इच्छा मी समजू शकतो. परंतु त्यासाठी याच मार्गाचा अवलंब कशाला? एका चांगल्या पद्धतीने सार्वजनिक जीवन पुढे जात असताना ते जीवन निवडणुकीच्या स्वार्थासाठी म्हणून मलिन करू नका, एवढेच मी म्हणेन.

जातीय विचार हा माझ्या जीवनात अशक्य आहे, हे काय या मंडळींना माहीत नाही? खरे म्हणजे माझ्या खासगी जीवनातल्या गोष्टींची मी सार्वजनिकरीत्या

वाच्यता करू नये. तसे काही सांगण्याची माझ्यावर कोणी वेळही आणू नये. परंतु अशा तऱ्हेचे आरोप केले जातात, तेव्हा खंत वाटते.

महाराष्ट्रातल्या जनतेला माहिती आहे, की मी अगदी गरीब स्थितीत असताना शिक्षण घेतले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी गाव सोडून बाहेर जावे लागले. परंतु जेथे गेलो, तेथे राहण्यासाठी वसतिगृह निश्चित करताना मी दहा वेळा विचार केला. परंतु जातीय नावावर चालणा-या वसतिगृहात शिक्षणासाठी राहायचे काय, असा सवाल माझ्यासमोर निर्माण झाला आणि अखेरीस अशा वसतिगृहात राहायचे माझ्या मनाने नाकारले. जिथे कुठे लहान खोली मिळाली, तिथे राहिलो आणि शिक्षण घेतले. योगायोग असा, की त्या लहान खोलीत मला जोडीदार मिळाला, तोही एक माझा ब्राह्मण मित्रच होता.

हा उल्लेख मी एवढ्यासाठी करीत आहे, की जातीयवादाचा विषारी विचार लहानपणापासूनच मला कधी शिवला नाही. माझा तर असा दावा आहे, की महाराष्ट्रात आणि अन्यत्रही समाजातील सर्व वर्गातील लोकांशी माझे व्यक्तिश: जिव्हाळ्याचे आणि घरोब्याचे संबंध आहेत. गरीब घरांतल्या शेतकऱ्यांशी, हरिजन वर्गातल्या मंडळींशी जेवढे माझे जिव्हाळ्याचे संबंध आहेत, तेवढेच पुढारलेल्या ब्राह्मण वर्गातील लोकांशीही आहेत. जनसंघ आणि रा. स्व. संघ यांच्याशी राजकीय दृष्ट्या मतभेद असले, तरी त्यांच्यापैकी अनेकांशी व्यक्तिगत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. इतकेच कशाला, मनातले दु:ख कुणाला सांगायचे ठरवले, तर चारांतले तीन ब्राह्मण असतात. हरिजन, मुसलमान, लिंगायत, ब्राह्मण अशा साऱ्यांच जातीजमातींबद्दल माझ्या मनात काही जिव्हाळ्याच्या भावना आहेत. अशा स्थितीत महाराष्ट्रात कोणी जातीयवाद फैलावण्याचा प्रयत्न करणार असतील, तर जीव पणाला लावून महाराष्ट्रातील जातीयवादाविरुद्ध मी उभा राहीन, असा माझा निर्धार आहे.

थोडे मागे वळून पाहिले किंवा इतिहासाची पाने उलटली, तर रा. स्व. संघावर टीका

करणारे कोण आढळतात? रा. स्व. संघ ही ब्राह्मणांची संघटना आहे. ही टीका प्रथम राष्ट्रसेवा दलाच्या गोटातूनच केली गेलेली आहे. राष्ट्रसेवा दलाच्या मार्गदर्शकांना ही माहिती असावी. असलीच पाहिजे.

या उलट, रा. स्व. संघाचे महाराष्ट्रातले आणि बाहेरचेही स्वरूप मी पाहिले आहे. त्यामुळे या संघटनेत एकाच जातीचे लोक आहेत, असे मी म्हणू शकत नाही. जनसंघाचेही तेच आहे. समाजातले निरनिराळे वर्ग त्यात आहेत, याचीही मला माहिती आहे. व्यक्तिगत उल्लेख करायचा, तर पुण्यात, मी जेव्हा वकिलीचा अभ्यास करायला आलो, त्यावेळी लॉ कॉलेजसमोर, जिथे मी राहात असे, तेथे माझा 'रुम पार्टनर' हा रा. स्व. संघाचा एक सचोटीचा कार्यकर्ता होता. माझ्या मित्रमंडळींतही अशांचा भरणा होता. तेव्हा संघ-जनसंघावरील माझी टीका म्हणजे ब्राह्मण वर्गावर किंवा जातीवर टीका, असे भासविण्याचा प्रयत्न जेव्हा माझ्या बाबतीत होतो, तेव्हा त्याचे मला हसू येते.

कारण माझी टीका असते, ती विचारसरणीवर. सामाजिक-सांस्कृतिक अलिप्तपणाच्या त्यांच्या निष्ठांवर. परंतु याची जाणीव टीकाकार ठेवीत नाहीत, असे दिसते. तेही मी समजू शकतो. पण काँग्रेसमधून शिंगे मोडून जनता पक्षाच्या आश्रयाला कालपरवा गेलेलेही तशीच पोपटपंची करतात, हा सर्वांत मोठा विनोद आहे.

खरे तर, जनता पक्षातलेच प्रमुख कर्ते लोक संघ-जनसंघाबाबत टीकात्मक बोलत आहेत. महाराष्ट्रातल्या टीकाकार मंडळींनी, वस्तुत: या टीकेचा अंतर्मुख होऊन विचार करावा, हे बरे. शहाण्या-सुरत्यांनी अगोदर जनता पक्षातल्या टीकाकारांचे समाधान करावे आणि मगच शिल्लक उरल्यास टीकेचे हत्यार परजून माझ्या रोखाने धाव घ्यावी. संघ-जनसंघाला खडे बोल ऐकवणारा एक गट जनता पक्षांतर्गत आहेच ना ? माझ्यावर जातीयतेचा आरोप करणारांनी या गटावरील आरोपाचाही उच्चार एकदा केलेला बरा.

वैचारिक श्रद्धांतून काम करणारा मी माणूस. अनेकविध विचारांच्या मंडळींशी संबंध. विविध प्रकारच्या वाचनाची, व्यासंगांची सवय. असा मी, इच्छा झाली, तरी जातीयवादी बनणार कसा? सहज ओघात आले, म्हणून हा प्रपंच.

१९७८ चा प्रारंभ हा राजकीय इतिहास निर्माण करणारा महत्त्वाचा काळ आहे. चार-सहा राज्यांत निवडणुका होणार असून या निवडणुकांमध्ये जनता पक्षाच्या राज्यकारभाराच्या व धोरणांच्या अनुभवानंतर जनमताची कसोटी लागणार आहे. काँग्रेस पक्षाला आपल्या ध्येय-धोरणाचा, कार्यक्रमाचा पाठपुरावा करीत करीत गेल्या वर्षभरातल्या इतिहासाला कलाटणी द्यायची आहे. आपल्या मूळ प्रेरणा व काँग्रेसला इतिहासाने दिलेले काम व मनातली तीव्र जाणीव यांच्या आधारावर पक्षाने अधिकाधिक एकसंध बनून जनतेपर्यंत पाहोचावयाचे आहे आणि आव्हान पूर्ण करावयाचे आहे.

काँग्रेस पक्षावर, पक्षाच्या नेत्यांवर टीका या होत राहणारच. परंतु या टीकांचे परिमार्जन करण्यासाठी, लोकांना वस्तुस्थिती पटविण्यासाठी पाच-दहा माणसांच्या संख्येपासून हजारोंच्या संख्येपर्यंत कार्यकर्त्यांनी पोहोचून नवे युवामंडळ बनविण्याचे काम केले पाहिजे. खेड्यांपासून शहरांपर्यंत करावयाचे हे काम आहे. महाराष्ट्र म्हणजे काँग्रेस कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे, असे महात्मा गांधी म्हणत असत. म. गांधींनी महाराष्ट्राला जो काँग्रेसचा मंत्र दिला, त्याच्या परीक्षेची, कसोटीची ही वेळ आहे.

## २७. वर्गसंघर्ष आणि जातिसंघर्ष

'तरुण भारत' नागपूर, १९७७ च्या दिवाळी अंकातील लेख.

मार्क्सने मांडलेले वर्गसंघर्षाचे तत्त्व, हा इतिहासशास्त्रातील एक क्रांतिकारक सिद्धांत आहे. तो अमुक एका देशाला लागू आहे आणि अमुक एका देशाला लागू नाही, असे होऊ शकत नाही. हिंदुस्थानलाही तो लागू आहे. जोपर्यंत समाजात शोषित-पीडित लोक आहेत आणि त्यांना शोषून काढणारे लोक आहेत, तोपर्यंत मार्क्सचा सिद्धांत भारतातही आहेच. शोषकांचे अत्याचार वाढतील, तसतसा हा वर्गसंघर्ष वाढत जाईल, यात मला मुळीच शंका वाटत नाही. माझे तर उलट असेच मत आहे, की हिंदुस्थानात वर्गसंघर्ष नव्हता, असे कधी झाले नाही. त्या संघर्षाची व्याप्ती अधून मधून कमी-अधिक झाली असेल, इतकेच काय ते. पण संघर्षाची ही भावना अगदी पूर्वीही होती आणि आजही आहे. आणि मला वाटते, ती यापुढेही राहणारच आहे. कारण आपण इतर वर्गापेक्षा श्रेष्ठ आहोत, असे मानणारा वर्ग भारतात आजच्याप्रमाणेच पूर्वीही होता आणि त्याचे वर्चस्व न मानता ते झुगारून द्यावे, असे वाटणारा वर्गही पूर्वी होता व आजही आहे. तेव्हा हिंदुस्थानमध्ये वर्गसंघर्ष ही काही नवीन घटना नव्हे.

वर्गसमन्वयाची भावना व भाषा आपल्या संस्कृतीत आहे, असे मानून घेणे हीही एक प्रकारची सोयीस्कर गैरसमजूत आहे. उलट, भारतीय संस्कृतीच्या निर्मात्यांनी या दीन-दलितांनाही काही मन आहे, भावना आहेत, याचा फारसा विचार केलेला नाही, असेच खेदाने म्हणावे लागते. समन्वयाची भाषा काढताना ती घडवून आणतानाही नेहमी दलित वर्गांना शोषणाखाली कायमचे जखडले जाईल, असाच प्रयत्न झालेला आहे. हा आपल्या समाजव्यवस्थेचा दोष आहे. शोषित आहे, तो शोषित राहू नये, असा प्रयत्न कधी झाला नाही. शोषिताने प्रतिकार करावा, इतके सामर्थ्य त्याला समाजव्यवस्थेने कधी प्राप्त होऊ दिले नाही.

भारतीय संस्कृतीच्या अगदी भरभराटीच्या काळातही चातुर्वर्ण्य-प्रणाली निर्माण करून समाजात कायमचा जातिभेद निर्माण करण्यात आला. जो शूद्र आहे, तो शूद्रच

राहिला पाहिजे, असे युगानुयुगे सांगितले गेले. तेव्हा ज्या व्यवस्थेने माणसामाणसांत भेद केला, काही लोकांना हीन मानले, त्या व्यवस्थेत समन्वय हा शब्दही वर्णाश्रमव्यवस्थेला कायम रूप देण्यासाठीच होता, असेच म्हणावे लागते. हिंदुस्थानच्या इतिहासाचा असा समन्वयवादी अर्थ लावणे, हे वास्तवाकडे पाठ फिरवणे होणार आहे. शोषण करणारा समाज, वर्ग किंवा जाती आहेत, तोवर शोषित राहणारच. आणि शोषित असले, की असंतोष आणि संघर्ष येणारच. हजारो वर्षांपासून हेच होत आलेले आहे आणि शोषणरहित समाजाचा उदय सर्व जगभर होईपर्यंत असेच घडत राहणार आहे.

वर्ग-संघर्ष म्हटला, की तो अहिंसक असणे संभवत नाही. कारण एक तर वर्गविग्रहाची भावना पराकाष्ठेला पोहोचल्याशिवय संघर्ष पेटणार नाही. संघर्ष हिंसक व्हायला नको असेल, तर तो पेटणारच नाही, अशी व्यवस्था करायला हवी. वर्गसंघर्षाने हिंसक वळण घ्यायला नको असेल, तर वर्गविग्रहाची भावना दूर करायला हवी. आर्थिक दृष्ट्या दुर्बळ आहे, एवढ्याच खातर कुणावर अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यायला पाहिजे आहे. आजही कुणी दरिद्री असेल, गरीब असेल, तर तो दोष त्याचा नसून संपूर्ण समाजव्यवस्थेचा आहे, असे मानले पाहिजे. ते न करता वर्गसंघर्ष हिंसक राहणार, की अहिंसक राहणार, ही चर्चा नुसती पोकळ व कोरडी ठरणार आहे. समाजात विविध स्तरांवरील वर्ग आहेत व त्यांतला एक वा अनेक सबल वर्ग दुस-या कमकुवत वर्गाचे शोषण करतात, छळ करतात, हेच वर्गसंघर्षाचे मूळ कारण आहे. पूर्वी आपला समाजच अशिक्षित होता. आपल्यावर अन्याय होत असला, तरी ते 'आपले नशीब' असे मानण्याची शिकवण त्याला देण्यात आली होती. आता समाज जागा होतो आहे. हरिजनही आता साक्षर होत आहेत. शहाणे होत आहेत. त्यांच्या नव्या पिढीला परंपरेने चालत आलेले अन्याय, अत्याचार सहन होत नाहीत. ते दूर करण्यासाठी आजचा शोषित कंबर कसून उभा राहू म्हणतो आहे. त्याचा त्याच्या हक्कासाठी होणारा लढा हा वास्तविक समाजाने कौतुकाने स्वीकारला पाहिजे आहे. इतकेच नव्हे, तर मी तर म्हणेन, त्याला सर्वतो प्रकारे मदत केली पाहिजे. हा संघर्ष अटळ आहे. आणि एकदा तो अटळ आहे, हे

मान्य केले, की मग ती एक लढाई ठरते आणि लढाई नेहमी अहिंसकच राहिली पाहिजे, ही इच्छा चांगली आहे, पण व्यवहारात तसे घडणे अशक्य आहे.

मला वाटते, हरिजनांना अन् शोषितांना त्यांच्याच बाबतीत समाज पक्षपात करतो, असे वाटू न देणे, ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. जातपात कोणतीही असो, सामाजिक प्रतिष्ठा असो वा नसो, आर्थिक स्थिती खालावलेली असो वा चांगली असो, सारा समाज आपल्याकडे 'माणूस' म्हणून पाहतो आहे, ही भावना त्यांच्यांत वाढीस लावली पाहिजे. ते होणार नसेल, तर तो वर्ग संघटित होणार व आपल्या हक्कांसाठी संघर्षाला सज्ज होणार. परंतु हा वर्ग असा उग्र बनणार नाही, हिंसाचार करणार नाही, यावर उत्तम उपाय, म्हणजे समाजातील आर्थिक आणि सामाजिक विषमता दूर करणे हाच आहे. मार्क्सने सांगितलेली वर्गविग्रहाची कल्पना किंवा वर्गसंघर्षाचा सिद्धांत त्याच्या देशात होता, तसाच्या तसा कदाचित हिंदुस्थानात दिसत नसेल. येथील निरनिराळ्या वर्गांची कल्पना व रचना कदाचित निरनिराळी असेलही. परंतु वर्ग आहेत, विषमता आहे, त्यांच्या हितसंबंधांत विरोध आहे, पिढ्यान् पिढ्या तो वाढतो आहे. जातिव्यवस्था ही अत्यंत वाईट स्वरूपाची वर्गविग्रह-व्यवस्थाच आहे, असे माझे स्पष्ट मत आहे. या जातिव्यवस्थांना सध्या जे विकृत स्वरूप आले आहे, त्या स्वरूपासाठी त्या निर्माण करण्यात आलेल्या नव्हत्या, असे म्हणण्यात फारसा अर्थ नाही नि तसे म्हणणे म्हणजे स्वत:ची फसवणूक करणे ठरेल. आपल्या समाजात प्रत्येक पिढीत, किंवा युगात म्हणा, हवे तर, जातिव्यवस्था ही कायम स्वरूपाच्या जातिभेदात बदलत चालली आहे, हे ओळखणारे नेते किंवा समाजसुधारक नव्हते, की काय? पण तरीही हा ऱ्हास झाला व समाज-जीवनात जातिभेदाचे हे विष खोलवर भिनले. कामावरून ठरविलेली जात जन्मावरून ठरणा-या जातीला वाट करून का गेली? काम कोणतेही असो, आधी जात कोणती, त्याचा विचार त्यानंतर बळावला. त्यातूनच कामापेक्षा जन्म महत्त्वाचा ठरला आणि येथूनच आमच्या देशात जातिभेद हेच वर्गभेदाचे दुसरे नाव होऊन बसले.

आज हरिजन हा वर्ग राहिलेला नाही, ती जात बनली आहे. कदाचित शोषिताची आणि शोषकांची नवी जातच या देशात तयार होण्याचा धोका आहे. ती जात जन्मावरून नव्हे, तर आर्थिक संपन्नतेवरून किंवा विपन्नतेवरून ठरणार आहे. म्हणजे मार्क्सचा सिद्धांत प्रत्यक्षात आलाच. भारतात तरी वर्गसंघर्ष आणि जातिसंघर्ष यांचा तोंडावळा ब-याच अंशी एक-सारखाच आहे.

जयप्रकाशांनी हरिजनांवर होणा-या अत्याचारांच्या संदर्भात वर्गसंघर्षाची कल्पना मांडली आहे. परंतु माझ्या मते अशा वर्गसंघर्षातून हरिजनांचा लाभ होणार आहे, की नाही, या तात्त्विक चर्चेचा हा प्रश्न नाही. हरिजनांची आजची परिस्थिती काय आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हिंदुस्थानमध्ये आज अत्याचार ज्या पद्धतीने होताहेत, त्याची माहिती काढायचा जर प्रयत्न केला, तर असे दिसून येईल, की या सर्वांचे मूळ कारण सामाजिक अहंकाराचे आणि मोठेपणाचे जुने विचारच आहेत. त्याचबरोबर आजचे जे आर्थिक कार्यक्रम आहेत, त्या आर्थिक कार्यक्रमांना विरोध म्हणून हरिजनांवर हे अत्याचार होत आहेत.

या अत्याचारांची पाहणी करण्यासाठी माझ्या पक्षाने खासदारांच्या ज्या तुकड्या बिहार, गुजरात, उत्तर प्रदेश या राज्यांत पाठविल्या होत्या, त्यांनी आणलेल्या माहितीवरून दिसते, की ज्यांना जमिनी नव्हत्या, त्यांना जमिनी दिल्या, म्हणून त्यांच्यावर राग काढण्यात आला. कालपर्यंत बिनजमिनीचे असलेले हे लोक आता जमिनीचे मालक व्हायला लागले, जमीनदार व्हायला लागले, हे अनेकांना पाहवले नाही.

त्याचप्रमाणे ज्यांना राहायला जागा नव्हत्या, त्यांना त्या मिळाल्या, तर अत्याचार करणाऱ्यांनी त्या परत हिसकावून घेतल्या. वेठबिगारी पद्धतीत पिढीजात गुलामी करायला माणसे मिळत होती. त्यांना वर्षाकाठी काही धान्य दिले, थोडे कपडे दिले आणि पिढयान् पिढया आमचेच काम केले पाहिजे, म्हणून बांधून घेतले. तर अशी

जी वेठबिगार चालू होती, तिला विरोध करायला लोक उभे राहिल्याबरोबर त्यांच्यावर अत्याचार झाले आहेत. त्यातून हा संघर्ष निर्माण झालेला आहे.
म्हणजे हा संघर्ष मुळामध्ये आहेच. त्यांचे शोषण चालूच होते. त्यांचे सामाजिक आर्थिक शोषण वर्षानुवर्ष चालले आहे आणि आज त्यांनी बरोबरीच्या नात्याने वागायचा प्रयत्न करतो म्हटल्याबरोबर त्यांच्यावरती, जणू काही आपले जन्मसिद्ध अधिकार जातील, या भावनेने शोषक त्यांच्यावर नुसती कुरघोडीच नव्हे, तर हिंसक हल्ले करतो आहे. हे चित्र काय दर्शविते? हेच की, हा वर्गसंघर्षच आहे. दुसरे काहीही नाही. आणि हा जो शोषक आहे, तो हिंसेचा वापर करून शोषिताला दाबायचा प्रयत्न करतो आहे. अशा परिस्थितीत तो शोषित वर्ग जर प्रतिकाराला उभा राहिला, तर त्याच्याविरुद्ध तक्रार कशी करता येईल?

अशा परिस्थितीत या वर्गाने त्याच्यावर जो अन्याय होतो आहे, त्याच्याविरुद्ध संघटित झाले पाहिजे आणि त्याचा संघटित प्रतिकार केला पाहिजे. अर्थातच संघर्ष केला पाहिजे. कारण हा त्यांच्या मूलभूत हक्काचा प्रश्न आहे. या संघर्षासाठी समाजातील सुजाण व्यक्तींनी त्याला आपणहून सर्व प्रकारची मदतही केली पाहिजे. कारण अशा संघर्षातून त्याला जो लाभ मिळेल, तो चिरस्थायी राहणार आहे. कुणाच्या तरी उपकाराने किंवा उदारतेमुळे त्याला काही दिले, तर त्याने त्याचे भागायचे नाही. त्याचे समाधानही होणार नाही. कुणी त्याला दया दाखविली, तर त्याने काय होणार? अशा कृत्रिम मदतीने किंवा दयेने सामाजिक अन्याय, अत्याचार कधीच दूर होत नसतात. वरून येणा-या कुणाच्या तरी दयेवर अवलंबून राहून सामाजिक एकता कधीच निर्माण होत नसते.

मी काही समाजात वितुष्ट निर्माण करावे, अशा मनाचा नाही.वितुष्टे टाळली पाहिजेत, वितुष्टे निर्माण होणार नाहीत, असे प्रयत्न केले पाहिजेत, अशाच मताचा मी आहे. त्यासाठी समाजातल्या सर्व लोकांनी, शासकांनी, नेत्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. याच भावनेने आमच्या पक्षातील खासदारांनी आणलेल्या माहितीच्या

आधारे आपले पंतप्रधान मोरारजी यांना मी पत्र लिहिले आहे, की शासनाने आपली सर्व यंत्रणा या लोकांवरील अत्याचाराच्या प्रतिकारासाठी आणि असे अत्याचार होणार नाहीत, याची खबरदारी घेण्यासाठी सज्ज उभी करायला पाहिजे. हे शासनाचे काम आहे. सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांतील जे कोणी नेते असतील, त्या सर्वांचे हे काम आहे. हा काही एका पक्षाचा वा राजकारणाचा प्रश्न नाही. समाजातील न्यायाचा प्रश्न आहे.

## २८. जनता सरकारचे परराष्ट्रिय धोरण

परराष्ट्र व्यवहार खात्याच्या मागणीवरील चर्चेत भाग घेताना
२ एप्रिल १९७९ रोजी केलेल्या भाषणाच्या आधारे.

आजच्या गतिशील जगामध्ये अनेक महत्त्वाचे बदल अत्यंत जलद गतीने होत असतात आणि त्यामुळे आंतरराष्ट्रिय परिस्थितीसंबंधी वारंवार चर्चा होत राहिली पाहिजे, असे मला वाटते. याबाबतीत केवळ सरकारनेच पुढाकार घ्यावा, असे नाही; इतरांनाही अशी चर्चा प्रवर्तित करता येते.

आंतरराष्ट्रिय परिस्थितीचा ऊहापोह करण्यापूर्वी परराष्ट्रमंत्री म्हणून श्री. अटलबिहारी वाजपेयी करीत असलेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करणे आवश्यक वाटते. त्यांच्या या नव्या भूमिकेचे मी गेली दोन वर्षे निरीक्षण करीत आहे. जनसंघाचे नेते म्हणून त्यांनी वेळोवेळी व्यक्त केलेल्या वैचारिक भूमिका मी अवलोकन केलेल्या आहेत. ते लक्षात घेता, परराष्ट्रमंत्रिपदावर विराजमान झाल्यापासून श्री. वाजपेयी खुल्या वृत्तीने आणि लवचीक मनाने विचार करू लागले आहेत, असे म्हटले पाहिजे. पं. नेहरूंच्या परराष्ट्रिय धोरणाचा वारसा चालविण्याची जबाबदारी त्यांच्याकडे आलेली आहे. पं. नेहरूंचे धोरण ते पुढे चालवत आहेत, हे जसे त्यांना भूषणावह आहे; तसाच तो नेहरूंच्या धोरणाचाही विजय आहे.

१९७९ मधील भारताच्या परराष्ट्रिय धोरणाचा विचार करीत असताना परराष्ट्र-मंत्र्यांनी केवळ या वर्षापुरतीच आपली दृष्टी मर्यादित न ठेवता येत्या दशकातील परराष्ट्रिय धोरणाचाही साकल्याने विचार केला पाहिजे, असे मला सुचवावेसे वाटते. येत्या दहा वर्षांमध्ये जागतिक आंदोलनांचे स्वरूप काय राहणार आहे, जग कसे होणार आहे, आपले भौगोलिक स्थान, आकार व महत्त्व लक्षात घेता भारताचे धोरण कोणते राहील आणि आगामी परिस्थितीसंबंधीचे भारत सरकारचे मूल्यमापन कसे राहणार आहे या सर्व गोष्टी परराष्ट्रमंत्र्यांच्या डोळ्यांसमोर हव्यात. कारण परराष्ट्रिय धोरणाचा विचार करताना दीर्घकालीन संभाव्यता ध्यानात घेणे हितकारक ठरते.  भारतासारख्या देशाच्या परराष्ट्रिय धोरणाची परीक्षा अनेक निकषांच्या आधारे करता येणे शक्य आहे. शेजारी देशांबरोबरचे संबंध आणि या विभागातील देशांबरोबरचे संबंध हे दोन निकष प्रमुख आहेत. यांपैकी पहिला म्हणजे शेजारी देशांबरोबरच्या संबंधाचा विचार करायचा म्हटले, तर या बाबतीत सरकार काहीसे आत्मसंतुष्ट आहे, असे दिसते.

सर्व शेजारी देशांबरोबरचे आपले संबंध अतिशय चांगले आहेत आणि जनता सरकार अधिकारावर आल्यानंतरच हे घडून आलेले आहे, असे भासविण्याचा सरकारतर्फे प्रयत्न केला जात आहे. पण या दोन्ही गोष्टी ख-या नव्हेत. जर भारताचे आज शेजारी देशांबरोबर चांगले संबंध असते, तर जनता सरकार अधिकारावर येण्यापूर्वीही अशीच परिस्थिती होती, हे नाकारून चालणार नाही. तसेच शेजारी देशांबरोबरचे संबंध अगदी व्यवस्थित आहेत, ही निखालस चूक आहे. कारण पाकिस्तान, नेपाळ आणि बांगला देश म्हणजेच केवळ सर्व शेजारी देश नव्हेत. शेजारी देशांमध्ये चीनही येतो.

शेजारी देशांबरोबर चांगले संबंध असावेत, हा पं. नेहरूंच्या परराष्ट्रिय धोरणाचा एक महत्त्वाचा घटक होता आणि म्हणून या धोरणाचा वारसा आपण त्यांच्याकडून घेतलेला आहे. त्या चौकटीशी आणि मूळ सिद्धांताशी आपण प्रामाणिक राहिलो, तर

कोणत्याच परराष्ट्रमंत्र्याकडून चूक घडणार नाही. मात्र त्यासाठी नेहरूंनी आपल्या परराष्ट्रिय धोरणाचा पाया घातलेला आहे, तो स्वीकारण्याचा प्रामाणिकपणाही दाखवायला हवा.

पाकिस्तानबरोबरचे आपले संबंध सध्या काही प्रमाणामध्ये सुधारले आहेत, हे खरे असले, तरी ही प्रक्रिया सरकार अधिकारावर येण्याच्या ब-याच पूर्वीपासून सुरू झालेली होती. मागच्या सरकारच्या कारकिर्दीतच ती सुरू झालेली होती. जेव्हा बांगला देशाचा संग्राम सुरू झाला, तेव्हा भारतीय उपखंडात तणावाचे आणि संघर्षाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु त्या संघर्षानंतर बांगला देशाचा उदय झाला आणि नंतर नवे पर्व सुरू झाले. त्याच काळात भारत आणि पाकिस्तान यांच्या दरम्यान सिमला करार आणि अन्य करारही झाले. तेव्हापासून या दोन देशांदरम्यानचे संबंध हळूहळू सुधारू लागले.

कोणत्याही दोन देशांदरम्यानच्या संबंधांत सुधारणा होणे, हे केवळ शेजारी राष्ट्राबाबतच महत्त्वाचे असते, असे नव्हे, तर सर्व देशांबाबतही हेच म्हणावे लागते. म्हणून आपण द्विपक्षीय संबंधावर विशेष भर देऊन इतर देशांबरोबरही द्विपक्षीय आणि राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. द्विपक्षीय कराराचे धोरण सध्याच्या सरकारने चालू ठेवले आहे, ही आनंदाची बाब आहे. मात्र किरकोळ प्रश्नांबाबत असे द्विपक्षीय करार करून फार महत्त्वाचे काही साध्य होणार नाही, हे विसरता कामा नये.

पाकिस्तान अणुऊर्जेच्या क्षेत्रात काय करीत आहे आणि त्या बाबतीत त्याने चीन, फ्रान्स आदी देशांशी कोणते करार केलेले आहेत, हे सरकारने आम्हांला सांगितले पाहिजे. तसेच पाकिस्तानच्या मनात काय आहे, हेही कळायला हवे. पाकिस्तानच्या हेतूंबाबत आणि तयारीबाबत आपण सतत जागरूक राहण्याची गरज आहे. सरकारला याची जाणीव असावी, अशी मी आशा करतो.

नेपाळबरोबरचे आपले संबंध नेहमीच चांगले राहिले आहेत. नेपाळचे भारताबरोबरच्या संबंधात काही गैरसमज होते. आणि त्यामुळे त्याला भारताबरोबर प्रवासी सोयीसाठी वेगळा करार करावा, असे वाटत होते. नेपाळच्या दडपणापुढे मान तुकवून आपण एक करार करण्याऐवजी व्यापार आणि प्रवासी वाहतूक यांबाबत दोन वेगवेगळे करार केले, तर त्यांतून अनेक प्रश्न निर्माण होतील, म्हणून पुढे धोकादायक परिस्थिती उत्पन्न होईल, असे काहीही न करण्याची सरकारने दक्षता घ्यायला हवी.

शेजारी देशांबरोबरच्या संबंधात सरकार वस्तुस्थितीपासून दूर जात आहे, असे मला वाटते. ते देश लहान असले, तरी आपल्या देशाच्या विशाल आकारामुळे त्यांच्या मनांत आपल्यासंबंधी काही गंड असणे शक्य आहे, हे लक्षात घ्यायला हवे. लहान देशांबरोबर मैत्रीचे संबंध निर्माण करताना आपण उदार असले पाहिजे, हे खरे असले, तरी त्यांच्या गैरवाजवी मागण्या मान्य करण्याची चूक आपण टाळलीच पाहिजे.

भारत आणि नेपाळ यांच्या मैत्रीसंबंधाचा चांगला निकष कोणता, असे मला विचारले, तर मी म्हणेन, की, या दोन देशांनी संयुक्त नदीप्रकल्प हातात घेतले, तरच हे संबंध चांगले आहेत, असे मानावे. दर वर्षी आपण शेतीविषयक मागण्यांची चर्चा करीत असतो, देशातील पूर परिस्थितीचा आढावा घेत असतो. नेपाळबरोबर आपल्याला संयुक्त नदीप्रकल्प आखता न आल्यामुळेच दरवर्षी उत्तर भारताला महापुराचा तडाखा सहन करावा लागतो. आपण हा प्रश्न नेपाळशी वाटाघाटी करताना अनेक वेळा काढला होता. परंतु नेपाळने त्याबाबत तोंडदेखला होकार देऊन प्रत्यक्षात काहीही केलेले नाही. मी १९७६ मध्ये नेपाळला भेट दिलेली असताना तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी याबाबत बोलणी केली आणि त्यानंतर दोन देशांच्या परराष्ट्र सचिवांच्या दरम्यान करारपत्राची देवाणघेवाणही झाली. श्री. वाजपेयी यांनी नेपाळला भेट देऊन आल्यानंतर संयुक्त नदीप्रकल्पांबाबत थोडीशी प्रगती झाल्याचे म्हटले होते. याबाबतीत आणखी पाठपुरावा केला पाहिजे. नेपाळबरोबर आपल्याला मैत्रीसंबंध प्रस्थापित करायचे असतील, तर केवळ सदिच्छाभेटींवर भागणार नाही.

अशा भेटी आवश्यकच असतात, त्याबाबत मला काहीच म्हणायचे नाही. कोणत्याही देशाच्या नेत्यांबरोबर वैयक्तिक संबंध स्थापन झाले, तर ते चांगलेच असते. परंतु आपल्याला काय हवे आहे, हे आपण मनाशी पक्के केलेले असले पाहिजे. एखादा देश प्रमुख प्रश्नांबाबत कोणती भूमिका घेतो, यावरच त्याची आणि आपली मैत्री अवलंबून असते. भारत आणि नेपाळ यांच्या दरम्यान संयुक्त नदीप्रकल्प हा असाच एक प्रमुख प्रश्न आहे. म्हणून नेपाळ-बरोबरचे संबंध सुधारण्याचा प्रयत्न करीत असताना परराष्ट्रमंत्र्यांनी संयुक्त नदीप्रकल्पांना नेपाळ मान्यता देईल, इकडे लक्ष दिले पाहिजे.

बांगला देशाबरोबरचे आपले संबंध चांगले आहेत, असे सरकार सांगते. मागच्या सरकारच्या कारकिर्दीतही ही परिस्थिती होती. किंबहुना मागील सरकारने बांगला देशाच्या निर्मितीला हातभार लावल्यामुळेच तो देश स्वतंत्र होऊ शकला, हा इतिहास कोणालाही विसरता येणार नाही. नव्या सरकारने बांगला देशाला अधिक पाणी देण्याचे मान्य केल्यामुळे हे संबंध सुधारले, असा दावा केला जातो. पण त्यासाठी कलकत्ता बंदराच्या सोयीची उपेक्षा करण्यात आलेली आहे. मला पश्चिम बंगालबाबत सहानुभूती वाटते. बांगला देशाबरोबर आपले अत्यंत चांगले संबंध आहेत, असे सरकार वारंवार म्हणत असते. परंतु असे म्हणून संबंध सुधारत नाहीत. भारतात येणा-या निर्वासितांबाबत बांगला देश कोणते धोरण स्वीकारतो, तेथील अल्पसंख्याकांना तो कसे वागवितो, यावरच बांगला देशाच्या मैत्रीची कसोटी लागणार आहे. या महत्त्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून जर कोणी असे सांगू लागेल, की गेल्या दोन वर्षांत आम्ही आमच्या सर्व शेजाऱ्यांबरोबर मैत्री स्थापन केलेली आहे, तर ती शुद्ध आत्मवंचना ठरेल. हा दृष्टिकोण चुकीचा आहे. कारण जनता सरकार अधिकारावर येण्यापूर्वी या देशाचे शेजाऱ्यांबरोबर चांगले संबंध नव्हते, असे या वक्तव्यातून सूचित केले जाते.

चीन हा आपला सर्वांत महत्त्वाचा शेजारी देश आहे. श्री. वाजपेयींच्या चीन-भेटीबद्दल माझी वैयक्तिक काहीच तक्रार नाही. त्यांनी चीनला जाऊन यायलाच हवे होते, असे

माझे मत आहे. दूरदर्शनावर बोलताना श्री. वाजपेयी म्हणाले, की 'परमेश्वराकडून बोलावणे आले नाही, तर आपण त्याच्याकडेही जाणार नाही. त्याचप्रमाणे सैतानाने बोलावले, तर आपण त्यालाही भेटू.'

कोणीही बोलावणे आल्याशिवाय परमेश्वराकडे जात नाहीच. श्री. वाजपेयींनाही ते बोलावणे लवकर येऊ नये, अशीच माझी इच्छा आहे. परंतु त्याचबरोबर त्यांनी सैतानाची भेट घेतानाही काळजी घ्यावी, असे मी मित्र म्हणून सुचवेन. केवळ आमंत्रण आले, म्हणून सैतानांच्या भेटीला जायची घाई करू नका.

चीनबरोबर मैत्री प्रस्थापित करताना आपल्याला बरीच सावधानता बाळगायला हवी. त्या देशाशी राजनैतिक संबंध पुन्हा प्रस्थापित करण्याचे कार्य मागच्या काँग्रेस सरकारनेच पार पाडले होते. त्यावेळी चीनमधील आणि अन्य आशियाई विभागातील वास्तव परिस्थितीचे आम्ही मूल्यमापन केले होते. या मूल्यमापनाला वास्तवाचा आधार होता. त्यानंतर चीन बदलला आहे, असे म्हणता येईल का? चीनसारख्या देशातील परिस्थितीचे खरेखुरे मूल्यमापन करायचे असेल, तर परराष्ट्रमंत्र्यांच्या चीन-भेटीनंतर पेकिंगमध्ये वा दिल्लीमध्ये काय सांगण्यात आले, यावर केवळ विसंबून चालणार नाही. चीन हा जागतिक राजकारणातील एक महत्त्वाचा देश आहे आणि मोठ्या देशासारखाच तो वागत असतो. तो अनेक दृष्टींनी मोठा आहे, हे तर खरेच आहे. परंतु प्रश्न असा आहे, की चीनला आपल्या शेजा-यासंबंधी काय वाटते? त्याचा जागतिक दृष्टिकोण काय आहे, हे अतिशय महत्त्वाचे प्रश्न आहेत आणि म्हणून चीनशी मैत्री करण्याची इच्छा बाळगणा-याला हे प्रश्न विचारात घ्यावेच लागतील.

जगाकडे पाहण्याचा चीनचा दृष्टिकोण कोणता आहे? तिसरे जागतिक महायुद्ध अपरिहार्य आहे, असे तो मानतो. त्याचा आंतरराष्ट्रिय सामंजस्यावर विश्वास नाही. तिसरे महायुद्ध झाल्याशिवाय क्रांतीला चालना देता येणार नाही, असे त्याचे मत आहे. चीनच्या जागतिक दृष्टिकोणाचा हा एक भाग झाला. चीनच्या

शेजाऱ्यांबद्दलच्या दृष्टिकोणात खरोखरच बदल झाला आहे काय? मला तसे वाटत नाही. चीनला शेजाऱ्यांसंबंधी काय वाटते, याचा भारताने १९६२ मध्ये अनुभव घेतलेला आहे. व्हिएतनामने अलीकडे तो १९७९ मध्ये घेतला. यावरून चीनच्या मनोवृत्तीत काहीच फरक पडलेला नाही, हेच सिद्ध होते. माओ आणि चौ एन् लाय निधन पावले असतील, म्हणून काय झाले? त्यांची जागा तेंग आणि हुआ यांनी घेतली आहे. शेजाऱ्यांकडे पाहण्याच्या चीनच्या दृष्टिकोणात मुळीच बदल झालेला नाही. तो आहे तसाच आहे.

१९६२ मधील युद्धानंतर दुस-या एका देशाच्या मंत्र्यांशी बोलण्याचा योग आलेला होता. कोलंबो योजनेचा विचार करण्यासाठी भरलेल्या परिषदेमध्ये त्याने भाग घेतला होता. त्याने मला सांगितले, 'मी ज्यावेळी चीनला गेलेलो होतो, तेव्हा राष्ट्राध्यक्ष लिऊ शाओची मला म्हणाले, 'भारत जर अजूनही धडा शिकलेला नसेल, तर आम्ही त्याला वारंवार धडा शिकवू, हे तुम्ही तुमच्या भारतीय मित्रांना जाऊन सांगा'. याचा अर्थ असा, की चीन वारंवार भारतावर आक्रमण करील. चीन शेजाऱ्यांकडे कोणत्या दृष्टिकोणातून पाहतो, याचा हा एक पुरावा आहे. आपल्या लहानमोठ्या शेजाऱ्यांना धडा शिकविण्याची चीनची नीती आहे. चीन हा जगातील मध्यवर्ती देश असून सा-या जगाने आपले ऐकले पाहिजे, असे चिनी नेते मानतात. चीनची ही मन:प्रवृत्ती आपण कधीही विसरता कामा नये. ती लक्षात घेऊनच आपण त्याच्याबरोबरचे संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

चीनने आधुनिकीकरणाचा दीर्घकालीन कार्यक्रम हाती घेतला आहे. उद्योगांचे आधुनिकीकरण, शेतीचे आधुनिकीकरण, तंत्रविज्ञानाचे आधुनिकीकरण आणि संरक्षणसिद्धतेचे आधुनिकीकरण ही भाषा चिनी नेते बोलत असतात. चीनने इ. स. २००० मध्ये काय साध्य करावे, याचा वेध घेऊन चिनी नेते काम करीत आहेत. तर आम्ही कशाचा वेध घेत आहोत? आपल्यापुढे असा कोणता विचार आहे? परराष्ट्रमंत्र्यांच्या चीन-भेटीने बरेच काही साध्य झाले आहे, असे मानूनच फक्त आम्ही स्वस्थ राहणार आहोत काय?

चीनबरोबर आपले संबंध सुधारले आहेत, असे पंतप्रधान म्हणाले होते. चीनने व्हिएतनामला 'धडा' शिकविल्यानंतरही त्यांचे हेच मत आहे का? एखाद्या पत्रकातील एखाद्या वाक्याचा आधार घेऊन निष्कर्षाप्रत येऊ नका. पंतप्रधानांना चीनसंबंधी खरोखरच काय वाटते? चीनशी मैत्री करण्यासाठी आपण जो पुढाकार घेत आहोत, त्यातून काही तरी साध्य होईल, अशी त्यांची कल्पना आहे काय? भारत आणि चीन यांच्यात लवकरच शांततेचा आणि मैत्रीचा करार होणार आहे, असे पंतप्रधानांच्या निवेदनावरून वाटू लागते. त्यामुळेच देशात भ्रामक आशावाद निर्माण झालेला आहे. वाजपेयींच्या चीन-भेटीचा जो गाजावाजा करण्यात येत आहे, त्यावरून भारत-चीन मैत्री करार ही आता काही दिवसांचीच बाब राहिली आहे, असा लोकांचा समज होण्यासारखा आहे. परंतु भारत आणि चीन यांच्या मैत्रीत अवघड प्रश्न गुंतलेले आहेत. चीनच्या दिशेने मैत्रीचा हात पुढे करण्यापूर्वी त्याचा शेजाऱ्यांबद्दलचा दृष्टिकोण आणि त्याचे आंतरराष्ट्रिय धोरण विचारात घेतले पाहिजे. हे मूल्यमापन अगदी स्पष्ट असले पाहिजे. तुम्ही जर खोट्या आशांचे इमले बांधून पुन्हा जुन्या भाईभाईच्या काळात जाणार असाल, तर आपल्या हातून पूर्वी जी चूक झाली, तिचीच पुनरावृत्ती होईल.

श्री. वाजपेयी यांच्या चीन-भेटीनंतर सोविएत रशियाचे पंतप्रधान कोसिजिन भारतात येऊन गेले, हे फार चांगले झाले. त्यावेळी भारत आणि सोविएत रशिया यांच्या दरम्यान अनेक करार झाले, याचाही मला आनंद वाटतो. त्यामुळे समतोल पुन्हा साधला गेला आहे. हे करार करण्यात ज्यांनी कोणी पुढाकार घेतला असेल, त्यांचे मी अभिनंदन करतो.

कोणत्याही देशाच्या परराष्ट्रिय धोरणाचे मूल्यमापन करताना अनेक निकष ध्यानात घ्यावे लागतात, हे मी प्रारंभीच म्हटले आहे. शेजाऱ्यांसंबंधीचे धोरण, हा एक निकष होय. भारत आंतरराष्ट्रिय क्षेत्रात काय करीत आहे, हा दुसरा निकष म्हटला पाहिजे. आंतरराष्ट्रिय क्षेत्रामध्ये भारताला दोन भूमिका बजावायच्या असतात. अलिप्ततावादी

आंदोलनाचा तो संस्थापक-सदस्य आहे, ही एक भूमिका, संयुक्त राष्ट्रसंघातील कार्य, ही दुसरी भूमिका. अलिप्ततावादी आंदोलनामधील भारताचा सहभाग फार महत्त्वाचा आहे. हे आंदोलन कसे कार्य करीत आहे आणि त्याची वाटचाल कोणत्या दिशेने करावी, यासंबंधी भारताला पुढाकार घ्यावा लागतो. जनता सरकारने गेल्या दोन वर्षांत अलिप्ततावादी आंदोलनाबाबत जे कार्य केले आहे, त्याबद्दल माझी काहीच तक्रार नाही. अलिप्ततावादी आंदोलनाच्या समन्वय समितीच्या आणि परराष्ट्रमंत्र्यांच्या सर्व महत्त्वाच्या बैठकांमध्ये नव्या सरकारने भाग घेतला आहे. अलिप्त राष्ट्रांची शिखर परिषद अजून व्हायची आहे. अलिप्ततावादी देशांच्या बैठकांमध्ये सरकारने योग्य वेळी योग्य भूमिका घेतली आहे. या क्षेत्रामध्ये नेहरू नी प्रवर्तित केलेले धोरण नवे सरकार कायम ठेवत आहे, हे चांगले आहे.

जनता सरकार अलिप्ततावादी आंदोलनामध्ये भाग घेत असले, तरी त्यासंबंधी ते साशंक आहे, असे वाटते. आम्ही खरोखरच अलिप्त आहोत, असे हे सरकार वारंवार जगाला आणि स्वत:लाही सांगत असते. ते नेहमी अलिप्ततावाद हा शब्द उच्चारण्यापूर्वी 'खराखुरा' हे त्याला विशेषण लावतात. जनता सरकार पाश्चिमात्य राष्ट्रांकडे झुकलेले आहे आणि त्यावर आवरण घालण्यासाठी ख-याखु-या अलिप्ततावादाचा जयघोष केला जातो. सरकार जेव्हा हा शब्द वारंवार उच्चारते, तेव्हा तर सरकारच्या अंत:स्थ हेतूंबाबतचा संशय अधिक बळावतो.

अलिप्ततावाद म्हणजे तटस्थता नव्हे. एका बाजूला सोविएत रशिया आणि दुस-या बाजूला अमेरिका, एका बाजूस एक मित्र आणि दुस-या बाजूला दुसरा मित्र म्हणजे अलिप्ततावाद नव्हे. ती एक विधायक संकल्पना आहे. अलिप्ततावादात साम्राज्यवाद आणि वसाहतवाद यांना विरोध करणे अभिप्रेत आहे. त्यामुळे सरकार साम्राज्यवादाविरुद्ध आणि वसाहतवादाविरुद्ध कोणती भूमिका घेते, यावरच ते अलिप्त आहे किंवा नाही, हे ठरत असते.

अलिप्ततावादाला आर्थिक आशयही आहे आणि त्या दृष्टीनेही भारत या आंदोलनाला साहाय्यभूत होऊ शकतो. विकसित आणि विकसनशील देशांमध्ये गेली

दहा वर्षे बोलणी चालू असली, तरी त्यांत विकसित देशांनी अडथळा आणलेला आहे. साधनसामग्रीच्या पुरवठ्याचा प्रश्न असो, कर्जफेडीबाबत सवलत देण्याचा प्रश्न असो किंवा आंतरराष्ट्रिय चलनव्यवस्था विकसनशील देशांना सोयीची ठरेल, अशा रीतीने तीत सुधारणा करण्याचा प्रश्न असो, विकसित देशांनी नेहमीच प्रतिकूल भूमिका घेतलेली आहे. म्हणून अलिप्ततावादी देशांनी सामूहिक स्वावलंबनाचा कार्यक्रम अंगीकारिला पाहिजे, असे कोलंबो येथे भरलेल्या अलिप्त राष्ट्रांच्या शिखर परिषदेत ठरविण्यात आले.

आपण जेव्हा देशाचा विचार करतो, तेव्हा राष्ट्रिय स्वावलंबनासंबंधी बोलतो, तसेच जेव्हा आपण अलिप्ततावादी आंदोलनासंबंधी बोलतो, तेव्हा सामूहिक स्वावलंबनाचा पुरस्कार करतो. भारताने या भूमिकेचा पाठपुरावा केला पाहिजे. भारत या बाबतीत पुढाकार घेऊ शकेल. कारण भारताची अर्थव्यवस्था समर्थ औद्योगिक आणि तांत्रिक पायावर उभी आहे. जनता सरकारला जर स्वावलंबनाचा विसर पडला आणि आतापर्यंत झालेली शास्त्रीय प्रगती त्याने उधळून लावली (आणि तसे होण्याचा संभव दिसत आहे.), तर आपण आपल्या अर्थव्यवस्थेचा मौलिक आधार गमावून बसू. तसे झाले, तर भारताची फार मोठी हानी होईल. म्हणून आम्ही सरकारला तसे करू देणार नाही. आपण आपल्या औद्योगिक प्रगतीबाबत स्वावलंबी राहिलेच पाहिजे.

अलिप्ततावाद ही परराष्ट्रिय धोरणातील आत्मनिर्भरता आहे. आधुनिकीकरणासाठी विज्ञान आणि तंत्रविज्ञान यांच्या बाबतीतही आपण आत्मनिर्भर राहिलेच पाहिजे. या महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीचे सरकारचे धोरण लोकांना कळले पाहिजे. भारत शांततामय उपयोगासाठीही अणुस्फोट करणार नाही, असे पंतप्रधानांनी जाहीर केले, तर परराष्ट्रमंत्र्यांची भूमिका नेमकी विरुद्ध आहे. म्हणून सरकारने आपली भूमिका जाहीर केली पाहिजे. याबाबत सरकार काय करू इच्छीत आहे, हेही कळायला हवे. जर शांतता कार्यासाठीही अणुस्फोट करायचाच नाही, अशी सरकारने भूमिका घेतली असेल, तर अणुविज्ञानामध्ये आपली प्रगती होणार नाही. ही अशी भूमिका भारतीय

जनतेला मुळीच मान्य होणार नाही. अणुऊर्जेचा शांततामय कार्यासाठी उपयोग करण्याचा आपल्या देशाला संपूर्ण अधिकार आहे.

संयुक्त राष्ट्रसंघामधील भारताची भूमिका हा परराष्ट्रिय धोरणाच्या दृष्टीने दुसरा महत्त्वाचा मुद्दा आहे. कारण या आंतरराष्ट्रिय व्यासपीठावर आपण शक्यतो दूर राहावे, असे मानणारा आपल्या परराष्ट्रमंत्रालयात एक गट आहे. आपण सुरक्षा समितीत स्थान मिळविण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे, असे माझे मत आहे. कारण त्यामुळे अनेक आंतरराष्ट्रिय प्रश्नांबाबत भारताला परिणामकारक मतप्रदर्शन करता येईल. आतापर्यंत अनेक प्रसंगी भारताने योग्य निर्णय घेतलेले असल्यामुळे आंतरराष्ट्रिय व्यासपीठावर भारताच्या मताला मान दिला जातो. इतर काही देशांच्या तुलनेने भारतापाशी प्रचंड लष्करी वा आर्थिक सामर्थ्य नाही. (अर्थात भारताची आर्थिक प्रगती मुळीच उपेक्षणीय नाही) तरी देखील संयुक्त राष्ट्रसंघामध्ये भारत काय म्हणतो, इकडे इतर देश उत्सुकतेने लक्ष देत असतात.

भारताचे अमेरिकेबरोबरचे संबंध चांगले आहेत, ते सुधारतही आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष इकडे येऊन गेले आणि आपल्या पंतप्रधानांनी अमेरिकेला भेट दिली. परराष्ट्रमंत्री जेव्हा संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीत जातात, तेव्हा ते इतर परराष्ट्रमंत्र्यांना भेटतात. त्याबाबत मला एक धोक्याचा इशारा द्यावासा वाटतो. आपण जेव्हा बड्या देशांबरोबरच्या चांगल्या संबंधांबाबत बोलतो, तेव्हा हे बडे देश म्हणजे अंत:करण नसलेली यंत्रे आहेत, हे आपण विसरता कामा नये. ते केवळ आपले हितसंबंधच जाणतात - केवळ राष्ट्रिय हितसंबंध नव्हेत, तर जागतिक हितसंबंधही. हे सोविएत रशिया, अमेरिका आणि चीन या सगळ्यांच्या बाबतीत खरे आहे. हे तिन्ही देश आपले राष्ट्रिय आणि जागतिक हितसंबंध ध्यानात घेऊनच निर्णय करीत असतात.

अमेरिकेच्या जागतिक विचारामध्ये भारताला कितपत महत्त्वाचे स्थान आहे? अमेरिकेपुरते बोलायचे, तर तिच्या जागतिक विचारामध्ये भारताचा क्रमांक बराच

खालचा लागतो. सांस्कृतिक, आर्थिक आणि औद्योगिक प्रश्नांचा विचार करण्यासाठी आपण भारत-अमेरिका संयुक्त आयोग स्थापन केले आहेत. ही चांगली गोष्ट आहे. या आयोगांचे कामही ठीक चालले आहे. परंतु जेव्हा अणुविज्ञानासारखा महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो, तेव्हा बडे देश भारतासंबंधी मुळीच अगत्य दाखवीत नाहीत. ते आपल्याला तुटक पत्रे लिहून काय करावे, यासंबंधी उपदेश करू लागतात. प्रत्येक देशासंबंधीचा अग्रक्रम भू-राजनैतिक दृष्टिकोणातून ठरविला जातो. भू-राजनैतिक दृष्टीने भारताला कोणता क्रम मिळतो? हा घटक आपण नीट लक्षात घेतला, तरच बड्या देशांशी आपण संबंध प्रस्थापित करू शकू. केवळ नेत्यांच्या भेटीगाठी आणि आयोगांच्या बैठकी यांतून काहीच निष्पन्न होणार नाही. आंतरराष्ट्रिय राजकारण हा जागतिक मुत्सद्देगिरीचा खेळ असतो आणि मुत्सद्द्यांची भाषा सगळीकडे सारखीच असते.

यासंबंधात दिएगो गार्सिया प्रश्नाचा विचार केला पाहिजे. जर अमेरिका हिंदी महासागरातील तटवर्ती देशांची खरीखुरी मित्र असती, तर तिने आपण होऊन दिएगो गार्सिया येथला नाविक तळ काढून घेतला असता. हिंदी महासागराबाबत आपण इतर देशांशी चर्चा करायला तयार आहोत, असे रशियाने जाहीर केले आहे. हिंदी महासागरात इतर देशांच्या नौका नुसती वाहतूक करीत असतील, तर त्यांना कोणीच आक्षेप घेणार नाही. कारण प्रत्येक देशाला जगभर संचार करायला अधिकार आहे. हिंदी महासागर हा त्याचा एक खुला रस्ता आहे. परंतु अमेरिकेने या महासागरात आपला लष्करी तळ उभारावा, याला आमचा विरोध आहे. तो तळ केवळ भारतालाच नव्हे, तर या विभागातील सर्व देशांना दहशत ठरू शकतो. आफ्रिका, इराणच्या आखातातील देश, भारत, पाकिस्तान आणि आग्नेय आशिया एवढ्या मोठ्या भूभागावर जरब बसविणे हा या तळाचा उद्देश आहे. म्हणून या तळाचा धोका आफ्रिकी देशांना आहे. सुएझ कालव्याच्या दोन्ही बाजूंकडील देशांना आहे, आखातातील देशांना आहे आणि सर्वांत महत्त्वाचे, म्हणजे तो भारतासही आहे.

जनता सरकार जर 'खरेखुरे' अलिप्ततावादी असेल, तर दिएगो गार्सियाबाबत ते

कोणती भूमिका घेते, यावर त्याच्या अलिप्ततावादाची कसोटी लागणार आहे. त्यांनी अमेरिकन नेत्यांशी या बाबतीत चर्चा केली पाहिजे. सर्वच बड्या देशांशी वागताना काळजीपूर्वक पावले टाकली पाहिजेत. विशेषत:, अमेरिकेच्या बाबतीत तर आपल्याला फार जागरूक राहायला हवे. कारण आपल्या मागच्या दाराशीच तिचा लष्करी तळ आहे. रशियाचे नौदलही हिंदी महासागरात येत असते, असे काहीजण सांगत असतात. हिंदी महासागरात रशियाचाही वावर असतो, हे खरे आहे. प्रत्येक बडा देश सा-या जगाला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत असतो. हिंदी महासागर त्याला अपवाद नाही.

पण महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की हिंदी महासागरात तळ कोणाचा आहे? रशियाने तेथे तळ उभारलेला नाही. अमेरिकेने मात्र उभारलेला आहे. आणि म्हणून अमेरिकेबरोबरच्या संबंधाची दिशा आणि स्वरूप ठरविताना ही गोष्ट आपण सतत ध्यानात ठेवली पाहिजे.

मी जनता सरकारवर केवळ टीका करण्यासाठी ही टीका केलेली नाही. आपल्या परराष्ट्रिय धोरणाची आखणी करताना आपल्या राष्ट्रिय हितसंबंधांचे आपल्याला विस्मरण होता कामा नये, या हेतूनेच हे विश्लेषण केलेले आहे.